# हिंदुस्थानांतील तारा.

हें

पुस्तक करणार

साळुबाई भ्रतार भाऊसाहेब तांबवेकर.

किंमत दोन रुपये.

# हिंदुस्थानांतील तारा.

हें पुस्तक

**साळुबाई भ्रतार भाऊसाहेब तांबवेकर**

यांणीं तयार केलें

तें

स्वकपोलकल्पित फारच मनोरंजक, गोड, अति रसभरित, कादंबरी, रसिकांकरितां तयार केली आहे. तिजसंबंधी सर्व हक्क पुस्तक करणारणीनें आपणाकडेस ठेविले आहेत.

पुणें येथें

“जगद्धितेच्छु” छापखान्यांत छापिलें आहे.

---



मि० पौष वद्य १० शके १८१६.

---

किंमत दोन रुपये.

# ईशस्तव
## व
## प्रस्तावना.

श्रीगणपति हें स्मरतां तो हरि विघ्नें समस्त भक्तांचीं ॥
वक्त्याला यश द्याया धाव हि घे सुप्रसन्न वक्ताचि ॥ १ ॥
श्रीकृष्णा तव चरणीं शिर माझें हें सदैव गा आहे ॥
रसरंगादिक कविता करण्या मति मागते सदा बाहें ॥ २ ॥
बा हे दीनापरि मी कर जोडुनि विनवितेंचि दिनरात्रीं ॥
वर दे पुरवी आशा हें श्रम मी अर्पितेचि सत्पात्रीं ॥ ३ ॥
सत्पात्रीं मम कविता व्हावी जगिं मान्यता बहू माझी ॥
नरपशुमध्यें गणना झाली आहेचि मुख्य हा वाजी ॥ ४ ॥
हा वाजी इंद्राचा इंद्रापरि यश सदैव मज द्यावें ॥
तल्लिप्सा नच करितें प्रभु मम वक्त्रि हें तुझेचि गुण यावें ॥ ५ ॥
गुण यावे मुखिं माझ्या त्वद्यशगानें जगीं ध्वजा लागो ॥
वागो सज्जनहृदयीं मच्छ्रम हे दुर्गुणा प्रति त्यागो ॥ ६ ॥
त्यजतिल दोषां यांतिल विनवणि बंधुभगिनीस करितें मी ॥
वांच्छित तत्प्रेमाला तुमच्या साह्यास योग्य हरास नमी ॥ ७ ॥
नमिती हरास अवघे चव घेण्या हाल असें कसें उरलें ॥
भरलें असूनि सुगुणी महदाश्रय भूषणांत तें शिरलें ॥ ८ ॥
राधाविलास रमणा सुमना परि अर्पिते मी या आर्या ॥
सुजनीं यश मज द्यावें चिंता मज निशि दिनीं अहो आर्या ॥ ९ ॥
कमलाप्रिय हे विष्णो कमला परि नेत्र तूं मला दे गा ॥
कमलाक्ष धाव आतां कमलासदनीं सदा असोंदेगा ॥ १० ॥
श्रीशंकर गिरिजापति याचे चरणारविंदिं शिरकमला ॥
ठेउनि प्रार्थित गंगा बापा यश देइ माझिया कृतिला ॥ ११ ॥
माता तात गुरू जो कुलदैवत अंबिका असें चार ॥
कविता आरंभितें मी यश देई हा असेचि सुविचार ॥ १२ ॥

आर्यजनाला प्रार्थुनि करितें आरंभ आर्यग्रंथास ॥
ईश्वर साह्य असो मज कविता लक्षित पदेंचि बहुभास ॥ १३ ॥
ताता वंदन करितें ईशा संपूर्ण पूर्ण कर हेतु ॥
सत्कीर्ति मिळवाया वर दे अपुल्या तडीस ने हें तूं ॥ १४ ॥

॥ पद ॥

ध्यावा सांब सदाशिव हो ॥ ध्रु० ॥ ज्याला ध्यातां विघ्नें
हरि तो ॥ तापहि दूर करि हो ॥ १ ॥ ध्या० ॥ ब्रह्मा
विष्णु शिव सखा तो ॥ स्वरूपीं एकचि हो ॥ २ ॥ ध्या० ॥
शिरि वाहण्याची त्या नामाचीं ॥ चरणी लीनचि हो ॥३॥ ध्या०॥

अहा–पहा. हा काय चमत्कार आहे बरें? या मृत्यु लोकांत स्वेच्छेप्रमाणें कोणत्याही सुखाचा प्राणिमात्रास अनुभव घेतां येत नाहीं. आतां आपण असा विचार मनांत आणला कीं, सुख म्हणजे विषयसेवा, हें ऐहिक होय. पारलौकिक सुख स्वर्गादिक आहे असें शास्त्र सांगतें. परंतु तें दृष्टिगोचर नसल्यामुळें अर्वाचीन कित्येक आंग्लभाषाभिज्ञ विद्वान म्हणविणाऱ्या लोकांस अविश्वसनीयत्वाचा भास होत आहे त्याच्या सत्यमिथ्यात्वाचा विचार करूं लागल्यास शास्त्र हेंच प्रमाण आहे असें मानून चालल्यावांचून निर्वाह नाहीं. ऐहिक सुख काय आहे तें सर्वानुभूत आहेच. त्यांत विषयेच्छेच्या पूर्णत्वानें सुखाचा लाभ होतो अशाविषयीं जनांचा ग्रह आहे. परंतु महाभारतांत ययाती राजानें एका श्लोकांत आपला अनुभव सांगितला आहे.

॥ श्लोक ॥

यत्पृथिव्यां व्रीहियवं हिरण्यं पशवः स्त्रियः ॥
नालमेकस्य तत्सर्वमिति मत्वा शमं व्रजेत् ॥ १ ॥

अर्थ—या पृथ्वीमध्यें सर्व धान्य, धन, पशु, स्त्रिया, आदिपदानें जितके भोगार्ह पदार्थ आहेत तितक्या वस्तूंचा उपभोग एका मनुष्यास होणें दुःशक आहे असें मानून शांतीचा अवलंब करावा.

या वचनाधारें असें दिसून येत आहे कीं सर्व जातींच्या विषयोपभोगाविषयीं भोक्त्याला भोगाविषयीं असावें तितकें बल नाहीं ह्मणजे ज्या इंद्रियाकडून जितकें परिमित विषयाचें सेवन होतें त्यापेक्षां त्या इंद्रियानेंच

त्याच विषयाचे लक्षपट अधिक सेवन व्हावें अशाविषयींचा समज असतो तो चुकीचा असावा असें वाटतें.

याविषयीं प्रमाणभूत वाक्य आहे तें असें:—

न जातु कामःकामानामुपभोगेन शाम्यति ॥
हविषा कृष्णवर्त्मैव भूय एवाभिवर्धते ॥ १ ॥

**अर्थ**—विषयाच्या सेवनानें विषयभोगाची इच्छा कधींही पूर्ण होत नाहीं. जसें घृतादिक स्निग्ध पदार्थांच्या संयोगानें अग्नि अधिकाधिक वाढतो. त्याप्रमाणें विषयसेवेनें विषयेच्छा वृद्धिंगत होते. व त्या विषय-भोगाकरितां किती महत्त्वाचीं साधनें करावीं लागतात ही गोष्ट सर्वानुभूत असल्यामुळें फारसें येथें वर्णन करण्याचें कारण दिसत नाहीं. तथापि त्या-गार्थ विषयांचें दिग्दर्शन करितें.

पहा विषयांचें इतकें महत्त्व आहे कीं जितेंद्रिय पुरुषही त्यांचें स्वाधीन झालेले दृष्ट, श्रुत आहेत. तद्विषयक भर्तृहरीनें वर्णन केलें आहे तें असें.

॥ श्लोक ॥

**भर्तृहरी**—विश्वामित्रपराशरप्रभृतयो वातांबुपर्णाशना ॥
स्तेऽपि स्त्रीमुखपंकजं सुललितं दृष्ट्वैव मोहं गताः ॥
स्वाद्वन्नं सघृतं पयोदधियुतं भुंजंति ये मानवा ॥
स्तेषामिंद्रियनिग्रहो यदि भवेद्विंध्यस्तरेत्सागरं ॥ १ ॥

**अर्थ**—वायु, जल, वृक्षांचीं गलितपानें यांचा आहार करणारे परम तपस्वी विश्वामित्र, पराशर आदि ऋषीही दर्शनीय असें स्त्रियांचें मुखक-मल पाहूनच मोहाच्या स्वाधीन झाले. मग जे कोणी मनुष्य दूध, दधि, घृतादिस्निग्ध पदार्थांनीं युक्त अशा गोड अन्नाचें भोजन करितात, त्यांस केव्हां इंद्रियनिग्रह घडेल तो सांगतात. जेव्हां समुद्राच्या जलावर विंध्य पर्वत तरून राहील तेव्हां अन्नभक्षण करणाऱ्या पुरुषांस व स्त्रियांस आ-पलीं इंद्रियें आपल्या स्वाधीन ठेवितां येतील. या वाक्याधारानें असें दि-सून येत आहे कीं प्राचीनकालच्या परमर्षींसही इंद्रियनिग्रह करणें क-ठिण वाटत असे. अर्वाचीन कालांत इंद्रियनिग्रह ह्मणजे काय पदार्थ आणि त्याचा उपयोग कशाबरोबर करावयाचा हें सर्व आंग्लविद्वानांस विशेष ज्ञात आहेच, तथापि तें आपल्याकडून होईल तितकी खटपट करून आ-पले पूर्वजांस स्वदेशीय विषयांच्या सेवनाच्या लागलेल्या घाणेरड्या व्यसना-

पासून आपणास सोडवून घेऊन द्विपांतरस्थाप्रमाणें देशांतरीय व्यसनानंदांत निमग्न करून घेतात ही एक माणऱ्यासारखी अभिनंदनीय गोष्ट असेल काय?

आमच्या हिंदुधर्मशास्त्रांत असें सांगितलें आहे कीं, कामादिक टाकावेत याचें कारण काय तें दाखवितें. अध्यात्मरामायण.

क्रोध एष महान् शत्रुस्तृष्णा वैतरणी नदी ॥
संतोषो नंदनवनं शांतिरेव हि कामधुक् ॥ १ ॥

**अर्थ**—बाह्य शत्रुपेक्षां क्रोध हा अंतः शत्रु फार मोठा आहे, यमलोकाच्या मार्गामध्यें जशी वैतरणी नदी भयंकरी आहे त्याप्रमाणें तृष्णा म्हणजे आशा भयंकर व अपारावार आहे. इंद्रास संतोष करणारें जसें नंदनवन होय, त्याप्रमाणें संतोष हाच नंदनवन आहे. शांति ही कामधेनुप्रमाणें इच्छित फल देणारी आहे तरी अशांचा आश्रय करणें विशेष श्रेयस्कर आहे असें मला वाटतें.

वर सांगितल्याप्रमाणें समाधानवृत्ति माझी सदैव असावी अशाविषयीं मीं उद्योग करून पाहिला. परंतु तो व्हावा तसा साध्य झाला नाहीं. तथापि तो सफल कशा रीतीनें होईल अशा चिंतेंत मी गुंग होऊन बसले होते तो माझ्या सुदैवानें मला श्रीहरीचें स्मरण झालें.

केका.

अहा भुवनपालका करिं स्तुति मि विश्वंभरा ॥
धरा मम कराग्रहे झडकरी मला उद्धरा ॥
सदां पदिं मि मागतें प्रभुवरा तुझा आसरा ॥
त्वरीत परि ने तडी सदय हो नको ती जरा ॥ १ ॥
दयानिधि करी कृपा खचित मी असें लेंकरूं ॥
उपाय न सुचे मला तुजविणें कशी मी तरूं ॥
सहाय करि सत्वरीं पसरि तोंड दीनोद्धरा ॥
अल्या शरण रक्षणें तुजसि योग्य लक्ष्मीवरा ॥ २ ॥
प्रभो दिलिस काय तूं आणविलेंस या संभ्रमीं ॥
लढोनि मज दाविलें अभय हें असे व्यग्र मी ॥
परंतु मन नावरे अवरितें जगच्चालका ॥
मुखाब्ज तव लोकिल्याविण नसे मना भावुका ॥ ३ ॥
न तात आणि माय ही भरंवसा तुझा हा मला ॥

मनांत बहु जोडिला प्रभुजि आसरा चांगला ॥
जनांत अति गांजलें परि सुखावलें कीर्तनीं ॥
स्मरारि स्मरतां मनीं निशिदिनीं वसें नादिनी ॥ ४ ॥
अगाध तव सद्यशा विकथनीं नसें मी पुरी ॥
स्वरूप तव लोकण्या हृदयिं झाले मी घाबरी ॥
करोनि नवसास ही परि नसें तया भावना ।
ह्मणोनि प्रभु प्रार्थितें पसरली जगीं कामना ॥ ५ ॥

याप्रमाणें सृष्टीची उत्पत्ति, स्थिति, लय करणाऱ्या ईश्वराचें व माता, पिता, गुरु यांचें स्तवन करून या सर्वांचें साह्य मिळावें तरच हा लेखनारंभ पूर्णतेस जाईल अशी आशा धरून मी सर्वांस वंदितें. ते सर्व माझे मनोरथ पूर्ण करोत.

मनुष्यानें आपली बुद्धि चांगल्या मार्गाकडे वळविली पाहिजे म्हणजे जसें ज्या वर्णाच्या मनुष्यास वैद्य आचार शास्त्रांत सांगितले आहेत त्याप्रमाणें अधिकारपरत्वें वर्तन केलें असतां त्या मनुष्याचें मन कधींही अमार्गाकडे वळावयाचें नाहीं याविषयीं सुभाषितामध्यें एके ठिकाणीं सांगितलें आहे.

**सुभाषित**—दृष्टिपूतं न्यसेत्पादं वस्त्रपूतं जलं पिबेत् ।
शास्त्रपूतां वदेद्वाचं मनःपूतं समाचरेत् ॥ १ ॥

**अर्थ**—मार्गानें चालतांना जमिनीकडे खालीं पाहून नंतर पाऊल टाकावें ह्मणजे किडे, मुंगी वगैरे क्षुद्र प्राण्याचा नाश होत नाहीं. वस्त्रानें पाणी गाळून प्याल्यानें मैल पोटांत जात नाहीं व जलावरचे अल्प प्राणीही मरत नाहींत. शास्त्रानें पवित्र झालेल्या वाणीनें बोलावें ह्मणजे त्या वाणीनें कधींही कोणाचे अंतःकरणास दुःख होणार नाहीं. त्याचप्रमाणें मनानें जी गोष्ट पवित्र मानली ती करावी. या स्थळीं याचा अर्थ असा आहे कीं, शास्त्रसंस्कृत ज्याचें मन झालें असतें त्याचे हातून ज्या गोष्टी घडतात त्या कधींही अन्यायाच्या घडावयाच्या नाहींत. आतां प्रापंचिक मनुष्यांस कधीं कधीं सुख व दुःख भोगणें भाग पडतें, मग तो मनुष्य विद्वान् असो अथवा अविद्वान् असो त्याला अडचणी येणारच. याचें कारण असे आहे कीं, मनुष्यांचें जन्मच मुळीं पुण्य व पापाच्या मिश्रणानें होत आहे त्यामुळें त्याच्या स्थितिकाळांतही तत्फलें ह्मणजे सुखदुःखें भोगावीं लागतात.

याविषयीं श्रीमद्भागवतांत भीष्माचार्यांनें धर्मराजास असें सांगितलें
आहे कीं,

यत्र धर्मसुतो राजा गदापाणिर्वृकोदरः ॥
कृष्णोऽस्त्री गांडिवं चापं यतः कृष्णस्ततो विपत् ॥ १ ॥

अर्थ--धर्मासारखा नीतीनें राज्य करणारा राजा, गदेनें युद्ध करणारा
भीमसेन, अर्जुनासारखा अस्त्रवेत्ता, साक्षात् जिकडे श्रीकृष्णाचा आश्रय,
अशा सर्व गोष्टी अनुकूल असून तरी पांडवांना संकट आहेच.

यावरून असें दिसतें कीं पुण्यपापांचे मिश्रणानें जसें मनुष्य. जन्म
शास्त्रप्रसिद्ध आहें त्याच क्रमानें सुखःदुखें भोगावीं लागतात.

याविषयीं भीष्माचार्यांनें भागवतांत धर्माला असा उपदेश केला
आहे कीः—

सर्वकालकृतं मन्ये भवतांच यदप्रियं ॥
सपालो यद्वशे लोको वायोरिव घनावलिः ॥ १ ॥

अर्थ—मला असें वाटतें, तुह्मास जीं संकटें प्राप्तझालीं तीं सर्व काला-
च्या योगानें झालीं आहेत. कारण ज्या कालाच्या स्वाधीन इंद्रादिक आ-
ठदिशांच्या लोकपालांसुद्धां सर्व लोक आहेत. जसें वायूच्या पारतन्त्र्यामुळें
जिकडे वायु जाईल तिकडे मेघमंडलास जाणें भाग पडतें.

असो. आतां मनुष्यजन्मास आलेल्या प्राण्यांनीं आपलें कर्तव्य शक्त्य-
नुसार केलेंच पाहिजे तें कोणतें असा प्रश्न सहज उत्पन्न होतो. परंतु पर-
मेश्वरानें मनुष्य कशाकरितां उत्पन्न केला याविषयीं भागवतांत चार का-
रणें सांगितली आहेत. ‘ मात्रार्थ ’ ह्मणजे धर्म प्राप्त विषयभोग करण्या-
करितां ‘ भवार्थ ’ ह्मणजे जन्मापासून सशास्त्रकर्मे करण्याकरितां ‘ आत्मने ’
ह्म० कर्माप्रमाणें स्वर्गादिक लोकांत जाऊन सुखें भोगण्याकरितां. ‘ अक-
ल्पनाय ’ ह्मणजे जन्ममरणापासून सुटण्याकरितां ह्म० मोक्ष प्राप्ति करून
घेण्याकरितां. वर दाखविलेलीं जीं चार कारणें आहेत यांचें पूर्णपणें ज्ञान
होण्याकरितां प्रत्येकास व विद्येची सुसंगतीची अत्यावश्यता आहे हें
सांगणें नकोच. आतां विद्या ह्मणजे काय व तिचीं साधनें व फलप्राप्ती
कोणती असा आक्षेप उत्पन्न झाला आहे यांचें निरसन खालीं लिहिल्या
प्रमाणें—

कालिदासः—

काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये ।
सद्यःपरनिर्वृतये कांतासंमिततयोपदेशयुजे ॥

**अर्थ**—काव्याच्या ह्म० कविकृत इतिहासांच्या ज्ञानानें यश, व्यवहारचातुर्य, पापनाश, व परमेश्वर प्राप्ती, हीं तत्काळ प्राप्त होतात जशी स्त्री आपले पतीस कल्याणाचा उपदेश करतें त्याप्रमाणें काव्य होय.

या वाक्यावरून सकल विद्या व सकल कला यांचा समावेश होतो. मात्र ज्याच्या योगानें ऐहिक ह्म० इहलोकसंबंधीं व पारकीय ह्म० परलोक संबंधीं ज्ञान व सुख मिळतें. प्रस्तुत साधनाचा विचार केला तर शिक्षण क्रम ज्याप्रमाणें आहे त्याप्रमाणें ज्ञान व तदनुयांयीची संगती तद्द्वारा-व्यसनावाप्ति वगैरे अनेकानर्थपरंपरा वाचकाचे दृष्टीस येतच आहे. याकरितां शिक्षणक्रम असा असावा कीं, बालपणांत मुलांची धर्मावर पूज्य बुद्धि उत्पन्न होण्याकरितां ज्या जातींचीं मुलें असतील त्या जातींतील जे धर्मबोधक ग्रंथ आहेत त्यांचा अभ्यास चांगल्या रीतीनें करवून त्यांची बुद्धि धर्माचरणाकडे दृढ झाल्यानंतर मग उदरपोषणाकरितां ज्या कालांत ज्या भाषेची गरज असेल त्या भाषेचें ज्ञान होण्याकरितां यत्न करवावा ह्मणजे स्वधर्मनिष्ठेत सुटणार नाहीं. प्रस्तुत तसें न होतां असा उलट प्रकार घडतों कीं, बालपणांत बुद्धीची कोमल ग्रहणशक्ति असून त्यांत स्वधर्माचे उलट नेहमीं शिक्षणक्रम असतो ह्म० जें पुस्तक मुलांनीं वाचावें त्याचे त्यांत स्वधर्माचा उपदेश नसून उलट परधर्मी लोकांच्या कथा व इतिहास असें असून धर्मनिष्ठतेबद्दल मुळींच उदाहरण नसते, या कारणानें मुलें अर्वाचीनकालीं अशिक्षित होऊन थोरपणीं व्यसनार्णवांत निमग्न होऊन शिक्षणास हास्यास्पद करून आपणही होतात.

विद्येनें मनुष्यें कशी शोभतात तें खालीं पाहा—

वृद्धाचाणाख्य—

रूपयौवनसंपन्ना विशालकुलसंभवाः ॥
विद्याहीना न शोभंते निर्गंधा इव किंशुकाः ॥ १ ॥

**अर्थ**—रूपानें तारुण्यानें युक्त व चांगल्या कुलांत उत्पन्न झालेले असेही पुरुष विद्येवांचून शोभत नाहींत. जसें सुगंधरहित पलाशपुष्पें शोभत नाहींत. त्याप्रमाणें—

अशा स्वधर्मनिष्ठतापुरःसर विद्यासंपादनाकडे व शिक्षणक्रमाकडे आमचे देशबांधव लक्ष देतीलच अशी माझी आशा आहे:—

वर सांगितल्या महत्त्वांत माझी गणना कशी करावयाची याचा विचार करणें मला अशक्य आहे तरी चार ओळी लिहितें. अर्वाचीनकालीं स्त्रीशिक्षण ह्मणून जो क्रम सुरू आहे, त्यांत बऱ्याच आमच्या भगिनी सुशिक्षित झाल्याचे दृष्टीस पडतें परंतु चालू स्त्रीशिक्षणाचा क्रम बरोबर नाहीं अशी कित्येक सुजन लोकांचे ओरड कानावर येत आहे. त्यांत कांहीं अंश खरा आहे असें भासतें तें खालीं पाहा.

**वृद्धाचाणाख्य**--

सा भार्या या शुचिर्दक्षा सा भार्या या पतिव्रता ॥
सा भार्या या पतिप्राणा सा भार्या सत्यवादिनी ॥ १ ॥

**अर्थ**—जी पवित्र, चतूर, पतिव्रता, पतिस प्रिय, सत्य भाषण करणारी तीस भार्या असें ह्मणावें.

अर्वाचीनकालीं आमचे भगिनीकडे या अर्थाचा उपयोग करावयाचा ह्मटलें ह्मणजे "या अशुचिः" अशीं पदें या वाक्याचीं करून चालावें व चार ठिकाणीं 'भार्या' अशीं पदें आलीं आहेत. त्याचा उपयोग अर्वाचीनकालीं असा करावा कीं "भृयते पत्यादिर्यया" ह्म० जिचेकडून पति आदि स्वजनास महत्त्व येतें. बाकीचीं पदें अकार प्रश्लेषानें ह्म० वाक्याची योजना अर्वाचीन कालास अनुसरून शोभणारी होईल.

असो स्त्रीयांना साधारण लिहितां, वाचतां, व कामापुरतें गणित करतां यावें ह्मणजे बस्स आहे. अधिक शिक्षणाचा स्वीकार करून स्त्रीजातीचे नेत्रकमलांत वास करणारी लज्जारूप लक्ष्मी आपले पित्याकडे उलट पोंचविण्यापेक्षां वर सांगितलेलें अल्प शिक्षण बरें ? माझें हें लेखनक्रमाचें साहस कितपत तडीस जाईल तें पाहावें ह्मणूनच मीं हें पुस्तक हातीं धरलें आहे.

॥ श्लोक ॥

**कुमारसंभव**--

सहसा विदधीत न क्रियामविवेकः परमापदां पदं ॥
वृणुते हि विमृश्यकारिणं गुणलुब्धाः स्वयमेव संपदः ॥ १ ॥

**अर्थ**--साहसपणानें कामें करूं नयेत. केलीं असतां संकटें प्राप्त होतात. विचार करणाऱ्या पुरुषांस गुणलुब्ध अशा संपत्ति आपले आपण

वरितात. असें समजूनही मी हें पुस्तक लिहित आहें व यास यशदेणारा प्रभु समर्थ आहे.

या पूर्वीं मीं " चंद्रप्रभा विरहवर्णन " या नांवाचें पुस्तक रचून प्रसिद्ध केलें आहेच. तें आमचे वाचकांस कितपत पसंत झालें असेल तें मला समजलें नाहीं; तत्रापि तो माझा पुस्तक रचण्याचा प्रथमच प्रयत्न असल्यामुळें, मी स्त्रीशिक्षणक्रमाप्रमाणें अनधीत असल्याकारणानें व स्त्रीसमाजांत वक्तृत्वानभिज्ञ असल्यामुळें बराच कमी जास्त प्रकार झाला आहे व तो अधिक होण्याचें कारण असें झालें कीं, तें पुस्तक छापण्यास सुरू केल्यानंतर मी आजारी पडलें होतें. त्या आजारीपणांत माझी बुद्धि बरीच अस्वस्थ झाली होती. यामुळें त्या पुस्तकांत बऱ्याच चुका राहिलेल्या वाचकांचे ध्यानांत आल्याच असतील.

हल्लीं तसा इतर लोकांवर भरंवसा न ठेवितां फार काळजी ठेवून परिश्रम घेऊन हें पुस्तक चांगलें शुद्ध छापावें असा मीं निश्चय केला आहे.

या पुस्तकाचें नांव " हिंदुस्थानांतील तारा " असें ठेविलें आहे. यांत सुरस संस्कृत श्लोक, पदें, आर्या, प्राकृत श्लोक, अंजनीगीत, दोहरे, साक्या, दिंड्या, ठुंबऱ्या, दादरे, अभंग, यांपैकीं कांहींचे राग व ताल स्पष्ट करवतील तितके केले आहेत. यांत स्वकृताचाच समावेश अधिक केला आहे. या पुस्तकाचे भाग नऊ केले आहेत. तरी अशा पुस्तकापासून आमचे देशभगिनींचा विशेष उपयोग व्हावा व देशबांधवांचें मनोरंजन व्हावें, या उमेदीनें मीं परिश्रम केले आहेत. तरी या पुस्तकास पूर्ण आश्रय देणें हें त्यांचें कर्तव्यच आहे. तें केल्यावांचून वाचक राहणार नाहींत ही माझी विनंति आहे.

# हिंदुस्थानांतील तारा.

## भाग १ ला.

कोणी एक स्त्री जहाज फुटून एका समुद्राचे किनाऱ्यास लागते न लागते इतक्यांत मोठें वायधूळ येऊन समुद्रास मोठी भरती आली. व समुद्राच्या मोठ्या लाटेसरशी ती फिरून पुन्हां पाण्यांत गेली. ज्या स्त्रीस वारा व ऊन कधींही माहीत नाहीं, तिची अशा समुद्रांत काय दशा झाली असेल? याचा, वाचकहो, तुम्हीच विचार करा. वरचेवर ती बुडे व लाटेसरशी वर येई, असें करितां करितां, तिला एक फळी सांपडली. बहुशा ती अर्धीमेली झालीच होती. ती त्या फळीच्या आधारानें बरीच दूर गेली. ती अशा दुःखांत मरणोन्मुख झाल्यामुळें तिला आपल्या सर्व आप्तांचें व विशेषेंकरून भ्रतारांचें स्मरण होऊन, तिनें परमेश्वराची स्तुति केली व समुद्राला लक्षून म्हणते.

**गाणें**—( **पद**–आजि शेवटचा लाभचि॰ या चालीवर. )

॥ मम आशेचा सर्वहि भंगचि जाहला, एकाएकी घाला पडला ॥ पहा दैवानें ओघ कसा हा आणिला, मम पतिचा वियोग घडला ॥ आज पहाण्याला जलधि प्रेम कीं आला, दुःखद तें झालें मजला ॥ म्हणे बुद्धीनें वैर कसा साधीला, चंद्र चकोरा अन्तर पडला ॥ चाल ॥ आतां पाहूं मी कोणे ठाईंहो ॥ पतिवांचुनि जगिं नच कांहींहो ॥ जगण्याची आशा नाहींहो ॥ चाल ॥ हतभागिण मी झालें कशिरे भगवंता, पति माझा भेटवी आतां ॥१॥ वर पाहतें मी भयंकर खग तारे, चहुंकडे हें सुटलें वारें ॥ चंद्र सूर्याचें तेज कसें हें लपलें, पतिविरहें व्याकुल झालें ॥ मज सुचेनाहो उपाय शतशा केलें, देह प्राणा कांहो त्यजिलें ॥ चाल ॥ खवळला हा सागर भारी ॥ पाण्याच्या येती लहरी ॥ मच्छ कच्छही लपले दरींहो ॥ चाल ॥ या भीतीनें मी मनिं बहु घाबरलें, जन्मलें ती कां नच मेलें ॥ २ ॥ आई अंतरलें सर्वपरी

ग तुजला, आजवरि मीं हरी न भजला ॥ प्रीति भर्त्याची गोडी त्याग वचनाला, त्यामध्यें काळ घालविला ॥ स्वामिराया हो दासी होतें सेवेला, अंतरलें आपुले चरणाला ॥ चाल ॥ आतां ठेवा स्मृति तरि ताजीहो, आपुलें मन राखा राजीहो ॥ सरली खरि पुण्याई माझीहो ॥ गंगा कवनाची गोडी लागो सर्वांला, ठाव मागतसे सिंधूला ॥ ३ ॥

नंतर ती फळी तशीच वाहत जाऊन, एका खडकास लागली. तो खडक उंच व बराच लांब होता. त्यावर ती स्त्री जाऊन पोंचली. आणि तिनें ईश्वराचे आभार मानिले व मनांत म्हणते, येथें दुसरें कोणी मनुष्य दिसत नाहीं! ईश्वरा, हा मजवर काय प्रसंग आणलास?! येथें एकटीनें मीं काय करावें?! असें म्हणून तिनें मोठ्यानें रडून आक्रोश केला. पण एका ईश्वराशिवाय तिला कोण जाणतो? ती, पाण्यामुळें हाल होऊन दमलेली व पोटांत अन्नाचा लवलेश नसल्यामुळें व्याकुल झालेली; त्या खडकावर आतां माझी धडगत नाहीं, असें म्हणून निराशेनें मूर्च्छित पडली. सुमारें दोन तास झाले, इतक्यांत ज्यास दीनदयाळू म्हणतात त्या ईश्वरासच करुणा येऊन, तिला दुःखांत सुख देण्याकरितां, दुसरी कोणीएक स्त्री खडकापलीकडील मैदानांतून येऊन या स्त्रीजवळ उभी राहिली. आणि मनांत म्हणते, अशा प्रदेशांत कोणीएक नसून एकाएकीं विद्युल्लतेसारखी ही स्त्री येथें कशी आली? या आश्चर्यांत ती आहे, इतक्यांत तिला एक युक्ति सुचली व त्याप्रमाणें ती तिला हालवूं लागली. परंतु ती सावध न होऊन स्थिर अशी बेशुद्धच पडली. डोळा उघडणें व हातपाय हालवणें हें कांहीं नसून हलके हलके श्वास मात्र चालला आहे, यावरून ही मृतवत् जरी दिसते, तरी ही जिवंत आहे अशी तिच्या मनाची खात्री झाली. मग तिनें आपले पदरानें वारा घालून किंचित् तीस सावध केलें आणि उठवून बसविलें. परंतु त्या दोघींची परस्पर दृष्टादृष्ट होतांच, मी कोठें आलें व माझी ही काय दशा, असें म्हणून ती मोठ्यानें रडूं लागली. तेव्हां ती दुसरी स्त्री तीस म्हणते, तूं भिऊं नकोस. कशाचाही खेद करूं नकोस. जें तुझ्या नशिबीं होतें, तें सर्व घडून आलें. आतां फक्त इतकेंच कर कीं, तूं प्रथम शांत हो, आणि सर्व हकीकत मला सांग. मीही तुजसारखीच दुःखी आहें व तुझी ही दशा पाहून माझे मनांस फारच दुःख होतें. बरें तें असो. पण हा प्रदेश केवळ वाळूचा आहे. येथें गोडें पाणी म्हणशील तर लवलेशही

यावर नव्या स्त्रीनें उत्तर केलें, येथून खडक बराच दूर आहे, तरी रोज कांहीं फळें खाऊन त्या खडकावर सायंकाळपर्यंत काल घालवावा म्हणजे ईश्वरासच दया येऊन आपल्याला नेण्यास कोणी तरी तो पाठवील. आपण त्यास आपले बापाभावाप्रमाणें मानून यांतून पार पडूं व आपले घरीं जाऊं. पण तुला कसें वाटतें? पहिली म्हणाली, इकडून फक्त जहाजें जातात व तींही बरींच दुरून जातात. मग आपणाकडे कोण पाहतो व आपल्यास नेण्याची काळजी कोण घेतो? ती नवी स्त्री म्हणाली, सखे, सृष्टिकर्ता फार दयाळू आहे, त्याला दया येऊन तो आपला हेतु पूर्ण करील. आपण आपले धर्मानें वागलों म्हणजे केव्हांना केव्हां चांगलें फळ मिळतेंच. यावर त्यांनीं ईश्वराचें स्मरण करून तसें करण्याचा निश्चय केला. नंतर नित्यविधि आटपून, अरण्यांत सांपडलेलीं फळें खाऊन, त्या झऱ्याचें स्वच्छ पाणी पिऊन त्या शांत झाल्या. मग ठरल्याप्रमाणें त्या खडकावर जाण्यास निघाल्या व त्यावर हलके हलके जाऊन पोंचल्या. तेथें गेल्यावर समुद्रांतून एक जहाज जातांना त्यांना दिसलें व तेवढ्यावर त्यांनीं संतोष मानिला. त्या याप्रमाणें रोज खडकावर जाऊं लागल्या. त्या नियमानें तेथें पांच दिवस गेल्यावर सहावे दिवशीं पांच वाजण्याचे सुमारास एक जहाज तेथें आलें. जहाजांत पाणी घेण्याकरितां दोन तासांची अवधि होती, म्हणून त्या जहाजांतील कांहीं हौशी लोक आसपासचा प्रदेश पाहण्याचे हेतूनें होडींत बसून फिरूं लागले. तों शुभ्र वस्त्रें नेसून दोन स्त्रिया खडकावर चांदण्या सारख्या चमकत उभ्या असलेल्या त्यांच्या दृष्टीस पडल्या. हा चमत्कार काय आहे, त्याची शहानिशा करण्याकरितां त्यांनीं आपली होडी खडकाकडे वळविली आणि मनांत म्हणतात कीं, येथें सर्व जलमय असून अप्सरेसारख्या या स्त्रिया कोण असाव्या? कांहीं तर्क चालत नाहीं. जाऊन पाहूं तर खरें, जवळ गेल्यावर काय तें तथ्य समजेल. असे मनांत नानाप्रकारचे तरंग आणीत व विचार करीत करीत ते खडका जवळ येऊन पोंचले. मग त्या होडींतून उतरून पाण्यांत शिरले व हलके हलके खडकावर चढले. त्या गृहस्थांपैकीं कांहीं सभ्य व मोठ्या घराण्यापैकीं व कांहीं सामान्य प्रतीचे असे होते. त्यांनीं या स्त्रियांस प्रश्न केला कीं तुह्मी कोण, कोणाच्या, येथें कशा आला व येथें असण्याचा हेतु काय तें आम्हांस कृपा करून सांगितल्यास आ-

म्हांवर फार उपकार होतील. हें ऐकून त्या रडूं लागल्या आणि म्हणाल्या, आम्ही अनाथ आहोंत. आम्हांस या संकटांतून काढाल तर तुमचे जन्मभर उपकार स्मरूं. हें ऐकून कांहीं लोक म्हणाले कांहीं चिंता नाहीं, तुम्ही स्वस्थ व्हां, आम्ही तुम्हांस घेऊन जातों. हें ऐकून त्या दोघींस धैर्य येऊन त्यांच्या चेहेऱ्यांवर टवटवी दिसूं लागली. त्यांपैकीं एकजण म्हणाली, महाराज, आपण कृपा करून आम्हांस आमच्या घरीं नेऊन पोंचतें कराल, तर आमचे नेण्याबद्दल जो खर्च लागेल तो तुमचा तुम्हास मिळून शिवाय आमच्या घरचीं मनुष्यें तुम्हांस चांगलें बक्षीस देतील. परंतु अर्धवट मात्र करूं नका. मी तुम्हांस आपले पित्यासारखे मानतें तर मजवर ममता करून हा माझे गळ्यांतील हार आहे यांतील एक पदर मी आपल्यांस देतें तो घ्यावा आणि जो लागेल तो खर्च करावा. फक्त आपण मला सांभाळून नेलें पाहिजे.मी चंद्रपूरचे राजाची धाकटी सून आहें. माझे सासऱ्याचें नांव मकरध्वज हें आहे तेथें मला पोंहचती करावी, अगर माझा बाप दक्षिणेंत चंपापूर येथील शशिशेखर राजा, त्याची मी धाकटी मुलगी आहे, तेथें पोंचवावी. मला दोहीं ठिकाणांमधून कोठें तरी पोंचती कराल तर आपले जन्मभर उपकार मानीन; हें ऐकून त्यांतील एका गृहस्थाचें हृदय भरून आलें व नेत्रांवाटें आश्रुधारा चालल्या. हें सर्व लोकांनीं पाहून म्हणूं लागले कीं, हें काय ! हीं नांवें ऐकून तुम्हांस इतकें वाईट वाटण्याचें कारण काय ? असें विचारतांच, तो म्हणाला तुम्हांस या गोष्टी काय सांगाव्या ? एकंदरींत माझें दुःख मी जाणतों. ईश्वरसत्ता मोठी बलवत्तर आहे. जें होणार तें कधींही चुकत नाहीं. परमेश्वरा ! या स्त्रीवर हा असा प्रसंग यावा, हें स्वप्नींही नव्हतें तो आज हा प्रसंग प्रत्यक्ष दृष्टोत्पत्तीस आला हें पाहून तर माझें काळीज फाटून गेलें.अहारे, परमेश्वरा! तूं राजाचा रंक व रंकाचा राव एका क्षणांत बनविशील यांत संशय नाहीं. ज्या स्त्रीस दुःख म्हणजे काय हें मुळींच माहित नव्हतें, ती या अशा संकटांत पडावीना ? हे इंदुमुखी, तूं आज या समुद्रप्रदेशांत अन्नाविरहीत राहवीसना ! शेंकडों दासी जिचे ' सेवेंत रात्रंदिवस तत्पर, तिनें आज यःकश्चित् मनुष्याची प्रार्थना मला घेऊन जा, व संभाळा म्हणून करावीना ! नारायणा ! तूंच धन्य, म्हणून मला आज महत्वाचें काम नसून इकडे येण्याची बुद्धि दिलीस व ही माझी धर्मभगिनी माझ्या दृष्टीस पडली. अशा विचारांत तो

आहे हें याचें वर्तन त्या जवळील लोकांनीं पाहून ते मनांत आचंबा करूं लागले. त्यांपैकीं त्याचे निकटसहवासाचा एक मनुष्य त्यास म्हणतो, आपणास या स्त्रीस पाहून इतकें दुःख होण्याचें काय कारण! मला वाटतें या स्त्रीस आपण पूर्णपणें जाणत आहां. किंवा या बाईचा अगर इचे घराण्यांत कोणाचा तरी आपला संबंध असावा. त्याशिवाय इतकी कळकळ असण्याचें कांहीं कारण नाहीं. यावर त्यानें उत्तर दिलें कीं, मला कोणी कांहीं विचारूं नका व मी तुम्हांस कांहींएक सांगणार नाहीं. मग तो गृहस्थ तीस विचारतो कीं, तुम्हाजवळ जो मोत्याचा हार आहे, तो मला देण्याची जरूर नाहीं, उलट माझ्या जवळ जें आहे तें तुमचेंच आहे. मी तुम्हास तुमचे घरीं निर्विघ्नपणें पोंचतें करतों. आपण कोणतेच गोष्टीची काळजी करूं नये. यापुढें आपलें दुर्दैव आपणास भेटणार नाहीं. आतां स्वस्थ असावें. वाटेल तो हुकूम करावा इतकीच माझी हात जोडून प्रार्थना आहे. माझें संबंधानें आपण कोणत्याही गोष्टीविषयीं संकोच धरूं नये. मी सर्वस्वीं आपला आहें. इतकें म्हणून त्यानें तीस विचारलें, आपल्याबरोबर जी स्त्री आहे ती कोण आहे? यांवर ती म्हणाली, ही माझी धर्मभगिनी आहे. माझें पूर्वीं आठ दिवस संकटांत पडून ही येथें आली होती. हिनें मला अशा वेळीं फार साह्य केलें व म्हणूनच मी आज तुमचे दृष्टीस पडलें. हिनें माझा प्राण वांचविला, हे हिचे उपकार कधींही फिटणार नाहींत. ही दुःखसमयीं माझें उपयोगीं पडली व हिचे मजवर फार उपकार आहेत, ह्मणून ही माझे बरोबर असणार. जशी मी तशीच ही आपण मानावी, ही आपणास विनंति आहे. त्या गृहस्थानें फार उत्तम, असें ह्मणून त्या दोघींस होडींत बसवून जाहजांत नेलें. नंतर चाकराकरवीं गोडें पाणी आणून त्यांस तें हात तोंड धुण्यास देऊन चंदेरी हातरुमाल तोंड पुसण्यास दिले. व बरोबर आणलेली मिठाई व फळफळावळ खाण्यास दिली. त्यांनीं ती खाऊन थोडें थंड पाणी पिऊन स्वस्थ झाल्या. पुढें त्यांस चाकरांनीं नरम बिछाना घालून दिला व त्यावर त्या दोघी स्वस्थपणें झोंपीं गेल्या. इतक्यांत जहाजाचीं दोन तासांची वेळ भरली आणि पाणी भरून घेऊन जहाज हाकारिलें. तें चालत असतां त्या, दोन तीन तासांनीं जाग्या झाल्या आणि बिछान्यावर उठून बसल्या व ह्मणतात, आजचा दिवस आह्मांस ईश्वरानें दाखविला. आह्मी या जलप्रदेशाची माहिती जन्मांतही विस

रणार नाहीं. असो, या गृहस्थांस दया येऊन येथपर्यंत तर मजल गांठली. या पुढें काय योग आहे तो कळत नाहीं. असो. त्या जहाजांतील लोक या स्त्रियांस पाहून मोहीत झाले, व कितीएक वेडावूनही गेले. कितीएक बरळूं लागले व कितीएकांनीं लाजलज्जा सोडून आपले मनाशींच बोलूं लागले कीं, ही जर आपणांस वश होईल तर आपली सर्व संपत्ति हीस अर्पण करून जन्मभर यथेच्छ सुख भोगूं. यामध्यें कोणी सावकार, कोणी जवाहिरी, कोणी लक्षाधीश व्यापारी, कोणी प्रधानपुत्र व कोणी राजपुत्र असे मोठमोठे होते. तसेच कोणी मोठे घराण्यांतील सभ्यगृहस्थ, कोणी आश्रित व कोणी सामान्य लोक अशा सुमारें हजार बाराशें लोकांनीं तें जहाज भरलें होतें. परंतु त्यांत ज्यांस ऐपत होती असे लोक या स्त्रीस पाहून भांबावून आपआपणांमध्यें बोलूं लागले कीं, ही स्त्री जर आपणांस वश होईल तर हीस राज्य व संपत्ति सर्व अर्पण करून जन्मभर हिचे दास होऊन राहूं. असें नाना तऱ्हेनें आपआपणांत ते बोलूं लागले. आणि आपआपणांत पण करूं लागले कीं,हीस वश करून घेईनच घेईन, कारण माझें रूप व गुण तिचे मनांत आवडलेच असतील! दुसरा ह्मणतो, माझे जवळ अतोनात संपत्ति आहे, मी इच्छीन तें करीन. तिसरा ह्मणतो, सर्व राज्य माझें आहे, हिचें मनोरथ मी हवे त्या तऱ्हेनें पुरवून हिचे मर्जीनें वागून इला आपलीशी करून घेईनच घेईन. चौथा म्हणतो, मी विद्वान असून माझे जवळ संपत्तीही अतोनात आहे. व मी बापाचा एकुलता एक असून आवडता आहे. मी जें करीन ती पूर्व दिशा. असें एकमेक चढाओढीच्या गोष्टी बोलून एकमेकांत शरता मारूं लागले. परंतु मांजराचे गळ्यांत घांट बांधायची परंतु ती कोणी बांधावी! जो पुढें होईल तोच प्राणास मुकणार. सर्पाचे शिरावर पाय देणें हें काम फार कठिण आहे. तशीच पतंगाची झडप दिव्यावर पडणें म्हणजे प्राणास मुकणें, दुसरा अर्थ नाहीं. या संबंधानें एक म्हण आहे, " आव पतंग निसंग हो जरे तुमारा आंग। पहिले ती दीपक जरे, पिछे जरे पतंग " यावर एक मुसलमानी भाषेंत गोष्ट आहे, परंतु येथें लिहिली असतां विस्तार फार होईल म्हणून ती लिहीत नाहीं. सारांश गतभर्तृकेचे अवयव किंवा दरिद्र्यांचे मनोरथ जसे जेथल्या तेथेंच नाश पावतात. तद्वत् या मंडळींच्या विचारांचें झालें. कारण त्या स्त्रियांना असे शब्द बोलणें म्हणजे अग्निकुंडांत पडणेंच होतें. त्यांच्या पातिव्रत्याचें तेज असें झळकत होतें कीं, त्यापुढें असे शब्द

बोलण्यास कोणीही समर्थ झाला नाहीं. अशा साध्वींना कन्या, भगिनी अथवा माताच म्हटलें पाहिजे. ज्या परोपकारी मनुष्यानें त्यांना जहाजावर आणिलें तो त्यांना फार पूज्य मानी. त्यानें त्यांची चांगली व्यवस्था ठेविली. दुसरे दिवशीं दहाचे सुमारास तें जहाज त्यांचें गांवीं लागतांच, जहाजांतून उतरवून त्या दोघींस आपले घरीं नेलें, व आपल्या कुटुंबांत नेऊन ठेविलें. आणि आपले सर्व कुटुंबांतील मनुष्यांस सांगितलें कीं, ह्या माझ्या धर्मभगिनी आहेत. व थोडकेच दिवसांत या आपल्या घरीं जाणार आहेत, तर यांस कोणत्याही गोष्टीची उणीव पडूं देऊं नये. त्याच्या आईनें बरें आहे असें उत्तर देऊन त्यांच्या मर्जीनुरूप सर्व व्यवस्था ठेवली. त्या सावकारपुत्राची स्त्री फारच चतुर असे. तिचें नांव मनमोहिनी. ती अतिरूपवती असून फार कुशल होती. तिनें अष्टोप्रहर त्यांचे जवळ बसून त्यांच्या दुःखाचें शांतवन करीत असावें. एकें दिवशीं त्या इतक्या बोलण्याच्या प्रेमांत आल्या कीं, तिनें विचारलें आपण कोण ! कुठील ! आणि आमच्या घरीं कशा आला ! आणखी ती त्या राजकुलीन स्त्रीस म्हणाली, आपले मुखचर्येवरून गरोदरपणाचा भास होतो, तर हें साकल्य वर्तमान आपण मला निष्कपटपणानें सांगावें. आपला व माझा द्वैतभाव मुळींच नाहीं. प्राणनाथांनीं सांगितल्यावरून आपलें व माझें नणंद भावजईचें नातें होतें. मग आतां कांहीं विचार करण्याचें कारण राहिलें नाहीं. असें म्हणतांच तिचे डोळे पाण्यानें भरून आले आणि म्हणूं लागली कीं, माझें कर्मच येथें मला आणण्याला कारण झालें. माझें प्राणनाथ व आईबाप मला काय म्हणत असतील कोण जाणे. आतां माझी त्यांची भेट होईल तो सुदिन. बाई, आपल्या येथें मला कोणत्याही गोष्टीची उणीव नाहीं. तरी रात्रंदिवस माझ्या डोळ्यांसमोरची मूर्ति एक क्षणभर देखील हालत नाहीं! काय करूं! असें म्हणून ती मूर्छित पडली. मग तितक्यांत मनमोहिनीनें जलदी करून डोळ्यांस गुलाबपाणी लावून व विंझण्यानें वारा घालून तीस सावध केली आणि म्हणाली, मीं आपल्यास जरी कधीं पूर्वी पाहिलें नाहीं, तरी आपले मुखचर्येवरून आपली मुखकांति अगदीं कमी दिसते. खरेंच सांगा, आपल्याला किती दिवस गुदरले आहेत ? तिनें तीस लाजत लाजत सहावा महिना म्हणून सांगितलें. मनमोहिनी म्हणाली, तर मग ठीकच आहे, आतां आपली सर्व हकीकत सांगा. हा प्रसंग पहिलाच दिसतो ! तिनें मानेनें होय

म्हटलें. मनमोहिनीला सावकारकन्येची हकीकत ऐकण्याची उत्सुकता झाली होती. तेव्हां तिला ती म्हणाली, तुह्मी आपला वृत्तांत मला सांगा. सावकारकन्या म्हणाली, कर्नाटकामध्यें ईवली म्हणून गांव आहे. तेथें माझा बाप मोठा सावकार आहे. त्याचें नांव धनशेट. तो जातीचा देशस्थ ब्राह्मण आहे. शिवाय मला दोन भाऊ आहेत. एकाचें नांव त्रिंबकनाईक व दुसऱ्याचें नांव बाळजी. मी तिसरी बहीण, माझें नांव कमलावती. माझ्या आईचें नांव सुहास्यवदना. माझ्यावर माझ्या आईचें प्रेम अतिशय असे. एके दिवशीं मी आपल्या बागेमध्यें फिरत असतां, एका सावकारपुत्राची व माझी एकाएकीं दृष्टादृष्ट झाली. आणि ईश्वरी संकेताप्रमाणें माझें मन त्यावर व त्याचें माझ्यावर बसून गेलें आणि अज्ञानावस्थेमुळें आईबापाशीं अमर्याद भाषण करवेना. यामुळें माझें मनांत रात्रंदिवस त्या पुरुषाचा ध्यास लागून गेला. पुढें दुर्दैवानें त्या माझ्या प्रियकराचें दर्शन मला दुर्लभ झालें. तरी आज दृष्टीस पडतील, उद्यां पडतील, या आशेवर मी होतें. शेवटीं मी उपवर झालें असें पाहून माझ्या वडलांनीं एका दुसऱ्या सावकारपुत्राबरोबर माझा विवाह करण्याचा निश्चय केला ! तो मला कसा संमत होईल ? मी पुढचा कांहींएक विचार न करितां दुसऱ्या बरोबर आपला विवाह न व्हावा म्हणून कोणाला न कळवितां घरांतून बाहेर पडलें, ती अनेक संकटें सोशीत यांची जेथें गांठ पडली त्या निर्जनबेटांत जाऊन पडलें !

---

# भाग २ रा.

## सावकार पुत्रानें आपल्या मित्रास सांगितलेली हकीकत.

मित्रा, तूं मला फार आग्रहच करतोस म्हणून मी तुला आतां घडलेला मनोरम वृत्तांत सांगतों. एके दिवशीं, मी शिकारीस गेलों. मजबरोबर माझे मित्र व सैन्य पुष्कळ होतें. शिकार करतां करतां एक हरिण माझे दृष्टीस पडला. त्याचा पाठलाग करीत करीत मी गेलों. पुढें एक तलाव लागला. त्यांत दोन प्रहरचे सुमारास सूर्यविकासिनी कमलें फुलून राहिलीं होतीं. तो तलाव संगमरवरी दगडानें अष्टपैलू बांधिला होता.

त्याचे किनाऱ्यांस हंस, मयूर, चक्रवाक्-पक्षी विहार करीत होते. नाना तऱ्हेचे पशु पक्षी पाणी पीत होते. त्या तलावांत नानातऱ्हेच्या रंगांचे मासे होते, इतकें कीं, जणू पाहणारास भूलच पडून जाईल. असो, मी त्या ठिकाणीं गेलों व त्यांतील पाणी प्यालों. तें पाणी केवळ अमृतसें मला भासलें आणि मनास अति आनंद झाला. वाटलें, आज इच्छित पदार्थ खचित प्राप्त होणार यांत संशय नाहीं. अशा वेळीं मी एकटा असून माझा मित्रही कोणी जवळ नव्हता असें असतां माझें मन चमत्कारिक तऱ्हेचें झालें. आणि मी तळ्याचे आजूबाजूस पाहूं लागलों, तों तळ्याच्या पलीकडे एक सुंदर बाग दृष्टीस पडला व तिकडे मी गेलों. व आंत जाऊन उभा राहतों तों फळभारांनीं नम्र झालेले मोठमोठाले वृक्ष माझे नजरेस पडले. प्रत्येक वृक्षास हात लावून फळ घ्यावें म्हणून पुढें जावें, तों तें फळ व ती फांदी उंच जावी. याप्रमाणें एक प्रहरभर हें फळ नाहीं तें फळ, तें नाहीं दुसरें, दुसरें नाहीं तिसरें असें करीत करीत नारिंगें, डाळिंबें, पेरू, रामफळें वगैरे सर्व प्रकारच्या झाडांचीं फळें हातीं लागण्याची खटपट केली, परंतु कांहींएक फायदा न होतां अतिश्रम होऊन मी थकून गेलों. त्या झाडांपासून मी दूर गेलों कीं तीं फळें जमिनीस येऊन टेंकावींत. याप्रमाणें बारावर तीन वाजलें. भुकेनें जीव व्याकुळ झाला. दिशाभूल पडली व एक सुंदर रस्ता पुढें दिसूं लागला. तेथें जाण्यास मला कोणींही मना केली नाहीं. तिकडे मी गेलों तों तेथें एक सुंदर बंगला माझे दृष्टीस पडला. त्या बंगल्यासमोर जाऊन विचार केला कीं, आपण आंत जावें. परंतु कोणीकडून जावें म्हणून इकडे तिकडे जों पाहतों, तों चांदीचा मोठा दरवाजा, ज्यावर सोनेरी रंग असून मिन्याचीं चित्रें काढिलीं आहेत व दोन्ही बाजूस भय वाटण्यासारखे मोठाले सिंह, चित्रें तर खरीं, पण हुबेहुब जीवंतसे मला वाटले. आंत कसें जावें या विवंचनेंत मी उभा आहें, इतक्यांत असा चमत्कार झाला कीं, मला जांभई आली म्हणून मीं आळसानें हात वर केले, तो माझा हात किंचित् त्या बागेंतील बंगल्याच्या दरवाजास लागला व एकदम तोफेसारखा आवाज होऊन तो दरवाजा खाडकन् उघडला गेला! हें पाहून मला मोठा चमत्कार वाटला, तरी मी तसाच आंत गेलों. व चहूंकडेस पाहतों, तों सर्व मनुष्यें जेथल्या तेथें कांहीं बसलेलीं व कांहीं उभीं अशीं पाषाणाचीं दिसलीं. फक्त डोळ्यांत मात्र जीव. पुढें तसाच आंत गेलों, तों त्याचप्रमाणें

कोणी चाकर, कोणी कामगार, कोणी राजपुत्र, कोणी राण्या, दासदासी आदि करून सर्व ऐश्वर्य दिसलें. परंतु तें पाषाणमय होतें. मीं सर्वांचे अंगावरून हात फिरविला, परंतु सर्व माझे हातास दगड लागले! सर्वांचे डोळे चमकत असल्यामुळें यांच्या जीवित खचित आहे, असें मला वाटलें. जें जें पहावें तें तें अधिकच आश्चर्यकारक वाटूं लागलें. माझे मनानें ही गोष्ट पक्की घेतली कीं, येथून वांचून बाहेर जाणें कठिणच. तथापि मी धैर्य धरून तसाच आणखी पुढें गेलों, तों आंत मोठी कचेरी दृष्टीस पडली. तेथें सर्व सभासद बसले असून मध्यें एक मोठें सोन्याचें सिंहासन व त्यावर एक राजा बसलेला, चोपदार, भालदार, छत्रचामरें धरणारे लोक व दुसरे कांहीं लोक, कोणाचे हातांत पंखे, कोणाचे हातांत तांबुलाचे डबे, कोणाचे हातांत सोन्याच्या झाऱ्या व हातरुमाल असें जेथल्या तेथें स्थिर फक्त डोळ्यांचीं बुबुळें मात्र चमकत होतीं, यावरून ते बोलत नाहींत तरी यांच्यांत जीव असावा असें मला वाटलें. तसेंच चोपदार, भालदार व राजाच्यापुढें प्रधान हात जोडून उभा, याप्रमाणें सर्व सभा थाट भरलेली पाहून पुढें काय आहे म्हणून मी राजमहालांत गेलों. तेथेंही सर्व राजविलासी सामान, मोठमोठीं नाना तऱ्हेचीं घड्याळें व तऱ्हतऱ्हेचीं चित्रें, मोठमोठे ऐने, हंड्या, झुंबरें व मोठमोठे भरगच्ची पडदे चौरस सोडले आहेत, ज्यांचे मोठमोठे जरीचे गोंडे व चित्रविचित्र मोठ्या काढण्या सुटल्या आहेत व सोन्याचीं ताटें नाना प्रकारच्या फळांनीं व पदार्थांनीं भरलेलीं आहेत. लहान छोटेखानी हिऱ्याचें सिंहासन या नजीक आहे व कांहीं दासीजनही जवळ सेवेंत हात जोडून उभा आहे. नकशीदार चौरंग, पाट आदिकरून सर्व सामान जवळ आहे. सोन्याचें कलश हातांत घेऊन नोकर लोक उभे आहेत. असो. तेथें जवळच एक मोठा छपरीपलंग होता, तिकडे माझी एकाएकीं नजर गेली. तो पाहून तर मी अगदींच भांबावून गेलों. व जवळ जाऊं लागलों तों मला कोणींही मना केलें नाहीं. तो पलंग सोन्याचा तर खराच, पण हिऱ्याची वेलपत्ती काढलेला असा, त्यांतील कुशलता पाहून आश्चर्य वाटण्याजोगा तो होता. त्या वेळेस ईश्वराचे आभार मानल्यावांचून माझ्यानें राहवलें नाहीं. त्या पलंगास हिऱ्याचा चांदवा व मोत्याची झालर असून त्यावर फक्त तोंड मात्र उघडें अशी अलौकिक, सुंदर, रूपवती, षोडश वर्षांची स्त्री तांबुल गालांत असून गालास एक हात देऊन दुसरा पराचे

गिर्दीवर ठेवलेला अशी निद्रिस्थ व जिचें आवयव पाहणाराचें मनास वेड लावतात इतकेंच नव्हे, तर मी खचितच भ्रमिष्ट झालों व त्या वेळेस माझे मनास असें वाटलें कीं, हा काय चमत्कार असावा ?! ईश्वरानें अमोल्य खाणी या दुनयेंत पैदा केल्या आहेत त्यांचे वर्णन करण्यास मति कुंठित होते. अहाहा! हे काय आहे! मी कोठें आलों! यापुढें माझी स्थिति काय होणार ? ईश्वरा, तूं धन्य आहेस. आज तर माझ्या डोळ्यांचें खचित सार्थक झालें. त्या वेळेस मी इतका निर्लज्य झालों कीं, या स्त्रीचें शरीरास एकवार तरी स्पर्श करावा, नंतर जें कांहीं होणें तें होवो असें वाटलें. मग माझी मान जरी कोणी तोडली तरी चिंता नाहीं, इतका मी उल्लू झालों! माझ्यानें धीर निघेना. मग मीं एकदम जाऊन त्या स्त्रीस आलिंगन देण्याचे हेतूनें, तेथें शें दोनशें दासी व दास उभे होते त्यांची भीड न धरतां, ही कोण, कोठील, असें ऐश्वर्य राजकन्ये शिवाय दुसरे कोणास असणार व असें केल्यानें माझा परिणाम विपरीत होणार हें कांहींएक मनांत न आणतां एकदम जाऊन, पलंगावर चढून तिचे अंगास स्पर्श केला. तों माझें हातांस व शरिरास सर्व पाषाण लागला! तरी मी नाना तऱ्हेनें तिच्या विनवण्या केल्या, पण ती एक केंसभरही हालली नाहीं. डोळ्यानें मात्र मजकडे पहात असे. तेथें मीं काय करावें हें मला कांहींच सुचेना व तेथून मला हलवेना. मग त्या पलंगावर तसाच त्या स्त्रीस पहात मी बराच वेळ बसलों. तेव्हां मला अतिशय गहिवरून आलें व रडें कोसळलें. हें त्या स्त्रीनें पाहून तिच्याही नेत्रावाटें जलधारा चालल्या. मी आपल्याकडून अनेक रीतीनें तिचें शांतवन केलें, पण तिला त्याचें कांहींच वाटलें नाहीं. मग तें तिला समजलें किंवा न समजलें हें मला माहित नाहीं. मित्रा! अशा स्थितींत मी असतां, माझी स्थिति काय झाली असेल याचा तूंच विचार कर. नंतर मीं मनांत विचार केला कीं हें कांहीं तरी जादूचें कौटिल्य अथवा ही राक्षसी माया खचीत असावी.पण याचा आतां थांग लागतो कसा? व हें तर मला समजलेंच पाहिजे. मग मी धैर्य धरून पहिल्या सांगितलेल्या कचेरींत आलों आणि त्या सिंहासनाजवळ गेलों. त्या सिंहासनावर ऐंशी वर्षांचा वृद्ध, ज्याची दाढी पांढरी सफेत वीत दीडवीत छातीपर्यंत लोंबत आहे, जो शरीरानें भव्य, तेजःपुंज असा दिसला, त्यानें गंभीर मुद्रेनें मला पाहिलें आणि हळूंच म्हणाला,—बाबा तूं कोण! येथें कां आलास,

ही केवळ जादूची राजधानी आहे ! आलास तसा परत जा कसा, नाहीं- पेक्षां दोन तासांनीं आमच्यासारखीच तुझी स्थिति होईल. याकरतां बाबा येथून निघून आपल्या माणसांत जाऊन पड. येथें एक क्षणभरही राहूं न- को. हें ऐकून प्रथम मी तर फारच घाबरून गेलों. पण मीं मनांत धैर्य ध- रून हात जोडून त्या वृद्धापाशीं बोलावयास आरंभ केला. बाबा, आपलें ऐश्वर्य व आपली संपत्ति व अंगावरील हे राजालंकार पाहून मी लहान व कोत्या बुद्धीचा मनुष्य असल्यामुळें दुःखार्णवांत पडलों आहे. महाराज, आ- पली अशी अवस्था व राज्याची स्थिति अशी पाषाणरूप कशानें झाली, हें मला कृपा करून सर्व सांगा ? आणि अशा स्थितींत आपलें जीवित कसें राहिलें हें मला सांगितलें तर मी आपलें फार आभार मानीन. त्यानें सां- गितलें, तुझ्या प्रश्नाचें उत्तर माझ्याच्यानें देववत नाहीं. याजकरितां तूंच मजवर कृपा कर आणि हें विचारूं नकोस. आमचे भोक्तृत्व आम्ही भोगतों आहोंत. त्यास तूं भागीदार होऊं इच्छितोस हें बरें नव्हे. वारंवार तुला सां- गतों कीं तूं येथून निघून सुध्यापायीं चालता हो. आमची चौकशी करण्यांत तुझा कांहींएक फायदा होणार नाहीं. व्यर्थ जीवास मात्र मुकशील. मग मी फारच अग्रह धरिला, तेव्हां त्यानें मला सांगितलें कीं, उद्यां बारा वा- जल्यानंतर मला भेट. आतां तळ्याचे पार, जलदी करून सूर्यास्ताचे आंत जा, म्हणजे तूं भीतिरहित होशील. पुढें नाना प्रकारचे चमत्कार दृष्टीस पडतील तरी तूं त्यांस न भितां पुढें पाऊल टाक. किंचित्‌ही आपले म- नांत भीति बाळगूं नकोस. भ्यालास कीं गेलास. आणि ही गोष्ट कितीही जिवलग मित्र असला तरी त्यास कळवूं नकोस. कारण, कळलें असतां मीही पाषाणरूपी होईन. येथें तूं झाडाचें फळ अगर खाण्याचा पदार्थ बिलकूल खाऊं नकोस. आणि ज्या तळ्याचें पाणी पिऊन तू शांत झालास त्याच तळ्याचें पाणी फिरून पी. उद्यां मात्र पाणी प्याल्याशिवाय इकडे ये व ही गोष्ट कोणासही सांगूं नकोस. एवढी देणगी मात्र मला दे. बरें म्हणून मी त्या राजाचे चरणावर मस्तक ठेवून तेथून पुढल्या दालनांत आलों. तेथें पाहरेकरी उभेच होते. त्यापुढें आलों, तो वाघच कीं काय अशासा- रखीं कुत्रीं देवडीवर सुमारें पांच चार, अंगावर आतां धांवत येऊन फाडतील अशीं दिसलीं. मी झट्‌दिशीं पुढें बागेंत आलों, तों चोंहीकडून रीस व्या- घ्रादिक भयंकर हिंस्रक जनावरांच्या आरोळ्या कानीं आल्या. मी फारच

घाबरलेलों; ईश्वराचें स्मरण करीत त्या तळ्याजवळ येऊन कसा तरी पोचलों आणि त्या वृद्धानें सांगितल्याप्रमाणें त्या तळ्यांतील अमृतासारखें गोड पाणी मनमुक्त प्यालों. भीतीमुळें भ्यालेलों व भुकेनें व्याकुळ झालेलों, त्या तळ्याचे किनाऱ्यावर विश्रांति घेत बसलों, तों माझ्या मनांत पाहिलेल्या गोष्टीबद्दल नाना तऱ्हेचे तरंग सुरू झाले. तथापि अंतकाळापेक्षां मध्यान्हकाळ फार कठिण आहे. मी भुकेनें फार व्याकुळ झाल्यानें माझी सर्व पूर्वस्मृति मला झाली.डोळ्यांवर चक्कर येऊन सर्व काळोख दिसूं लागला. पित्त खवळून गेलें. मी वेड्यासारखा हरिणाचे नादानें येथपर्यंत कां आलों, व माझे मित्र आपले मनांत मला काय म्हणत असतील या चिंतेनें इकडे तिकडे सैरावैरा पाहूं लागलों. इतक्यांत किंचित् डोकें जाग्यावर येऊन खिशांतील कांचयंत्राची आठवण झाली. मग तें झटकन् काढून अष्ट दिशा पाहूं लागलों; तों उत्तरेचे बाजूस आपलें मित्रमंडळ व कांहीं स्वार दृष्टीस पडले, तेव्हां हर्षानें तसाच चालत गेलों आणि मित्रमंडळांत मिसळलों, तों सूर्यास्त झाला.

माझ्या मित्रांनीं मला मिठ्या मारून, आज आम्हाला आपलें पुनरुज्जीवन वाटलें असें ते म्हणाले. सायंकाळपर्यंत आपला ठिकाण नाहीं. आम्ही फार घाबरलों, स्वार, शिबंदी सर्व चहूंकडे शोधावयास पाठविलें, परंतु तेही अद्याप आले नाहींत. कोणाचेही तोंडांत अद्याप पाणी नाहीं, तर रावसाहेब, आपण प्रथम स्नान करून पूजाविधि आटोपा म्हणजे भोजन करून घेऊं. नंतर माझें स्नान संध्या देवपूजा वगैरे आटपल्यावर, सर्वांचें भोजन होऊन थोडावेळ इकडील तिकडील चांदण्याच्या गप्फा झाल्या. मग सर्वजण आपापले जागीं तंबूंत गेलों. सर्व झोपीं गेलें. पहाटे चाराचे सुमारास उठून सर्व शिकारीस गेलों व इकडे तिकडे शिकार करून दहाचे सुमारास जेथें तळ दिला होता, तेथें स्नान वगैरे नित्यकर्म आटपलें. मला हा अद्भुत चमत्कार पाहिल्यामुळें कांहीं सुचत नव्हतें. ती राजकन्या व तो म्हातारा मनुष्य या सर्व लोकांची तेथें पाषाणस्थिति कशानें झाली, हें समजून घेण्याची उत्सुकता असल्यामुळें तें स्थळ सोडल्यापासून मला कांहीं सुचेना. हा चमत्कार कशानें झाला हें कळल्याशिवाय मन शांत होईना. त्यामुळें निद्रा, खाणें, पिणें, शिकार व मित्रांशीं थट्टा मस्करी कांहीं सुचेना. हें माझे मित्रांनीं पाहून मनांत आणलें, पण ओळख दिली

नाहीं. त्यांनीं असा विचार केला कीं, आपले मित्राचें मन कोणीकडे तरी खचित वेधलें आहे. पण त्यास विचारलें असतां तो रागावून आपल्यास कमबुद्धी ठरवील. म्हणून ते तसेच त्या दिवशीं माझ्याशीं मूकवृत्तीनें वागले. कारण रागाचे वेळीं मला विचारलें असतां तथ्य तर निघणार नाहींच, मग व्यर्थ त्रास काय म्हणून द्यावा! सारांश सुजनजन ज्या चालीनें वागतात तीच चाल माझ्या मित्रांनीं स्वीकारली. असो, अकराचा अम्मल झाला. नंतर मी आपले खाजगी १०–१२ लोक बरोबर घेऊन त्या तळ्याचे पाळीवर जाऊन हत्यारबंद पोंचलों. तेथें त्या सर्वांस ताकीद केली कीं, मी येईपर्यंत तुह्मी सर्व येथेंच असा. व कांहीं चमत्कार तुमच्या दृष्टीस पडला तर तुह्मी अगदीं भिऊं नका. याचें कारण मी तुह्मांस संध्याकाळचे सहा वाजतां परत येईन तेव्हां सांगेन. येथील फळें व पाणी बिलकूल सेवन करूं नका. केलें असतां तुमचा दगा होईल. जर येथें काय चमत्कार आहे, हें पाहण्याच्या हेतूनें तुह्मी कांहीं करण्यास जाल तर व्यर्थ फसाल. इतकें ह्मणून मी त्या तळ्याचे जवळ गेलों आणि त्यांतील पाणी प्यालों. मीं आपली नजर त्या बागेकडे केली. जर मी पाणी प्यालों नसतों, तर ती जादूची नगरी माझे दृष्टीस कधींच पडली नसती. इतक्यांत बारा वाजले. तेव्हां मला असें झालें कीं, मी त्या ज्ञाताऱ्याजवळ केव्हां जाऊन पोंहचेन आणि त्याची हकीकत केव्हां ऐकून घेईन. हें गारूड कांहींच कळत नाहीं. कोणी तरी मोठ्या जादुगारानें हें कृत्य केलें असावें असा तर्क होतो. मग नकळे खरें काय असेल तें. अशा कल्पना करीत मी त्या बागेजवळ जाऊन पोहोंचलों. मी त्या बागेमधील बंगल्याजवळ गेलों व दरवाज्यावर किंचित् टणत्कार केला. तो करतांच दरवाजा उघडला गेला व मी आंत गेलों. पूर्ववत् प्रमाणें सर्व चमत्कार, मनुष्यें, जनावरें, पक्षी, पाषाणरूपी पाहून माझ्या मनास फार वाईट वाटलें, पण तसाच पुढें गेलों. प्रथम राजकन्या महालांत निजलेली होती तिकडे गेलों तों ती पूर्वस्थितींतच पाहिली. तिचे अंगावर हात फिरविला आणि मी अभागी ह्मणून येथें येऊन परत तसाच चाललों, ह्मणून फार शोक केला. अनेक गोष्टींनीं माझें मन वेडें केलेलें व वेडावलेला असा मी फारच दुःखी झालों आणि मोठ्या श्रमानें व त्रासानें ज्या सिंहासनावर राजा पाहिला होता, त्या पुढें कचेरींत हजर झालों. त्याचे पायावर मीं आपलें शिर ठेवून त्याचें आशीर्वचन घेऊन तेथें

बसलों त्यांनीं मला विचारलें, तूं कोण ? तुला तळ्याचें पाणी प्याल्याशिवाय ये ह्मणून सांगितलें होतें परंतु तूं तें पाणी प्यालास. नाहींपेक्षां हा बाग तुझ्या कधींच नजरेस पडला नसता. ज्यापेक्षां तूं माझी आज्ञा मोडलीस त्यापेक्षां तूं आल्या मार्गानें परत जा. हें ऐकतांच माझे मनांत एकदम धडकी भरली व चक्र झालें. मी आपल्याशींच ह्मणूं लागलों, कीं मी येथें कोठें आलों व हें काय झालें ! मीं त्या ह्मातार्‍याच्या पायावर लोळण घेतली. तेव्हां त्यास दया येऊन त्यानें मला आश्वासन दिलें. आणि सांगितलें कीं माझ्या वचनास माझी हयात आहे तोंपर्यंत मी कधींच बाध आणणार नाहीं. मग कोणी कसाही इमानें इतबारें वागो वा न वागो. माझें मी शील सोडणार नाहीं. परंतु तूं प्रथम या जगांत कोण पूज्य मानीत असशील त्याची शपथ मला दे. आणि माझें प्रिय करशील हीही शपथ दे. त्याप्रमाणें मीं दोन्ही शपथा दिल्यावर तो बादशाहा अतिशय रडूं लागला. त्याचा कंठ भरून आला. त्यास पूर्वस्थितीची सर्व आठवण झाली. आणि या पुढें माझी अवस्था काय होईल असा तो विचार करूं लागला. तो म्हणाला यास तर मीं वचन दिलें कीं मी तुला उद्यां सांगेन. त्याप्रमाणें हा हजर झाला. आतां यास चुकवून उपयोग नाहीं. हा यःकश्चित् मनुष्य माझे उपयोगीं काय पडणार; हेंही मनांत आणणें वाजवी होणार नाहीं. “ को कालो फलदायकः ” ही जी अनुभवसिद्ध संस्कृत कव्युक्ति आहे तिला अनुसरून कोणते काळीं कोणाचा उपयोग काय होईल याचा नियम नाहीं. आणखी याकरितांच नेहमीं सर्वांचा स्नेह संपादावा व सर्वांवर उपकार करीत असावें. व यासच सद्धर्म म्हणतात. या उलटही वागणारे लोक असतात, पण तो त्यांचा धर्म व तें त्यांचें शील ईश्वरास नावडून, तोही त्यांस तसेंच फळ देतो. असो. या प्रकारें विचार करून तो मला म्हणाला, आपण कोण, कोठील राहणार, आपलें नांव काय, आपण काय करीत असतां, आपला देश कोण, व काय उद्देशाने येथें आलां आहां? आणि मनांत काय हेतु धारण केला आहे, हें मला प्रथम सांगां. नंतर मी आपल्यास कबूल केल्याप्रमाणें काय सांगणें तें सांगेन. तेव्हां मी म्हणालों, माझें नांव चंद्रशेखर. माझे वडलांचें नांव रत्नपाल. ते हिंदुस्थनांत मोठे प्रख्यात सावकार आहेत. माझे आजे प्रख्यात जवाहिरी, दुनियेंत मोठे परीक्षक, फुलशेट या नांवाचे होऊन गेले त्यांच्याचप्रमाणें माझे वडील आहेत व मी-

ही तोच धंदा करतों. आतां मी येथें कां आलों, तेंही सांगतों. मी एका बागेंत एके दिवशीं फिरावयास गेलों असतां, एक अति रूपवती स्त्री पाहून मोहीत झालों. मला घर, दार, धंदा कांहींएक सुचेना. वडलांजवळ हें बोलतां येईना, म्हणून माझें मन उदास होऊन मी शिकारीच्या नादानें नेहमीं असा फिरावयास निघालों. परंतु ती सुंदरी माझे डोळ्यांसमोरून एक क्षणभरही हालत नाहीं. खातां, पितां, बसतां, बोलतां, हिंडतां, फिरतां सर्वदां ती चारुगात्री मजसन्निधच आहे. कांहीं केल्यानें मला तिचा विसर पडत नाहीं व त्या योगें खाणें, पिणें, निद्रा यांनींही मला एक महिना झाला सोडिलें. मी या जंगलांत आल्यापासून रोज शिकार करतों. आतां हा माझा धर्म नव्हे. परंतु राजपुत्रांच्या संगतीनें हें क्षत्रियांचें व्यसन मला लागलें आहे. असो. मीं आपली सर्व हकीकत निष्कपटपणानें आपणांस विदीत केली, आतां मला गरिबाला आपण कृपा करून आपली हकीकत सांगावी. तेव्हां तो म्हणाला, तूं माझी हकीकत समजून घेण्याच्या नादीं पडूं नकोस. त्यानें असें सांगितलें, व पुष्कळ आढेवेढे घेतले, तरी मीं म्हणून आपला हट्ट सोडला नाहीं. मी म्हणालों, मला आपली हकीकत कळलीच पाहिजे. आपली ही स्थिति जाऊन पूर्वस्थिति येण्याबद्दल करावे लागतील ते प्रयत्न करण्याचा मीं निश्चय केला आहे. मग त्याबद्दल माझा जीव गेला तरी त्याची बिलकूल परवा करणार नाहीं. मातेच्या पोटीं देह धारण केला त्याचें साफल्य झालेंच पाहिजे. नाहींपेक्षां या पृथ्वीवर जीवजंतू थोडे का जन्मतात? पण ते जसे व्यर्थ जातात, तसें या देहाचें होऊं नये. कांहीं तरी बरा किंवा वाईट कोणी होता हें मागें राहिलें पाहिजे. व आपले कृपेनें ही माझी इच्छा परिपूर्ण होवो. आहार, निद्रा, भय व मैथुन हे प्राणीमात्रामागें आहेतच, तरी माझे हातून कांहीं तरी परोपकार घडावा असें करावें त्यास ही वेळ बरी दिसते. तो म्हणाला, हें तुझें भाषण ऐकून मी संतुष्ट झालों. तुझा हेतु अति उत्तम आहे. आणि हेंच मनुष्यजन्माचें फल आहें. माझी हकीकत तुला सर्व पाहिजे असल्यास येथून उत्तरेस चारशें मैलांपलीकडे एक मोठा पर्वत आहे. त्या पलीकडे तीन मैलांवर एक पहाड आहे व तेथें एक मोठें वडाचें झाड आहे. त्या झाडाखालीं एक गुहा आहे. तेथें एक महातपस्वी महंत रहात असतो. तेथें गेलें असतां माझी अशी दशा कां झाली हें सर्व तुला सांगेल,व तो जसें सांगेल तसें तूं केलें

असतां तुझा हेतु पूर्ण होऊन दुनयेंत तुझें नांव गाजेल. आतां तो महंत कसा आहे म्हणून विचारशील तर सांगतों ऐक. त्याचें वय सुमारें ९५ वर्षांचें असून अति तेजःपुंज, त्रिकाळज्ञानी, सर्व दुःखें ज्यानें सहन केलेलीं, षड्रिपूंचें दमन केलेलें व ईश्वर आपलासा केलेला असा तो आहे. तो केवळ प्रतिसूर्यच समज. पूर्वीं जरी तो बादशाहा होता, तरी त्यानें ईश्वरसान्निध्य केल्यानें तदाकार होऊन तो सर्व पृथ्वी तुच्छ मानतो. त्यानें विचारलें असतां माझें नांव " रूपशांतशाह " असें सांगून त्याचे चरणावर मस्तक ठेवून माझाही प्राणिपात सांगून तुला मजविषयीं जें काय विचारणें असेल तें विचारून घे म्हणजे तुझा हेतु तडीस जाईल. परंतु तेथें जाण्यास अति भीति व त्रास सोसावा लागेल तो सहन केला पाहिजे. ज्यापेक्षां तूं आपल्या देहाची आशा दूर ठेवून वागण्याचें इच्छितोस त्या अर्थी तुला एक युक्ती सांगतों.

येथून एक मैलावर पूर्वेकडे एक मोठें रान आहे. तेथें आंब्याच्या झाडावर ढोलींमध्यें वृद्ध असा एक शुक आहे. त्या आंब्याची खूण अशी कीं, आसपास केवड्याचीं बेटें असून पलीकडे राखडीच्या चांफ्याचें झाड आहे, अशा खुणेवर जा व त्याची गांठ घे म्हणजे तो तुला कांहीं वनस्पती सांगेल व तो मार्गही तुला दाखवील. त्याप्रमाणें तूं कर म्हणजे तुला कांहीं आयास पडणार नाहींत. पण त्यापूर्वीं तूं एकवार आपले आईबापांस भेट आणि एक दोन वर्षांची मुदत मागून घे म्हणजे त्यांसही दुःख होणार नाहीं, व याशिवाय जाऊं नको. इतकें सांगून बादशाहानें मला जाण्यास हुकूम दिला. व तो म्हणाला,ईश्वर कृपा करील तर तुझी व माझी फिरून भेट होईल. इतकें तो बोलतांच मी त्यांस नमस्कार करून तेथून निघालों, तों तळ्याचे किनाऱ्यावर गेलों आणि त्यांतील पाणी प्यालों व शांत होऊन इकडे तिकडे पाहूं लागलों, तों माझे लोक दृष्टीस पडले. त्यांची व माझी दृष्टादृष्ट होतांच ते माझा घोडा घेऊन पुढें आले. मग मी घोड्यावर स्वार होऊन वनशोभा पहात पहात तंबूकडे गेलों. भोजन वगैरे आटोपून दुसरे दिवशीं घरीं जाण्याचा बेत केला व त्याप्रमाणें केलें. नंतर माझ्या मित्रांपैकीं जिवलग मित्र " रंगराव " याणें मला शपथा वगैरे घालून विचारलें कीं, आपण आतांशीं कोणत्या नादांत आहां ? आम्हाशीं बोलण्यास एक क्षणभर सुद्धां फावत नाहीं. सदा विचारांत व विवंचनेंत वृत्ति असते तर

याचें कारण कृपा करून सांगा. मीं म्हटलें, तुला सोडून मी कांहींएक करणार नाहीं. माझें गुप्त तुला केव्हांना केव्हां तरी कळेलच कळेल. तो म्हणाला, मग आतां कां सांगत नाहीं ? मी म्हणालों, तूं जर माझा खरा मित्र असशील तर वडलांना विचारून दोन वर्षांची मुद्दत घेऊन मजबरोबर चल म्हणजे तुला सर्व सांगेन. तो म्हणाला, फार उत्तम आहे तुजपेक्षां या जगांत मला कांहींएक अधिक प्रिय नाहीं. तुजकरितां मी वडलांस सांगून दोन वर्षांची रजा घेऊन येतों. फार तर काय परंतु या देहाचा तुकडा जरी तूं मागितलास तरी देखील मी कापून देण्यास तयार आहें. असें म्हणून तो आपले घरीं गेला व वडलांची आज्ञा घेऊन ताबडतोब मजकडे आला. नंतर मी दहाबारा माणसें, कांहीं जवाहीर, सोन्याचें नाणें व उत्तम अश्राप असा घोडा बरोबर नेण्यासाठीं तयार केला व वडलांची मोठ्या प्रयासानें आज्ञा घेतली.

---

## भाग ३ रा.

मी व माझा मित्र व बरोबरचीं माणसें ज्या रानांत तो वृद्ध शुक होता तेथें गेलों. तेथें गेल्यावर बादशहानें सांगितलेल्या सर्व खुणा पटल्या. मग आम्ही त्या आम्रवृक्षाजवळ जाऊन ढोलीखालीं उभे राहून शुकराज, शुकराज, म्हणोन हाका मारूं लागलों. पांच चार हाका मारल्यावर त्या वृद्ध शुकानें ढोलीच्या बाहेर तोंड काढून पाहिलें आणि म्हणाला, बाबांनो, माझें नांव तुम्हाला कोणीं सांगितलें? व येथें तुम्हांला कोणीं पाठविलें? त्या बादशहानें पाठविलें काय? मी म्हणालों, बादशाहानें तुमचें नांव सांगितलें नाहीं. परंतु खुणेनें तुम्हाकडेसच पाठविलें. आपलें नांव शुकराज काय ? तेव्हां त्यानें सांगितलें बाबा माझें नांव चंद्रचूडामणी. तुला त्यानें माझें नांव कसें सांगितलें नाहीं कोण जाणे. असो. मी त्या बादशहाच्या मर्जींतील एक पक्षी होतों. बरें आतां तूं येथें कां आलास ! मीं सांगितलें कीं उत्तरेकडे कोणी एक महंत आहे त्याकडे मला जाणें आहे. व तिकडे जाण्याचा रस्ता व सुलभ उपाय तुला माहित आहे. व मला बादशहानें सांगितलें कीं,

तो शुकराज तुला एक वनस्पती देईल व तो रस्ताही दाखवील. त्याप्रमाणें मी तुजकडे आलों आहें, तर आपण मजबरोबर चलावें. बादशहाचा हुकूम शिरसावंद्य म्हणून तो निघाला व आम्ही त्याचे बरोबर निघालों. त्यानें आम्हांस कोणतेंही संकट, व्याघ्र, सर्प व वनांतील राक्षस यांच्या भीतीशिवाय त्या बोवाचे ठिकाणीं नेलें. आणि एक वनस्पती आणून दिली. तेथें त्या चूडामणीनें माझी व त्या महंताची गांठ घालून दिली. आमची उभयतांची गांठ पडल्यावर उभयतांनीं त्याचें चरणावर आपली शिरें ठेवून आशीर्वाद घेतला. त्यानें विचारलें तूं कोण? येथें कां आलास? मी तपश्चर्या करीत असतां येथें मला कां उपद्रव देतां! बाबांनो, आपल्या वाटेनें परत जा. मीं सांगितलें महाराज आपणास त्रास देण्याकरितां मी आलों नाहीं. पण बादशहाची नगरी पाषाणरूपी कशानें झाली हें आपण सांगाल असें मला बादशहानें सांगितल्यावरून मी येथें आलों आहें. इतकें म्हणतांच त्यानें शुकाकडे पाहिलें व म्हणाला बा चूडामणे, तुझा बादशहा खुशाल आहेना? त्यानें उत्तर केलें, आपण योगबलानें सर्व जाणतच आहा व आपणास विदितच आहे. मी आतां जातों. हें ऐकून मी थोडा घाबरलों व त्या शुकास विचारलें, बा चंद्रचूडामणें, त्या वनस्पतीचा उपयोग काय तें मला सांग. तो म्हणाला, ही वनस्पती जेथें जावयाची इच्छा असेल तेथें श्रम न पडतां डोळे झाकिले असतां नेते. प्रथम या मुळीची थोडी प्रार्थना मात्र केली पाहिजे. आणखी याहून तुझा काय पाहिजे आहे? मीं कांहीं नको असें म्हणतांच त्यानें त्या महंताची व माझी रजा घेऊन तो आपल्या ठिकाणीं गेला. नंतर मीं त्या महंताची हात जोडून प्रार्थना केली कीं महाराज, मी येथें येण्याचें कारण ज्या बादशहानें मला आपणाकडे पाठविलें त्याचें शहर व सर्व राज्य पाषाणरूपी कशानें झालें व तो इतक्या दुःखांत कशानें पडला हें मला कृपा करून सांगावें. तो म्हणाला, तूं या कामांत श्रम घेऊं नकोस. कारण, ईश्वर कृपेनें तुझें सर्व यथास्थित आहें. तूं अशा कामांत मन घातलें असतां तुला नानातऱ्हेचीं संकटें व जीवावरील दुःखें सोसावी लागतील. तूं आल्या रस्त्यानें परत जा. तुला माझे बोलण्याचा अनुभव येईल व जसजसा अनुभव येत जाईल तसतसें तुला माझें स्मरण होईल. मीं सांगितलें, महाराज मीं जें एकवेळ काम स्वीकारलें त्यांतून कधींही पाऊल मागें घेणार नाहीं. तो येवढा मनुष्य रात्रंदिवस इतकें दुःख

सहन करीत आहे तें माझ्यानें पाहवत नाहीं.महाराज, त्या प्राण्यावर माझे-कडून कांहीं उपकार होतील तर सांगा, मी करण्यास तयार आहें. पण हें जादूचें गूढ मला सांगावेंच. मग त्यानें माझा फारच आग्रह पाहून एक तासभर स्वस्थ बसला आणि विचार करून मला म्हणाला बाबा, तुझें म्हणण्यांत कांहीं तथ्य दिसतें. या कामीं ईश्वर तुला यश देईल. आतां ही सर्व हकीकत सांगण्याचें पूर्वीं तुला एक गोष्ट सांगतों इकडे लक्ष असूंदे. येथून दक्षिणेचे बाजूस एक नामांकित शहर भानुनगर म्हणून आहे.तेथें एक मोठा नामांकित राजा राज्य करीत आहे. त्याचे स्त्रीस एक कन्या तारा या नांवाची आहे. तिच्या हातानें ही घातकी मायिक राक्षसी क्रीडा करणाऱ्या राक्षसांचा संहार तिच्या वयाच्या चवदावे वर्षीं होऊन तो बादशहा म्हणजे ज्यास तूं पाषाणनगरींत पाहिलास तो मुक्त होईल. ती राजकन्या लावण्यवति, सुगुणी, सद्धर्मशीला शौर्यबलसंपन्न सुलोचना, केवळ अष्टभुजेचा दुसरा अवतार अशी आहे. तर तूं त्या राजाजवळ जाऊन राहावें व जेणें करून त्याचें मन तुजकडे वळेल असें त्याजबरोबर वागावें. आणि नेहमीं त्या मुलीच्या सहवासांत असावें व जेणेंकरून ती मुलगी शिकारीच्या नादीं लागेल असें करून तीस इकडे घेऊन यावें. यावर मी म्हणालों महाराज, ही गोष्ट स्त्रीजातीकडून कशी होईल ! तो म्हणाला तें तसेंच अघटित होणार आहे. तूं फक्त यशध्वज हो म्हणजे झालें. तूं बोलशील त्यास यशच येईल.जा माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे.मात्र तूं आपली नीति व धर्म सोडूं नको. असो, मी आतां आपले तपश्चर्येस बसतों, तूं आपल्या कार्यास जावें. नंतर मी तपस्व्याचे चरणावर मस्तक ठेवून चालता झालों व सर्व लोकांसह हा देश, तो देश, हें शहर तें शहर, असें करीत करीत दक्षिण देशांत भानुनगरांत गेलों. तेथील राजा कोण आहे व कशी काय व्यवस्था आहे याचा शोध करून एक उत्तम हवाशीर जागा भाड्यानें घेऊन शहरानजिकच राहिलों. दिवसांतून दोन तीन वेळां त्या शहरांत जात येत असें. व त्या सहल करण्यानें त्या राजनगराची मला बरीच माहिती झाली. कांहीं दिवसांनीं मीं त्या शहरांत जवाहिऱ्याचें दुकान घातलें. देशोदेशींचा उत्तम माल खरेदी करावा व देशोदेशीं राजेरजवाड्यांकडेस पाठवावा या योगानें त्या शहरांत व्यापाराच्या संबंधानें मी बराच नाणावलों. ही वार्ता राजाचे कानावर गेली. व मी तेथें इतके दिवस असून ज-

वळील मनुष्यांनीं मजविषयीं मुळींच कळविलें नाहीं, याचें राजास आश्चर्य वाटलें एके दिवशीं एक हिऱ्याचा चंद्रहार घेऊन कोणी एक गृहस्थ दूरदेशाहून राजाकडे आला व तो चंद्रहार राजापुढें ठेवून म्हणाला कीं, आपले राणीसाहेबांचे गळ्यांत हा असावा. तर परीक्षा करून याचें मोल मला द्यावें. राजानें तो ठेवून घेतला व आपले प्रधानास बोलावून आणून कळविलें कीं, आपलें येथें जवाहीर घेणें आहे करितां उत्तम परीक्षक बोलवावे. हुकुमाप्रमाणें प्रधानानें सर्वांबरोबर मलाही बोलावणें केलें. दुसरे दिवशीं दहाचे सुमारास राजानें बोलावलें म्हणून मी गेलों. सर्व जवाहिरी जमल्यावर राजानें सांगितलें, येथें कोणी एका जवाहिऱ्यानें एक हिऱ्याचा चंद्रहार आणला आहे तो पाहण्याकरितां आपण सर्वांस बोलाविलें आहे. इतकें म्हणतांच कारकुनानें तो चंद्रहार आणून पुढें ठेविला. राजानें तो घेऊन माझे स्वाधीन केला आणि विचारलें कीं, याचें काय मोल द्यावें तें परीक्षा करून सांगावें. तो चंद्रहार मी हातीं घेतांच पाहून चकित झालों आणि म्हणालों, वारेवा दागिना ? याचें नांव जवाहीर. व मनांत म्हटलें कीं, हा दागिना अति रूपवती स्त्री अमोल्य खाणीच वालणारी असली पाहिजे तर हा शोभणार. असो. असाही प्राणी परमेश्वरानें उत्पन्न केला असेल. चंद्रहार पाहून परीक्षा करून मीं राजास सांगितलें कीं, आपले शहरांतील दुसरे मोठमोठे जवाहीर परीक्षक आहेत त्यांजकडून परीक्षा करावी. मी आपले अकलेनें परीक्षा केली आहे त्या वरून अजमासें कोटाचे जवळ याचें मोल असावें. पण हें आपण आपले मनांत ठेवावें. राजानें दुसऱ्या जवाहिऱ्याकडून परीक्षा करवून पाहिलें, तों त्याचे आंत बाहेर किंमत होऊं लागली व जो तो जवाहिरी माझेकडे बोट करूं लागला. व म्हणूं लागले कीं, यास आपले शहरीं येऊन आज दोन वर्षें झालीं, परंतु यांची व आपली या हाराचे योगानें आजच भेट झाली. हे फार चांगले परीक्षक या शहरांत आले आहेत. यांची बरोबरी कोणीही करूं शकणार नाहीं. पूर्वीं भोजराजाचे कचेरींत नवरत्नें होतीं तसें आपल्या कचेरींत हें एक रत्नच म्हणण्यास हरकत नाहीं. असे परीक्षक दुनयेंत फारच दुर्मिळ. यांची पिढी सावकार नसून राजकुलांतील उत्पत्ति आहे. काय कारणानें जवाहिराचा व्यापार संपादन केला नकळे. तरी दोन तीन पिढ्या हे हिंदुस्थानांत प्रख्यात आहेत. फुलशेटजी यांचे आजे, रत्नपालशेट बाप व चंद्रशेखर यांचें नांव. यांच्या घराण्यांतील

बहुतेक लोक असेच परीक्षक आहेत.आज आपले येथें येऊन आपण भेटीचा मोठा लाभ दिला. व आतां हा परिचय चालविणें आपलेकडेस आहे. हें ऐकून राजा म्हणाला, असा मनुष्य आपल्या जवळ कशानें राहतो, पण विचारून पहावें. ज्यापेक्षां सर्व लोक यास मान देतात त्या पेक्षां हा खरोखरच उत्तम असला पाहिजे. नंतर राजानें मला विचारलें, चंद्रशेखरजी आपण आमचे शहरांत येऊन इतके दिवस गुजरले व आपण कधींच इकडे आला नाहीं हें मोठें नवल आहे. असें होऊं नये. हें राज्य तुमच्यासारखे लोकांनीं सुशोभित असल्यानें आमचे मनास अति आनंद होईल. आणि आमचे वाड्यांत येऊन राहिल्यास त्याहून अधिक. हे राजाचे तोंडांतील शब्द निघतांच मला जो आनंद झाला तो सांगतां पुरवत नाहीं. " आंधळा मागतो एक डोळा तर देवानें दिल्हे दोन्ही" असें मला झालें.मीं हात जोडून राजास म्हटलें,महाराज मीं आपले चरणाजवळ असावें अशी आपण इच्छा करितां तर असा या पामराचे अंगीं काय गुण आहे. मी यःकश्चित् मनुष्य, व्यापार करून पोट भरतों. आपली सत्कीर्ति ऐकून आपले चरणाजवळ आलों आहे. यावर आपली जशी मर्जी असेल तसें करण्यास तयार आहें. आपले बाहेर मी कधींही जाणार नाहीं. इतकें म्हणून राजास नमस्कार करून जाण्यास हुकूम घेतला. राजानें सांगितलें तुम्हीं दररोज भेटत जावे—बरें म्हणून मी आपले बिऱ्हाडीं आलों. कांहीं दिवस गुजरल्यावर राजानें मला आपले जवळ ठेवून घेतलें व त्या जवाहिऱ्यास त्याचे हाराचें मोल देऊन कांहीं बक्षीस दिलें व वाटेस लावले. पुढें माझा व राजाचे कुटुंबांतील मनुष्यांचा बराच परिचय होत गेला. एके दिवशीं मी आपले मनांत असा विचार करूं लागलों कीं, या राजाची मुलगी अति उत्तम आहे म्हणून आपणास समजलें आहे, तर ती कोठें दिसत नाहीं ! तिचा तपास कसा लागावा या चिंतेंत मी पडलों. म्हण आहे " कहूंके नाकहूं, कहूं बिगर ना रहूं. कहूं तो मा मरजाय, ना कहूं तो बाप कुत्ता खाय " महंतानें सांगितलें, ती जन्मास आली व येथें तर कोठें दिसत नाहीं. मग बारकाईनें तपास करतां ती आपले आजीचे घरीं गेली आहे असें कित्येकांनीं सांगितलें. " जलबसे कमोदिनी, चंदा बसे आकाश, जहां जिनके हृदय बसे ओही उनके पास " ॥ श्लोक ॥

गिरौ मयूरा गगने पयोदाः लक्षांतरे ऽर्कश्च जलेषु पद्मं ॥
इंदुर्द्विलक्षं कमलस्य बंधुर्यो यस्य मित्रं न हि तस्य दूरं ॥ १ ॥

तद्वत् माझी स्थिति झाली. कोणतेही प्रकारें करून तो बादशाहा मुक्त होऊन त्याची हकीकत कळल्यावांचून या देहाची शांतता होणार नाहीं. हा जो चटका लागला आहे त्याची निवृत्ति झाल्यावांचून जिवास बरें वाटणार नाहीं. मग कसें करावें इत्यादि नानातऱ्हेचे तरंग मनांत घोळूं लागले. व शेवटीं निश्चय केला कीं, राजासच ही गोष्ट विचारावी, पण एक दोन दिवसांचे आवधीनें विचारावी. त्यास एक दोन दिवस गुजरल्यानंतर राजा व मी कांहीं मौजेच्या गोष्टी बोलत बसलों असतां परस्परांच्या हकीकती निघाल्या. व निघतांच मीं हा महत्त्वाचा विषय काढला. मीं म्हटलें, महाराज, आपल्यास कन्या आहे असें ऐकतों तर ती कोठें आहे ? हें ऐकतांच राजाचें अंतःकरण गहिवरून आलें आणि डोळ्यावाटें पाण्याच्या धारा चालल्या. तेव्हां मीं हात जोडून म्हटलें, महाराज, मीं यःकश्चित् मनुष्यानें येवढ्या पृथ्वीपतीला दुःखांत पाडलें. माझ्यासारखा अपराधी दुसरा कोणीही या दुनयेंत नसेल. महाराजांचा अपमान करण्यास मीच कारण झालों काय ! महाराज, येवढें दुःख कां करतां ? माझे हातून कांहीं अपराध घडला असें वाटत असेल तर बेलाशक या देहास शिक्षा करावी, परंतु आपण दुःखी होऊं नये; हें ऐकून राजास फारच वाईट वाटलें, पण तो आपलें दुःख आवरून म्हणाला, तूं खेद करूं नको. माझी सद्गुणी कन्या एके रात्रीं महालांतून नाहींशी झाली. त्या योगें मी रात्रंदिवस अति दुःखी आहें. पुष्कळ प्रयत्न केले, परंतु तिचा अद्याप थांग लागत नाहीं. तिचे गुण किती आठवूं ! तशी मुलगी फिरून निपजेल असें मला वाटत नाहीं. तिला कोणीं नेऊन मारली कां कोणीं पाण्यांत बुडविली, अथवा राक्षस पिशाच्च यांनीं हरण केली किंवा यक्ष, गण, गंधर्व, किन्नर यांनीं तिचा आभिलाष केला, कांहीं कळत नाहीं ! कोणी शोध करून माझे कन्येची व माझी भेट करील त्यांस तो मागेल तें मी देईन. आज तीन वर्षें त्रिखंड धुंडाळलें परंतु तिचा शोध नाहीं ! हायरे दैवा ! माझें सर्व आयुष्य तिच्या वियोगानें व्यर्थ झालें. ती कन्या नव्हे. पुत्राचे अंगीं जे गुण असणे कठिण, तें तिच्या अंगीं वसत होते !

राजाचा हा शोक पाहून मीं म्हटलें, महाराज, “ आपली व आपले कन्येची भेट करून देतों. हे अमृतासारखे शब्द राजाचे कानीं पडतांच, जसा पाऊस पडून जमिनी,झाडें तरारतात,तद्वत् राजाची मुखचर्या दिसूं लागली

व तो म्हणाला, माझें इच्छित मला मिळाल्यास, मी तू जें मागशील तें तुला देईन. आमचें असें बोलणें चाललें असतांना रस्त्यांत कोणी एक फकीर “ ओबी दीन जायेगा ” असें बोलत उभा राहिला. आणि पहाऱ्यावरील शिपायांस विचारूं लागला, बाबा, राज्याकी गादी सलामत रहे. मेरा सव्वाल है, के राज्याकी मुलाखत चाहिये. असें म्हणतांच पाहेरेकरी म्हणाले, साई ! राजाकूं आपकां संदेसा जांके कहताहूं. जरा तखलीप लेके ठर ज्यायी ये मकान आपका है. आब मै राजाकें पास जाकें हूकुम लेके आतांहू. देखो, मै आया देख रहो. इतकें म्हणून राजाजवळ येऊन पहारेकऱ्यांनीं वर्दी दिली. महाराज, कुई षक्स दरोजेपर खडा है. आपकों मिलनेकूं चाहतां है. हें ऐकून राजा मला म्हणाला तुझें दैव उदयाला येण्याची वेळ दिसते. साधुरूपानें ईश्वर भेटतो म्हणतात, तर हा तसाच कोणी नसेलना ? असें माझ्याशीं बोलून राजानें शिपायास सांगितलें कीं, त्या फकिरास वर घेऊन ये. शिपायानें जी हुकूम असें म्हणून फकिरास वर आणिलें. तो फकीर, ज्याची दाढी सफेत असून छातीस लागलेली, शरीरानें कृश व उंच पण भव्य, अति तेजःपुंज, ज्याचे हातांत काठी, एके बगलेस झोळी असा पाहतांच, राजानें अति नम्रतेनें त्याचे पायाचें चुंबन केलें व त्यास आपले गादीवर बसवूं लागला. तेव्हां फकीर म्हणाला, खुदा तेरी गादी आबाद रखेगा. मत् फिकिर कर तूं आपने दिलमें हमेषा खुष और दिलगिर रात दीन क्यों होता है. मत् खपाहो. खुदा तुजकूं हमेषा नाखुषी रहेनेकूं यह गादी दिये है. पेटमे लडका नहीं इसालियें तूनें बहोत तसदी लीई पन तेरे तखदिर मे लिखा नही हुवा. तो मै उस्कु क्यां करूं! फीकिर मत कर बेटा तेरेंकूं एक खुबीका संदेसा लायाहै. सुनलें. बादशाहा म्हणाला महाराज, पहिलें तो आप येहे गादीपर बैठियें पीछे आप बात करियें. नंतर फकीर म्हणाला. नही नही. इस गादीकूं पाव ना लगाऊंगा. मेरीबात सुनो. अल्लानें तुजपर रहिम नजर कींई दुनयेके बीचमे दाना आदमी पैदा किया. तेरे तखदीरमें दौलत लिखी, राज लिखा. उइशी पैदाई दुनयामें बहोत लोककें वास्ते दानिषमन् तुजकूं बनाया. और मेरे सरीखे फकीर फुकाव बहोत पैदा किया. लेकिन् उनकूं उसकां हम लोगोका क्या है कुई जानते. नाकुई सुनते. मेरेकूं आलख बिठादे. नंतर राजानें हात जोडून म्हटलें, आपकें पांवका यह बंदा हूं. खुदा और आप कुच आलख नही.

मै दीनोकूं पैदा करनेवाले संभालने वाले जानतां हूं. आब बैठिये. इन गादीकूं कुच तक्रार मत करो. आब सरीखे नहि बैठे तो तकसीर होगीं. इतकें जरी राजा बोलला तरी तो गादीवर बसला नाहीं. या संबधानें दोघांची बरीच तक्रार झाली. शेवटीं फकीर म्हणाला, मै जंगलमे रहनेवाला, तुझें गादीकीं बिलकुल दरकार नहीं. आप बैठियें. मुझें कूं तूं चाहें सो बैठनेके वास्ते मखदूर माफक बैठनेकू दे. हें ऐकून राजानें त्यास स्वतंत्र बसावयास दिलें. आणि विनंति केली, साई, चाहेसों फरमाइयें. ये बंदा तयार है. फकीर म्हणाला बेटा तेरी दुनयादारी अबाद रहे, मेरा इत्ता सव्वाल है. तेरी छोकरी दिलकी प्यारी कहां है. उसकां कुच तुने आज तलख तपास किया और नही, तेरे ध्यानमे उसकूं कौन लेगया, और उस्कीं क्या तऱ्हा भई, मुझे बयानकरो. इतकें ऐकून राजा स्तब्ध होऊन डोळ्यांतून आश्रू ढाळूं लागला. हें पाहून साईचें मन गहिंवरून आलें आणि राजास म्हणाला बेटा, मत् फिकीर कर. मत् घबरा जा. तेरी छोकरी तेरे दिलकी रतनखान आच्छि है. मै देखके आयाहूं. रातादिन तेरी याद करत है. उसमे इता हैके इदर आनेके दिन नजीक आन पोहोचें. इसलिये मै ह्यां आपकें नजीक आन पोहच्या देतां हू तो आप इत्ती जलदी करो. कें आपके पास कुई भरोसेका आच्छा आदमी होगा तो मेरे साथ भेजदे. मै तेरे नौकरीमे हाजर हूं. च्याहे तो मै कल् आउंगा अगर न आवेतों आपके नजीक पहाड उसके नीचे मै रहताहूं उधर भेजो तो मै उसकी तजवीज करकें मुझे चाहे उधरलें जाऊंगा. तेरी कुच इसमे तक्रार तो नहींहै. उसकू एक बरस लगेगा. नहीं तों एकदिनमे उलट उधर आवेगा. आप क्या इस्से मंगता है. राजा म्हणाला साई, आज मेरेपर खुदाकीं आपकीं बडी मेहेरबानी हुइहै. इसवास्ते आज मै बहोत बहोत खुष है. आपकूं मेरा आदमी तल्लाष करकें कल मिलेगा. आप मेरे तै आज रहिये. आपका मुकाम ह्यां होनेका मुझकूं खूप आराम देगा. हें ऐकून फकीर तेथें एक रात्र राहिला. दुसरे दिवशीं राजानें कांहीं लोक आपल्या खात्रीचे बोलावून त्यांस विचारलें, माझें कांहीं गुप्त काम आहें त्यास भयंकर निर्जन वनांत पायांनीं गेलें पाहिजे. नाना संकटें व दुःखें भोगिलीं पाहिजेत. शीर हातावर घेऊन माझ्याकरितां घरादाराची व प्रपंचाची आशा न धरली पाहिजे. तर हें काम करण्यास कोण तयार होतो ? हें राजाचें बोलणें ऐकून धरली भुई कोणीही सो-

डिनात. जे ते आपापले जागीं चूर होऊन गेले व म्हणूं लागले, आम्हीं चाकऱ्या सुखासाठीं धरिल्या. प्राण कोणास वर आला आहे ? आपली नाहीं बोवा हें काम करण्याची सोय. राजा नौकरीवरून दूर करील तर घरीं बसूं, दुसरीकडे जाऊन चाकरी करूं अथवा भीक मागून निर्वाह करूं. पण हें जिवावरचें संकट नको. सारांश राजाचें कार्य करण्यास कोणी कबूल होईना ! इमान दुनयेंत फार थोडे हेंच खरें. मग मीं राजास म्हटलें, महाराज, या कामास मला आपण हुकूम द्यावा. मी त्या फकीराबरोबर जाण्यास अन्तःकरणपूर्वक राजी आहें व जीं दुःखें व संकटें येतील तीं सोसण्यास तयार आहें. या देहाचें सार्थक परोपकारानेंच झालें पाहिजें. महाराज, माझा संकल्प आहे कीं, परोपकारासाठीं वृक्ष फळें देतात, गाई दूध देतात व नद्या वाहतात तसेंच हें शरीर परोकारार्थ झिजवायचें. राजा म्हणाला धन्य आहात तुम्ही ! अशी बुद्धि होणें म्हणजे पूर्व पुण्याईच पाहिजे, त्या शिवाय अशी बुद्धि होणें नाहीं. मीं म्हटलें, महाराज, दुःखांतून प्राणी सुटून सुखांत जावा, हाच माझा मुख्य उद्देश आहे. मी जावयास तयार आहें. नंतर राजानें माझे मोठे उपकार मानिले. आणि म्हणाला, मला आज तुम्ही ईश्वररूपींच भेटलांत. चला आतां आपण फकीराकडे जाऊं.

नंतर आह्मी दोघे त्या फकीराकडे गेलों. आणि उभयतांनीं त्याचे चरणावर मस्तक ठेवून त्याचा आशीर्वाद घेतला. राजानें सांगितलें, साई, वो छोकरा आपने साथ आनेकू बहोत खूष है. आपकी उनपर मेहरनजर चाहिये. आप ज्यो उनकूं बताउंगा इस रहासे ओ च्यलेगा. बडा दानिषमन्, हुषार वो है. इसलिये आपके साथ मै देताहूं. ओ बोजा उन्ने मेरे शिरपर बडा दिया है. उसका उलट जब खुदा करेगा ओ दिन मै देखुगां. आच्छा कुच फिकीर नहीं. आपके साथ उनकू लेज्याव. हें ऐकून फकीर मला बोलला बेटा, मेरे साथ आनेकू राजा देता है तूं तयार है ? मीं हात जोडून उत्तर दिलें, महाराज, मालिकनें जो हुकूम फरमाया, इसमे मै आनेकू दिलमेसे खूप राजी है. किस तऱ्हे चलना, ये मेरेकूं एक बखत बताव तो मै उसमे फरक ना करूंगा. जानवर आया तोबी मै पीच्छे कबू नही हटुंगा. आब मै किसीकूं डरता नहीं. कब चलनेका ईरादा है ! नेका बंदा मै हूं. असें बोलून जाण्याची सर्व तयारी करून घेतली व उत्तम घोडा बरोबर घेऊन साईस बसण्याकरितां पालखी, कांहीं सोन्याचें नाणें व जवाहीर बरोबर घे-

तलें. आपलें सर्व सामान व बरोबर आणलेले नोकर लोक व स्नेही यांची सर्व व्यवस्था करून राजाचे स्वाधीन केले आणि सांगितलें कीं, मी येई तोंपर्यंत त्यांची चांगले प्रकारें बरदास्त ठेवावी. राजानें सांगितलें, आपण बिलकूल काळजी करूं नये. आपण माझेच आहांत, यांत काय तें समजावें. आपण मात्र फार हुशारीनें व साईंचे मर्जीनें असावें. आपला कार्यभाग आटपून माझ्या प्राणापेक्षां प्रिय अशी माझी कन्या, तीस लवकर घेऊन यावें आणि माझे लेंकराची व माझी भेट करावीं. येणेंकरून माझेवर जे आपले उपकार होतील ते जन्मभर फिटणार नाहींत. मी आपला जन्मोजन्मीं ऋणी होईन. असें बोलून साईस व मला उत्तम प्रकारें भोजन घालून राजानें आमचे पंक्तीचा लाभ घेतला. आणि साईनें राजास आशीर्वाद दिला व साई व मी जंगलांत निघून गेलों. पुढें ती पालखी वगैरे परत लाविली. साईनें मला झोळी, कंथा, सोडगें, पादुका इत्यादि जिनसा देऊन एक भारलेला ताईत माझे दंडांत बांधिला. खेरीज कांहीं वनस्पती रानांतून आणून माझे झोळींत टाकल्या आणि सांगितलें, बेटा, आज सब दुनयादारीका बादशाहा तुजकूं बनाया है. ये झोलीमे च्याहेसो तुझे दिलकूं बंदे सरिखे तुज सामने हात बांधके खडे रहेगां और क्यां च्याहिये सो मिलेगा. खुदाके पास कुच कमतर नहीं. और तेरेसे कुई लढनेवाला आया उसकू छडगा बताव, तो उस्से लढेगा. ये पावमे डाल और आंख दब ले चाहे उदर ज्याके पोंहचेगा. यह कंथा दीई उस्कू धूप और बरसात और थंड ज्यो ज्यो कुच ना लगेगा. और आंगपर कुईनें घाय किया तोबी घायाल ना होगा. और जो कुई जानवर ये देखेगा, तो तेरेकु छीने बिगर निकल ज्यायगा. तेरा डर आलम दुनिया मानेगी. तेरेकूं किसीकां डर ज्यालमतख ना पावेगां इत्ती मेरी निशाणी तुझकूं दिई है, और इस्से कुई बडा जादुगर मेरे सामने आनेकी ताकत किसीकू ना पावेगा, और जब च्याहिये तब मेरा नाम हमेषा मूमे आस्ते बोलते जाना. तेरे दिलमे आयाके आप किसीके नजर मै नही आना इत्ते दिलमे आया तो मेरा ध्यान करना. इत्ती मेरे पास जुगत थी तुजकूं बतादी. ये तुम आपने ज्यानसे भीतर रखना. जब खानेको भूक पीनेकूं प्यास लगेगी तब इसमे सफेत मुली है, उस लेके, आपने आंख मिटाके खानेकू मंगलेना तूजकूं देगी. किधर बी गयातो उसकू भुलना नहीं आब ये सब ध्यानमे रखना, ज्यान गई तो बेहत्तर, मगर ये किसीकूं मत कहना. तो

तेरा काम फत्ते होगा. तब पीच्छे ये सब चीजो उलटला दे. तेरेकूं अच्छा इलम, सबसे ज्यादा गल्लेका मनका तुजकूं दे देउगा. आब इरादा क्या है. बादशाहाकी लडकी मेरे आंखोके सामने मेरे नजरमें आती है आब तेरेकूं बताऊं देख रहो, असें बोलून त्या झोळींतून निळी मुळी काढून मला दाखविली. ती मी पहातांच, आपण एके मोठ्या महलांत उभे असून पलंगावर कोणी एक सुंदर स्त्री निजलेली दृष्टीस पडली. तीस पाहतांच मन चकित होऊन तिजकडे पहात एक क्षणभर तटस्थ उभा राहिलों. ती म्हणाली, या माहालांत आपण कसे आला? येथें सर्व राक्षसी माया आहे ! आपण आला तसे परत जा कसे, आतां चार वाजून गेले, पांचाचे सुमारास तो दुष्ट राक्षस येऊन माझा प्राण घेतो कीं काय असें होतें ! आज आठ दिवस याप्रमाणें चाललें आहे. मी म्हणालों, तूं माझी धर्मभगिनी आहेस. तुझी अशी स्थिति होण्याचें कारण काय, तूं कोणाची कोण, होतीस कोठें, येथें कशी आलीस, तो राक्षस कोण, व तुला तो कां छळतो, हें सर्व मला सांग ? मी तुझ्या दु;खाचें निवारण करतों. हें ऐकून ती रडूं लागली मीं सांगितलें, तुझा ऊर्जितकाळ नजीक आला म्हणून दैवानें मला तुजकडे पाठविलें आहे. तूं स्वस्थ ऐस. तुला या दुःखांतून मी सोडवीन. तिनें सांगितलें महाराज, मी रडतें यावरून आपण सर्व समजावें, व मजवर उपकार करावा असें जर आपल्या मनांत असलें तर विलंब न लावतां आतां जावें नाहींतर आपला घात होईल. इतकें तिनें म्हणतांच कडकड अवाज होऊन मोठी मेघगर्जना झाली आणि सर्व दिशा धुरानें भरून गेल्या! एकदम वीज चमकल्यासारखें झालें आणि सर्व दिशा प्रकाशित झाल्या ! इतक्यांत मीं गुरूचें स्मरण केलें तों आपले गुरूजवळ पूर्ववत् उभा आहें !

गुरूला पाहून त्यांचे चरणावर मस्तक ठेवून म्हटलें, साई, ये क्या हुवा ! मुझे क्या बताया? आब ओ सब कहां गये ! बडी आचंबेकी बात है आजी मै कांहाथा! और कांहा आन पोहोंच्या मै बहोत घबरा गया. ज्यानमे कुच न रहा. मेरी आक्कल गुंग भई, मेरे आख मिट गये, दिलमे एक आजब क्या है दिल फटगया मुजकू ये आजब क्या बताया ? आजी मै कुई आच्छा छोकरीके सात बाता करताथा और ह्यां कैसा आया ! ये मुझे कहदे ? साई, तेरी तारीफ है के तेरे ज्यो यलम है सो मुझें बताया. नागिनी सरीखी उमदा परिया जात कहां है? हें माझें बोलणें ऐकून फकीर मनांत म्हणतो, या-

ला ही विद्या साह्य झाली खरी. मग उघडपणें मला म्हणाला बेटा, कहां गयाथा ! और क्या देखां बोलदे. सब परवर दिगार तेरेपर खूष है. तेरेपर उनकी मेहर नजर पुरी है. तेरे किसमतमे क्या है, मुझे मालुम नही. लेकिन् कुच मै जानताहूं इसमे पैछानले. छोकरा, तुम क्या क्या देखा मुझें कहदे. नंतर मीं सांगितलें, मै ह्यांसे जो गया तो, बडा महेल जंगलमे था, उधर गया. और उधर आच्छी छोकरी, अस्मानकी बिजली, नागकी नागन, मदनकी रती क्या कहूं उस्की तारीफ करनेकू कौन सके. सब दुनया उस छोकरीके पांवके नीचे है, मैने उइसी नागिनी ना देखी, और ना सुनी, सो मैंने यह जानमे आज देखी. मेरी जान जा रही. मगर आपनी याद करके यहा आन पोंहच्या आब ओ क्या मुझें बयान करतीथी सुनो— साई, कुइ बडा सैतान उस्कू छेडके डराताहै. ये कुच बात बोलतीथी और रोतीथी आखोमेसे पानी बहोत जमिनपर गिरताथा. मुझे मालुम पडताथा कुच इस्के गह्लेमे मोतनकी लडिया. उनके नीचे बुंद माफक हार टुटकर गिरताहै. जब देखी तब मेरे नजरमे आया. सच ये रोती है. वैसे दिलमे आया और दर्याफीकिरने लगे तो ख्याल हुवा. ध्यानमे आया. बडे धोकेमें यह छोकरी गिरी है. खुदाताला परवरदिगार मेहेर करेगा तो यह छोकरी आपने आराममे जब गिरेगी. और कौन है साई बेटा तुजकूं जो राजानें भेजा इदर उधर तुजकूं मैंने भेजा. वो लडकी राजाकी नहीहै लेकिन् उस्का रस्ता ओ बतावेंगी. ओबी उनके मा भेनकी लडकी है उस्को मालुम है. कुइ षक्सनें उडाई है. ओ देवदूत है. ओ छोकरी भगवानका तारा उनका भिनाम ताराहै. जैशी महीताब लग रहि है. क्या उस्की बानी ! क्या उस्की तारिफ खुदा और ओ कुच फरक नही. ज्यानो ओ छोकरी बडे पहाढपर कलरात आई है. जंगलमे घुमती है. उस्कु रस्ता मिलता नही. आब तुम पहिले उसतरफ जाना चाहिये. क्यौंकी ओ छोकरी बडी अश्राप है. घुमनेसे थक गई है. इसलिये उस्के बेहेनकू मरदोका पेहराव करके साथ लेजाना और उनकी मुलाखत करके नाम बताना नही. उस्के सात तुम जाव और ये पाहाडके नीचे ईधरउधर घुमती होगी उस्कूं मेरे तै ले आना. पहिले सैतानकु मेहेलोमें ठार करना, पीछे उस छोकरीकूं पीपपर उस्के भेनके उधर ले जाना. पीछे ओ तुमकू मिलेगी ओ जंगल बडा कठण है. तुमकू सब तरतीफ् उसलिये बताई है. उसमाफिक

सब चलना. उस्मे फरक बिलकूल करना नहीं. किसीं जगें ये चीजो नहीं भुलना. उस्की तरतीफ् किसीकू नही बताना. ओ किसीकू बोलना नही, इतनी खबरदारी दिलके बीचमें रखना. तेरेकूं खुदाकी सौगन है. पीपपर और तेरे दस्तकू कुइ पकडेगा तो तेरे सात मै पवनके माफक आन पोंहचुगा. मी हें सर्व ऐकून साईच्या पायावर डोकें ठेवून तेथून पादुकावर पाय ठेवून सर्व सरंजाम बरोबर घेऊन डोळे झांकून पादुकांस म्हटलें, मला त्या बंगल्यांत घेऊन चला. डोळे झांकतांच त्या बंगल्यांत त्या मुली जवळ जाऊन पोहचलों. मला पाहतांच ती उठून उभी राहिली. तिनें माझें आगतस्वागत उत्तम रीतीनें केलें. आणि म्हणाली काल आपण एकाएकीं नाहींसे झाला, त्या आश्चर्यांत मी आहे. त्यापेक्षां आपण कोण आहां; हें मला सागां? मीं सागितलें मी देवदूत आहे, तुम्हास नेण्याकरितां येथें आलों आहें. ती म्हणाली, या राक्षसाचे हातून मी कशानें सुटणार. जरी आपण देवदूत आहां तरी देवांचें आणि राक्षसांचें नेहमीं युद्ध असतें. त्यावर मीं विचारलें, तुम्ही येथें कशा आला? तेव्हां ती म्हणाली, मी माझ्या सख्याबरोबर बागेंत फिरत असतां, थकून एके झाडाखालीं बसलें. त्या बागेंत पुरुष कोणी नाहीं, असें वाटून मी स्वच्छंदपणें होतें. तेथें चांफ्याचीं फुललेलीं फुलें माझ्या दृष्टीस पडलीं. मीं तीं आणावयास दासींस सांगितलें. त्यावरून त्या फुलें तोडीत होत्या. मी जेथें बसलें होतें तेथून जवळच एक सुंदर तलाव होता म्हणून मी त्याच्याकाठीं जाऊन बसलें. तों माझ्या मागून उत्तम पोषाग केलेला, अति सुकुमार पण घाबरलेला असा पुरुष येऊन, मला सोडीव, सोडीव! नाहींतर मी मरतों; धांवा! धांवा! असें ओरडत तेथें आला. त्याचे ते दीनवाणे शब्द ऐकून मी त्याजवळ गेलें आणि विचारलें, तुम्हास काय झालें? त्यानें सांगितलें, गुप्तरूपी पिशाच्च मला ओढीत व तोडीत आहे, म्हणून मी ओरडत आहें. तेव्हां मला दया येऊन गुरुमंत्रानें मीं त्याचेवर पाणी शिंपडलें. तों तो स्वतःच खरें पिशाच्च होऊन माझ्यापुढें आक्राळविक्राळ मुख पसरून भयंकर दांत वासून एक ओठ जमिनीस व एक आकाशास लागलेला असा झाला! तो भयंकर प्राणी पाहून मी घाबरून गेलें. तो हातपाय आदळीत माझ्यापुढें उभा राहिला व ओरडून म्हणाला, पोरी, तूं मला वर. माझी स्त्री हो. तुझ्या गुरुमंत्रानें माझें तूं खरें रूप पाहिलेंस व भ्यालीस, पण तुला आवडेल असेंच रूप धरून मी राहीन. तूं भिऊं नकोस. तुला जें जें प्रिय तें तें मी

करीन. माझा दरदराट सर्व पृथ्वीभर आहे. इंद्रासही दुर्लभ तें मी तुला आणून देईन, पण एकदां मला वरलें म्हणून म्हण. मी घाबरून गेलें होतें त्यामुळें माझ्या मुखावाटें एक शब्दही निघेना. माझ्या सख्या व दासी तर घाबरून जेथल्या तेथें निचेष्टित पडल्या. मी मात्र त्या दुष्टाचे दाढेंत सांपडलें. तथापि मीं धैर्य धरून मनांत म्हटलें, हा तर आपणास सोडीत नाहीं हें खचित आहे, पण प्रयत्न करून पहावा. मग मीं त्यास म्हटलें, मीं जर तुम्हास वरलें नाहीं तर तुम्ही माझें काय कराल! तो म्हणाला, ठार मारून टाकीन. तुझ्या रूपास मी मोहीत होऊन मनोहर रूप धारण करून तुजसन्निध येऊन उभा राहिलों व अद्वातद्वा बरळलों, तर हे सुंदरी, मला माळ घाल. म्हणजे तुझे सर्व मनोरथ पुरवीन. हे त्रिभुवनसुंदरी तुला काय पाहिजे असेल तें मागून तर पहा आणि मग मला वर. यावर मीं त्याचा धिक्कार केला. तेव्हां त्यानें रागानें एक संगमरवरी शिला आणून तिच्यावर मला जबरीनें बसविलें व या बंगल्यांत आणून ठेविलें. पण त्यानें हा कालपर्यंत माझ्या अंगास स्पर्श केला नाहीं. तो रोज माझें खाणेंपिणें घेऊन येतो व म्हणतो, अशा आणखी पांच राजकन्या मीं आणून ठेवल्या आहेत. व त्याच्या बोलण्यावरून त्या माझ्या आप्तच असाव्यात असें मला वाटतें. मीं त्यास दररोज मुदत करीत करीत आजपर्यंत दिवस काढले. एके दिवशीं मीं प्रेमाविर्भाव दाखवून त्यास विचारलें, तुझें मरण कोणाचे हातीं आहे? तेव्हां त्यानें सांगितलें कीं, चंद्रशेखर या नांवाचा एक सावकारपुत्र जन्मला आहे तो एका फकीराच्या अनुग्रहानें मला मारणार आहे. हें ऐकून मी मनांत समजलों कीं, साईनें सांगितलेली गोष्ट अनुभवास येणार व आपल्यास खास जय येणार. मग मीं तीस म्हटलें, तूं त्या राक्षसास दुसऱ्या राजकुमारी कोठें आहेत हें विचारून घे. मात्र येवढें काम अवश्य कर. तो येथें तुझें खाण्याचें घेऊन केव्हां येतो? ती म्हणाली, सकाळीं नऊ वाजतां व संध्याकाळीं पांच वाजतां खाण्याचीं ताटें घेऊन येतो व जातो. पण मध्यरात्रीं येऊन मीं त्यास वरावें म्हणून मला विनवीत असतो. आतां आज गोड गोड बोलून त्या माझ्या आप्तांच्या मुली कोठें आहेत हें काढून घेतें. पण तें ऐकून तुम्ही काय करणार, त्याचें मरण तर त्या सावकार पुत्राचे हातीं आहे व तुम्ही देवदूत आहां. मीं सांगितलें, तुला याची काळजी नको. मी तुला यांतून मुक्त करीन. ती म्हणाली,

आपण देवदूत मला मुक्त कसे करणार? छे, छे, माझी धडगत दिसत नाहीं! हे तिचे दुःखोद्गार ऐकून मला वाईट वाटलें, व मीं तीस म्हटलें, हें माझे प्रियभगिनी, ईश्वर माझ्या हातानें तुला या राक्षसाच्या हातून सोडविणार आहे यावर तूं भरंवसा ठेव व त्याचें स्मरण करीत ऐस. इतक्यांत पांचाचा अम्मल झाला, तेव्हां मीं विचार केला कीं, येथें असल्यानें सध्यां कांहींएक उपयोग होणार नाहीं. असा विचार करून मी तेथून फार दूर गेलों नाहीं इतक्यांत कड् कड् कड् असा मोठा शब्द होऊन आकाश कोसळून खालीं पडतें कीं काय असें झालें आणि धुराचा मोठा कोट होऊन त्या मधून मोठमोठ्या ज्वाला निघूं लागल्या. तेव्हां मला, आतां हा बंगला व हीं झाडेंझुडें सर्व जळून जातात कीं काय असें वाटलें. इतक्यांत एक मोठा राक्षस डोकीवर पर्वतासारखें गांठोडें घेऊन बंगल्यांत तिच्याजवळ गेला, व तीस म्हणाला, तुजकरितां रत्नजडित अलंकार व नानातऱ्हेचे पोषाक भरगच्ची बादलीचे असे राजगृहांतून आणले आहेत तर हे घे आणि मला वर. तूं खूष व्हावेंस याकरितां मी नानाछंद व श्रम करीत आहें तरी तूं मला वश होत नाहींस. हे सुंदरी तुजकरितां स्वादिष्ट अन्नें सिद्ध करून आणलीं आहेत. व मेवामिठाई, फळफळावळ, अत्तरगुलाब आदिकरून सर्व सामानाचीही सिद्धता आहे. तर हे घे आणि खूष हो. नाहींतर काय परिणाम होईल त्याकडे लक्ष दे. या पर्वतावरून तुला ढकलून देऊन तुझ्या अंगाचे शतशः तुकडे तुकडे करून टाकीन, शस्त्रानें तुझें छेदन करीन, पाण्यांत बुडवीन, अग्नींत टाकीन इत्यादि हाल करीन, पण तूं माझा कधीं अपमान केला नाहींस व माझ्याशीं एकही अमर्याद भाषण केलें नाहींस म्हणूनच वांचलीस. मी तुजवर आज प्रसन्न आहें. तुला जें मागावयाचें असेल तें मागून घे. यावर तिनें ही संधी पाहून हात जोडून विनयपूर्वक ती म्हणाली, आपण जर मजवर प्रसन्न आहां तर तुम्हीं ज्या राजकुमारी आणल्या आहेत त्या कोठें आहेत तें सांगा? तो म्हणाला, चित्रकूट पर्वतावर त्या तुझ्या भगिनी आनंदानें नांदत आहेत. यावर ती म्हणाली, राक्षसी माया मोठी अनिवार आहे, हें एवढें ओझें राजगृहांतून आपण आणलें तो राजा तरी कोण? त्यानें सांगितलें, तुझा पिता. हें ऐकतांच तिनें तात्काळ जिनसा उघडून पाहिल्या आणि त्या घेऊन उत्तम पोषाग करून अंगांत हिरे मोत्यांनीं जडलेली चोळी घातली व ते अलंकार अंगावर चढ-

वून ती अप्रतीम बनली व म्हणाली, आजचा मुहूर्त अति उत्तम आहे. मी आज रात्रीं आपणांस वरणार. तेव्हां माझ्या भगिनी येथें असाव्या अशी माझी उत्कट इच्छा आहे. परंतु हा योग कशानें येणार ?! त्यांचीं नांवें कृपा करून मला सांगावी. असें म्हणून तिनें त्यांचीं नांवें व ठिकाणें त्यास विचारून घेतलीं. नंतर तिची सर्व खाण्यापिण्याची व्यवस्था करून तो मोठ्या आनंदानें, आज रात्रीं सर्व श्रमांचें सार्थक होऊन ही सुंदर स्त्री मला प्राप्त होणार, मी खरोखर सभाग्य, माझी बरोबरी कोण करूं शकेल, असे मनीं मांडे व स्वप्नीं पुऱ्या खाऊं लागला. पण " मनसा चिंतितं कार्यं दैवोऽन्यत्र चिंतयेत् " हें त्याला काय माहीत? असो, मग तो राक्षस आपले मनीं आनंद मानून, परत लवकर येतों, तूं स्वस्थ ऐस, असें सांगून निघून गेला.

---

## भाग ४ था.

त्या दोघी स्त्रियांचें काय झालें, इकडे वाचकांचें लक्ष लागलें असेल, तर आतां तिकडे वळूं. त्या दोघीही सुशिक्षित होत्या. त्यांनीं कांहीं तरी सदुद्योगांत काळ घालवावा असा विचार करून, त्या परोपकारी गृहस्थाच्या शेजाऱ्या पाजाऱ्यांच्या लहान मुलामुलींना विद्याकलादिकांचें शिक्षण देण्याचा उद्योग चालविला. यामुळें त्यांचीं स्वतःचीं दुःखेंही त्यांना कमी वाटूं लागलीं. त्यांची शिक्षण देण्याची पद्धत काळाजीची व मायेची असल्यामुळें मुलें तयार होऊं लागलीं. त्या मुलांचे आईबाप कृतज्ञताबुद्धीनें या दोघींना मेजवानीला बोलावून लुगडीं वगैरे देऊं लागले. परंतु यांनीं म्हटलें, आमच्या वेळेचा सद्व्यय व्हावा म्हणून आह्मीं हें कृत्य आरंभिलें आहे. मुलांनीं व मुलींनीं सुशिक्षित व्हावें यापेक्षां आमचा दुसरा उद्देश नाहीं. तुम्ही आम्हांला जें देता तें तुम्हीं या आमच्या आवडत्या मुलांमुलींना द्यावें. त्या मुलांच्या आया वरचेवर यांची स्तुति करीत व म्हणत कीं आपण येथें आल्यानें आमचें कल्याण झालें. एक पैसा खर्च न करतां उत्तम शिक्षण मिळून उनाड पोरें व पोरी स्थितीवर येऊन त्यांचीं मनें विद्येंत विलसून रा-

हिलीं आहेत, व वाद्यें व गायन यांतील सूर, ताल, राग, रागिणी ओळखून ईश्वरभजनीं व मातापितरांचे ठायीं भक्तिही तुमच्या योगानें त्यांचे अंगीं वास्तव्य करूं लागलीं. असो.

आपल्या धर्मभगिनींनीं आरंभिलेला हा उद्योग पाहून त्या परोपकारी गृहस्थाला आनंद झाला. त्यानें मुलांमुलींना विद्यार्जनीं उत्तेजन यावें म्हणून पाडव्याच्या मंगलदिनीं शहरांतील थोर संभावित व विद्याभिलाषी लोकांस व त्यांच्या भार्याजनास निमंत्रण करून मोठा बक्षिससमारंभ केला. समारंभाची जागा मोठ्या उत्साहानें सुशोभित केली. नाना तऱ्हेच्या रंगमाळा व छतें देऊन चहूंकडे फुलांच्या माळा लावल्या. हार, गजरे, अत्तर गुलाब, पान सुपारी, पेढे, बरफी, साड्या, चोळ्या, टोप्या नाना तऱ्हेचीं पुस्तकें व कांहीं रोकड जेथल्या तेथें आणून ठेविली. याप्रमाणें सर्व सुरेख व्यवस्था करून बायकांकडे बायका व पुरुषांकडे पुरुष आगत स्वागत करण्यासाठीं उभे केले. सर्व लोक उल्हासानें नेमलेल्या वेळीं हजर झाले. सर्व मुलें व मुलींही आल्या. थोडेंसें संभाषण होऊन तंतुवाद्यें सुरू झालीं व मुलींस कविता म्हणावयास सांगितलें, व त्यांनीं खालील कविता म्हटल्या.

॥ श्लोक ॥

॥ प्रातःकालिं उठोनि सर्व मुलिनों प्रातर्विधीतें करा ॥
॥ विद्या-नाद सदैव वागवुनिया हा मार्ग खासा धरा ॥
॥ या योगें करुनी तुम्हांसि अवघें देईल तो ईश्वर ॥
॥ त्यामध्यें आपलें कुटुंब सगळें पोसोनि घ्यावा भर ॥ १ ॥

॥ पद ॥

॥ घ्याहो घ्याहो विद्याधन, केलें तुम्हांतें आर्पण ॥ ध्रु० ॥
॥ विद्या संपादावी तुम्हीं, शिक्षक बोले दिली आम्हीं ॥ १ ॥
॥ विद्या प्रसार करावा—सुख संपत्तीचा ठेवा ॥ २ ॥
॥ विद्याहीन मानवासी, पुसेनात कोणी त्यासी ॥ ३ ॥
॥ विद्यालाभ हा मिळवा, आपले मना संतोषवा ॥ ४ ॥
॥ विद्या श्रेष्ठ सर्व लोकीं, याच योगें सर्व सुखी ॥ ५ ॥
॥ विद्या माउली जनांची, इच्छा पुरवी मनाची ॥ ६ ॥
॥ गंगा सांगे विद्ये साठीं, तिचे तुम्ही लागा पाठी ॥ ७ ॥

॥ पद ॥ ३ ॥

( उभे उभे मम प्राणनाथा मजला टाकूनिया कोठें जातां-या चालीवर. )

आज्ञा गुरुची आधीं वंदावी, विद्या स्मृति ही नित्य असावी ॥ ध्रु० ॥
॥ प्रथमारंभीं उपदेशाला, शिष्या मनें जो वागेल त्याला ॥ चा० ॥ विद्या येईल हीं मनीं उमजावी ॥ १ ॥ गुरुनें शिष्या पुत्रा सम तो-विद्या शिकवूनि तडीस नेतो ॥ चा० ॥ गुरूनें ती विद्या शिरी भरवावी ॥ २ ॥
॥ गुरु आज्ञेनें पाठ करावें, दिले धडे ते नित्य पढावे ॥ चा० ॥ सांगितली रीति खुप वळवावी ॥ ३ ॥ मग ज्ञानातें संपादुनिया, शांति दया या अनुभव ध्यावा ॥ चा० ॥ शिष्या मनीं विद्या खुप भरवावी ॥ ४ ॥ कल्पतरू हा विद्या ऐसी, मार्गीं प्रवासी राखी त्यासी ॥ चा० ॥ गंगोधासमही सदैव वाहावी ॥ ५ ॥—

आर्या

॥ भूषणनरास विद्या त्याचा तूं बाळगीं सदाबाणा ॥
॥ सत्कीर्ति ज्ञात्या दे सुखदायी सत्य हें असें जाणा ॥ १ ॥
॥ नासा भूषण शोभे पहतां चमकेच त्यांत हीरमणी ॥
॥ पतिपदिं निष्ठा ती स्त्री कांता आवडे बहुत ही रमणी ॥ २ ॥

॥ श्लोक ॥

॥ प्रयत्नें साधावें धन अमित विद्या बहुमिसें ॥
॥ मिळेना ते त्यासी फिरत जणु लागोनिच पिसें ॥
॥ नरा ऐशा योगें भ्रमित जरि झालासी नुरता ॥
॥ तुला त्या प्राप्तीनें जन म्हणतसे धन्य पुरता ॥ १ ॥

॥ पद ॥

॥ स्त्री शिक्षण हें ऐकुनीकरणीं-तन्न्यायें मी स्वरुपें वर्णीं ओळखूं जातां वृक्षीनपर्णीं ॥ चा० ॥ सरणी त्याची कोणा कळेना, न्याता घेता वेळ मिळेना ॥ ध्रु० ॥

॥ श्लोक ॥

॥ विद्येमुळें मिळतसे बहुमान लोकीं, विद्ये विना न पुसतो जनबा विलोकीं ॥
॥ विद्या धनीक बघतां लवतील सारे, विद्ये विना उदय काळ कसा तुझारे ॥ १ ॥

॥ आभंग ॥

॥ विद्येची थोरवी कोण हो वाखाणी, तुच्छ रत्नखाणी तीचे पुढें ॥ १ ॥

॥ विद्या ज्या नराला विलासोनी राहीली, सुखाची दावीली घडी तीनें ॥ २ ॥
॥ विद्या हें भूषण विद्या हें निधान, कीर्तीस कारण विद्या होय ॥ ३ ॥
॥ विद्ये विण जीणें असें लाजिरवाणें, नर नारी भूषणें विद्या होय ॥ ४ ॥

॥ आभंग ॥

॥ विद्या सुमार्ग दाखवी ॥ वर्णी कालीदास कवी ॥ १ ॥
॥ विद्येची हो रुची ज्याला ॥ ते नर नारी ये भाग्याला ॥ २ ॥
॥ विद्या धन मानवलें ॥ तया उणें काय झालें ॥ ३ ॥
॥ बुद्धि देता असें ज्ञाता ॥ भेटे जणुकां सिंधु सरिता ॥ ४ ॥

॥ आर्या ॥

॥ माता विद्या धन गुरु यांचे ठायीं धरा तुम्ही भाव ॥
॥ देती फल तत्क्षणिं ते नकळे इतरांहि ईश्वरी भाव ॥ १ ॥

साकी

॥ विद्या विलास मंदिर आहे घ्या उपभोग तयाचा ॥
॥ इच्छित तुमचें पूर्णचि होईल अति उल्हासें वाचा ॥
॥ विद्या कल्पतरू, भरवा हृदयीं मान्य गुरू ॥ १ ॥
॥ सूर्य विकासिनी कमलें जैसीं तैसें हृदय करावें ॥
॥ विद्येनें सालंकृत होउनी लोकीं मान्य ठरावें ॥
॥ ऐसा यत्न करा—विद्वत् समूह पार पडा ॥ २ ॥

( झाली ज्याची उपवर दुहिता या चा०. )

आनंदालय भुवन हें बनलें ॥ पहा किती नामि मंदिर सजलें ॥ ध्रु० ॥
सर्व दिशा ह्या प्रफुल्ल जहाल्या ॥ अति बहु नामी परिमळ सुटले ॥१॥
कारंजाचे तुषार पाहुनि ॥ मोर किती तरी तन्मय जहाले ॥ २ ॥
अरसे महाल सुशोभित पहातां ॥ मैना रावे मंजुळ बोले ॥ ३ ॥
गानरंग रंगाते येउनी ॥ अभिनय पाहुनी कंठची डोले ॥ ४ ॥
वर्तनादि गुण लोकुनिया जन ॥ रंगिं तरंगुनी सहज ते गेले ॥ ५ ॥
रामात्मजा हें सर्व विलोकुनी ॥ हरिनामाते घेउनि डोले ॥ ६ ॥

याप्रमाणें सर्व मुलांनीं व मुलींनीं कविता म्हटल्यानंतर कोणांस पुस्तकें कोणांस साड्या, कोणांस खण व नाणें अशीं सर्व प्रकारचीं बक्षिसें योग्य रीतीनें दिलीं. निमंत्रित गृहस्थांस पान सुपारी व स्त्रियांस हळदीकुंकू व सर्वत्रांस अत्तरगुलाब वगैरे देऊन सर्वत्रांचे आभार मानिले. नंतर त्या बायांचे

आभार मानून लोक आपआपले घरीं गेले. वाटेनें जातांना कांहीं संभावित व कांहीं थोर पण टवाळ लोक बोलूं लागले, त्यापैकीं कांहीं मासला दिल्यास वाचकांना अप्रिय होणार नाहीं.

**गोपाळराव**—कां धोंडोपंत ! कसा काय थाट उडाला ?

**धोंडोपंत**—आजचा थाट तर आजब झाला. बायका मनुष्यें होऊन काळाचा असा सव्यय, ही गोष्ट आश्चर्य करण्या सारखीच खरी. पण बोवा या बायांचें तारुण्य, सौंदर्य व या येथें एकट्या येणें यावरून यांत कांहीं गोम असावी.

**गोपाळराव**—त्यांच्या वर्तनावरून व चर्येवरून मला तसें वाटत नाहीं. त्या दोघीही सदाचरणी असाव्यात व अशा स्त्रिया आपल्या देशांत असणें हें देशाचें भूषण होय.

**धोंडोपंत**—मला तर वाटतें, या आपल्या घरांतून निघालेल्या असाव्यात व यांनीं हें ढोंग माजविलें असावें.

**गोपाळराव**—वा ! थोर आहात ! आपल्या विद्याव्यासंगानेंच हें मनुष्यस्वभावज्ञान आपणांत आलें वाटतें ! जळो तुमची विद्वत्ता. विद्येचा मुख्य गुण म्हणजे दया, क्षमा व शांति यांचा अवलंब व व्यभिचाराचा परित्याग. पण आपल्याविषयीं विचार करितां सर्वच विपरीत ! जिला आपली भगिनी म्हटलें तिच्यावर पापदृष्टि ठेवणें, अबलांवर नाहक जुलूम करणें, व इतकें करून परस्त्री मातेसमान, ही व्यर्थ बडबड असावी अं! तुमच्या विद्याव्यासंगाप्रमाणें तुमचें मन जर सोज्वल असतें तर मघाचे अश्लाघ्य शब्द तोंडावाटे निघाले नसते. ( दुसऱ्याकडे वळून ) ऐकलेत कां पंतांचे शब्द ! रावसाहेब ! आपण विद्वान व मोठे अंमलदार आहांत, परंतु आपले हातून सुद्धां परोपकार होत नाहीं. धड मागें ना पुढें. काय हो आपल्या संपत्तीचा आणि कमाईचा उपयोग ? आपलें बोलणें व उपदेश जसा अघळपघळ, तशी आपली वर्तणूक असती तर आपण जगद्वंद्य झाला असता.

**आत्मारामपंत**—अहो थोरांचें सर्वच थोर. पण गोपाळराव, आपला स्पष्टवक्तेपणा कधीं तरी आपला घात करील.

**गोपाळराव**—हे पहा गानु, आपण खुषामती करणारे आहात व ह्यामुळेंच आपलें यांच्याजवळ वजन आणि आपला उत्तम गुण म्हटला म्हणजे आत्मकार्यसाधन ! बरें, आपलें त्या बायांविषयीं काय मत आहे ?

**आत्मारामपंत**—बाया उत्तम शिकलेल्या आहेत. व त्या सदाचरणी-ही असाव्यात असें वाटतें.

**गोपाळराव**—रावसाहेबांच्या करितां तुम्ही संशयात्मक बोला पण तुमचें मत माझ्यासारखेंच आहे. रावसाहेब आपण रागावूं नका. आपले हातून परोपकार स्वप्नांतही घडत नाहीं. आज पाहूं गेलें असतां, राजाचा रंक व रंकाचा राव एके क्षणांत कोणासही मनावर घ्याल तर आपण करा-ल. म्हणून लोक आपल्या कोणत्याही कृत्याला चांगलें चांगलें म्हणतील. पण खरा परोपकार असा त्या बायाच आज करीत आहेत. आपले वयास सुमारें ६० वर्षें गुदरलीं. विद्वत्ता असून बाह्य दांभिकपणा दाखविणें ही निदान आपलेसारख्यास मोठी लांच्छनास्पद गोष्ट आहे. यापुढें तरी आपण आपलें आचरण सुधाराल अशी आशा आहे.

( असें बोलत बोलत ते सर्व आपापले घरीं गेले. )

त्या दोघी स्त्रियांपैकीं राजस्त्री गरोदर होती हें वाचकांस माहीत आहे-च. तिचे दिवस भरले होते व ती त्याच रात्रीं प्रसूत होऊन तीस पुत्ररत्न झालें. उजेडतांच सर्वांनीं आनंदानें साखरा वाटल्या. बारा दिवस झाल्या-वर नामाभिधान ठेवावयाचें, करितां मोठा उत्साह केला पण तिनें सांगितलें कीं, येथें नांव ठेवावयाची कांहीं जरूर नाहीं. तो आपले घरीं जाईल तेव्हां त्याचें योग्य नांव त्याचे घरचीं माणसें ठेवतील. हें ऐकून त्या परोपकारी गृहस्थानें आलेले लोकांस कपडे व डागडागिने देऊन संतुष्ट केलें. व बाळबाळंतिणीस कपडे व डागिने देऊन हर्षयुक्त झाला. परंतु घरांतील बायका म्हणाल्या कीं मुलाचें नांव येथेंच ठेवावें व असें के-ल्यानें सर्वत्रांस फार संतोष होईल, मग यावर आपली मर्जी जशी असेल तसें करावें. हें ऐकून राजस्त्रियेस फार वाईट वाटलें. ती म्हणाली, या नांवाचा समारंभ आज घरीं केवढा झाला असता ! व तिकडे आनंदीं आनंद होऊन गेला असता, पण माझ्या दुर्दैवानें मला सर्व गोतांतून काढून येथें एकटी कशी आणून सोडिली ! नंतर सर्व बायकांनीं व तिजबरोबर आ-लेल्या सावकारकन्येनें तिचें सांत्वन केलें. त्या म्हणाल्या, मनांत वाईट वाटूं देऊं नका. हें बालक तुम्हासहित आपले माणसांत लवकरच जाऊन पडेल. पण चाललेला समारंभ होऊं द्या. तिनें बरें म्हटल्यावर, ज्योतिष्यांनीं सांगि-तल्याप्रमाणें त्याचें नांव “ चंद्रानन ” असें ठेवलें व चहूंकडे साखरा वां-

टून ज्योतिष्यांसह सर्व आलेल्या मंडळीस पोषाग वगैरे देऊन संतुष्ट केले.आणि बायकांस हळदकुंकूं, लुगडीं चोळ्या अत्तर गुलाब व पान सुपारी देऊन ओट्या भरल्या. असा समारंभ चालला आहे इतक्यांत शोध करीत करीत कांहीं स्वार व कांहीं कारकून तेथें आले व त्या संपन्न व परोपकारी गृहस्थास भेटले व राजस्त्रीची हकीकत विचारली. तेव्हां ती खुशाल असून सर्व संकटांतून पार पडली व तीस पुत्ररत्न झालें असें त्यांना कळलें, व हें कळतांच त्यांना मोठा आनंद झाला. नंतर ताबडतोब एक स्वार पत्र देऊन परत पाठविला. तें पत्र पाहून तिच्या पतीस, सासूस व सासऱ्यास किती आनंद झाला तो लिहिण्यास हें कलम असमर्थ आहे. वाचकहो, जी स्त्री मेली किंवा जिवंत आहे याचा मुळींच पत्ता नाहीं, ती एकदम सांपडली तर मग त्या आनंदास काय विचारावें ? जे लोक ती नाहींशी झाल्यापासून शोधास निघाले होते, त्यांस एकदम तिला पाहून केवढा आनंद झाला असेल ? त्यांच्या श्रमाचें साफल्य झालें असें त्यांस वाटलें व ते आपल्या यजमानणीस भेटले व त्यांनीं आपल्या लहानग्या धन्यास डोळे भरून पाहिलें, आणि घरचें कुशल कळवून आपणांस नेण्यास आम्ही आलों असें तीस सांगितलें. हे त्यांचे शब्द ऐकून तिला जो आनंद झाला, तो अन्तःकरणांत मावेना. पुसण्यास लज्जा तर खरीच, पण मनास धीर निघेना म्हणून आडून आडून प्रकृति कशी आहे हें अन्योक्तीनें तिनें विचारलें. हें ऐकून कारकुनानें सांगितलें, रात्रंदिवस आपला निजध्यास लागला आहे. कोणाशीं धड बोलणें किंवा चालणें बिलकूल नाहीं. राज्यकारभार पहावा म्हणून राजेसाहेब वारंवार सांगतात, पण माझ्यानें साफ कांहीं होणार नाहीं, माझी आशा तुम्ही धरूं नका, मी मृत्यूचे दाढेंत सांपडलों आहें व दोन महिन्यांचा सोबती असेन नसेन, मग यावर ईश्वरी इच्छा स्वतंत्र आहे, हे त्यांचे शब्द असतात. राजे साहेब म्हणतात, हा वेड्या, बायकोच्या मागें कधीं कोणी मेलें आहे का ! तुला एक सोडून चार बायका करून देईन. तूं शहाणा असून हें वेड्यासारखें काय बरळतोस ! यावर ते म्हणतात, छे, छे, आतां या दुनयेंत माझें कांहींएक उरलें नाहीं. माझी अर्धांगी प्रिया मला टाकून गेली, आतां मला ही दुनिया घेऊन काय करावयाचें आहे ! सर्व स्त्रिया माझ्या भगिनी, कन्या आहेत. त्यांची मला मुळींच आशा नाहीं. मला या दुनियेंतील संसार व्यवहार कांहीं नको, माझी जन्माची सोबतीण, माझा जो-

डा परमेश्वरानें नाहींसा केला त्यापेक्षां मीं दुनियेंत राहणें योग्य नाहीं. हे त्यांचे शब्द ऐकून आईसाहेबांना फार दुःख होतें, व त्या म्हणतात कीं, हा दुःखानें पोळून गेला खरा, पण आम्ही इतकें सांगतों तरी याचें अन्तःकरणांत ज्ञानाचा मोड कसा उद्भवत नाहीं ? आतां काय करावें! आम्हा वृद्धांस या वेळीं कोण साह्य करील ? आम्हीं शोधाकरितां चारी दिशेस मनुष्यें पाठविलीं, परंतु कांहीं शोध नाहीं! एकुलता एक पुत्र त्याची ही दशा! सर्वपरी आमचें पातक उभें राहिलें यांत संशय नाहीं! असो, आतां सर्वांनीं ईश्वरावर भार घालून ब्राह्मणद्वारें अनुष्ठानें चालूं केलीं आहेत.

इकडून धाडलेला स्वार तावडतोबीनें जाऊन त्या राजस्त्रियेच्या घरीं चौथे दिवशीं पोंचला व त्यानें राजास पत्र देऊन सांगितलें कीं, वहिनीसाहेब मुला सुद्धां खुशाल आहेत. हे आयुष्यवर्धक शब्द ऐकतांच सर्व राजनगरींत आनंदी आनंद झाला. चोहींकडे हत्तीवरून साखरा वांटल्या, व सर्व प्रजाजनांनीं तो दिवस सणाप्रमाणें साजरा केला. राजपुत्राला तर पुनर्जन्म झाल्यासारखें वाटलें. त्याला ग्रहण सुटल्यासारखें झालें. त्यानें पुनः तें पत्र वाचून पाहिलें. नंतर तो विनयानें आईबापांस म्हणाला, मजकडून अमर्याद पुष्कळ कृत्यें घडलीं व आपली फार अवज्ञा झाली, त्याची मला क्षमा करा. मी आपलें लेंकरूं आहें. तेव्हां ते म्हणाले, लेंकराचे हातून कितीही अपराध झाले तरी आईबापांस त्याचा विषाद मुळींच वाटत नाहीं. आम्ही समजतों कीं, तूं हें सर्व अजाणपणानें केलेंस! चिंता नाहीं. तूं स्वस्थ ऐस. आतां तुझी बायको तुला लवकर भेटेल. नंतर राजानें त्या आलेल्या स्वाराबरोबर कांहीं वयस्क बाया, म्याना, स्वार शिबंदी व कांहीं लवाजमा रवाना केला आणि सांगितलें कीं, जितकी तुमच्यानें जलदी होईल तितकी करून तीस लवकर घेऊन या, व मूल बाळंतीण फार फार जपून आणा. ते सर्व राजाचा हुकूम घेऊन व राजपुत्रानें गुप्तरीतीनें आपले कुंटुंबास दिलेलें पत्र घेऊन, मजल दर मजल कूच करीत लवकरच त्या परोपकारी गृहस्थाच्या शहरांत गेले व सर्व हकीकत सांगून पत्र दिलें. त्यानें तें पत्र वाचून राजस्त्रियेची जाण्याची तयारी केली व आपणही तिजबरोबर निघाला. घरांतील मनुष्यास तिचे सहवासाचें सुख आठवून फार वाईट वाटलें. तरी तिच्या आनंदाकडे लक्ष देऊन तिला जाण्याला मोठ्या जुलुमानें रुकार दिला. तिनें देवास व मानलेल्या आईभावांस नमस्कार

केला आणि आपल्या धर्मभगिनीस बरोबर येण्याविषयीं आग्रह केला. परंतु ती म्हणाली, तुम्हाला माझ्या वियोगाचें दुःख होईल खरें, पण येथें राहिल्यानें माझ्या दुःखाचें मला कांहीं वाटणार नाहीं. मुलांमुलींना शिकविण्यांत माझा काळ आनंदानें जाईल. माझी ओळख ठेवा म्हणजे झालें. यावर तिची धर्मभगिनी म्हणाली, तुमची ओळख कशी विसरेन ? पण तुम्ही मात्र तुमच्या प्रियकराची भेट झाल्यावर मला भेटायला या. कमलावतीनें या बोलण्यावर सद्गदित कंठानें—मग येईन बरें भेटायला, असें म्हणून डोळ्यांना पाणी आणून तिला जायला निरोप दिला. पुढें ती एका मुक्कामावर जाऊन उतरली असतां पदरच्या एका मनुष्यानें एक पत्र तिचे हातीं दिलें. अक्षर पाहून तिला गहिंवर आला, व पत्र केव्हां वाचीनसें झालें. लखोटा फोडून कांहीं वाचलें, तों त्यांतील दुःखोद्गार वाचून ती रडूं लागली. हें दासीनें पाहून झट्कन् जवळ गेली आणि म्हणाली, बाईसाहेब, सावध व्हा. अशा कां घाबरलांत ? आतां आपल्यास लवकरच यजमान भेटतील. शिजेपर्यंत दम धरला नि आतां निवेपर्यंत नाहीं का धरवत ? आपले दैवाची स्थिति मुसळास अंकुर फुटल्याप्रमाणें झाली. आतां घाबरूं नका. एक दोन दिवसांत सरकारची भेट होईल. इतकें दासीनें सांगितलें तरी पूर्वस्मृति होऊन ती प्रेमानें म्हणाली, माझ्या प्रियकराचा मुखचंद्रमा केव्हां पाहीन असें मला झालें आहे. असें म्हणून ती बेशुद्ध पडली. दासीनें पंख्यानें वारा घातला. गुलाबपाण्यानें रुमाल भिजवून डोक्यावर व कपाळावर ठेविले. नंतर थोडें गुलाबपाणी डोळ्यास लावतांच ती सावध झाली व स्फुंदून स्फुंदून रडत म्हणाली, आतां मला ते केव्हां भेटतील ? पंख असते तर जाऊन केव्हांच भेटलें असतें. असो. असें करीत करीत एक मजल तिची नगरी राहिली तो इतक्यांत काय चमत्कार झाला कीं, कोणीएक मुशाफर दोन चार स्वार घेऊन त्याच धर्मशाळेंत येऊन उतरला. तो मुशाफर म्हणजे तिच्या पतीवांचून दुसरा कोणी गृहस्थ नव्हता. शिकारीला जातों या मिषानें तो वडलांची आज्ञा घेऊन आपल्या स्त्रीला भेटण्याकरितां आला होता. तो या धर्मशाळेंत मोठें लष्कर उतरलेलें पाहून येथें कोण उतरलें आहे याची चौकशी करूं लागला. परंतु रात्रीचा समय असल्यानें बरोबर कोणी ओळखेना. इतक्यांत दासी बाहेर आली व तिनें मोठ्या चतुराईनें त्याजकडे पाहतांच आपले धन्यास ओळखलें आणि बाईसाहेबाकडे धांवत जाऊन म्हणाली, बाईसाहेब

आज मोठा सुदिन उगवला. धनीसाहेब आले आहेत. हे शब्द ऐकून ती मनांत म्हणूं लागली कीं, मी भेटीविषयीं उतावळी झालें आहे म्हणून ही माझी थट्टा तर करीत नसेलना? पुनः दासीनें सांगितलें, बाईसाहेब मीं काय म्हटलें, तें ऐकलेंत का? बाहेर धर्मशाळेंत कांहीं स्वार उतरले आहेत, ते कोण म्हणून मी पहावयास गेलें तों तेथें स्वारी दृष्टीस पडली व मग मी तशीच तडक इकडे धांवत आलें. माझें सांगणें जर आपणास खोटें वाटत असेल तर कोणी दुसरें मनुष्य पाठवून मनाची खात्री करून घ्यावी. हे तिचे शेवटचे शब्द ऐकून आपल्यावर अमृतवर्षावच झाला कीं काय, असें तिला वाटलें व म्हणाली, परमेश्वरा हें जर खरें होईल तर लक्ष त्रिदळें शिवास वाहून सव्वालक्ष ब्राह्मणांची सालंकृत पूजा करून त्यांना भोजन घालीन. नंतर दासीस म्हणाली, अग, तेथें हुजऱ्यांपैकीं नारायण, गोविंदा, कोणी असतील त्यांस इकडे बोलाव आणि सांग कीं, आपलें खटलें सर्व धर्मशाळेभर पसरलें असून नवीनच कोण तेथें उतरलें आहे, याची चवकशी करून त्यास पुरतें पाहून काय तें मला कळीव. जा लवकर आणि जेवढी जलदी करवेल तेवढी करून मजकडे ये. हुकुमाप्रमाणें दासी गेली व बाईसाहेबांच्या सांगण्याप्रमाणें हुजऱ्यांस हुकूम केला. त्यांनीं जाऊन त्या लोकांस हुकूम केला कीं, येथें राणीसाहेबांचें खटलें उतरलें आहे व दुसरे कोणासही राहण्यास परवानगी नाहीं. काढा येथून आपलें खटलें. उचला बोजा. राजपुत्र म्हणाला—मेहेरबानी करून रात्रचेरात्र आम्हास राहूं द्या. हुजरे म्हणाले, छे, आमच्या बाईसाहेबांस हें मुळींच खपणार नाहीं. अशी बोलाचाली होत आहे तो दोन चार घोडेस्वार तेथें आले व त्यांपैकीं एक म्हणाला, नरायण, क्या गडबड है! कुई चोर चिलट तो नही? क्या है मुझे फरमादेव. रस्तेमें कुच बात बनी तो मेरेसरीखा कडवा आदमी इस दुनियेमें न होगा. बोलो क्या हैसो? नारायणानें सांगितलें, रामजी, इधर कुइ मुशाफर सब रात रह्यनेकू आया है. और मेरी थिटोरी करत है के, मै फजर निकल जाऊंगा. मैने उस्कू दो मर्ते फरमाया के भला आदमी, ह्यांसे निकल जा. तो मेरा नही सुनता, और मुजसे हिलता नहीं, क्या मगरूर है. इत्ते मै बोला तो हसने लगा. क्या बेवकूब गव्हार आदमी हय. आब तूं उसकूं पहिले निकाल देव, नही तो बाईसाबकूं बहोत घुस्सा आवेगा. ज्या जलदी. इतकें बोलून नारायण निघून गेला. स्वार पुढें होऊन

कौन हो, इतकें बोलून वर पाहतो तों मुषाफरी पोषाग केलेला आपलाच यजमान, असें पाहून त्यास फार वाईट वाटलें. आणि मनांत म्हणाला, अरे भगवान् ! बडी खैर भई, मेरा बुरा शकून मुझे मूके बहार नहीं निकला. येतो मेरे खाविंद है. असा विचार करून झट्कन् धनीसाहेब, असें म्हणून मुजरा केला. राजपुत्र म्हणाला, तुमची धनीण कोठें आहे ? हें एका दासीनें ऐकलें आणि ती म्हणाली, महाराज वहिनीसाहेब जवळच आहेत. चलावें मजबरोबर, असें म्हणून आपण लगबग पुढें जाऊन धनिणीस सांगितलें कीं, महाराज आले आहेत. हें ऐकतांच त्या अनेक दुःखें भोगलेल्या राजस्त्रीच्या डोळ्यावाटें आनंदाश्रू वाहूं लागले. कंठ सद्गदित झाला, व स्वारी कोठें आहे म्हणून विचारते, तों स्वारी येऊन थडकली. मग त्या आनंदास पारावार नाहीं. सर्व सुखदुःखें एकमेकांचीं दृष्टादृष्ट होतांच पुढें उभीं राहिलीं. परस्परांकडे पहात दोघेही क्षणभर तटस्थ उभे राहून परस्परांनीं एकमेकांस मिठ्या मारल्या. राजपुत्रानें आपल्या बालकास पोटाशीं धरून त्याचे खूप मुके घेतले व त्यास वारंवार कुरवाळून मस्तक अवघ्राण केलें व त्यास म्हणाला, आपले आईस फार दुःख दिलेंस, पण आतां सुखी ऐस. व वारंवार त्या बालकाच्या मुखचंद्राकडे पाहून जसें कमल प्रफुल्लित होतें तद्वत् अन्तःकरण करून स्त्रीस म्हणतो, येथें कोणीही तिसरे मनुष्य नाहीं, मग आतां माझ्याशीं बोलण्याला भीड काय म्हणून ? सर्व दुःखांची समाप्ति होऊन पोटीं पुत्र व पतिदर्शन झाल्यामुळें आनंदातिशयानें तिचा कंठ भरून आला होता यामुळेंच तिला बोलतां येईना. अशा अवस्थेंत कांहीं वेळ गेल्यावर ती म्हणाली,प्राणनाथा आपली ही हृदयानंदकारी मूर्ति पाहिल्याबरोबर आपल्याला घट्ट आलिंगन देऊन आपल्याबरोबर मी किती तरी बोलूं असें मला झालें होतें. परंतु आनंदसागराच्या अमित भरतीनें माझें हृदय भरून गेल्यामुळें माझ्या मुखावाटें शब्द निघेना याला मी काय करूं ? बरें पण आतां असेंच उभें किती वेळ राह्यचें ? या मंचकावर पडावें, म्हणजे ही दासी चरणसेवा करून पूर्वसुखाचा अनुभव घेईल. या तिच्या बोलण्यावर राजपुत्र म्हणाला,काय आज तुजकडून चरणसेवा करून घ्यायची, प्रिये तुला इतके शीण झाले असतील कीं आज मींच तुझी चरणसेवा करावी. असें म्हणून राजपुत्रानें आपल्या अर्धांगीचा हात धरला व ते दोघे मंचकावर बसले. दोघांची मध्यंतरीं एकाएकीं तुटातूट होऊन बऱ्याच

दिवसांनीं गांठी पडल्यामुळें एकमेकांच्या सुखदुःखाच्या गोष्टी सांगण्याला ती रात्र त्यांना पुरली नाहीं. अगदीं अरुणोदय झाला तेव्हां राजपुत्र म्हणाला, आतां मी पुढें जातों तुम्हीं मागून यावें. आपण बरोबर गेलों तर माझे मित्र माझी थट्टा करतील. यावर त्याच्या स्त्रियेनें बरोबरच जाण्याविषयीं पुष्कळ आग्रह केला परंतु त्यानें आतां रात्रीं भेट होणार आहेच, खेरीज आपण बरोबर गेलों तर तें दिसण्यांतही वाईट दिसेल, अशी आपल्या स्त्रीची समजूत करून तो पुढें निघाला.

राजपुत्र आपल्या वाड्यांत जाऊन पोंचल्यावर मागून थोड्याच वेळांत हें खटलें जाऊन पोंचलें. सर्व नागरिकांनीं मोठा उत्सव केला. राजानें व राजपुत्रानें आपल्या परोपकारी गृहस्थाचा बहुमान केला, व तो जरी कोणी नात्यागोत्याचा किंवा इष्टमित्रांतला नव्हता तरी दोघांनींही त्याला तो स्वतःच्या जिवाहून प्यार आहे असें वागविलें. दोन तीन दिवस तेथें राहिल्यावर तो परत जाण्यास मुभा मागूं लागला, परंतु राजवाड्यांतील सर्व लोक त्याला जाऊं देईनात. राजपुत्रानें तर त्यास सांगितलें कीं, आपण आमच्याच नगरांत सततचे राह्यला या. मी तुम्हाला मोठा वाडा बांधून देतों. राजाच्या मनांतून या गृहस्थास मोठी जहागीर करून द्यावी असें आलें व त्यानें ती गोष्ट यास निवेदन केली. तेव्हां हा म्हणाला, आपली मजवर कृपा आहे हीच मोठी जहागीर आहे. मला आपण जहागीर द्याल या आशेनें मी आपल्या स्नुषेस धर्मभगिनी मानून आणलें नाहीं. ईश्वरकृपेनें आजच्या मित्तीला मला कांहीं कमी नाहीं व मी जर केवळ परोपकारबुद्धीनें अनाथास आश्रय देत जाईन, तर ईश्वर मला कांहीं कमी पडूं देणार नाहीं ही मला खात्री आहे. असो आतां आपण मला माझ्या गांवीं जाण्यास परवानगी द्या. आपल्या परोपकारी गृहस्थाचा जेव्हां जाण्याविषयीं अत्याग्रह पडला तेव्हां राजानें, राजपुत्रानें व त्याच्या स्त्रियेनें मोठ्या नाखुषीनें त्याला जाण्यास परवानगी दिली. या त्रिवर्गांनीं असल्या परोपकारी गृहस्थास बहुमोल पोषाख व आभरणें प्रेमानें दिलीं हें सांगायला नकोच.

# भाग ५ वा.

इकडे पूर्वी सांगितल्याप्रमाणें रात्रीं दोन वाजतां तो राक्षस त्या सुंदरी- जवळ मोठ्या उल्हासानें आला आणि तिला म्हणाला, तुझी काय इच्छा आहे ती सांग म्हणजे ती परिपूर्ण करितों. ज्यापेक्षां तूं मला आतां वर- णार, त्यापेक्षां माझ्या हातून कांहीं प्रमाद घडला असला तर त्याची मला क्षमा कर. यावर ती म्हणाली, माझी क्षमा कशाला मागतोस? परंतु आज- पर्यंत जीं तूं अनन्वित पातकें केलींस त्यांची ईश्वराजवळ क्षमा माग. हें ऐकतांच राक्षसाचे मनांत प्रकाश पडला. त्यास वाटलें कीं, आज कांहीं तरी विपरीत आहे. तो इकडे तिकडे पाहूं लागला, तों त्याचे दृष्टीस मीं पडलों. मला पाहतांच त्यानें आपलें खरें स्वरूप धारण केलें. आणि तीस म्हणाला, हे दुष्टे, चांडाळणी! निर्लज्जे, आजपर्यंत मीं तुझी वाट पाहिली व आज वरशील उद्यां वरशील या आशेवर दिवस काढले. ती तूं आज माझे प्राणावर उठलीस काय? दुष्टे! माझ्या समोर तूं व तुझा त्राता दोघे अ- हां तर आतां दोघांसही फाडून खाऊन टाकतों. असें म्हणून त्यानें मोठें आक्राळ विक्राळ स्वरूप धारण केलें. त्याच्या तोंडांतून अग्नीसारख्या ज्वाला निघूं लागल्या. हात पाय आदळून तो मोठ्यानें ओरडला व त्या सुंदरीस डावे हातीं धरून तिजला आपटून मारून खाणार, इतक्यांत मीं जलदी करून त्याचे शिरावर खड्ग मारून त्याचे राई राई येवढे तुकडे केले व ते सर्व तुकडे चारी दिशांना फेकून दिले. आणि त्या कन्येस म्हणालों, हे भगिनी आतां भिण्याचें कारण मुळींच राहिलें नाहीं. असें तिचें शांतवन करून तीस आपले खांद्यावर बसवून पादुकावर पाय ठेवतांच मी त्या सुंदर कन्येसहवर्तमान त्या महंताजवळ येऊन उभा राहिलों. आम्हीं दोघांनीं त्या महंतास साष्टांग नमस्कार केला व मीं म्हटलें, साई! ये छोकरी सैतान मारकें लाई है, तो सिद्ध स्थितीवर येऊन पाहूं लागला आणि म्हणाला, बेटा, तेरी सिद्धी होय. आब ये छोकरकूं इसकें बापकें घर लेज्याना. हें ऐकून ती मुलगी म्हणाली, या राक्षसानेंच माझ्या पांच नात्याच्या बहिणी चोरून नेल्या आहेत. त्यांचे आईबापही असेंच शोक करून त्यांच्या नेत्रीं प्राण उरले असतील. तरी मजबरोबर त्यांचा शोध लावून त्यांस घेऊन चला. त्या आपणास मोठा

आशीर्वाद देतील. हें ऐकून मीं साईस म्हटलें, साई ! ये छोकरीका इरादा कुच और है. इस्के पांच बेहन सैतान लेगया है, उस्का पत्ता मिलता नही, तो उस्का तल्लाष करके साथ ले जानेकूं मंगती है. तो आप पहिले देखो, ओ छोकरीया कहां कहां है. ओर आव हुकूम करोगे तो मै तांहा जाउंगा. आपने कहने बिगर ना करूंगा. हें ऐकून साई म्हणाला, बेटा आख मिटजां. नंतर मीं डोळे मिटले. मिटतांच त्यानें माझे डोकीवर हात ठेवून तो म्हणाला, बेटा, क्या नजरमें आया? मीं सांगितलें महाराज, पांच कन्या जशा अप्सरा मीं कधींच पाहिल्या नाहींत अशा नजरेस आल्या. अहाहा,एकापेक्षां एक चढ स्वर्गींच्या रंभा त्यांच्यापुढें तुच्छ आहेत. ईश्वरानें येथें खरोखर आपलें खरें चातुर्य खर्च केलें आहे. ज्या कोणास या भाग्यशाली कन्या मिळतील त्यास इंद्राचेंही सुख यापुढें तुच्छ वाटेल व त्याचे सर्वपरी कल्याण होईल. असो. आतां या मुलीस येथेंच ठेवून आपण तिकडे चालतें व्हावें. असा विचार करून साईस म्हटलें, साई, ये छोकरी आपकें पास रहने दे. मै आब जो छोकरी देखी सो जंगलमें कुई पहाडमें कोई पानेमे कोई मेहेलोंमें देखी. उस्का रस्ता मैने नही पैछाना. आबक्या तरतीबसे ह्यां लाना उस्का ख्याल दिलोमे पहिला करना चाहियें. एककू लाना, ओर दुसरी के व्हां जाना. ये बिगर बात होनेकी नही. साई मैने सब देखा. आब इदर लानेकी तरतीब मुझे बताव. साई म्हणाला, बेटा, तुजकूं सब चीजो मै दे चुका. ये छोकरीयोके वास्ते जो तरतीब तुजकूं बताई, सो बखत पडेगा उधर उधर येंच करना चाहिये. हें ऐकून मी त्याचे पायावर डोकें ठेवून समुद्राचे किनाऱ्यावर गेलों व तेथें एक मोठें वडाचें झाड होतें तेथें जाऊन त्या खालीं छायेंत बसलों. तों तेथें मोठ्या भुताच्या किंकाळ्या ऐकूं येऊं लागल्या. हाणा, मारा, तोडा, खा, हें शब्द ऐकून मीं मनांत फारच घाबरलों, तरी पोटीं धैर्य धरून विचार करूं लागलों कीं हा काय अनर्थ आहे ? व गुरुजी रक्षण करोत असें म्हणून वर झाडाकडे पाहूं लागलों, तों तें झाड सर्व पेटून गेलें आहे व त्याच्या ज्वाला जणूं काय आकाशास लागतात कीं काय असें दिसलें ! आतां पुढें काय होणार, म्हणून इकडे तिकडे पाहूं लागलों पण तेथें कोणीही मनुष्य दृष्टीस पडेना. कांहीं वेळानें भुतांचा कलकलाट स्तब्ध होऊन कोणी एक पुरुष हातांत मनुष्याचें डोकें घेऊन नग्न माझे समोर येऊन उभा राहिला आणि म्हणाला, हें

फळ तूं घे म्हणजे तुझें इष्ट पूर्ण होईल. मीं सांगितलें, अलीकडे ये आणि माझे हातांत दे. तो पिशाच्च म्हणाला,मी तुला स्पर्श करीन तर मी खाक होऊन जाईन. नंतर तो पुढें आला व तें माझे पुढें ठेवलें. मी हात पुढें करून घेणार तों तें शीर मोठी आरोळी ठोकून त्या उंचवट्यावरून गडबडत जाऊन समुद्रांत पडलें, व मोठा ध्वनी असा झाला कीं, तूं इकडे ये. तुझा रस्ता खुला झाला. असें ऐकतांच साईचें स्मरण करून मीं न भितां त्या स्मशानवत् भूमीपासून उठून जेथें शिराचा ध्वनी झाला तेथें गेलों. व पाहतों तों पाण्यांत मोठें भुयार दृष्टीस पडलें. त्या भुयारास सुवर्णाच्या पायऱ्या असून दोहींकडे ध्वज लागलेले होते. दोहीं बाजूंस सुंदर मृदु काढण्या सोडून दिल्या होत्या. मी थोडा पुढें गेलों तों दोन दासी पंचारत्या घेऊन पुढें आल्या व मागाहून सर्व जवाहिराचे दागिन्यांनीं भरलेली अशी सोळा वर्षांची अति रूपवती ती स्त्री सुंदर पोषाक केलेली पुढें आली. आणि मला म्हणाली, महाराज, असें इकडे यावें. हा मार्ग फार सुलभ आहे. न भितां स्वस्थ मनानें आपण खालीं यावें. रस्ता दाखविण्यास मला आज्ञा झाली आहे. असें म्हणून मला आग्रह करूं लागली. मग मी गुरूचें स्मरण करून त्या स्त्रीबरोबर जिना उतरून त्या भुयारांत गेलों. माझ्या दृष्टीस एक मोठा महाल पडला. व त्यांत जों पाहतो तों नाना तऱ्हेचे पक्षी पिंजऱ्यांत नाना तऱ्हेच्या भाषा बोलत होते व मला पाहातांच त्यांनीं फारच कलकलाट केला. त्यांत कोणी दक्षणी भाषा बोलणारेही होते, ते म्हणाले, हे सावकारपुत्रा, फीर माघारा. तिकडे जाऊं नको. जाशील तर फसशील आणि आमच्यासारखी तुझीही स्थिति लवकरच होईल. मीं त्यांस सांगितलें भिऊं नका, स्वस्थ असा. मी तुम्हांस मुक्त करण्याकरितां येथें आलों आहें. तुमची हकीकत उद्यां सर्व ऐकेन व परवांचा दिवस तुमची मुक्तता झाल्याशिवाय उजेडणार नाहीं. परोपकारासारखें पुण्य नाहीं व अनृत भाषणासारखें पातक नाहीं. इतकें म्हणून आंत शिरलों, तों सर्व चकचकाट माझे दृष्टीस पडला. चोहों बाजूंस मोठमोठे भरगची पडदे सोडले होते व चोहींकडेस दीप प्रज्वलित झाल्यानें तो प्रकाश चहूंकडे फांकून गेला होता. पुढें पाहतों तों नाना जातीच्या जनावरांचीं खिल्लारें दृष्टीस पडलीं. त्यांच्या पुढें योग्य चारा व स्वच्छ पाण्याचीं भांडीं भरून ठेविलीं होतीं. तसाच पुढें गेलों,तो एक रत्नजडित जिना खाली जाण्यास दृष्टीस प-

डला. तेथें जों जाऊन पाहतों तों सुदंर सुंदर स्त्रिया आपापल्या आदबीनें बसल्या होत्या. सर्व दासी हात जोडून सेवेंत तत्पर उभ्या होत्या. पुढें एक रत्नजडित सिंहासन असून त्यावर अतिमृदु हातभर उंचीची बैठक घालून त्यावर लोड तिवासे मांडलेले असून त्यावर एक तरुण स्त्री केवळ रतितुल्य जिचें स्वरूप, मधें चंद्रासारखी चमकत आहे, असें दिसलें. तिच्या आसपास मोठमोठ्या हुद्याच्या व ज्यांचें सौंदर्य अवर्णनीय अशा तरुण स्त्रिया दुसऱ्या सिंहासनावर बसून तिच्या हुकुमाप्रमाणें वर्तत होत्या. व सिंहासनासमोर तीन स्त्रिया नाचून गात होत्या. मी त्यांचे पोषाकही भरगची मोती खिळलेले होते. आणि अंगावर लाखों रुपयांचें जवाहीर घातलेलें होतें. व सुंदर हातापायांनीं ताल व काल दाखवीत होत्या. मी गेलों तेव्हां त्यांचा सर्व भाव त्या स्त्रीकडे चालला होता. मी तर त्या पायांतील छुमछुम नूपुराचा शब्द व तो हावभाव पाहून व अप्रतिम गाणें ऐकून अगदीं वेडावून गेलों. त्या येवढ्या स्त्रियांत मला एकही पुरुष दृष्टीस पडला नाहीं. त्यामुळें मी मोठ्या संशयांत पडलों व मनांत म्हणालों, कीं या स्त्रीसमूहांत माझी आहुती पडते कीं काय न जाणे ! मी कोणते कार्यास आलों आणि हें माझ्या पुढें काय दिसत आहे ? जी मुलगी आपण नेणार ती कोणती ? येथें तर सर्वच सौंदर्याच्या खाणी दिसताहेत. जिकडे जिकडे पहावें तिकडे तिकडे सुंगधींसुंगध सुटला आहे. जी गादीवर बसलेली राणी दिसते ती कोण असावी बरें ! माझ्या तर सर्व माता भगिनीं कन्याच आहेत. परंतु माझी पूर्वार्जित पुण्याईच खरी यांत संशय नाहीं. नाहींपेक्षां अशा स्त्रियांचीं मानवी प्राण्यास दर्शनें दुर्लभ आहेत. आतां येथें मी नेणार ती स्त्री कोणती ? व तिचा शोध कसा लागतो ? असो; अशा विवंचनेंत मी आहें इतक्यांत त्या गाणारणीनें ही चीज म्हटली:-

॥ ठुंबरी हिंदुस्थानी ॥

( कृष्णा गोकुळीं गुजगुज उठली, या चालीवर. )

आंबियाके डारिपर कोयल बोले, अवाज सुनकर नागीन डोले ॥ ध्रु० ॥
चमक चमक चमक चमक बिजली, चहूं चहूंकर कर मयूख बी चाले १
पवन चलत जब पूर नदीयनसे, नीर बहत है मिहूं बरसे ॥ २ ॥

इतक्यांत एक दासी येऊन मला तिनें त्या सिंहासनाजवळ नेलें. आणि

सर्व गाणारणींस जाण्याविषयीं हुकूम दिला. हुकूम मिळतांच सर्वजणी मुजरा करून चालत्या झाल्या व तेथील सर्व दुसऱ्या स्त्रियाही झट्कन् आपापल्या ठिकाणीं गेल्या. नंतर मला त्या सिंहासनावरील स्त्रीनें म्हटलें, आपण मला नेण्याकरितां आला आहांत, पण माझें येणें आपले बरोबर कसें होईल? हें ऐकतांच मीं तीस विचारलें कीं, मी आपणास नेण्यास आलों आहे, हें आपणास कसें कळलें? ती म्हणाली, आपण या गूढांत मुळींच पडूं नये व मीही सांगणार नाहीं. आपण मला नेणार कसें? मला येथून नेण्यास आपणास कोणीं पाठविलें? मीं तीस सांगितलें कीं, मी येथें आपणास नेण्याकरितां आलों आहे हें जर आपणास कळलें तर मला कोणीं पाठविलें हेंही कळलें पाहिजे होतें. ती म्हणाली, माझ्या भगिनीनें माझ्या येवढ्या सुखांत काय म्हणून अंतर पाडलें! मला येथें राक्षसानें आणून सर्व स्त्रीराज्याची मालकीण करून ठेवली आहे. येथें कोणीही पुरुष व स्त्री येऊं शकत नाहीं. जर बडा जादुगार भेटेल तरच कोणी येथें येऊं शकेल. माझ्या येथें भुतांचे पहारे आहेत. व आपण जें वडाचें झाड पाहिलें, तेंच राक्षसाचें समुद्रकिनाऱ्यावर रहाण्याचें स्थान आहे. जें शिर ओरडून गडबडत समुद्रांत रस्ता दाखविण्यास कारण झालें, तो त्या राक्षसाचा हस्तक आहे. आतां तो राक्षसही लवकर मृत्यु पावेल असें त्याच्या बोलण्यावरून मला समजलें. तर तो मेल्यावांचून मला सुटका नाहीं. जेणेंकरून मला सुख होईल तें तो सर्व करीत असतो. पंधरा दिवसांनीं आमावास्येचे दिवशीं मात्र तो मला विचारतो कीं, तूं मला वरणार कीं नाहीं! नाहीं म्हटलें, कीं तो चालता होतो. मला येथें येऊन सुमारें चार वर्षें झालीं. माझे पित्याचे घरीं माझा विवाहसमारंभ चालला असतां व मी गच्चीवरील महालांत निजलेली असतां, यानें मला तेथून उचलून आणलें. आतां माझें वय सोळा वर्षांचे असून येथें ममतेच्या मनुष्याशिवाय सर्व सुखें आहेत. आतां आपण ज्या दुसऱ्या स्त्रिया पाहिल्या त्याही अशाच लग्नसमयीं पळवून आणलेल्या सर्व राजकन्याच आहेत. त्यांपैकीं सर्वांचें आधिपत्य मला दिलें आहे. त्याही मोठ्या चतुर व सुगर आहेत. कसेंही येथें दुःखांत सुख मानून आयुष्याचे दिवस काढीत आहोंत. पण आतां मला वाटतें, आमचे ग्रह फिरले म्हणूनच आपणास कोणीं येथें पाठविलें. नाहींपेक्षां हें समुद्रतळ कोणाचेंही दृष्टीस पडणार नाहीं. पण ज्यापेक्षां आपण येथें आलांत त्यापेक्षां आपल्या जवळ

कांहीं तरी अजब चीज असली पाहिजे हें खचीत आहे. आतां आपणच मला सांगा कीं, आपण येथें कसें आला व मला कसें नेणार? मीं सांगितलें, माझे स्कंधावर आरोहण करा मग कसा नेतों तें पहा. ती म्हणाली, छे, मी अशी एकटी कधींच येणार नाहीं. माझे स्वतःचे आयुष्याची मला कांहींएक प्रतिष्ठा नाहीं. पण माझ्या ह्या धर्मभगिनी व पशूपक्षी जादूनें अन्यस्वरूपी बनले आहेत त्यांस त्यांचें पूर्वस्वरूप देऊन त्यांचें इष्ट पुरवीन नंतर मी येथून पित्याकडे जाईन. नाहींपेक्षां मी अशीच येथें मरेन. माझे जीविताची मला आशा नाहीं. मी यःकश्चित् स्त्रीवांचून जगाचें काय कल्याण होणार आहे? आणि मी मेलें तरी काय नुकसान आहे? माझा विवाह देखील झाला नाहीं. फक्त माझ्या संबंधानें माझी मावसबहीण जिनें तुम्हास मजकडे पाठविलें, ती मात्र अंतःकरणपूर्वक माझी काळजी करीत असेल व माझे पित्यासही दुःख होईल. पण त्यांत काय? ईश्वर ज्या स्थितींत ठेवील त्या स्थितींत राहिलें पाहिजे. मला कांहींएक काळजी नाहीं. आतां तुम्हीं पाहिलेल्या स्त्रिया मला श्रेष्ठत्व देतात, माझा हुकूम मानितात आणि रात्रंदिवस म्हणतात कीं, आपण आम्हा सर्वांस मुक्त करावें. नाहींपेक्षां आपले पश्चात् आमचे सर्वांचे प्राण जातील. तर या सर्वांची अर्धी मुक्तता करा, नंतर मला घेऊन चला. मग मी तयार आहें. असें आपले अंगांत सामर्थ्य आहे काय? विचार करून मला सांगा. मीं तिचे प्रश्नाचे उत्तर न देतां तीस विचारलें कीं तो राक्षस येथें केव्हां येईल? तिनें सांगितलें, आजपासून तिसरे दिवशीं आमावास्या आहे ते दिवशीं मध्यरात्रीं तो येईल. मग तो आल्यावर काय तें पाहून घेईन असें मीं तिला सांगितलें. नंतर तिनें उत्तम उत्तम फळफळावळ व शिलकीपैकीं मिठाई आणून माझे पुढें ठेविली आणि हें सेवन करा म्हणून सांगितलें. मी तें तिचे आगतस्वागत पाहून फारच संतुष्ट झालों आणि म्हणालों, मला कशाचीही अपेक्षा नाहीं. मला गुरुकृपेनें खाण्यास व पिण्यास पाहिजे तें यथेच्छ तयार आहे. कांहीं अपेक्षा नाहीं. हें ऐकून ती म्हणाली, सिद्धकृपेनें कोठें कांहीं कमी नाहीं. तथापि माझें कर्तव्य मीं केलें. यावर आपली मर्जी असेल तसें करावें. मी आपलें मन उगीच संशययुक्त कशास करूं? असें म्हणून तेथेंच एक मला स्वतंत्र जागा राहण्यास दिली व ती आपण स्वतः मला हवें नको पहात असे. मग मीं तेथें स्नान करून झोळीची प्रार्थना केली व गुरूचें स्मरण

केलें व पाहतों तों दोघी स्त्रिया पुढें येऊन उभ्या राहिल्या आणि म्हणाल्या, काय आज्ञा आहे? मीं सांगितलें, भोजन व पाणी तयार पाहिजे. मला भूक लागली आहे. आज्ञा, असें म्हणून त्यांनीं भोजनाचें ताट व उत्तम गंगेचें गार पाणी ज्यांत वाळा घातला आहे असें सोन्याचे तांब्यांत घातलेलें आणून पुढें ठेविलें. मी त्या ताटांतील षड्रस अन्नाचें यथेच्छ भोजन करून तृप्त झालों, आणि थंडगार गंगोदक प्राशन केलें. नंतर दुसरे स्त्रीनें तस्त व कांहीं उष्णोदक हात धुण्यास देऊन रुमाल दिला व विडा चतुर्दश गुणी देऊन जाण्यास हुकूम मागितला. मीं आज्ञा देतांच त्या जेथल्या तेथें गुप्त झाल्या. नंतर मी आपल्या पादुकावर उभा राहून गुरूकडे जाण्याचें मनांत आणिलें व डोळे झांकतांच गुरूपुढें जाऊन उभा राहिलों. तों ती सुंदर बाला तेथें एकटी बसली होती, इतक्यांत मीं तीस विचारलें, गुरु कोठें आहेत? तिनें सांगितलें कीं गुरू ध्यानस्थ बसले आहेत व एक घटकेनें समाधी उतरेल. मीं विचारलें तुमचें भोजन झालें काय? तिनें सांगितलें येथें कोणी दोन बायका आल्या होत्या त्यांनीं मला उत्तम भोजन व पिण्यास उत्तम पाणी देऊन त्या गेल्या. आतां मला कांहीं इच्छा नाहीं. तुमचीच मार्गप्रतीक्षा करीत होतें. भेटली काय माझी बहिण, ती सुखी आहे काय, आतां ती माझ्या केव्हां दृष्टीस पडेल, असें म्हणून ती रडूं लागली. नंतर मीं तिचें सांत्वन करून लवकरच भेटेल, काळजी करूं नका, म्हणून सांगितलें. इतक्यांत गुरूची समाधी उतरून मला म्हणाला बेटा, तू कब आया! नाहक तस्दी क्यं लीई! मीं हात जोडून सांगितलें आबके हुकूम बिगर उधरके चिडिया. पच्छी और ज्यानवरकू मै बचन दीये, के तेरे आलख पहिला जनम पहिले सरिखे करूंगा. ये तो मेरी भाक सौगन नाहलक तो आब मै क्या करूं मैने उस्कू कलका करार किया है तो सही आबका हुकूम होगा तो कहे बरहुकूम बंदा करेगा. क्या हुकूम. साईनें सांगितलें बेटा! जिसकूं दु:ख होता है उस्कूं सुख देना ये काम भगवाननें आदमीके दस्तमें रखा है. सो करना, कुच फिकीर नहीं. आब तूं जलदी ज्या और आपना सकून पुरा कर. हें ऐकून मी पूर्व ठिकाणीं गेलों व मला दिलेल्या जागेवर रात्रीं निजलों. उजेडतांच मुख्य स्त्री तेथें आली आणि म्हणाली, काय आपण विचार केला तो मला कळवा बरें! मीं सांगितलें राक्षसाची व माझी गांठ पडली म्हणजे सांगेन. आपणास तर येण्याची कांहीं हरकत नाहींना? ती

म्हणाली या सर्वांस मुक्त करून पूर्व स्थिति द्यावी म्हणजे मी येण्यास तयार आहें हें मीं आपणास पूर्वींच सांगितलें आहे. मीं ती गोष्ट लागलींच कबूल केली. नंतर एक दिवसाची अवधी उरताच चाराचे सुमारास तीसह त्या पक्ष्याकडे गेलों आणि त्या झोळींतील राख प्रत्येकाचे अंगावर फुंकून त्यां सर्वांस पूर्वस्थितीवर आणलें. आणि दुसरी मुळी घेऊन तिची प्रार्थना केली. ती करतांच मोठमोठे कपड्याचे ढीग येऊन तेथें पडले. ते त्या प्रत्येकांस लागतील तसे देऊन संतुष्ट केलें. इतकें होतांच सर्व माझे पाय धरण्यास धावले, तेव्हां मीं सांगितलें कीं, ईश्वराची स्तुति करा. संकटांतून मुक्त झाल्याबद्दल त्याचें आभार माना. या बाईनें तुम्हावर हा उपकार केला. इतकें जरी मीं सांगितलें तरी कित्येकांनीं माझे चरणावर लोळणच घेतली आणि ईश्वराची स्तुति करून म्हणाले या स्त्रीनें तर आम्हावर उपकार केला यांत संशय नाहीं. परंतु ईश्वरानें आपणास परोपकारार्थ निर्माण केलें म्हणून हें सर्व घडून आलें. नंतर त्या दिवशीं मोठ्या उत्साहानें सर्व पाक सिद्ध करून प्रत्येकास मंगलस्नानें घालून स्वादिष्ट भोजन दिलें. सर्व स्त्रीपुरुषांचीं भोजनें झाल्यानंतर पान सुपारी होण्याचे वेळीं स्त्रियांनीं राजपुत्रांस पाहून मोहित झाल्या. हें तेथील मुख्य स्त्रीनें पाहतांच मनांत विचार केला कीं, अशी संधी पुनः येणार नाहीं. या राजकन्या व हे राजपुत्र एकमेकांस योग्य आहेत. राजकन्या अतिरूपवती, पद्मिणी, चित्रिणी जशा नागकन्यका अप्सराच आहेत व राजपुत्रही गुणानें व पराक्रमानें युक्त आहेत. असो ही गोष्ट तिनें त्या राजपुत्रांस व राजकन्यांस स्पष्ट बोलून दाखविली. तेव्हां तेही परस्परांवर मोहित होऊन सर्वत्रांनीं एकमेकांस गांधर्वविधीनें वरिलें. नंतर पानसुपारी अत्तरगुलाब होऊन सर्वांस वाहनें देऊन व बरोबर बेताचें सैन्य देऊन ज्यांचे त्यांचे घरीं जेथले तेथें ते राजपुत्र व त्या राजकन्या सर्व पोंहोचत्या केल्या व तें सैन्य व तीं वाहनें मंत्रानें नाहींशीं झालीं. याप्रमाणें सर्व पक्ष्यांची व पशूंची स्थिति झाली. आतां जिकडे तिकडे ज्यांचे पुत्र व ज्यांच्या कन्या आपल्या घरीं आल्या हें पाहून त्यांचे आईबापांस जो आनंद झाला असेल त्याचा विचार ज्यांस ममतेचा पाश असेल त्यांनींच करावा.

नंतर त्या रात्रीं मी तसाच स्तब्ध आपले नेमल्या जागीं निजलेलों असतां, ती सुंदरी तेथें आली आणि म्हणाली, आतां राक्षस येईल तर त्यानें

मला त्या पक्ष्यांविषयीं व राजकन्यांविषयीं विचारलें तर मीं काय सांगावें? मीं सांगितलें, तुला विचारण्याचा प्रसंगच येऊं देत नाहीं म्हणजे झालें कीं नाहीं? तो येथें येण्याचे पूर्वीच तूं माझेबरोबर चल. ती म्हणाली, मी अशीं कोणासही फसविणार नाहीं. तुमचे अंगांत सामर्थ्य असेल तर मला त्यांचे समक्ष न्यावें. मीं म्हटलें, तुला अद्याप सामर्थ्याची शंका आहे काय! ती म्हणाली नाहीं, पण आपण तरी त्यास असें कां भितां? मीं म्हटलें, मीं भिणारा मनुष्य नव्हें. तसा असतो तर येथपर्यंत येतोंचना. असो, किती अवधी आहे? तो केव्हां येईल? ती म्हणाली, सुमारें बारा वाजतां तो पाय आदळीत मोठी गर्जना करीत येथें येईल व तेव्हां माझी जी पांचावर धारण बसेल ती माझी मीच जाणें. आतां तुम्ही माझे धर्माचे बंधू व मी तुमची धर्माची भगिनी, यापुढें आपण काय कराल तें मला सांगा? मीं सांगितलें कीं, काय करीन तें आतां काय सांगूं? जसा प्रसंग पडेल तसें करावें लागेल. तुम्हांस सांगणें नकोच. तुम्हीं पाहिलेंच आहे. इतकें बोलून आम्हीं दोघांनीं स्नान व भोजन करून मी गुरूचें स्मरण करून हातांत छडगा घेऊन दिशा भारीत बसलों. ते दिवशीं तिचें त्या ठिकाणीं फक्त आम्हां दोघांखेरीज कोणीच नव्हतें. इकडे जेथें राक्षस होता तेथें त्यास दुश्चिन्हें होऊं लागली. व त्यावरून त्यास वाटूं लागलें कीं, आज आपला मोठा घात आहे. तो आपले अन्तःकरणांत विचार करूं लागला कीं, जेथपर्यंत माझा संचार आहे तेवढ्या प्रांतांत उपवर झालेली विवाहास योग्य अशी राजकन्या मी या देशांत किंबहुना या प्रांतांतही ठेविली नाहीं व हें चौर्यकर्म मी बरेच करीत आलों. सर्वगुणसंपन्न राजपुत्र व ते ज्या ज्या राजकन्यांवर आषक व ज्यांना ज्यांना वरण्याकरितां टपलेले अशा सर्व राजकन्या मीं पिंजऱ्यांत आणून समुद्रतळीं पक्षी करून ठेविल्या. त्यांचे आईबाप मला शाप देऊन रात्रंदिवस माझें वाईट चिंतीत असतील. दुसरें असें कीं, या माझ्या दुष्ट देहास पाहून भीतीमुळें कितीएक लोक मरण पावले. असो. आमची नीति म्हणून मीं अद्याप सोडिली नाहीं. चौर्यकर्म हें केवळ आमचें धंद्याचें कर्मच आहे. आजपर्यंत मीं कोणावर जुलूम केला नाहीं व कोणासही ठार मारलें नाहीं. व तसें कदाचित् असेलच तर मला आठवत नाहीं. पुनः दुश्चिन्ह झालेलें पाहून तो मनांत म्हणूं लागला, आज मला दुष्ट चिन्हांनीं तर बरेंच दर्शन दिलें. माझे दैवीं या योनींत किती दि-

वस पातक भोगण्याचें आहे नकळे. आतां काय करावें ? मलाही या जीविताचा त्रास आला आहे. कांहीं दिवसांनीं मी हा धंदा सोडून गंगातीरीं अथवा मोठ्या गुहेंत तपश्चर्या करीन म्हणतों, पण ही सुंदरी मी आपली राणी करण्यास इच्छितों. ती तर अद्याप वश होत नाहीं, ती वश झाल्यावर माझा प्राण गेला तरी बेहत्तर आहे, असो आज आमावास्या आहे व तिकडे जाण्याची ही संधी बरीच आहे. तर आज तिला आक्राळविक्राळ स्वरूप दाखवून वश करून घेणार. कशी वश होत नाहीं तें पाहतों. आज चार वर्षें वाट पाहिली पण यापुढें माझ्याच्यानें राहवत नाहीं, काय तो निकाल आज करून टाकतों. सर्व राजकन्येंत मुखरणी ठरवून मुख्य राणी तीस केली व सर्व राजकन्यांनीं तिचा हुकूम मानावा अशी सर्वांस ताकीद केली. दुनयेंतील हवी ती चीज तिला आणून देऊन तिची वरचेवर भरती करतों. इतकें असून त्या सर्व स्त्रीसमुदायांत मी गेलों असतां हिच्या साह्यानें मला दुसऱ्याही राजकन्या वश होत नाहींत. मला एका मोठ्या ऋषीचा शाप आहे कीं, तूं असशील तेथें एक मोठा बलाढ्य सावकारपुत्र येऊन तुला ठार मारील. तेव्हां या भीतीनें मीं आपलें घर समुद्राचे आंत केलें आहे, आणि तेथें कोणी मनुष्य येऊं शकूं नये म्हणून दर्याकिनाऱ्यावर पिशाच्चांचा श्मशानवत् पाहरा ठेवून मींही आपलें वास्तव्य तेथेंच वडाखालीं ठेविलें आहे. जे दिवशीं तो वड जळेल ते दिवशीं माझा हस्तक राक्षसीमुख मरण पावेल. व तो त्या मनुष्यास समुद्रांतील रस्ता दाखवील, व हें सर्व भाकीत जेव्हां घडेल तेव्हां माझें मरण जवळ आलें असें मी समजेन. परंतु ही गोष्ट घडणें दुरापास्तच आहे. सर्पाचे पाठीवर समजून उमजून कोण पाय देईल? यमाचे दाढेंत जाण्यास कोण तयार होईल! तसेंच माझे घरीं मरण्यास कोण येईल ! ज्यास परस्त्री म्हणजे माता तोच कदाचित् येथें येईल, त्या शिवाय कोण येणार ? येवढ्या राजकन्या पाहून कोणाचें मन द्रवणार नाहीं ? तात्पर्य या मृत्युलोकीं माझा वध करणारा निपजण्याची शंकाच आहे, त्याला सप्तजन्मींचीं पुण्याईच असली पाहिजे. माझ्या समोर जर कोणी येईल तर कडकडा चावून फोडून खाईन. राक्षस हें नांव ऐकतांच मनुष्याची गाळण होऊन जाते. मग मानव राक्षसाचा वध करील हा ऋषीचा शापही असंभाव्य व चमत्कारिकच दिसतो. आकाशाकडे पाहतो आणि मनांत म्हणतो, बरें त्या सुंदरीनें मला कांहीं

वस्तू आणण्यास सांगितली नाहींना ? नाहींतर तिचें प्रिय न केल्याचें पातक मला लागेल. माझे हातून जीं आजपर्यंत अनुचित पातकें घडलीं असतील त्यांची ईश्वर मला क्षमा करो व ही सुंदरी मला वश होवो, खरोखर एवढें झाल्यावर मी हा सर्व धंदा सोडून एकांतस्थळीं तिजसह तपश्चर्येस जाईन. असें म्हणून मोठ्यानें आरोळी ठोकून त्या दर्याकिनाऱ्यावर आला व एक टांग त्या वडावर ठेवणार तों तेथें आदळून पडला. आणि आपलें हस्तकास हाका मारूं लागला. तों त्याचें शव समुद्राचे किनाऱ्यावर व डोकें पाण्यांत असें त्यास दिसलें. मग तो मनांत समजला व असा बलाढ्य कोण समुद्रांत शिरला असेल तो पाहावा म्हणून समुद्राचे आंत शिरला आणि पाहतो तों तेथें कोणी एक मनुष्य किंवा पक्षी नसून आपले महालांत पलंगावर बसलेली रतीसारखी स्त्री पाहून तीस म्हणतो,आज हें तूं काय कौटाळ मांडलें आहेस ? हे त्याचे तोंडचे शब्द ऐकतांच, ती मंजिरी भयभीत होऊन थरथर कांपूं लागली. तिच्या तोंडावाटें एक शब्दही निघेना. हें पाहून तिच्यापाठीमागें मी बसलों होतों, तो उभा राहून त्यास म्हटलें हे दुष्टा राक्षसा, तूं आजपर्यंत अनन्वित पातकें केलींस त्याचा तुला अझून पश्चात्ताप होऊं नयेका ! त्यानें माझेकडे पाहिलें आणि मनांत खात्री केली कीं, हा यःकश्चित् मनुष्य मला काय मारणार आहे ! याला मीं पाहिलें नव्हतें तोंपर्यंत भीति वाटत होती. यास तर मी एका क्षणांत मारून खाऊन टाकीन. माझा हस्तक गेला व वडाचें झाड जळालें येवढ्यावरून माझी शक्ति मात्र गेली. असो, असा मनाशीं विचार करून तीस म्हणाला, तूं वश होतेस कीं नाहींस ? त्यावर ती त्यास म्हणाली, वश होणें तर दूरच परंतु तूर्त तूं आपलें रक्षण कर. तुला आतां येथें कोणी त्राता नाहीं. पण या गृहस्थास शरण जा म्हणजे हा तुला प्राणदान देईल आणि या पुढें असें चौर्यकर्म करूं नकोस. व याबद्दल तुला पूज्य असेल त्याची शपथ घे तर हे तुला सोडतील, नाहींपेक्षां तुझा मृत्यु जवळ आला. असें म्हणून तिनें माझेकडे पाहिलें आणि म्हणाली, दादा यास प्राणदान द्या. हें ऐकून राक्षस रागावून म्हणाला, या राक्षसास प्राणदान आणि शरण व शपथ माझेकडून कधींच होणार नाहीं? सुंदरी वश हो, जें मागशील तें देईन व आजपर्यंत दिलें आहे त्याचें स्मरण कर. माझें कर्तव्य येवढेंच, मीं तुला येथें आणून स्वस्थ आजपर्यंत राहूं दिली म्हणून आज तूं मला माझा प्राण वांचविण्याची युक्ति

सुचवूं लागलीस, जर मीं तुजवर जुलूम केला असतां व छळून तुला दुःख दिलें असतें, तर तुझे मुखांतून आज हे शब्द कधींच निघाले नसते, असें म्हणून तो माझा हात धरण्यास पुढें सरसावला, तोंच मीं झोळींतून शस्त्र काढून त्याचे हाताचे तुकडे तुकडे करून टाकिले. राक्षसानें मोठमोठ्यानें ओरडून मला धरावयास यावें, परंतु माझे देहास बिलकुल स्पर्श न होतां शस्त्रांनीं व त्या सोडग्यानें मीं त्याचा प्राण घेतला.

---

## भाग ६ वा.

त्याचा वध करून त्या स्त्रीजवळ जाऊन पाहतों तों ती निचेष्टित पडलेली दिसली हें पाहून मी घाबरून गेलों आणि आपले स्कंधावर तिला तशीच घेऊन पायांत पादुका घालून झोळीसहित जेथें साई होता तेथें त्या कुमारीसह येऊन पोंचलों. साई समाधी उतरून नुकतेच कोठें स्थितीवर येत होते, त्यांनीं मला त्या कन्येसह पाहतांच शाबासकी दिली आणि म्हणाले, बेटा! तेरा भगवान अच्छा करेगा.ए छोकरी ऐसी च्यूप क्यौं होई है. इतक्यांत मीं तिला खाली ठेवलें आणि पाहतो तों ती बेहोष होऊन गेली आहे. त्या महंतानें तीस पाहतांच म्हणाला, छोकरी घबरा गई है. मेरेकू यही लगता है के तुनें ये सैतानकू मार डारा इसलिये ये डरके मारे हैरान होके बेहोष होगई. नाझनीके माफक उसकी जान क्यंव नाडरे. इतकें म्हणून त्या महंतानें तिचे आंगावरून हात फिरविला व तो फिरवितांच ती चटकन् उठून बसली व इकडे तिकडे पाहूं लागली. तो एके बाजूस कोणी एक मुलगी निजलेली तिच्या दृष्टीस पडली. ती आपले मनांत विचार करूं लागली कीं, मी पाताळ भुवनांत असतां येथें कशी आलें! येथें तर सर्व रान व ही एक फकीराची गुहा दिसते? हा फकीर तरी कोण? आणि ही निद्रेंत असलेली माझे मावसबहिणीसारखी कोण दिसते! छे; ही कल्पना असंभवनीय आहे. ती येथें रानांत कशाला येईल! फिरफिरून तिजकडे पाहून म्हणाली, महाराज, ही माझ्या मावसबहिणीसारखी कोण मुलगी दिसते ती मला सांगा? हें माझे विचारणें विलक्षणच आहे हें मला

ही वाटतें; तथापि कर्मगति विचित्र आहे. माझेसारखी हिची स्थिति झाली नसेल कशावरून ? मी विचारतें याची मला क्षमा असावी व मला ही कोण आहे हें प्रथम सांगावें ? किंवा मला परवानगी द्याल तर मी तिचे जवळ जाऊन तीस उठवितें ? त्या महंतानें तिचें मन इतकें उतावीळ झालें हें प्रेम पाहून मुद्दाम तीस म्हणाला छोकरी, ये तेरी भैन किनने कहदिया ! यावर तीही ती भाषा शिकलेलीच होती, तेव्हां तिनें उत्तर दिलें कीं मेरा जी यह मेरे बेहेनपर सब रात दीन गुजरहा है. मेरे माबापसें उस्का प्यार मुझकूं बहोत है. दिलमे मेरा मनका इस्के नाम रात दीन चला है. इसलिये जिधर जिधर मेरे आंख जाते उधर मेरी ज्यान ओ बहन मालूम पडती. इसवास्ते आपकूं पूच्छतीहूं ओ कौन है ? इतकें चाललें आहे तों ती जागी होऊन उठून बसली आणि अंगांस आळोखे पिळोखे देऊं लागली. तों हिनें तीस पाहून झटकर जाऊन तिचे गळ्यास मिठी मारली. आणि म्हणाली, येथें गांव नसतां सर्व पशू पक्षी असून तूं येथें कशी आलीस हा काय चमत्कार ? हा महंत कोण ? तूं व मी आणि हा सावकारपुत्र इतकेंच आपण काय ते या जंगलांत हा मोठाच चमत्कार वाटतो ! तूं या कामीं कांहीं जाणत असलीस तर मला सांग ? मी या कामीं अगदीं अज्ञान आहें. ती म्हणाली, तुला येथें पाहून मीही मोठी गूढांत पडलें. हा सावकारपुत्र तर म्हणतो, मी तुम्हांस बहीण मानतों, पण मला वाटतें, या दुनियेंत अशी बुद्धि असणें फारच कठिण आहे व हा कोणीतरी ईश्वरी दूत असावा,कारण अशी परोपकारबुद्धी मानवी प्राण्याचे अंगीं असणें फार कठिण आहे. त्यांत हा तरुण आहे, तेव्हां कांहीं तरी आशेवांचून कोणीही असले कामीं झटून पडणार नाहीं. तेव्हां यावरून या पुरुषाचे संबंधानें कांहीं तर्क चालत नाहीं. तो महंत हें भागिनीचें परस्परप्रेम पाहून फार संतुष्ट झाला.नंतर मीं त्या दोघींना सर्व हकीकत कळविली. आणि साईस म्हणालों, साई आब दो छोकरी या मिलना च्याहिये. साई म्हणाला, तेरेकू एक येलम सब रस्ते बता दिये है, आब क्या फिकीर करते हो ? बेफिकिर हो ज्या. आब दो तो लाये मगर और दोनोकूं लेनेकूं ज्या,मेरी कुच मनाई थोडी है! आब पहिले किधर ज्यावोगे ? तेरी झोली, छडगा, जूता तेरे सात है तो तूं जमका भी डर ना मानेगा. यावर मीं म्हटलें, साई ओ दो छोकरी आबके माबापके घर जानेकूं रुकसत् मंगती है,आप देना चाहिये.हें ऐकून तेथें जवळच

ती मुलगी उभी होती, ती म्हणाली, एक वेळ प्राण्यामागें जन्ममरण लागलेंच आहे. माझ्यासारख्याच अति संकटांत पडलेल्या माझ्या दोन चुलत बहिणी व एक मामेबहिण अशा तिघी आहेत. तर जशीं मला इतक्यांत यमाचे दाढेंतून काढून आणली तशा त्या तिघींसही आपणच आणाल तर आणाल, इतराची पुण्याईच नव्हे हें मी पक्कें जाणलें. आपली विभूति केवळ परोपकारार्थच आहे,तर माझें सांगणें आपण मान्य कराल अशीं आशा आहे,व आपण परत येईतों आम्ही येथेंच साईची सेवा करून राहूं. ती तरी आम्हास कोठून मिळणार ! साहजिक पूर्वपुण्याईनें हा योग घडून आला आहे,तो टाळण्यास आपण प्रवृत्त होऊं नये, येवढी माझी पदर पसरून हात जोडून उभयतांपाशीं विनंति आहे. मीं सांगितलें, तुम्ही साईची सेवा काय करणार ? ते आरण्यवासी आहेत, त्यांना कोणाची जरूर नाहीं. तुमचें दैव चांगलें म्हणूनच त्यांचें दर्शन झालें. असो, साईनीं तुमच्या या म्हणण्यास रुकार दिला तर मी तुम्हां दोघींस येथें ठेवून तुमच्या बहिणींच्या तपासास जातों. नंतर मीं हात जोडून साईस विचारलें व त्यानें दोनोकू रहने देव असें सांगतांच त्यांचा हुकूम घेऊन पादुकावर पाय ठेवून झोळीसह निघून गेलों व मोठ्या अरण्यांत एका डोंगरांचे शिखरानजीक उतरलों व पाहतों तों, तेथें, एक फकीराचा वेष धारण केलेला चौदा पंधरा वर्षांचा मुलगा पाहिला. त्यास पाहून मी मोहित झालों. व म्हटलें, तूं एवढ्या अरण्यांत एकटा कसा आलास ? तूं इतका सुस्वरूप आहेस कीं तुझा मदनासही लाजविणारा चेहेरा पाहून मी मोहित झालों. एखादी स्त्री जर तुला पाहील तर रात्रंदिवस तुझ्या प्राप्तीसाठीं झुरणीस लागेल.वारेवा रूप, याचें नांव सौंदर्य. तुजयोग्य विधात्यानें कोणती स्त्री पैदा केली असेल समजत नाहीं ! असो, येथें कोणीही प्राणी नसून तूं येथें एकटा कसा आलास हें मला सविस्तर सांग ! तो म्हणाला मी येथील नसून हवें तेथें स्वेच्छेनें हवा तेथें जात असतों. मी मानवी प्राणी आहे, मला कोणी आहे किंवा नाहीं हें मी कधींच कोणास सांगणार नाहीं. मी मोठा दुःखी अभागी प्राणी जन्मलों आहे. मी मरण्यास तयार आहें पण मला पाहून मृत्यु पहा कसा दूर पळत आहे तो.इतके झाले तरी स्वतः मी आत्महत्या मात्र कधींच करून घेणार नाहीं. बरें असो, तुम्ही येथें कशाला आला व येथें येण्याचा हेतु काय हें मला सांगा, असा मला त्यानें प्रश्न करतांच मीं त्यास

सांगितलें, आपण येथें येण्याचा हेतु काय तो जर मला खरा सांगाल तर मीही आपला खरा हेतु दर्शवीन. नंतर त्यानें कांहीं वेळ विचार करून म्हटलें, मी सार्वभौम राजाचा पुत्र आहें, माझें नांव राजहंस आहे. मी एका स्त्रीचे नादानें फिरत आहें, परंतु ती मला प्राप्त होणें तर कठिणच, ती मला जादूनें या अरण्यांत कधीं कधीं सोडीत असते. ती ही रूपगुणसंपन्न असून यौवनभरें परिप्लुत झालेली आहे, परंतु राक्षसाचे सपाट्यांत सांपडून येथें आली आहे. तिचें नांव मदनमंजिरी. ती जर तुम्ही पाहाल तर दुनियेंतील सर्व स्त्रिया तिजवरून ओवाळून टाकाव्या असें तुम्ही म्हणाल. पण तिकडे जाण्यास बिलकूल मार्ग नाहीं. तीही तिकडे रात्रंदिवस काळजी करून तिचे शरीरांत अस्थिचर्म मात्र उरलें आहे.परंतु आज चार दिवस झाले, तिला दृष्टांत झाला कीं, कोणी एक जादूविद्येनें पूर्ण असा सिद्ध येथें येऊन तीस नेणार आहे. बरें पण, तेच तर आपण नसालना ? जर असाल तर मला चोरूं नका मीही आपला साथीदार होऊं इच्छितों. नंतर मीं त्यांस म्हटलें ठीक आहे, तुमची आमची मित्रत्वाची जोडी ठरली, पण ती कोठें आहे सांगा ? या पहाडाखालीं मोठें मैदान असून भुईकोट किल्ला आहे. त्या किल्याचे सभोंवतीं दारूगोळा भरला असून मोठा मजबूत चौफेर दगडांचा कोट आहे. त्या कोटाचे आंत मोठा खंदक असून नागवे तलवारीचा पाहरा त्या बंगल्यासभोंवतीं आहे व त्या बंगल्याचे पांचवे मजल्यावर तिचें वास्तव्य आहे. तिची खाण्यापिण्याची व वस्त्राची तजवीज तो राक्षस स्वतः आठ दिवसांनीं येऊन करीत असतो. मला एका महंतानें थोडी जादूविद्या शिकविली. त्या योगानें मी येथें येऊन तिला कधीं कधीं भेटत असतों. परंतु तिला येथून नेण्याचा मार्ग त्याचे हातीं नाहीं. खरोखर माझे अन्तःकरणास तिची स्थिति पाहून फार द्रव येतो. अशी सुकुमारी अशा संकटांत पडलेली पाहून कोणास द्रव येणार नाहीं ? तुम्ही जर यास कांहीं उपाय काढाल तर मी तुमचा जन्मभर दासानुदास होईन. असें बोलून तो रडूं लागला. इतक्यांत सिंह, व्याघ्र यांच्या आरोळ्या ऐकूं येऊं लागल्या. वीज चमकून पाऊस पडूं लागला. आतां काय करावें, कोठें जावें, असें मनांत आणून त्यानें मला विचारलें, आतां कसें करणार ? इतक्यांत मीं त्यास आपले खांद्यावर घेऊन डोळे मिटण्यास सांगितलें. व तसें होतांच तो जिचें चिंतन करीत होता तिच्या पुढें त्यास नेलें

व डोळे उघडण्यास सांगितलें. त्यानें डोळे उघडतांच ती सुंदर नागिणीसारखी स्त्री त्याजपुढें येऊन त्याचा हात धरून प्रिय गोष्टी बोलूं लागली. इतक्यांत तो तीस म्हणाला, नथ दिली त्याचें स्मरण करतेस पण ज्यानें नाक दिलें त्याचें स्मरण न करणें हें कृतघ्नपणाचें काम आहे, तर हें कोण आले आहेत पहा. तिनें माझेकडे पाहून घाबरून विचारलें, हे येथें कसे आले ? तुम्ही त्यांचे बरोबर कसे आला ! हें राक्षसी भुवन अति भयंकर आहे. येथें माशी देखील फिरक होण्याची कठिण, तों तुम्ही दोघे एकदम कसे आला ! तो म्हणाला तुम्हीं मला स्वप्न सांगितलें होतें त्याचा अनुभव आला व हे तुम्हांस नेण्याकरितां आले आहेत. हें ऐकून तेथेंच एक लहान पलंग होता त्यावर उभयतांस बसावयास सांगितलें आणि म्हणाली मला कसें नेणार ! मीं सांगितलें तुमचे मामेबहिणीनें तुम्हांस बोलाविलें आहे. तुम्ही राक्षसाचे हातीं सांपडून अति संकटांत आहा, हें एका श्रेष्ठानें जाणून मला इकडे पाठविलें. आतां ज्यानें चोंच दिली त्यानें चाराही दिलाच असेल. ती हे शब्द ऐकून आपले मनांत विचार करूं लागली कीं, आतां मी आपल्या ममतेच्या माणसांत खांस जाऊन पडेन काय ? ईश्वरा, तूं धन्य आहेस ! असा दिवस मला केव्हां उगवेल ! माझे बापानें माझा केवढा लग्नसमारंभ मांडला होता आणि एकाएकीं मी जेव्हां नाहींशीं झालें तेव्हां त्याचे अन्तःकरणाची स्थिति काय झाली असेल! माझी पुण्याईच कमी म्हणून अशा संकटांत पडलें. ईश्वरा आतां मात्र माझीं आईबापें मला लवकर भेटीव. माझी त्यांची भेट होतांच ते लाखो रुपये खैरात करतील व जिकडे तिकडे आनंदीं आनंद होऊन जाईल. असा विचार करून त्या राजपुत्रास म्हणाली, उद्यां तो राक्षस येथें येईल तर तुम्ही आपले प्राण वांचवा. येथें राहूं नका. मग माझेंच काय होईल तें होऊंद्या. आतां माझे देहांत काय आहे, नुस्तें अस्थिचर्म उरलें आहे, तथापि मला केव्हां न्याल! कां मला या संकटांतून मुक्त होण्याची आशाच नाहीं ? असें म्हणून ती रडूं लागली.इतक्यांत मीं पुढें होऊन तिचें शांतवन केलें आणि सांगितलें, तूं भिऊं नकोस मी तुला घेतल्याशिवाय जाणार नाहीं. असें म्हणून त्या राजपुत्रास सांगितलें कीं तुम्ही येथेंच रहा. आमच्या गुरूंचें माहात्म्य तर पहा. असें म्हणून आम्हीं तिघांनीं सुखदुःखाच्या गोष्टी सांगून ती रात्र काढली. इकडे सूर्योदय होतांच तो राक्षस आपले मनांत विचार करूं

लागला कीं, या राजकन्येस मीं बरीच छळली तरी अद्याप ती वश होत नाहीं, आतां काय करावें? इतकी लहान असून तिचे अंगीं येवढें धैर्य आहे हा मोठा चमत्कार आहे. तरी मीं अद्याप ती भीतीनें मला वरणार नाहीं म्हणून माझें खरें स्वरूप तिला दाखविलें नाहीं. परंतु सौम्यतऱ्हेनें मानवरूपानें तिचे समोर जाऊन नाना तऱ्हेनें तिच्या विनवण्या करून पाहिल्या-आतां मात्र शेवटला उपाय हाच करून पाहिला पाहिजे कीं, तिला आपलें खरें आक्राळ विक्राळ स्वरूप दाखवावें व फिरून मानवासारखें स्वरूप धरून तिला म्हणावें कीं, तूं मला वरणार नाहींस तर तो बोवा येऊन तुला खाईल. मग ती काय म्हणते तें पाहूं. असा विचार करून तो एका बागेंत गेला व तिच्याकरितां नाना तऱ्हेचीं पुष्पें व फळफळावळ घेऊन सपाट्यासरशीं ती जेथें होती तेथें आला. तो दुरून येतो आहे असें पाहून ती मला म्हणाली, तो पहा राक्षस आला. तो तुम्हांस पाहील तर मारून टाकील, तर तुम्ही येथून निघून जा एकक्षणभर देखील राहूं नका. मीं सांगितलें तूं भिऊं नकोस, आम्ही गुप्त रूपानें येथें असूं. तुला भय वाटल्यास आम्हांस हाक मार. ती बरें म्हणते न म्हणते इतक्यांत राक्षस तेथें आला व जें फळफळावळ आणलें होतें तें तिला देऊन म्हणाला, हे सुंदरी, तुला काय इच्छा आहे ती मला सांग ? ती म्हणाली, मला कांहींएक इच्छा नाहीं. मी आपले देहावर उदार आहें. आतां आपली इच्छा काय असेल ती असो. राक्षस म्हणाला, तूं मला केव्हां वरणार तें सांग, नाहींपेक्षां हा प्राण राहत नाहीं. हें ऐकून ती मनांत म्हणाली, मेल्या, मरेनासका एकदाचा ! तूं जगावेंस अशी कोणाची इच्छा आहे ! वांचून लोकांचा नाश गरीब स्त्रियांच्या जन्माचीं वाटोळीं हेंच होणार कीं नाहीं? व यांत कोणास सुख होणार आहे ! लवकर मरशील तितका बरा. असें मनांत बोलून नंतर त्यास उघड उत्तर देती झाली; तें असें,–तुम्हास माझें जें करणें असेल ते करा. मी तुम्हास कधींही वरणार नाहीं. येऊन जाऊन काय तो प्राण घेणार येवढेंच कीं नाहीं. तुमचें कर्म खुशाल करून घ्या. मूर्खा राक्षसांचा आणि मानवांचा कधीं तरी विवाह झाला आहे काय ! तूं कधीं पाहिला आहेस किंवा ऐकला तरी आहेस? म्हणून वरचेवर येऊन मला त्रास देतोस. आतां माझे देहांत रक्त मांस तर शपथेस उरलें नाहीं, तेव्हां मला खाऊन तरी तुझें काय पोट भरणार आहे ? असें म्हणतांच त्यानें तिजपुढें हात

पाय आपटून आपलें अक्राळ विक्राळ रूप धारण केलें. तिला हा राक्षस आहे हें जरी माहित होतें तरी त्याचें हें रूप तिनें कधींच पाहिलें नव्हतें, यामुळें तिनें तें स्वरूप पाहतांच घाबरून धांवा ! धांवा ! मेलें ! मेलें ! या दुष्टाचे हातून कोणी तरी सोडवा, असें म्हणून मोठ्यानें ओरडली. ती ओरडतांच मीं तेथें जाऊन माझे सोट्यानें राक्षसास मारून खड्गानें त्याचा शिरच्छेद करून तुकडे तुकडे करून टाकले व सुंदरी जवळ गेलों आणि म्हणालों, तुला भिण्याचें कारण काय ! ती माझा पराक्रम पाहून निर्भय होऊन म्हणाली, केवढें हें धूड ! बरें हें येथें ठेवून जाणें प्रशस्त होणार नाहीं. करितां यास कोठें समुद्रांत किंवा मोठ्या नदींत नेऊन टाका म्हणजे माझें मन शांत होईल. हें तिचें बोलणें ऐकून मीं सोट्यास आज्ञा केली. ती करतांच हजारों महा बलाढ्य व भयंकर आकृतीचे असें लोक येऊन त्या दुष्टाचें प्रेत उचलून हाल करीत व नाना तऱ्हेची निर्भत्सना करीत समुद्रावर गेले व तें प्रेत त्यांनीं समुद्रांत टाकलें.नंतर मीं पुनः सोट्यास हुकूम केला कीं, हें राक्षसाचें सर्व सैन्य लढाई करून आपलेंसें कर. तेव्हां त्या सोट्यानें लढाई करण्यास आरंभ केला, तो करतांच मोठें तुफान होऊन गेलें. त्या लोकांनीं सोटा धरण्यास जावें तों खालीं पडावें. असें होतां होतां सर्व लोक बेशुद्ध पडले व तो सोटा परत माझे हातीं आला. तो माझे हातीं येतांच आजिंक्य झाला असें मी समजलों. नंतर त्या राजकन्येस व त्या राजपुत्रास बरोबर घेऊन ते लोक पडले होते तिकडे गेलो. ते मृतवत् पडलेले लोक पाहून आम्हांस त्यांची करुणा आली व राजकन्येस म्हणालों, राजकन्ये ! या राज्याचा मालक कोण तो सांग. ती म्हणाली हें राज्य राक्षसाचें आहे व तो तर मरण पावला, तेव्हां आतां मालक कोण असणार ? परंतु ज्यापेक्षां आपण येवढे श्रम घेऊन येथें आलां व त्यास मारलें, त्यापेक्षां हें मी तुम्हासच बक्षीस देतें. मीं तिला स्पष्ट सांगितलें मला कशाचीच आशा नाहीं. सर्व शिवस्व आहे. व असें म्हणून तें राज्य तिचेच नांवानें करून दिलें. पुढें तिनें त्या मृतवत् पडलेल्या लोकांविषयीं प्रार्थना केली कीं, या सर्वांस जीवदान द्यावें आणि माझे नांवाची द्वाही फिरवून हें राज्य संभाळण्यास त्यांना ताकीद देऊन आपण चालते होऊं. यावर आपली जशी मर्जी असेल तसें. मी अल्पवयी माझी अक्कल ती किती ? असें म्हणतांच मीं सर्व तिचे म्हणण्याप्रमाणें केलें. आणि तेथून निघण्याची तयारी

केली. तेव्हां तो राजपुत्र म्हणूं लागला कीं, मला येथें टाकूं नका. इजबरोबर मलाही घेऊन चला. मी असल्यानें तुमचे कर्तव्यास व्यत्यय आणणार नाहीं. यावर मीं त्यास उत्तर दिलें कीं, गुरूची आज्ञा फक्त राजकन्येला आणण्याविषयीं आहे. आपण तर नर असून राजकन्येकरितां हा वेष धारण केला, हें मला पूर्वीच सांगितलें आहे. आणि आपणास मीं कोणीकडे न्यावें ? व गुरु तरी मला काय म्हणतील ? कदाचित् तुमचे संबंधानें अभिलाषबुद्धि तर कोणी समजणार नाहीं. तथापि कुतर्क काढूं गेलें असतां, लोक नाना तऱ्हेनें दोष देऊं शकतील. पूर्वी या अरण्यांत आपण होता तर खरे ? तेव्हां माझे पूर्वी आपण येथें कसा काळ घालवीत होतां. हें सर्व सांगा ? त्यानें सांगितलें, माझी सर्व हकीकत या सुंदरीस विचारली असतां कळेल. ती राजकन्या जवळच होती, तिनें हें आमचें भाषण ऐकून म्हटलें, हा राजपुत्र नव्हे तर ही राजकन्याच आहे. व ही आणि मी सख्या बहिणी. हिचीही हकीकत मोठी विचित्र आहे. ती सांगूं लागलें तर फार वेळ लागेल करितां आतां सांगत नाहीं, पुढें वेळ मिळेलच तेव्हां सांगेन. आतां लवकर चलावें. मीं हें ऐकून दोघींस दोन्ही खांद्यावर घेऊन पायांत पादुका घातल्या आणि डोळे झांकून गुरूचें स्मरण केलें. तें करतांच तिघेंही त्या जंगलांत येऊन गुरूचे गुहेजवळ येऊन पोंचलों. नंतर आम्हीं तिघांनीं गुरुचरणीं लोटांगण घातलें. व मीं गुरूस सांगितलें, साई ह्या दोन्ही मुली आणून आपले चरणावर आणून ठेवल्या आहेत. आतां पुढें जशी आज्ञा होईल तसें करीन. गुरुजी आजचा प्रसंग बिकट खरा पण हे पाय समर्थ होते म्हणून मी येथें या राजकन्यासह तुमच्या दृष्टीस पडलों. ही भाषा त्यास समजेना तेव्हां ते क्या बेटा क्या, म्हणूं लागले. तेव्हां मीं हात जोडून सांगितलें, साई ! आपके पावसे यह दोनो छोकरीया लेके आपके पास आन पोंहच्या. बडी तखदीरकी बात है. ए सैतान बडा खराब था. लेकीन् आबकी विद्या ओ क्या जाने मेरे सामने खडे रह्यनेकी ताकद उस्कू बिलकून नहीथी. देखो साई, भगवानने उस्की तन कित्ती बडी पहाडके माफक और क्या उस्के आंखसे अंगार गिरताथा. हमने उस्को देखतेही मेरी जान जाती रही. मेरेकू एक सव्वाल करनेका था लेकीन मै देखके बहोत घबरा गया. तोबी मैने आपके पांवकी याद करके मनमे ना डरा. ओ मुझे डरानेका इरादा बताताथा तोबी मै आपके

कह्यने माफक सब कर चुका, तो ओ मर गया तो फेर मैंनें उस्का सब राज्य खलास किया, और ये छोकरीके नामका हुकूम उदर फरमाया और ओ लोककूं ताकीद कर दीईके ये राज्य ओ छोकरीका है, इदर कुई आवेतो उस्का नाम कह्यदेना इत्ते काम करके मै आया हूं. बडे सैतान मेरे आंखो-के सामने खडे दिखते है. साईनें सांगितलें, बेटा, तेरा सब काम फत्ते हुवा आब क्या मंगते हो ? यावर मी उत्तर दिलें, जो करनेका पहिला इरादा था ओ कुच और है. उस्का तो पत्ता नही. फत्तरकी नगरी भई है उदर जरा दिल ज्याने देव. उस्की क्या तारीफ है के उधरका बादशहा फत्तर बन रहा है. उस्के क्या हाल है ओ मुझे बयान करो. हें ऐकून साई म्हणाला बेटा, मेरे बाबका बाप है, उनको पूच्छना चाहिये बिगर सच खबर ना मिलेंगी. मीं विचारलें ओ कहा है ? त्यानें सांगितलें मेरे नीचे जानेका रस्ता है. उदर जाके उनकूं पूच्छके तूं इस लिये संभाल. उसके कहनेपर आच्छा दिल रखना उदर ज्याना फेर तुजकूं ना मिलेगा उस्की आदब मत छोड. इतकें म्हणून तो आपलें बसलेलें आसन सोडून पलीकडे झाला त्यानें आणि मला आंत जाण्याचा रस्ता दाखविला. मीं तेथील एक मोठी शिला उचलली आणि आंत जाऊन पाहतों, तों एक जुना आंब्याचा वृक्ष माझे दृष्टीस पडला. त्यावरून खालीं उतरलों, तों खालीं नानातऱ्हेचे वृक्ष फलपुष्पांनीं भरलेलें पाहिलें. जिकडे तिकडे पालाच पाला पडून राहिला आहे,व त्या वृक्षावर नाना तऱ्हेचे पक्षी मंजुळ स्वरानें गायन करीत आहेत. मी तसाच पुढें गेलों, तों लहान हरीणबालक येऊन माझा पदर धरून ओढूं लागला. त्याचा मला मोठा चमत्कार वाटला कीं, हें लहान हरिणबालक मला नेतें तरी कोणीकडे ? नंतर मी त्यास गोंजारून म्हटलें, तूं मला कोठें नेतोस ! असें म्हणतांच त्यानें उडी मारली व पुढें एक संगमरवरी दगडाचा गाभारा होता तेथें जाऊन तोंडांत एक गवताचा कवळ धरून फिरून माझ्या जवळ आलें. मला तेथील दाट वृक्षांची थंडगार छाया पाहून अति आल्हाद झाला. मी हलकें हलकें रमत रमत त्या संगमरवरी दगडाच्या गाभाऱ्याजवळ गेलों आणि आंत डोंकावून पाहतों, तों कोणी एक गृहस्थ, ज्याची दाढी हातभर लांब काळीभोर लोंबत असून भिवया व पापण्याचे केंस एक वीत वीत लांब व डोकीचे केंस पाठीवर लोळत आहेत, असा मला दिसला. तो नाका डोळ्यांनीं अति सुरेख असून त्याची गौरवर्णकांति सूर्याप्रमाणें

भासत होती व एकाग्रचित्त करून बसला होता. त्याच्या विशाल भाळावर त्याचे तपश्चर्येचें तेज स्पष्ट चमकत होतें. अशी ती दिव्य मूर्ति पाहून माझें अन्तःकरण एकाग्र होऊन गेलें. मी तेथें जाऊन गाभाऱ्यांत उभा राहिलों आणि मोठ्या स्वरानें म्हणालों माझी दाद लागत नाहीं. अहो माझी दाद घ्या आणि मी येथें आलों आहे तर मला संकटांतून काढा. हे माझे दीनवाणे शब्द ऐकून त्याचें अन्तःकरण द्रवलें आणि डोळे उघडून पाहूं लागला व म्हणाला कोण आहे ? तेव्हां मीं हात जोडून सांगितलें, महाराज, आपके पूतने मुझे ह्या भेजा है मेरा एक अर्ज है. एक राजा जिसकीं जान फत्तर हो रही है, और जिसकी सब राजधानी फत्तर बनी है, और जानवर चिडीया सब फत्तर हो गये है. उस्का मायना क्या ? साईं, मुझे कह देव ? कीसेने उइसी बन रही और बादशहा अपनी जान कीस तऱ्हें पकड बैठा ए सब मुझें एक मर्तें कहदेव. सब रात दीन उसकी जान फिकिरमें गिर रही है. मै आपकें पावकां बंदा हाजीर है. किसलियें आब ओ पहिले सरिखा बजेगा ये मुजे कहदेव. हे माझे दिनवाणे शब्द व भाषण ऐकून तो म्हणाला, ये मै जानता है. लेकीन मेरेकूं बिलकूल फुरसत नही इसवास्ते, तूं मेरे बावाके पास जा. तुजकूं ओ सब कुच उनके वास्ते तरतीब बतावेगा. समजे ! आब मुझें इसलिये फेर ना सतांव. हें ऐकून मला एक आश्चर्य वाटलें तें असें कीं, हा आपले गुरूचा बाप आणि हा तर याचे मुलापेक्षांही लहान दिसतो. असो, याचें वय तर विचारावें ? असा विचार करून मीं त्यास हात जोडून म्हटलें, साई ! आपकी उमर कित्ती है ? माझें भाषण ऐकून तो हसला आणि म्हणाला बेटा ! मेरी उमर क्या पूछताहो ? मेरी उमर बरोबर पांचसो बरसकी षुमार होगी तुजकूं क्या जरूर है ? हें ऐकून मीं सांगितलें, आबके बाल काले खडे मालूम पडे और आबके छोकरेके बाल सफेत हो रहे, ये कुच और मालुम पडा उसलिये मुझें बडा आचंबा लगा. हें ऐकून तो वृद्ध म्हणाला, आबकी दुनियादारी उइसी है आब तूं मेरा बाबा देखेगा तो मेरेसे छोटा तूजकू मालूम पडेगा. आबक्या तेरेकू दरकार नही है. आब तूं ज्यो कामकूं आया ओ होगा सो फत्या करो और निकलजा. मेरी जान तूं आयासे घबरा गयी है. इदर कुई षक्स आता नहीं. और ओ रस्ता किस्कू मालूम नहीं. लेकीन तुजकूं मेरे छोकरेनें बतादिया, आब तूं मेरे बाबाके

पास जा और तेरा जो कुच अरज होगा सो उनके सामने कर जा. हें ऐकून मीं म्हटलें साई ! मुजे रस्ता मालूम नहीं. ओ कहां रहतां है ! हें ऐकून त्यानें डाव्या हाताचे खुणेनें मोठी एक दगडाची चीप उचलण्यास सांगितली. ती मी उचलण्यास गेलों परंतु ती मला जागची सुद्धां हालेना, तेव्हां साईनें मला थोडी खाक दिली आणि म्हणाला, उसपर जरा फेकदेव और नीचे चला जाव, मीं त्याप्रमाणें केलें आणि खालीं जिन्यासारख्या पायऱ्या होत्या त्यावरून खालीं उतरलों आणि इकडे तिकडे पाहूं लागलों, तों तेथें एक भव्हें मोठें जंगल माझे दृष्टीस पडलें. तसाच पुढें गेलों, तों एक मोठा सुंदर तलाव दृष्टीस पडला, ज्याचे तीरीं राजहंसपक्ष्यांची जोडपीं खेळत होती, बदकें क्रिडा करीत व चक्रवाक पक्ष्यांचे जोडे बसले होते. व दोन प्रहरचा सुमार असल्यामुळें त्या पाण्यांत कमलपुष्पेंही प्रफुल्लित होऊन आपले मित्रास वर तोंड करून हांका मारित आहेत कीं काय असा भास होई. तसाच पुढें गेलों तों दोन मोठाले कुत्रे ज्यांची कांति सफेत असून व भले दांडगे अंगावर हात हात लांब केंस वाढलेले होते असे ते दोघे एका टेंकडीवर बसले होते. त्यांची माझी दृष्टादृष्ट होतांच एक कुत्रा मजकडे आला आणि मनुष्यासारखा दूर उभा राहून माझा चेहरा न्याहाळूं लागला. त्यांस पाहतांच मला मोठी भीति वाटावी ती न वाटतां उलट असें वाटलें कीं, माझा हेतु हाच विचारीत आहे कीं काय ! म्हणून मी त्याच्या जवळ गेलों व ती त्याची गंभीर मुद्रा पाहून मला अतिशय आनंद वाटला. नंतर माझ्यापुढें पळत सुटला. मी किंचित् मागें उभा राहिलों कीं तोही मागें सरून तसाच तेथल्या तेथें थबके. मग मी तसाच त्याच्या पाठीमागें धांवत गेलों तों दुसरा कुत्रा तेथून उठला आणि पुढें येऊन शेंपटी हालवीत हालवीत जवळ येऊन मागें पुढें पाहूं लागला. तेव्हां मी समजलों कीं, हाही मला कोठें तरी नेणार आहे. मग मी त्याच्या मागोमाग जाऊं लागलों, तों त्यानें मला एका मोठ्या बागेंत नेलें. तेथें फळझाडें अशीं कांहीं सुंदर होतीं कीं, तीं बहुशा फलांनीं लवून केवळ नम्र झालीं होतीं. प्रत्येक झाडाकडे नजर फेंकावीं, तों ईश्वराच्या चातुर्याकडे लक्ष जाऊन मोठें कौतुक वाटूं लागलें. नंतर तो कुत्रा एके झाडावर चढून दुसरे झाडावर जाऊन नानातऱ्हेचीं फळें मजकरितां खालीं घेऊन आला. आणि माझ्यासमोर माझ्या डोळ्यांकडे पाहत कांहीं वेळ स्तब्ध ब-

सला. यावरून मी समजलों कीं, मीं तीं फळें घ्यावीं हा त्याचा हेतु जाणून मीं त्यांतील एक फळ फोडून खाल्लें. काय त्याचें माधुर्य, काय त्याची रुची! आहाहा तीं किती ती गोड होती म्हणून सांगूं ! कीं तें खातांच मला वाटलें कीं, मी स्वर्गींच आहें कीं काय ? कोण जाणे ! मी त्यांतील दोन तीन फळें खाल्लीं आणि कुत्र्याकडे पाहिलें तों तो उजवे बाजूचे एका खोपटांत शिरला. मीही त्याचे मागें गेलों. तेथें जवळच एक स्वच्छ पाण्याचा झरा वहात होता त्यांतील स्फटिकासारखें स्वच्छ पाणी मीं प्यालों व माझा आत्मा संतुष्ट झाला. माझे मनास असें वाटलें कीं, हा कुत्रा नसून कोणी पुण्यवान् प्राणी कांहीं पातकामुळें हा पशुदेही झाला आहे. माझें आगतस्वागत त्या कुत्र्यानीं भाषणाशिवाय मनुष्यांपेक्षां अधिक प्रेमानें केलें ह्याचें मला मोठें कौतुक वाटून मीं ईश्वराचें फार आभार मानिलें. नंतर मी चिंतातुर होऊन आपले मनांत विचार केला कीं, येथील मजा पहात मी चैनींत बसलों आहे. पण मी कोणते कार्यास आलों व ही मजा काय पाहतों. नंतर इकडे तिकडे पाहूं लागलों, तों माझ्या मनांतील हेतु त्या कुत्र्यांनीं जाणून माझ्यापुढें ते धांवत सुटले. मग मीही त्यांचे मागेंच गेलों. कांहींसा दूर गेल्यावर एक मोठी गुहा माझ्या नजरेस पडली व तेथें दोन मोठे नाग मोठमोठ्याला दहा दहा फड्या काढून डुलत बसलेले दिसले. तो कुत्रा प्रथमतः त्याजवळ गेला आणि त्यांस किंचित् दबकावल्यासारखें करून व गुरकावून पुनः मजकडे आला. मी पुढें गेलों, तों दोन्ही नागांचे मध्यभागीं एक लहानशी शिला पाहिली. त्या कुत्र्यानें पायानें ती काढून मला रस्ता दाखविला. मी आंत जाऊन पाहतों, तों तेथें एक पांढरा सफेत ढीग माझे दृष्टीस पडला. तेव्हां मी हा काय चमत्कार म्हणून आपलेच ठिकाणीं भयभीत व चकित झालों. इतक्यांत त्या ढिगांतून ध्वनी निघाला, तो असा- ये इदर जो कुच है सो पुरा देखलेव फेर नजर कबूना आवेगा. तुजकूं जो चाहे सो मंगले. खुदानें जो पैदा किया सो जावेगा. जो मालुम नहीं पडता, सो नजरमें आवेंगा. आब तू जो कामकूं आया है सो फत्ते होगा. आब जो उधर फत्तरकी राजधानी होगई, सो आच्छी बनेगी. मत फिकीर कर. और ओ बादशहाकी छोकरी तेरेसे बिहा करेगी. तेरेपर खुदाकी मेहर है. तेरेसरीखा दानिषमन् पैदा किया है. तेरे सकुनपर गरीब लोगोंका तुमारे मु देखके आच्छा होगा. परवरदिगारनें ओ राजधानी ताराके वास्ते पैदा किया.

और तूं जस लेनेवाला एक आदमी है. तूं नागनीसरीख्या औरता आपने माबहन माफक ज्याने. माके पेटमें आकेला तूं अल्लासरिखा पैदा हुवा है. क्या तेरी तारीफ मुंसे कहु ! तुजकू देखके लोगोंका दुःख भाग जावेगा. ऐसी तेरी पैदास्ती हुई है. ये दुनयादारी बडी आजब चीज है. इमान मत छोड. जैसा कुई देखते चलेगा सो उमदा आदमी होगा. ना देखेंगा सो गिरेगा, और जो बुडेगा उस्का आंदाज ख्यालमें आनेका नहीं. ज्यो हुषार आदमी होगा सो मकान देखके चलेगा. आब सब रह्यने देव. सबकुच गल्लद है. लेकीन तेरा काम आठ दिनके बिचमें होगा. और होना चाहिये. आब मेरे पाससें खांक ले जाव. और दो आंछर तुजकूं पढा देता हूं सो ध्यानमें रखलेव. इतका ध्वनी होऊन तो ढीग ढासळून त्यांतून एक साई बाहेर आला व त्यानें आपले अंग झाडलें तो अंगावरील वारुळाची माती चहूंकडे पसरली. कांत टाकून जसा आंतून नाग निघतो तद्वत् तो स्वच्छ देही भव्य पुरुष दिसूं लागला. मीं त्याचे चरणावर डोकें ठेविलें आणि हात जोडून म्हणालों, आब जो इदर बैठेथे ये फकत्त बादशहाके खातिर ऐसे मुझें सच् सच् समज आया. कुच बंदेसे बेआदबी होगी तो गुन्हा माफ करिये. मै लाचार हूं आपने ज्यान कीं परवा ना रखी उइसी बातोंका आपके शीरपर क्यां बोजाथा. हें ऐकून साई म्हणाला. सुनले. सब दुनियाका मालिक बादशहा ओ ज्यो गिरफदारीमें गिरा तो आलम दुनया क्या करनेकी है. आब तुजकूं खांक देताहूं. और जो आंछर तुजकूं पढाउंगा ओ तारा करके छोकरीकें पास ज्यां उस्सात लेजा, और ओ खांक उस्के दस्तोंमे दे. और तूं उस्के नजीक खडा रहा. ये देखके ओ दुष्मन् सैतान आके तेरे सामने खडा रहेंगा. उस्कुं कुच भाला, बरची, तलवार, तमच्याका काम नही है. मिठी बात करनेमे आपनें काम कबु नही भूल जाना. ओ भूकलगी प्यास लगी करके मूं खोलकें तुमारे सामनें लढनेकूं कंगाल आवेगा. तो तारा छोकरीकें हातमे जो खांक दियेली होगी सो उस्के मूमें, आखोंमें फेक देना. षुमार नहीं उइसा ओ घबरा ज्याके बडी धामधूम करेगा. लेकीन उस्कूं मत डरना. ताराके हातकी खांक ओ सैतान के आंखमे और मुमें जब गिरेगी तब उस्की ज्यान और तन जूमिनपर आलख आलख गिर पडेगी इतनेमें यह खांक और उस तलावका पानी लेके जानवर, चिडिया, ही आदमी उस्के सब मेहेल राजधानीपर और ओ बादशहाके बैठनेके जगेपर

ए पानी डालके सब खांक फेक देव. और बादशहाकें कानमें ये आंछर बोलदेना. इतनें करते हो तों सब लोक आप आपनें नोकरीपर हाजर होगे. ओ पहिले सरीखा बादशहा और शहर बनेगा. ओ तारा और तूं मिलके उपर जा, और बादशहा आपने साथ ले. आकेला मतजा. उपर जाके नाजनी सरीख्या परिया गिर रहेली ओ सब खडे रह्यके ताजीम तवाज तुमकूं देखके देगी. और बादशाहा बोलेगा, मेरी छोकरी तुजकूं आपने खुषीसें देताहूं, ये ले. और ये बादशाही सब तेरी है. तेरे नामका डंका सब शहरमें आजसे बजेगा. इत्ति बात होती है तो और तुजकूं कुच चाहिये सो मेरे पास मंगले. दुनयेके बिचमे तुजकूं जो जादुविद्या है सो बताउंगा. आजका दीन तूं ह्या रह, सब तरतीब तुजकूं बताउंगा. सब ध्यानमे रख मत भूल ज्या. मेरा काम ज्यो था सो आज सब पूरा भया. बेफिकीर तूं रह ज्या. तुजकूं कुच कम न होगा. किसलियेके तेरी नेत शाबीत है. तूं इत्ती दौलत और परिया सरिखे औरता देखे लेकीन मा बहन उइसी तेरे दिलमें दुसरा ख्याल ना आया इसवास्ते तूं जिधर जिधर गया उधर उधर तेरा सब फत्ते हुवा. नामुष्कल गिरी. आब तुजकूं खानेकूं होना के नही? असें म्हणून त्यानें डोळे झांकले इतक्यांत जे दोन नाग बाहेर दृष्टीस पडले होते, त्यांचे दोन सुंदर सुस्वरूप पुतळे झाले. आणि त्या महंताचे पायावर डोकें ठेवून म्हणाले, काय हुकूम आहे? नंतर त्या महंतानें त्यांस सांगितलें, आछा आछा फल उस षक्सकें वास्ते धुंडके ले आव. हें ऐकून ते गेले व तावडतोब उत्तम फळें आणून त्याचे पुढें ठेविलीं. मग मला तीं फळें खाऊन त्यांसह जाण्यास हुकूम दिला. नंतर त्याचे हुकूमाप्रमाणें तीं फळें तिघांनीं खाल्लीं व त्या ठिकाणीं परत आलों. त्याचें स्वरूप पाहिलें तों ऐन पंचविशींत असलेल्या पुरुषाप्रमाणें मोठे धिप्पाड भव्यदेही पुरुष दिसला. ज्याचें भाळ विशाळ व भव्य असून दैदीप्यमान दिसलें, ज्याचें भाषण अमृतासारखें गोड असून तपश्चर्येचें तेज तोंडावर गांभिर्यामुळें सहज दिसत होतें. ही पूर्वीची अवर्णनीय शरीरसंपत्ति पाहून आपले मनांत म्हटलें, याचें वय किती असेल बरें? व हें त्याचे नातवास विचारलें असतां कळेल. म्हणून त्या साईजवळ जातांच पहिला प्रश्न महाराज, आब मुजकूं भेजा उदर ज्याके सब फत्तेकर आया. लेकीन् आबकें पावके पास इतना मंगताहूंके आब कुच तोबी फरमावो, ये बंदा करनेकूं तयार है. हें ऐकून साई म्हणाला,

आब तुम बहोत थकगये. तो ओ च्यार छोकरी और तूं मेरे सामने बैठो और ज्यो कुच तेरे और ये छोकरियेकें वास्ते खुदाने पैदा किया सो आनंदमे सब खा ज्याव. असें म्हणतांच मीं त्यास म्हटलें, साई मेरेकूं एक बडा आचंबा लगा, सो पूंच्छतांहूं इसलिये घुस्सा मत करो. आबके बाबाके बाबा कितने उमरके होगे ? हें ऐकून त्या फकीरास मोठें आश्चर्य वाटलें आणि म्हणाला, उस्की उमर आठसो बरसकी होगी. हें ऐकून मला मोठें नवल वाटलें आणि म्हटलें, सो बरस आदमी की मुदत और आंठसो बरस कांहासें लाये ? साई म्हणाला, पहिलें तो उइसे दीनथे किं कुई पाप ना करताथा आबतो सब पापही पाप हो गया है. दुनियादारी कैसी चलेगी. पापके मारे सोबरसबी आदमी आब कहां रहते है ? ज्यो हैसो ठीक है ! आब तेरा जंजाल ये छोकरिया सब सांत लेजा. और उस्की आप आपकें माबाप की मुलाखत करदे, तूं खुला होजा. तेरा आच्छा होगा. आब मेरी झोली, पादुका और दंडा मेरे पास रखजा. असें म्हणतांच त्या सर्व जिनसा मीं त्याच्या स्वाधीन केल्या. परंतु हात जोडून पुनः विनंति केली कीं मी एकटा पुरुष असतों तर कसाही गेलों असतों, पण या चौघी मुलींसह कसें जावें हा विचार आहे. इतक्यांत साईनें हें जाणून तो म्हणाला, ओ सब सामान लेव, मत् खट्टाहो, तुजकूं खुदानें ये देनगीके माफक दिये है. चाहे सो मजाकर. जब दिन तेरी नियत बिघड जावेगी ओ दिन तेरे पास एक चीज ना रहेगी. ध्यानमे रख. आब ओ फत्तर कूं आदमी बनाव, जाव. जलदी करो किसीकी रहा मत् देखो, छोकरीकूं साथ लेजाव मत् भुलज्या. इतकें होतांच मी म्हणालों, साई ! आपकी उइसी रहीम नजर मेरेपर रहने देव, किस लिये मै गिरफदारीमें फिर ना गिरुंगा, आब मै आपके हुकूमसें सब चीज उठा देताहूं और च्यारो छोकरी माबापकें घर ले जाताहूं मेरेकूं आपने रुकसत दिई असें म्हणून त्याचे पायावर डोकें ठेविलें आणि त्या चौघींस सांगितलें कीं या अवलियाचे पायावर डोकें ठेवा आणि मजबरोबर चला. असें म्हणतांच त्यांनीं त्याप्रमाणें केलें तेव्हां त्यांस साई म्हणाला, मैने खुदाका हुकूम फरमाया आब तुमारा आच्छा होगा. और फत्तरका बादशहा तुजकूं एक छोकरी देगासो लेके रानी बनाव तेरा भला हुगा.

---

# भाग ७ वा.

पुढें आम्ही सर्वजण जे तेथून निघालों, तों जेथें साई होता व ज्या राजाचे हुकुमानें मी साईबरोबर गेलों होतों, त्या राजाजवळ येऊन त्या चौघी मुलींसह पोंहचलों. ते दिवशीं त्यांच्या आईबापांचा आनंद गगनांत मावेना. जिकडे तिकडे दान धर्म, ब्राह्मणभोजनें व देणग्या सुरू झाल्या. व त्याचे दुसऱ्या तिघी मुलींचे आईबाप आप्तच असल्यामुळें त्यांस बोलावून आणून ज्यांच्या मुली त्यांचे स्वाधीन करून दिल्या. नंतर त्या सर्वांचा आनंद एकच होऊन गेला. कांहीं दिवस सर्व आप्तांस तेथेंच ठेवून घेतलें. नंतर या चारी कन्यांचा लग्नसमारंभ येथेंच व्हावा असें ठरलें. व मुलींनीं पाताळ भुवनांत जो जो ज्यांना आवडला तो तो मनानें आपले बापास सांगितलें कीं,आम्ही स्वतः वरलें आहेत त्यांच्यांशींच आमचीं लग्नें करून द्यावींत अन्य पुरुष आम्हाला बंधूपित्याप्रमाणें आहेत. या आमच्या भाषणानें आपली वडिलांची बेअदबी फार झाली, याची ईश्वर व आपण क्षमा करा. असें त्या बोलल्या. तेव्हां त्यांचे आईबाप म्हणाले, तुम्ही कांहीं अज्ञान नाहींत, तुमचें सुख तुम्ही पूर्णपणें जाणतच आहा. ज्याचेवर सर्व जन्माचें सुख अवलंबून असणार तो तुम्ही विचार करून योग्य रीतीनेंच वरला असेल, तर आतां त्या प्रत्येकांचीं नांवें व गांवें आम्हांस सांगा. असें म्हणतांच त्यांनीं त्यांजपुढें तीन चिठ्या टाकल्या. त्यांतील नांवें—चंद्रपूर येथील मकरध्वज राजाचा मुलगा शशिशेखर वय १८, दुसरा उत्तरेकडील विरामपूर येथील रामचंद्रभद्रसेन राजा त्याचा मुलगा सुबाहू वय २०, तिसरा पूर्वेकडील आमालिका खंडांतील सुहास्यवदन राजा त्याचा पुत्र पूर्णानंद वर्षे १८, याप्रमाणें तिघींचे वर झाले. चौथी या राजाची मुलगी, जिचें नांव इंदिरा ती म्हणाली, मला योग्य वर मिळाल्याखेरीज मी कधींच लग्न करणार नाहीं. तेव्हां तिचे बापास फार वाईट वाटलें. तो म्हणाला, तुझा पत्ता मुळींच लागत नव्हता तो दैवयोगानें एक सिद्ध आवाळिया येऊन आजचा आनंदाचा दिवस दृष्टीस पडला. या कामीं या सावकारपुत्राची खरी मेहनत आहे. हा इमानी मनुष्य होता म्हणूनच तुमची व आमची पुनरुज्जीवनें होऊन भेट झाली. तरी तुझी इच्छा अस-

त्यास त्यासच वर. हे शब्द मी ऐकतांच म्हणालों, राजा ! आपली कन्या माझी भगिनी आहे हा काळपर्यंत परस्त्री म्हणजे माता असें या मनानें घेतलें आहे तें ईश्वरकृपेनें शेवटास जावो. हें ऐकून ती कन्या म्हणाली, भाऊराया, माझे पित्यासही पुत्र नाहीं त्यापेक्षां आपणच माझे बंधु योग्य आहात. ममतेनें भाऊसुद्धां बहिणीकरितां इतके झटून श्रम घेणार नाहीं. आपण शिर हातावर घेऊन देहाची परवा न करतां नाहीं नाहीं ते दुःखद प्रसंग सहन करून मला त्या दुष्ट राक्षसाचे हातून सोडवून माझे आईबापांस आणून भेटविलें, यांचें उपकार मी आमरणपर्यंत विसणार नाहीं. हे उपकार असे झाले आहेत कीं,या देहाचें कांतडें काढून त्याचा जोडा शिवून आपले पायांत घातला, तरीही उत्तीर्ण होणार नाहीं. असो, आपणच मला मदत कराल अशीं आशा बाळगून मी आहें. असें म्हणतांच तिचा बाप म्हणाला कीं, हें माझें अर्ध राज्य मीं तुला दिलें. मीं सांगितलें, मी निस्पृह मनुष्य आहें. मला राज्याची कांहींएक जरूर नाहीं. तथापि राजानें फारच आग्रह केल्यावरून ती गोष्ट मीं स्वीकारली. पुढें त्याची मुलगी इंदिरा ही आपल्या तिघी बहिणींसह कांहीं दिवस आनंदानें राहिल्यानंतर एके दिवशीं ती स्वस्थ बिछान्यावर पडली असतां, आपल्याशींच विचार करूं लागली कीं, या सर्वांपेक्षां मी मोठी असून यांच्या लग्नांची व्यवस्था झाली, आतां मला वर कोठें मिळेल ! असा तिनें विचार करून उन्हाळ्याचे दिवस आहेत सबब मी बागेंत रहावयास जातें असें आईबापांस विचारून शहराबाहेर दोन तीन कोसांवर एक बाग होता तेथील बंगल्यांत जाऊन राहिली. बरोबर या तिघी बहिणी घेतल्या व कांहीं नौकर व सामुग्री शहरांतून आणून तेथें ठेवली व तेथें ती आपला वेळ आनंदानें घालवीत असे. संध्याकाळच्या चार वाजतां, आपल्या तिघी बहिणी व दोन अन्तःकरणांतील जीवलग दासी बरोबर घेऊन ती कधीं फुलझाडाचे ताटव्यांत, कधीं फळझाडांत, कधीं वाळूचे मैदानांत व कधीं कारंज्याजवळ इकडे तिकडे ऐषआरामानें फिरावयास जात असे. केव्हां केव्हां तेथेंच बंगल्यांत फराळ वगैरे करून खेळत असे. एके दिवशीं ती फिरत असतां जवळच तेथें एक मोठा तलाव आहे असें कळलें. मग त्या चौघींनीं बसून विचार केला कीं, उद्यां महाशिवरात्र आहे तर येथें जवळच तलाव आहे व त्या जवळच एक मोठें शिवालय आहे, तर तेथें प्रातःकाळीं जाऊन

स्नान करून शिवाचें दर्शन घेऊन यावे म्हणजे मोठें पुण्य घडेल. असा विचार करून तेथील माळ्यास उत्तम बेल, फुलें तोडून आणण्यास ताकीद दिली व स्वतः कांहीं सुवासिक पुष्पें तोडून त्यांचे हार, गजरे करून ठेवले व एका स्वाराजवळ पत्र देऊन आईबापांकडे पाठविलें. त्यांतील मजकूर येणेंप्रमाणें—

तीर्थरूप राजमान्य राजश्री बाबासाहेब–वडिलांचे शेवेसी, आपत्य बाळकें इंदिरेनें दोनी कर जोडून त्रिकाळचरणीं मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विनंति विशेष. यानंतर इकडील विनंति कीं, उदईक महाशिवरात्र असल्यामुळें प्रातःकाळीं तळ्यावर स्नान करून महादेवाचें दर्शन घेऊन बाराचे आंत परत बंगल्यांत यावें असा विचार आहे, तरी पत्राखालींच हुकूम यावा. शिवालय आपले बागेपासून दोन मैलांवर जवळच आहे, करितां अनमान होणार नाहीं. भरंवसा जाणून लिहिलें आहे, कळावें. शेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

मित्ती माघ वद्य १३ गुरुवार. आपली लाडकी प्राणापेक्षां प्रिय.

इंदिरा.

असें पत्र लिहून त्या स्वाराजवळ लखोटा दिला आणि सांगितलें कीं, लवकर उत्तर घेऊन ये. त्याप्रमाणें स्वार जाऊन दोन तासांत उत्तर घेऊन परत आला. नंतर तिनें पाहटेस पांच पालख्या, पायदळ व घोडेस्वार लवाजम्यासहित तयार ठेवण्यास सांगितलें. व त्याप्रमाणें पाहटें त्या तळ्यावर जाऊन संकेताप्रमाणें स्नानें करून पोषाक व डागिने घालून देवदर्शनास गेल्या. तेथें ब्राह्मणांनीं सर्व पूजेची तयारी करून ठेवलीच होती. नंतर यथाविधि देवाची पूजा केली व पुजाऱ्यानें तीर्थप्रसाद दिला तो घेऊन त्यास दक्षिणा देऊन त्या सर्व तळ्याचे पाळीवर आल्या, व तळ्याची मजा पहात इकडून तिकडे व तिकडून इकडे हिंडूं लागल्या. तों इतक्यांत तळ्याचे दुसरे पाळीवर आठरा वीस वर्षांचे दोघे उमेदवार हत्यारबंद चंद्रसूर्यांसारखे तेजस्वी दिसले. ज्यांचें तेज पहातांच ती राजकन्या दिपून गेली व त्यांस न्याहाळून पाहूं लागली. आणि मनांत म्हणाली, अहाहा! काय माउलीचे पोटीं हा हिरा जन्मला आहे! हा ज्याचे भाग्यीं असेल तीच स्त्री धन्य होईल. इतर जगांतील पुरुष याच्यापुढें तुच्छ आहेत. काय चेहरा

व बांधा तरी काय आहेग बाई ?! ईश्वरानें तर हें स्वरूप घडण्यांत कांहींएक कसर ठेवली नाहीं. ती जेथें उभी होती तेथेंच झाडाचे आड तिची मामेबहीण उभी होती, ती हिची चित्तवृत्ति त्या पुरुषाकडे जाऊन वेधिली आणि ही काय तऱ्हा करते, हें पाहण्याकरितां चोरून हळूच तिजकडे पहात स्तब्ध उभी राहिली. तों इतक्यांत तो राजपुत्र व त्याचा स्नेही हे उभयतां घोड्यावरून खालीं उतरून एकमेकांचा हात धरून फिरूं लागले. तो इतक्यांत एकाएकीं तळ्याचे दुसऱ्या पाळीवर राजपुत्राची दृष्टि गेली. आणि तो मोहित होऊन खालीलप्रमाणें तिचें वर्णन करूं लागला.

॥ साक्या ॥

बाहु तुझे हे कमलनाल जणु पाहुनी हृदि आनंद ॥
झाला लोकुनी आला प्रेमा मावेना स्वानंद ॥
अमृत मृदुवाणी ॥ धालों मी अंतःकरणीं ॥ १ ॥
स्मित हास्यातें पाहुनी तुजला धांव घेत मद साचें ॥
पाठिं तुझ्या मीं धांवत यावें द्रव्य जसें कृपणाचें ॥
भेटे सत्वरि गे ॥ धांव मी घेतो त्वद्गृहींगे ॥ २ ॥
तव कटी देखुनी केसरी वस्ती रानीं गुहेमध्यें केली ॥
नासिक चंपाकली आली नेत्री कमला लज्जा आणिली ॥
रूप रेखीव लतिका ॥ गेली गुंगुन आज मति कां ॥ ३ ॥
असेल संचितीं ही स्त्री ज्याच्या तो भाग्याचा मेरू ॥
यत्न करुनी किती थकलों म्हणती काय असें जनभेरूं ॥
सकल हा मम हेतु ॥ मित्रा खचितची पुरवी तू ॥ ४ ॥
हे चंद्रवदना सूर्य कांति तव बिंब फलचित व ओष्ठीं ॥
डाळिंबीसम दंत तुझे परी वागविसी उरीं पुष्टी ॥
रूप हें तुज साजे ॥ घे बहु आशीर्वचन माझे ॥ ५ ॥
केतकी वर्णा लोकुनी रामा कांतीमध्यें मोहकता ॥
लोकुनी रूपा चकित मी किती नेत्रें शिणली बघतां ॥
त्रास मना होतो ॥ प्राप्तीस्तव जिव बहु झुरतो ॥ ६ ॥
भिंवया लोकुनी धनुष्य लाजे हरिणाक्षी तुज वदती ॥
विधि रिकामा तुजला घडतां कामदेव त्या मदती ॥

ऐसें रूप बनलें ॥ म्हणवुनी रत्न जगीं आलें ॥ ७ ॥
दीर्घ केश किती काळे सुंदर कलाप देखत राहवें ॥
धुसधुस करिती भुजंग लोकुनी वेणी नव्हे माद्रिपु हे ॥
कैसी भूवरि या ॥ खचितची आली जिकाया ॥ ८ ॥
तव पदकमलीं आरक्तता ही लाज आणवी अरुणाला ॥
ऊरु कर्दलीस्तंभ अंक हे कृश उदरीं म्हण जीला ॥
उंच नसे भारी ॥ सडपातळ ही दिसे नारी ॥ ९ ॥
विशाळ भाळावरि कुंकुम हें शोभत अति रमणीला ॥
व्याल वेणीवर पुष्प दाखवित चंद्र जसा गगनाला ॥
मुदती शेष मणीं ॥ कैसी शोभत ही रमणी ॥ १० ॥
कज्जल नयनीं शर जणुं सोडी बाण लावी हृदयाला ॥
नेम कसा हा निरखुनी धरिला चूर करी चतुराला ॥
ऐशी मृदुगात्री ॥ सुहास्यवदना नृपपुत्री ॥ ११ ॥
गर्ह्लि गुलाबी पुष्प ठेविलें हनुवटी तैसी भासे ॥
नेत्रीं बाहुली आली चंचलवत् वाणी स्रवे अमृतसें ॥
पवित्र जशी सरिता ॥ नसे जगीं याहुन कोणी आतां ॥ १२ ॥
चंचल नागीण समती भासे हृदयाची अती नामी ॥
क्षमाशील जी दास्य जनाला पति सेवे तत्पर मी ॥
ऐशी खचितची हो ॥ भर्त्या कोपे नम्राचि हो ॥ १३ ॥
कंठ कंबुवत पाहणाराला रागा शांती करितो ॥
शोभती त्रिवळी अलंकारयुत वक्त्रा शोभा आणितो ॥
सीमा रूपाची ॥ केली विधीनें आज साची ॥ १४ ॥
चक्रवाक् पक्ष्याचा जोडा छद्में चोरुनी घेसी ॥
जागा दिधली योग्य स्थलीं त्या दिसती कुच वक्षासी ॥
स्थीरची ते असती ॥ न चंचलता कधिं करती ॥ १५ ॥
कमंडलुवत् तव कुच असती दिसती मनोहर भारी ॥
स्पर्धा करी गंडस्थल करिचें त्यांसीं ते संहारी ॥
त्यावरी आहे भृंगे ॥ अग्रे पाहतां अरी गुंगे ॥ १६ ॥
बोटें करिं पदिं सडक लांबसीं नखा कौमुदी लाजे ॥
अभिनय पाहुनी शब्दोच्चारणी आस्खलितही साजे ॥

रूपोत्कर्ष खरी ॥ अवनी तूं एक अससी नारी ॥ १७ ॥
चाल हंसवत डुलसी नागीण गजोन्मत्ता सम चाले ॥
राज्य सर्व गेल्याचि न चिंता भोगावी जन्मा आले ॥
इर्षा किती करिती ॥ मनीं हेतू हा बाळगिती ॥ १८ ॥
लेखन वाचन व्याकरणाची अवगत सर्व असेंही ॥
बहुपरि परिच्या भाषा शिकुनी शुद्ध लेख न घेई ॥
वाचन बहु करिती ॥ वाकब सर्वपरी होती ॥ १९ ॥
मर्यादेची सीमा जिचे पुढें लोकुनी ग्रहण करावी ॥
राज्यरीति ती बहुत जाणती न्यायान्याय गणावी ॥
ऐशी ज्ञानी असे ॥ सर्व गुरुत्व अंगीं वसे ॥ २० ॥
कुले घट्ट वर भुले पाहतां कैऱ्यापरी ऊरू त्यां ॥
मानी मनोरम स्वभाव जीचा धर्म करी बहु रीत्यां ॥
नीती जाणतसे ॥ माता तातही पूज्य असे ॥ २१ ॥

याप्रमाणें राजपुत्र वर्णन करीत असतां ती षोडश वार्षिका त्रैलोक्यसुंदरी सख्यांसह बोलत हळू हळू त्या राजपुत्राजवळ येऊन पोंहचली. राजपुत्र तर तिचें सौंदर्य पाहून मूर्छित झाला. इंदिराही तो प्रकार पाहून हें काय आश्चर्य, म्हणून आपले सखीशीं बोलूं लागली, कोणीकडे मी मेली आलें, आणि हें काय झालें नकळे! माझ्यासारखी दैवहीन कोणीच नसेल! एक तें तेव्हां झालें व हें दुसरें! हें ऐकून प्रधानपुत्र म्हणाला, तें काय व हें दुसरें काय हें मला सांगा. व सांगितलें असतां मजवर फार उपकार होतील. ती म्हणाली, आधीं तिकडे सावध करा मग माझ्याशीं बोला, असें त्यास सांगून दासीस म्हणाली, माझीही स्थिति तशीच होऊं पहाते. इतक्यांत दासींनीं चतुराई करून त्याचा हातरुमाल व हातांतील आंगठी मागून घेऊन आपण लौकर राजकन्येस पालखींत घालून रहाते ठिकाणीं बंगल्यांत नेलें, तों इतक्यां वेळांत ती अर्धवट बेशुद्ध झालीच होती. व बंगल्यांत आणतांच तिला अतिशय ज्वर येऊन ती बडबडूं लागली व त्यांत दुसरें कांहीं नाहीं, पण इतकेंच कीं, त्या तळ्याचे पाळीवरच मला असूंद्या; मला कोणी औषध उपचार करूं नका. ती क्षणोक्षणीं एकाग्रदृष्टि करून त्या राजपुत्राचें सौंदर्य मनांत आणून डोळ्यांतून पाणी गाळी. असें नित्य होतां होतां, सुमारें पंधरा दिवस झाले, औषधोपचार पुष्कळ

केले, परंतु गुण कांहीं येईना. तेव्हां जुने लोक म्हणूं लागले कीं, ईस पिशाच्चबाधा झाली असावी. तेव्हां तिच्या जवळील मैत्रिणी म्हणूं लागल्या कीं इला खचितच जिवंत पिशाच्च लागलें आहे, त्या वरचेवर आपआपल्यांत परस्परांचे हात दाबीत व हसत. सर्वांचे उपाय थकले, असें झाल्यावर त्या मैत्रिणींनीं असा विचार केला कीं, आपण जें पिशाच्च पाहिलें त्याचा आतां शोध केलाच पाहिजे. मग तिच्या बहिणींपैकीं दोघी मोठ्या चतुर व हुषार होत्या.त्यांनीं विचार करून पुरुषाचा वेष धारण करून घोड्यांवर बसून आसपास गांवीं फिरूं लागल्या. तों एके दिवशीं तो राजपुत्र व प्रधानपुत्र असे उभयतां घोड्यांवर बसून त्या तळ्याचे किनाऱ्यावर पुनः आले.आणि ती राजकन्या ज्या झाडाखालीं पूर्वीं उभी होती, तेथें जाऊन खिन्नवदनानें उभे राहिले. राजपुत्र प्रधानपुत्रास म्हणाला, मला ती सुंदरी पुनः भेटेल काय ! असें तो बोलत आहे, इतक्यांत हे दोघे घोडेस्वार तेथें येऊन घोड्यांवरून उतरून राजपुत्राजवळ आले आणि त्यास म्हणाले; आपण यापूर्वीं येथें कधीं आलां होतां काय ? येथें एका राजकन्येला आपल्यापासून पिशाच्च बाधा झाल्याचें कांहीं स्मरतें का ? राजपुत्र म्हणाला,—छे, मला कांहींएक माहित नाहीं. दुसरा म्हणाला, गांव जाळून मारुती बाहेर निराळाच. ठीकच आहे, राजास दिवाळी काय माहित ! एका बादशहानें प्रश्न केला कीं, प्रधानजी दुनया आबाद है ? प्रधानानें उत्तर केलें, महराज ! यंदां कर बसविल्यानें दुनया फार हलाकींत आहे, लोकांस अन्न देखील खाण्यास मिळत नाहीं. बादशहा म्हणाला, घी खिचडी क्यंव नही खाते ! तशीच ही गत ! आपल्यास कांहींच माहित नाहीं ! सूर्यास किरणें अनेक आहेत पण किरणांस सूर्य एकच असतो. असो, महाराज, आपलीही प्रकृति कृश झाल्यासारखी दिसते, तरी आपल्यास काय होत असतें ? हें त्यांचें भाषण ऐकून प्रधानपुत्र आपले मनांत म्हणूं लागला कीं, हे फार धूर्त आहेत, ठीक आहे. आतां काय होतें तें पाहूंच, असा विचार करून तीं चाललेलीं भाषणें ऐकून स्वस्थ बसला. यांनीं राजपुत्रास विचारलें, आपण राहणारे कोठले ? आपलें नांव काय ? आपणास काय होत असतें ? तेव्हां राजपुत्र म्हणाला,—माझें नांव मदनसेन, माझे शहाराचें नांव बेदरपूर, येथून पूर्वेकडे एक राजधानी आहे तेथील आम्ही राहणारे. हल्लीं माझे प्रकृतीस बिलकूल आराम नाहीं. डोकें दुखून अतिशय ताप येत असतो. शिवाय

अन्नास बिलकूल रुचि नाहीं. सुमारें पंधरा दिवस झाले झोंप नाहीं, बोलतों एक व करतों एक व मनांत भलभलतेंच येतें, उगीच पडून रहावेंसें वाटतें. अंगांत बिलकूल शक्ति उरली नाहीं, उठण्यास जातों तों, धाडकन् जमिनीवर पडतों अशी माझी दशा झाली, हा कसला रोग? यास म्हणावें तरी काय! ह्यांतून मला जो कोणी बरें करील त्यास मी मोठें बक्षीस देईन. हे राजाचे शब्द ऐकून या दोघी मनांत समजल्या कीं, आपलें काम झालें. व त्यास म्हणल्या, आम्ही एकजण वैद्य व दुसरा पंचाक्षरी विद्या जाणणारा असे आहोंत. असें म्हणून एकजण जो ज्योतिषी होता, तो बोलूं लागला कीं, याच्या नांवावरून समजतें कीं, यास पाण्याजवळ एका स्त्री जातीपिशाचानें झपाटलें आहे. राजपुत्र म्हणाला, मग आतां यास उपाय तरी काय? पंचाक्षरी ह्मणाला यास उपाय इतकाच कीं, तें पिशाच्च समक्ष आणून जसें तें लागलें तसें तें आपली पिशाच्चबाधा घेऊन गेलें पाहिजे, प्रधानपुत्र ह्मणाला, हें जर तुह्मी कराल तरच खरें. बरें आहे, असें ह्मणून सर्वजण घोड्यांवर बसले व गोड गोड गोष्टी करीत करीत त्या सुंदरीच्या बागेंत आले. व तेथें एका सुंदर वृक्षाखालीं गार छायेंत कोंचावर चौघेही बसले. व थोडा वेळ विश्रांति घेतल्यावर सर्वत्रांनीं दररोज पांच वाजतां येथें येत जावें असें ठरवून, राजपुत्र प्रधानपुत्रास सर्व बाग, फळझाडें, फुलझाडें, व तेथील रम्य कारंजें वगैरे दाखवित दाखवित निघून गेला व हे दोघेही आपले ठिकाणीं गेले. आणि राजकन्येस रात्रीं सांगितलें कीं, आपले रोगास एक उत्तम वैद्य पाहिला आहे व तो उदईक आपलेकडे येणार आहे. त्या वेळेस आपण येथें एकटें असलें पाहिजे. दुसरें कोणीही जवळ नको. ती ह्मणाली बरें आहे. पण माझा रोग गेला पाहिजे. मला तर वाटतें, माझा रोग ईश्वर भेटल्याशिवाय जाणार नाहीं. सर्व वैद्यांनीं हात टेकले. आतां मी लवकर मरणार! मला आतां कशाची आशा नाहीं, असें ह्मणून राजपुत्राचें स्वरूप मनांत आणून पुनः ती बेशुद्ध झाली व कांहीं वेळानें बडबडूं लागली कीं, सख्यांनो माझें मन ज्यानें चोरून नेलें तो माझा सुंदर पुतळा मला एकवार भेटवा, नाहींतर हा जीव पहा जाऊं पहातो. ही दुनिया त्यावांचून मला शून्य वाटते! हे तिचे शब्द ऐकून तिच्या मैत्रिणी आपापसांत ह्मणूं लागल्या, ऐका हे शब्द! पिडा कसली नी बाधा कसली! हें भूत प्रत्यक्ष तिच्या हृदयांत शिरलें आहे, तें भेटल्यावांचून ही कशी बरी होणार? मग त्या बोलूं ला-

गल्या, इंदिरे, हे पहा कोण आले. यांचा शिरपेच पागोट्यावर किती शोभतो आहे पाहिलास का ? या विशाळ भाळावर केशरी गंध तरी किती शोभतें? काय हे डोळे,स्नान केल्यामुळें ती काळीभोर शेंडी कशी पाठीवर मोकळी सुटली आहे ? ती पहा. असें ह्मणतांच ती किंचित् शुद्धीवर आली व ते कोठें आहेत ? असें ह्मणून लाजून उभी राहूं लागली. तों पुनः तेथें कोणी नाहींसें पाहून निराशेनें पुनः धाडदिशीं जमिनीवर पडली ! तिच्या सख्यांनीं तीस उचलून धरली व सावध हो, सावध हो असें ह्मणूं लागल्या. हें ऐकून ती ह्मणाली, आतां मी कसची सावध होतें ? तेव्हां तिची मामेबहीण ह्मणाली, गडे, हा रोग मी पक्का समजलें.पण काय उपाय केल्यानें तूं शुद्धीवर येशील व तुला बरें वाटेल तें करण्यास मला सांग ? मी तयार आहें. असें ह्मणतांच, ती तिच्या गळ्यास मिठी मारून म्हणाली, आतां माझ्या दुःखावर उगीच डागण्या देऊं नका. यावर तिची मामेबहीण म्हणाली, प्रत्यक्षास प्रमाण कशास पाहिजे ? आतां लग्न झाल्यावर आम्हाशीं बोलणार सुद्धां नाहींस. आतां मात्र आम्हाशीं गोड गोड बोलतेस, पण अशी शपथ वहा कीं, मी तुम्हाला कधीं अन्तर देणार नाहीं. ठेव माझ्या गळ्यावर हात. नंतर राजकन्येनें त्यांचे गळ्यावर हात ठेवून म्हटलें, मी तुम्हांस अन्तर देणार नाहीं. झालें कीं नाहीं आतां ? आण, भाक, क्रिया सर्व करून घ्या. जशी कांहीं जगानीं नीतीच सोडिली ! काय मेलं जगांत कांहीं खरेपणाच नाहीं असें तुम्हांला वाटतेंना ! इतक्यांत तिची मावसबहीण तेथें आली व ह्मणूं लागली, गेली का पिशाच्चबाधा ? कोणी पंचाक्षरी भेटला वाटतं ? यावर ती म्हणाली, पुरें आतां. मला जीवदान द्या. आतां मला केव्हां बरी करतां ? माझ्या प्रकृतीस मानवेल तेंच औषध द्या. इतक्यांत तिसरी आली, तेव्हां तिच्या त्या दोघी प्रिय दासी जवळच होत्या त्या तीस म्हणाल्या, उगीच फार बोलून बाईसाहेबास त्रास देऊं नका, आधींच प्रकृति धड नाहीं, त्यांत बोलण्यानें अधिक श्रम होतील, तेव्हां ती म्हणाली, तुमची प्रकृति मोठी नाजूक आहे, तेव्हां तुमची जपणूक ठीकच आहे ! बरें, आतां केव्हां उजाडेल आणि ते वैद्यबुवा केव्हां येतील कोण जाणे ! नुसते ते येणार आहेत येवढ्यावरच जर प्रकृतीला इतका आराम दिसूं लागला आहे, तर ते आल्यावर तर बोलायलाच नको. असो, ते दिवशीं रात्रीं सर्वत्रांचीं एकमेकींमध्यें अशा

प्रकारचीं विनोदाचीं पुष्कळ भाषणें झालीं. त्या रात्रीं तिनें मुळींच अन्न खाल्लें नाहीं व तिच्या डोळ्यांस झोंप आली नाहीं.

उजाडल्यावर जिकडे तिकडे पक्ष्यांचा किलकिलाट होऊं लागला, नानाप्रकारचे पक्षी वृक्षावर बसून मधुर मधुर शब्दांनीं गायन करूं लागले, चहूंकडे कोंवळे सूर्याचे किरण पसरून गेले, गार वारा येऊन शरीरास स्पर्श करूं लागला. त्या योगानें राजकन्येचे शरीरास हुषारी येऊन दासीजन आपआपले कामीं सर्व तत्पर होऊन जिकडे तिकडे सर्व आनंदीत दिसूं लागले. तशांत राजकन्येला तर ते दिवशींचा दिवस फारच रमणीय वाटूं लागला. ती आपले सख्यांस एक क्षणभरही सोडीना. तीस असें झालें कीं, वैद्यबोवा केव्हां येतील कोण जाणे, तिनें सर्व नित्य कृत्य आटोपून जशी मेघाची वाट मयूर पाहतो तशी चातकपक्ष्याप्रमाणें दृष्टि करून ती तदाकार झाली. बोलतां चालतां तो दिवस बराच गेला. चार वाजतांच त्या तिच्या दोघी बहिणी पुरुषाचे पोषाक करून बसल्या व दासीसही पुरुषाचा पोषाग घालून तिला त्या बागेंत उभी केली. आणि सांगितलें कीं, तूं येथेंच उभी रहा आणि येथें राजपुत्र व प्रधानपुत्र आले म्हणजे त्यांस सांग कीं येथें या बंगल्यांत एक रोगी आहे त्याची प्रकृति पाहण्याकरितां वैद्यबुवा वर गेले आहेत तर मर्जी असल्यास आपणही तेथें चलावें, व ते जर नच आले तर त्यांना आग्रह करूं नको, मलाच इकडे बोलावण्यास ये. नंतर ती दासी सांगितल्याप्रमाणें तेथें वाट पाहत उभी राहिली. इतक्यांत सायंकाळचे पांच वाजले, मग दासीनें चहूंकडे नजर फेंकली, तो उत्तरेकडून घोड्यांच्या टांपा ऐकूं आल्या, व लक्ष लावून पाहाते तों त्या दोघांचे पोषाग झळकले. एक शशांक व एक मृगांक असें तिला ते भासले.मग त्या दासीचे आनंदास पारावार नाहींसा झाला.ती त्यांचे पुढें गेली व तिनें त्या दोघांस मुजरा केला व हुजऱ्याच्या रूपानें त्यांशीं बोलूं लागली, महराज,आपली वाट बरीच पाहून,कंटाळून ग्येलों.हत एक रोगी हय् तकड वैद्य महाराज गेल हय्त. आपन वाइच या कोंचावर टेका, इतक्या मंदी तेबी येत्याल. नाहींतर जर आपनबी तकड याल तर आपल्यासंग मी बी येऊन रस्ता दाखवीन. यावर ते म्हणाले. आम्ही त्या रोग्याकडे गेलों असतां कांहीं हरकत तर नाहींना? असल्यास येथेंच सांग. हुजऱ्या म्हणाला, नाय नाय वैद्यबुवानी बी आपनासनी घेऊनशनी येण्यास सांगितल

हय्. त्या मंदी कांहीं योक हरकत नाइ आपन चला. असें म्हणतांच ते उभयतां त्या हुजऱ्याबरोबर त्या बंगल्यांत जेथें वैद्य व ज्योतिषी होते तेथें गेले. ते जातांच वैद्यबुवानें त्यांचें चांगलें आगतस्वागत करून त्यांना बसावयास सांगितलें आणि म्हणाले, मी आंतील रोगी पाहून लवकरच परत येतों. त्याची प्रकृति अतिशय बिघडली आहे. यावर हे म्हणाले आम्ही आंत आल्यास कांहीं हरकत आहे कीं काय? तेव्हां वैद्य म्हणाला, परवानगी घेऊन कळवितों. मग आंत एक दासी पाठवून परवानगी आणून ते चौघेजण आंत गेले, व पहातात तों ती राजकन्या डोळे झांकून पडली होती. कोणी सुंदर स्त्रिया वारा घालतात, कोणी डोळ्यांस व मस्तकास गुलाबपाणी लावतात. हें राजपुत्रानें पाहतांच तो मनांत म्हणाला, कीं हा नरम बिछान्यावर निजलेला नाजूक रोगी पाहून मला आजचा दिवस सुदिन भासतो. मीं असा रोगी कधींच पाहिला नाहीं. व आतां यास पाहिल्यानें माझें दुखणें जाईलसें वाटतें. बरें, पण ही सुंदरी कोण असावी? असें म्हणून तो तीस नीट न्याहाळून पाहूं लागला व मनांत म्हणतो, मीं पूर्वीं तळ्यावर पाहिली तीच तर ही स्त्री नसेलना? पण मीं पूर्वीं पाहिली होती, तेव्हां सतेजव टवटवीत दिसत होती, आणि आतां तर तें तेज बिलकूल नसून अति कृश झाली आहे. पुनः न्याहाळून पाहून म्हणाला खास हीच ती शुभांगी असावी. व माझेसारखी हिचीही दशा होऊन ती कृश झाली असेल. असा त्यानें विचार करून वैद्यास म्हणतो, वैद्यबुवा! ही स्त्री डोळे कां बरें उघडीत नाहीं? व इतकें वैद्यबुवास बोलून पुनः आपले मनांत म्हणाला, इतकी उतावळी करून उपयोग नाहीं. कदाचित् परमेश्वरी योग घडून आला तर हीच शुभानना मला पुढें दोष देईल तर आतां काय मजा होते ती मुकाट्यानें पहावी, असा विचार करून स्तब्ध बसला. परंतु राजकन्येनें हे त्याचे तोंडचे शब्द ऐकतांच ती वैद्यबुवास म्हणाली, वैद्यबुवा; मला औषध आणलें काय? व कमलासारखे डोळे उघडून चहूंकडे पाहूं लागली. राजपुत्राचे मुखचंद्राकडे दृष्टि जातांच तिचें अन्तःकरण कमलवत् प्रफुल्लित होऊन किंचित् लज्जायमान होत्साती त्या बिछान्यावर उठून बसली. हें सर्व प्रधानपुत्रानें पाहून तो आपले मनांत सर्व समजला. पुनः राजकन्या वैद्यबुवास म्हणाली, मला बरी केव्हां करतां? माझी शक्ति क्षीण होत चालली. प्रकृति बिघडल्यापासून आज किंचित् मनास समाधान वाटण्याचें चिन्ह

भासतें. ईश्वर करो आणि आपले हातास यश येवो. नंतर वैद्यानें सांगितलें कीं, मजबरोबर एक रोगी आला आहे त्यासही कांहीं पिशाच्चबाधा झाली असावीसें वाटतें. पण माझा मित्र त्या विद्येंत फार प्रवीण आहे. तर आपली परवानगी असेल तर मी दोघांसही एकच औषध तयार करतों. म्हणजे प्रथम आपल्यास शरीररोगावर औषध देतों व पुनः त्याच औषधांत या माझ्या मित्राकडून साखर मंत्रून घालून तें या रोग्यास देतों. असें म्हणतांच राजकन्येनें तसें करण्यास परवानगी दिली. परवानगी मिळतांच वैद्यानें औषध तयार केलें म्हणजे तें फक्त लिंबाचें सरबत होतें ! व पंचाक्षरी यानेंही साखर हातांत घेऊन तोंडानें कांहीं बुटबूट करून त्या लिंबाचे सरबतांत ती घातली. नंतर वैद्यानें दासीस सांगितलें कीं, आतां हें सरबत वाळ्याचें वासाचें पाणी घालून सिद्ध करा आणि या उभयतांस एक एक पेलाभर द्या. त्यापासून तत्काळ गुण येणार आहे. हें ऐकतांच दासीनें त्याप्रमाणें केलें आणि अर्धातास जातो आहे इतक्यांत राजकन्या आपले सख्यांना हाका मारूं लागली. व एक आवडती दासी जवळ होती तीस म्हणाली, माझी रत्नमाला कोठें आहे ? तिनें उत्तर दिलें कीं, ती त्या तळ्यावरच राहिली. नंतर राजकन्या मनांत विचार करूं लागली कीं, हे कोण असावेत ! व इतके सदय अन्तःकरणानें दृष्टि चुकवून वारंवार मजकडे कां बरें पाहतात ! असा विचार करून तिनें दासीचे कानांत कांहीं सांगितलें, तें ऐकून दासीनें मोठ्यानें उत्तर दिलें कीं, महाराज आपण स्वस्थ असा, तलास करून आपल्यास लवकरच कळवितें. हे दासीचे शब्द ऐकून प्रधानपुत्र व राजपुत्र किंचित् घाबरले आणि वैद्यास म्हणाले, आमचेमुळें ही राजकन्या आपणावर खप्पा होणार नाहींना ? तसें असेल तर आम्ही आपले जातों. आम्ही आल्यामुळें तुमच्यासारख्या गरीबाच्या अन्नावर मात्र पाणी पडूं नये. हे शब्द वैद्यानें ऐकून तो हात जोडून म्हणाला, महाराज, आपण माझे अन्नदाते आहां. आपण असाल तरच माझा फायदा होईल. इतकेच नव्हे पण कदाचित् जन्माचेही अन्न मिळेल असा संभव आहे आणि असे कां घाबरता. स्वस्त असावे, आपण जाऊं नये, यांतच माझें सर्व हित आहे. दासीनें ही सर्व गडबड पाहून विचारलें, वैद्यबुवा हे आपले बरोबर आलेले गृहस्थ कोण आहेत ? व यांचें शहर कोण ? हें जर मला आपण सांगाल तर मजवर मोठे उपकार होतील.

अथवा मलाच तस्दी घेण्यास सांगाल तर मी विचारीन. वैद्यानें तीस परवानगी दिली. नंतर ती दासी इकडे तिकडे कोणी नाहीं अशी वेळ पाहून सज्यावर एकटाच राजपुत्र गाठून ती राजपुत्रास विचारते, महाराज, मी विचारतें याची सर्व क्षमा कराल तर ही बंदी चरणापाशीं कांहीं प्रश्न करणार आहे. त्याचें यथातथ्य उत्तर या दासीस मिळेल काय? राजपुत्र म्हणाला, होय. उत्तर देण्यास काय हरकत आहे! विचार लवकर. नंतर दासी आपले प्रश्नांचीं उत्तरें देण्याची उत्सुकता त्याचे चेहऱ्यावर पाहून फारच आनंदीत झाली. राजकन्येचें तर सर्व लक्ष या चोरून उभयतांचे भाषणाकडे लागून राहिलें. मग दासी म्हणाली, महाराज, आपली गांठ कोणास घेणें झालें तर कशी घेतात? त्यांत आमच्यासारख्या आडमुठ व सदा सेवेंत रात्रंदिवस काढणाऱ्या दास्यजनांनीं भेटीस सादर केव्हां व्हावें? आणि अन्तःकरणांतील दोन शब्द उघड करून केव्हां दाखवावे? ह्या अज्ञानदशेंत राहिल्यामुळें व आमचे बुद्धीस जडत्व आल्यामुळें प्रश्न करण्यास धीर होत नाहीं. तर वचन द्यावें. म्हणजे मग मी आपल्यास काय विचारणें तें विचारीन. राजपुत्रानें सांगितलें, तुमचें भाषण मला फार सुखावह व प्रिय आहे. जें काय विचारायचें असेल तें विचारा. शंकेचें कांहींएक कारण नाहीं. व मनांत म्हणाला, इचा प्रश्न या सुंदरीचे संबंधानेंच असावा म्हणजे मजसारखा भाग्यवान् मीच. ईश्वर करो आणि तसेंच होवो. मग पुनः दासीस म्हणाला, तुम्हास जें कांहीं विचारावयाचें असेल तें लौकर विचारा. मला जाण्याची त्वरा आहे. हे शब्द ऐकतांच राजकन्या आपले मनांत म्हणाली, हायरे प्रारब्धा! काय तें मला आजच थोडें बरें वाटूं लागलें तों जाण्याची त्वरा करून वियोगसागरांत हे मला ढकलणार! असा इरादा दिसतो. मीं आणखी किती दिवस असेंच काढावें! नरजाती मनाची मोठी कठोर. त्यास दयेचा पाझर म्हणून कधींच सुटणार नाहीं. मूर्तिमंत पाषाण खरे. असो, ईश्वरासच दया येईल तो सुदिन! दैवावर हवाला ठेवून दासी काय म्हणते तें ऐकावें. असा विचार करून पुनः दासीचे बोलण्याकडे लक्ष लावून बसली. दासी म्हणाली, महाराज, आपले प्रकृतीस काय होत असतें? राजपुत्र म्हणाला, मीं एके दिवशीं महापर्वणी शिवरात्र होती म्हणून येथें जवळच एक शिवालय आहे असें पाहून तेथील महातीर्थ तळ्यांत स्नान करून महादेवाचें दर्शन घेतलें. आणि त्या तळ्याचे किनाऱ्यावरच आंब्याची दाट झाडी होती तिच्या निबिड छायेंत

उभा राहून यात्रेकरूंची मजा पाहण्यासाठीं चहूंकडे दृष्टि फेंकीत होतो. इतक्यांत कोणी जलदेवता, नागकन्या किंवा इंद्राची इंद्राणी म्हणा, अथवा आप्सरा, तिलोत्तमा अशी कोणी राजकन्या आपल्या सख्यांसमवेत जसा कांहीं चांदण्यांमध्यें चंद्रच चमकून राहिला आहे, अशी दिसली. व तिचा तो अमोल्य पोषाग, अवर्णनीय सौंदर्य अशी नवयौवना रामा मी पाहतांच मोहित झालों. माझा हा प्राणप्रिय मित्र प्रधानपुत्र यानें हा कालपर्यंत पुष्कळ पैसा खर्चून अति खटपट केली,पण कांहीं उपाय चालेना.शेवटीं भ्रमित झालों. पुढें माझे मित्रानें मला सांगितलें कीं,त्या तळ्यावर आपल्यास हा झटका झाला असावा. नंतर मी व तो त्या तळ्यावर पंधरा दिवस खेटे घालीत होतों तों काल हे पंचाक्षरी व वैद्यबोवा आह्मांस भेटले. व काल आह्मांस हा सारा बाग दाखवून त्यांनींच आज येथें येण्यास सांगितलें. पंचाक्षरी बोवानें ही कांहीं आपल्या सारखीच राजकन्येस बाधा झाली आहे,असें मला सांगितलें ह्मणूनच मी प्रथम या बागेंत आलों. क्षणोक्षणीं ती चारुगात्री शुभानना माझे नेत्रांसमोर येते एक क्षणभरही दूर होत नाहीं.काय तिचें तें मोहक सौंदर्य! अशी स्त्री मीं कधींच पाहिली नाहीं व पुढेंही पाहण्याची आशा नाहीं. अशी माझी हकीकत आहे. मी कर्नाटकांतील राहणारा असून माझें नांव मदनसेन. आतां ती सुकुमारी मला जर न प्राप्त होईल, तर तिचे विरहाग्नींत या देहाची आहुति देऊन हा प्राण विसर्जन करीन. जर या जगांत राहण्याचें या हतभाग्याचे दैवीं असेल तर ती प्राप्त होईल. नाहींतर तिजवांचून हे पंचप्राण मला सोडून जातील, यांत शंका नाहीं. या हतभाग्याची दया ईश्वरास येईल व त्या स्त्रीचें रात्रंदिवस सांनिध्य घडेल तर तो दिवस मी सुदीन उगवला असें समजेन. सध्यां तर मला एक क्षण एक युगवत् भासतो आहे. बरें, दासी तूं फार चतुर दिसतेस. तर तूं कांहीं जाणत असलीस तर मला सांग मी तुला चांगलें बक्षीस देईन. दासीनें उत्तर दिलें; महाराज, आह्माला आपल्या सारख्यांनीं चतुर हें विशेषण देणें अगदीं शोभत नाहीं. उगीच आमच्या बाईसाहेब आह्मास वागवून घेतात ह्मणूनच आह्मी तेथें निभलों आहोंत, नाहींतर ते शुद्धां कठिणच. राजपुत्र ह्मणाला तुमचे धन्याचें नांव काय? राहणें कोठें! हल्लीं येथें येण्याचें कारण काय! ती म्हणाली, आपण जसें प्रकृतिसंबंधानें सांगितलें, तशीच पिशाच्चभावना त्यांसही झाली आहे. त्यांचे नांव कांहीं दिवसानें

सारे कळेल. मला वाटतें, सुंदर पुरुष व सुंदर स्त्रिया यांनीं कधींच जनसमूहांत जाऊं नये. पण अशी बाधा जडणें हेंही एक प्रकारें हितावह आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. राजपुत्र म्हणाला, पिशाच्चबाधा हितावह कशी असेल ? ती तर सर्वथैव दुष्ट, घातकी असायची, सर्व शरीरास पीडा, कोठें मन लागायचें नाहीं, खाणें, पिणें, निद्रा याचा ती सर्व आहार करीत असते. ज्यास ही होते, त्या प्राण्यास सुख या शब्दाचें नांव देखील घेऊं देत नाहीं व सर्वथैव हाल करून शरीराचा चुराडा करून टाकिते ! तेव्हां यांत हित तें कोणतें ! दासी म्हणाली,—आणखी दुसरी एक बाधा लोक म्हणतात व तिचाही प्रकार असाच सांगतात. व तो मीं माझी धनीन पुस्तकांत वाचित असतांना ऐकला आहे. आपल्यास बाधा झाली म्हणून ज्या पंचाक्षऱ्यानें सांगितलें त्याच पंचाक्षऱ्यानें आमचे बाई साहेबासही तसेंच सांगितलें आहे. उगीच कांहीं बाई सांगतो, पण तें लोकांस सर्व खरें वाटून त्याचेच नादीं लोक लागले आहेत. बरं, आतां आपण हें सिद्ध केलेलें सरबत तर घ्या. जर ह्यानें आपल्याला किंचित् आराम वाटला तर बरें, नाहींतर त्याची कशी ती बिंबेरीच उडवून टाकीन. असले लोक हरामी, भोंदू असतात. हें ऐकून राजपुत्र म्हणाला हां ! हां ! थोडी थंड हो. इतकी रागाऊं नको. ते गरीब लोक पोटांकरितां धंदा करतात. त्यांचे अन्नावर पाणी आणूं नको. इतक्यांत वैद्यबुवा म्हणाले, महाराज, दासीजनाबरोबर आपल्या सारख्यानें अधिक व्यवहार ठेवणें बरें नाहीं. मघापासून ही आपल्यास काय काय सांगते आहे! राजपुत्र म्हणाला; आपलेविरुद्ध कांहीं नाहीं. वैद्य म्हणाला,मी विचारलें याची क्षमा करा.मीं मूढानें आपणास विचारूं नये तें विचारलें याबद्दल माफी मागतों. आपण हें तयार केलेलें सरबत घ्यावें. यापासून काय गुण आहे, तो थोडक्यांतच समजेल. नंतर राजपुत्रानें तें सरबत घेतलें व परस्परांची दृष्टादृष्ट चाललीच होती, इतक्यांत राजकन्या वैद्याकडे पाहून राजपुत्रास लक्षून म्हणाली, आजपर्यंत दररोज बदलून बदलून औषधें चाललीं पण कांहीं गुण न येतां या सरबतापासून आज कोठें थोडें गुणाचें तोंड दृष्टीस पडलें तों इतक्यांत जाण्याची त्वरा चालली ! मनुष्यास जर बरें करावें अशी इच्छा असेल तर चार दिवस येथेंच राहून मला चांगलें बरें करावें. नाहींतर एकदम जीव जाईलसा उपाय सांगा. वारंवार या यातना नको आहेत. हें राजपुत्रानें ऐकून वैद्यास म्हणतो, वै-

द्यबुवा; रोग्यास जर ही व्यथा सहन होत नसली तर त्यास उपाय थोडा आहे. पण माझ्या यातना अझून पुऱ्या नाहीं का झाल्या ! कोण जखीण माझे अंगांत बसली आहे कोण जाणे ! खरोखर या यातना सहन करणें फार कठिण ! पण या सरबतापासून थोडेंसें मन शांत झालें खरें. मग हा या औषधाचा गुण किंवा या जागेचा गुण कांहीं कळत नाहीं. इतक्यांत पंचाक्षरी म्हणाला, महाराज हा माझ्या अंगाऱ्यचा गुण आहे. व तुम्हास आतां असें सांगतों कीं, ती जखीण व हा खवीस हें एक युग्म आहे. ह्यांस येत्या शनिवारीं रात्रीं दोघांस बांधून आकाशमार्गें उडवून देतों, तरच मी पंचाक्षरी खरा. या दोघांनीं मला फारच त्रास दिला. मग वैद्य राजपुत्रास व राजकन्येस म्हणाला,—आपले उभयतांचे चर्येवरून आपण आज स्थितीवर आला असें वाटतें. याहून उद्यां जास्त याल व असाच दिवसें-दिवस गुण येत जाईल. आतां आपणास काळजी करण्याचें बिलकुल कारण उरलें नाहीं. पुनः राजपुत्रास म्हणाला, महाराज, आपले पाय आज येथें लागले या योगानें मला खचितच यश आलें असें वाटतें. असो, कर्म माझें व दैव तुमचें. राजकन्येस म्हणाला, येतों आम्ही आतां येत्या शनिवारीं म्हणजे आज गुरुवार आहे, उद्यां फक्त शुक्रवार मध्यें आहे, पर्वा सायंकाळीं आपली परवानगी असेल तर मी या महाराजास येथेंच घेऊन येईन. खप्पा व्हाल तर माझा जुलूम नाहीं. पण येथें आल्यानें एका मंत्रांत दोन्ही कामें उरकतील म्हणून म्हटलें. पण आपली मर्जी नसेल तर मग राहिलें, मला एक हेलपाटा जास्त पडेल पण कांहीं चिंता नाहीं. आतां यावर ती काय उत्तर देते या विवचनेंत राजपुत्र होता, तों तितक्यांत ती म्हणते, हेरे दैवा ! ! किती तरी हें छळणें, किती हा अंत पाहणें, अद्यापि नाहीं का तृप्ति झाली ! आणखी तिनें असें सांगितलें, शनवारीं सकाळींच ह्यांना घेऊन या म्हणजे उन्हाचा हेलपाटा नको. येथें सर्व मर्जीनुरूप व्यवस्था ठेवतां येईल. हें उत्तर ऐकतांच वैद्यबुवा म्हणतात, आवडतें तेंच कपाळीं आलें महाराज, आतां चला. राजपुत्राचे मनास या सुंदरीचे सानिध्यापासून दूर होणें फार वाईट वाटलें व तो आपले मनांत म्हणाला हर ! हर ! फिरून हा मुखचंद्र माझ्या केव्हां नजरेस पडेल ! असें म्हणून त्यानें श्वासोच्छ्वास टाकिले. हें राजकन्येनें पाहतांच ती म्हणाली, वैद्यबुवा आपण कांहीं काळजी करूं नये. वैद्य म्हणाला, महाराज

धीरसो गंभीर, उतावीळ सो बावरा. थंडपणानें काम केलें असतां स्थिरतेनें शेवटास जातें व त्याचा परिणामही फार गोड होतो. असो, घेऊं तर रजा? हा सर्व प्रकार प्रधानपुत्रानें पाहून तो मनांत समजला कीं, या राजकन्येनें तर एखाद्या जादुगारासारखीच मजा केली. ही फार चतुर व इच्या सख्याही चांगल्या साहकारी आहेत. आपण आतां एक छूट लढवावी व काय मजा होते ती पहावी, असा विचार करून राजपुत्रास म्हणाला, मित्रा या बंगल्यांत कांहीं तरी चमत्कार दिसतो म्हणजे बायकाचे पुरुष बनलेले दिसतात, तेव्हां येथें कोणी पिशाच्च तर नाहींना! मी तर आतां येथें फिरून कधीं येणार नाहीं. कदाचित् आम्ही बायका झालों तर? दासी हात जोडून म्हणते, महाराज आपल्यास जरूर असेल तर आपण या. मला वाटतें आपली तबीयतही यापुढें बरी होण्याचे पंथास लागली, तेव्हां आतां आपणास आमची जरूर मुळींच लागणार नाहीं. व हे वैद्यराजही एकनिष्ठ दिसतात तेव्हां ते आतां आपल्याला चांगलें बरें केल्याशिवाय कधींही सोडणार नाहींत. कारण ते स्वतः शरीरभोगावर औषध देणार समर्थ असून शिवाय त्यांच्याजवळ एक पंचाक्षरी आहे तेव्हां कदाचित् भूतबाधा असली तरी तीही बरी होणार आहे. व आपणही या वैद्यास आपली प्रकृति बरी झाल्याखेरीज कधींच सोडणार नाहीं असें दिसतें. तेव्हां मी येथें उगीच खिरींत सराटा कशास पाहिजे? माझें कांहीं काम नाहीं. आतां मला एक प्रश्न विचारावयाचा आहे, पण तो जर या राजकन्येची परवानगी होईल तर विचारीन? हें ऐकून राजकन्येनें त्यास परवानगी दिली. नंतर प्रधानपुत्रानें विचारलें, महाराज, आपली प्रकृति इतकी कृश होण्याचें कारण काय? आपल्यासारख्यास आज कोणत्याच प्रकारची न्यूनता नसून एकांतस्थळीं वास कां केला? आप्तवर्गास सोडून येथें एकटें राहणें हें तरुण मुलीस योग्य नाहीं. कितीही झालें तरी वयाचा धर्म कोठें राहिला आहे काय? इतकें म्हणून तो पुनः विनंति करूं लागला कीं, आपण जर एक दहा मिनिटें माझ्याशीं एकटेच बोलण्याचा योग आणाल तर मला आणखी कांहीं गुप्त विचारावयाचें आहे. राजकन्येनें त्याची विनंति कबूल केली. व सर्वांस एकीकडे जाण्यास सांगितलें आणि प्रधानपुत्रास सांगितलें कीं, तुम्हाला काय बोलायचें असेल तें बोलावें. नंतर तो म्हणाला, ईश्वरास स्मरून खरेंच सांगा कीं, ते दिवशीं आपण त्या तळ्यावर आलां

होतांना ! आणि माझे मित्राची प्राणापेक्षां अधिक प्रिय वस्तु जी आपण चोरून आणली, ती माझ्या जवळ परत द्या म्हणजे मी प्रसंगवशात् त्याची त्यास परत देईन. आपण शिवरात्रीस पुण्य करण्यासाठीं तेथें आलां होतां व त्याप्रमाणें स्नान, पूजा वगैरे तुम्हीं केली पण त्या बिचाऱ्याला उगीच तळमळ लावली, हें योग्य नाहीं. यांत तुमचें सर्व पुण्य जातें. हें त्याचें बोलणें ऐकून राजकन्या मनांत समजली कीं, हा पूर्ण चतुर आहे, पण विचार केला कीं, आतां याला फार चतुराईनें उत्तर दिलें पाहिजे. मग त्यास उघड म्हणाली, आपणास मीं येथपर्यंत येऊं दिलें त्याचें हें फल वाटतें ! आपण असें बोललांत आतां याहून आपले राजेसाहेब खूनच केला असें म्हणतील. हे आपले असले धंदे मला माहित नव्हते. आतां आल्या मार्गानें चालते व्हा कसें. मी शिवरात्रीस आपले घरीं आलें केव्हां? व आपले राजाची प्राणापेक्षां प्रिय वस्तु चोरली केव्हां ! आम्हीं असले धंदे कधींच केले नाहींत. प्रधानपुत्र म्हणाला,–कधीं केले नाहींत तों आरंभींच हा प्रकार, मग कांहीं अनुभव असता तर जीवच घेतला असतां म्हणायचा ! बरें आपल्याबरोबर ज्या चौघी सुंदर मैत्रिणी होत्या त्यांपैकीं येथें दोनच दिसतात, तेव्हां आणखी दोघी कोठें आहेत? ती म्हणाली, आपण कांहीं स्वप्न तर पाहिलें नाहीं ना ! नाहीं नाहीं तें काय हें बोलतां ! कोणी ऐकेल तर काय म्हणेल ? यावर प्रधानपुत्र म्हणाला, बरें मला भ्रम झाला असें कां म्हणाना ? मी तर राजेसाहेबास घेऊन जातोंच मात्र आपण रागावूं नका. पण आमची वस्तू द्या, नाहींतर तुम्ही ज्या पेटींत ती ठेवली आहे त्या पेटीसह आम्ही आपली वस्तु घेऊन जाऊं. ती वस्तू कोठें अल्प ठिकाणीं राहणारी नव्हें. आपले मनाचीच साक्ष आपण घ्या. दुसरा न्यायाधीश नको. जाऊं तर आतां ! हे शब्द ऐकून राजकन्या मनांत तर घाबरलीच, पण बाह्यात्कारीं धीर धरून त्यास ह्मणाली,–आपण हे शब्द लोकांदेखत बोलला नाहीं, ही मेहेरबानीच केली ह्मणायची ! आतां आपणास आणखी कांहीं बोलायचें राहिलें असेल तर बोला. परंतु पुढें परिजनाचे देखत कमज्यास्ती मात्र मला बोलूं नका. प्रधानपुत्रानें तिचे पायांवर डोकें ठेविलें आणि ह्मणाला, मी बोललों तें आपण खास समजलांत. असा उडविल्यानें मी उडून जाणारा मनुष्य नव्हें. मी आपलाच बंधू आहे. विनाकारण कां छळ मांडला आहे ! कोठला तो वैद्यबुवा ! ते आपले जातीचेच भासतात.

येवढा अटाहास कशास पाहिजे होता ? तर आतां हें गारूड पुरें करा आणि माझे मित्रास जीवदान द्या. उगीच उभतांच्या शरीराचे हाल कां करतां ? कोठली जखीण आणखी कोठला समंध ? संबंध झाल्याशिवाय समंध जाणार नाहीं. तरी आतां ओढाताण करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. गंगेंत घोडे विरूंद्या. रात्रंदिवस राजेसाहेबांची हाय हाय आह्मास सहन होत नाहीं, काय हा उपव्याप आणि कोण हा ताप ! राजकन्या ह्मणाली मी या तुमच्या बोलण्यांतील कांहींएक जाणत नाहीं. माझे जिवास चैन नसल्यामुळें माझ्या सख्या आणि कांहीं नोकर यांसह या बागेंतील बंगल्यांत स्वच्छ हवा घेत राहिलें आहे. व जिवास बरें नाहीं म्हणून या वैद्याचें औषध सुरू केलें आहे.त्यापासून आज थोडी डावी सोडून उजवी कांहीं भासते. आतां यापुढें काय होईल तें पहावें.प्रधानपुत्र म्हणांला आपल्यास आतां गुणच येईल माझेंही अंगांत येतें, आपल्यास चमत्कार दाखवूं काय ! तिनें हात जोडून म्हटलें, आतां आपलें हें सर्व कृत्य पुरें करा. व वैद्यबुवा व पंचाक्षरी यांनीं सांगितल्याप्रमाणें परवां लवकर या. ती आपले मनांत म्हणते कीं हा काय चमत्कार प्रधानपुत्र आपला बराच आहे, नाना तऱ्हेनें तो मला जिंकूं पाहतो, पण अशानें मी कोठली त्यास सांपडणार ! साप म्हणून भुईवर ओपटून पाहूं नये, असो हें पण त्याचे त्यासच शोभतें. दुसरा एखादा साधारण मनुष्य असता तर आज त्यास मीं खचितच दाखविलें असतें पण आतां जाऊंद्या, कां कीं प्रसंग फार यापुढें यांच्याशीच येणार आहे असें मनांत म्हणून ती त्यास म्हणते. चला आतां मी आपले मनुष्यांस बोलावितें. असें म्हणून तिनें लागलींच दासीस हाका मारली व सर्व लोकांस आंत बोलावून आणलें. व पुनः सरबत घेऊन चांगला गुण आल्याचें दाखविलें. नंतर सर्वजण हुकूम घेऊन आपआपले ठिकाणीं गेले. नंतर ठरल्याप्रमाणें शुक्रवारीं त्या चौघींनीं मिळून बेत केला कीं, उदयीक स्वारी येणार तेव्हां पुढें कसा काय बेत ठरवायचा तो घाट आतांच बनवून ठेवला पाहिजे. झालें तें सर्व ठीक झालें. राजापेक्षां प्रधान खरा चतुर आहे. परंतु तो माझ्या सहोदर बंधू पेक्षांही मला प्रिय आहे. काय काय तऱ्हेनें तो मला कबूल करून घेत होता, परंतु मीं म्हणून त्या एक शब्दाचा सुद्धां थांग लागून दिला नाहीं. धन्य बाई तो पुरुष ! मला नाना तऱ्हेनें छेडलें पण मीं म्हणून त्याची नाकास तूर लागूं दिली नाहीं; पण आपलें सर्व चरित्र

तो जाणतो. आतां बेत येवढाच करायचा कीं, उद्यां ते आले म्हणजे सर्व पहिल्या प्रतीची व्यवस्था ठेवा. सायंकाळपर्यंत मी म्हणून त्यांचे दृष्टीस पडणार नाहीं. हें ऐकून सर्व सख्या मोठमोठ्यानें हसूं लागल्या आणि म्हणाल्या, कसा बाई जीव होत असेल परमेश्वरास ठाऊक ! खचीत कां उद्यां संध्याकाळपर्यंत दृष्टि पडणार नाहींस ! ती म्हणाली,–सख्यांनो काय तुमची शहामत. त्या गृहस्थास येथपर्यंत नाचत आणला धन्य बाबा. कितीही पुरुष चतुर व शहाणा असो, व कितीही धूर्त असो, परंतु बायकांपुढें त्यांचें कांहींही चालत नाहीं. बायको मात्र शहाणी असावी. पुरुषाची काय बिशाद ! हवा तसा त्याला वांकवील. पुरुषही समंजस असला पाहिजे, म्हणजे उभयतां स्त्रीपुरुषांस सुख होतें, नाहींतर छत्तीसाच्या आंकड्याप्रमाणें यांचें तोंड पूर्वेस तर तिचें पश्चिमेस जर असलें तर मग त्या दंपत्यांत कोठून सुख असणार; यापेक्षां जन्मासच न आलेलें बरें. असो, उद्यां शंकरमूर्ति प्रसन्न होणारना ? हें शब्द ऐकून सर्वजणी राजकन्येस म्हणाल्या, आतां आमची ओळखही रहाणार नाहीं. ‘ गरज सरोनी वैद्य मरो,’ असें होणार.असो, पण तुमचे तरी चांगलें असो, बरें पण हा राजकुमार तरी अन्तःकरणपूर्वक आवडतो का ! आतांच पोक्तपणें विचार करा. कारण ही जन्माची गांठ आहे. पुढें दिवस सुखांत गेले पाहिजेत. वडिलांचें मत घ्या. नाहींतर हुराळली मेंढी नी लागली लांडग्याचे मागें असें होईल. पुरुषांची आणि सर्पाची एक जात आहे. ते स्त्रियांस पाहून मोहितही लवकर होतात आणि किंचित् न्यून पडल्यास लाथाही लवकरच झाडतात. तेव्हां पुरुषांचा भरंवसा शहाण्या स्त्रियांनीं कधींही धरूं नये व त्यांच्यावर विश्वासही ठेवूं नये. यावर हजारो गोष्टी मोठमोठाल्या विद्वानांनीं व ज्ञात्यांनीं लिहिल्या आहेत.असो, थोड्यांत गोडी व फारांत लबाडी.

॥ पद ॥

॥ नकोग बाई परपुरुषीं सहवास ॥ध्रु०॥ लावुनि नादीं व्यर्थ फसविती, जन्माचा करि नाश ॥ १ ॥ प्रथमारंभीं सुख बहु दाविती,-शेवट करिती उदास ॥ २ ॥ भोळ्या स्त्रियांसी कुणी फसवावें,–आब्रूचा करि नाश ॥ ३ ॥

बायकांस मुख्य दैवत तिचा नवरा. त्यावर तिचें सर्व सुख अवलंबून असतें. बायका त्यांचें स्वरूप,पाहून भुलतात पण वडील असतात ते अगोदरच अगोदर घराणें, कुल, शील, स्वभाव, विद्या, चाल रीत पाहून मग कन्या देण्यास

वाचादत्त होतात.बाह्यात् नुस्तें सौंदर्यास भूलत नाहींत! वरचे गुण असले व मग घरांत सासुसासरे कितीही कजाग असले तरी मुख्य मालकाकडे सर्वांचें लक्ष असतें. हें सर्व ऐकून राजकन्या म्हणाली, मी जें करतें तें मला तर कांहीं गैर वाटत नाहीं. मी निरंतरचें सुख असण्याची इच्छा करतें व यांत मीं कांहीं आईबापांचा अपमान केला असें निदान माझ्या मनास वाटत नाहीं. बरें आतां मी आपल्या बहिणीस विचारतें.हे आनन्दवल्लरी मी जें करतें यांत माझी कांहीं चूक आहे काय? नंतर त्या सर्वजणींनीं सांगितलें, नाहीं. उलट ही गोष्ट वडिलांस आनंदप्रद होईल. चक्षुर्वैसत्यं ते जेव्हां आपला जामात पाहतील तेव्हां आनंदसमुद्रांतच पोंहतील यांत कांहींएक संशय नाहीं. आतां येण्याची वेळ सांगितल्याप्रमाणें ते आले मात्र पाहिजेत. इतक्यांत वडिलांकडून पत्र घेऊन एक स्वार आला. तें पत्र वाचून पाहिलें तों त्यांत एक क्षणाचीही अवधि न करतां इकडे निघून यावें, कोणतेच प्रकारची हरकत चालणार नाहीं असें होतें. मग काय विचारावयाचें आहे ? ती चिठ्ठी वाचतांच वायूचे वेगानें जसा कर्दळीस्तंभ एकदम भूमीवर पडतो, तद्वत् तिनें आपलें अंग जमिनीवर टाकलें. आणि ती जी बेशुद्ध झाली तें सांगतां पुरवत नाहीं. तिच्या सख्याही फार घांबरल्या आणि म्हणूं लागल्या अगबाई ! एका एकीं हें काय झालें ?! इतके दिवसांत नुकत्याच कोठें कालपासून दोन मजेच्या गोष्टी बोलूं लागल्या होत्या, तों इतक्यांत दूधसाखरेंत हा मिठाचा खडा कोठून आला ! अरे ईश्वरा ! आम्ही सर्व संकटांत असतां, आम्हांस सोडवून आणलेंस, आमचे दीनाचे करुणेस कान दिलास आणि आम्हांस मान देऊन आपलें नांव प्रख्यात केलेंस. आमची सखी आम्हांपाशीं हितगुज बोलत असतां गार जळामध्यें जशी माती विरते तशी जेथल्या तेथें पित्याचें पत्र पाहतांच विरली. आतां तिचा प्रिय तिला उद्यां भेटण्यास येणार व तो आल्यावर तिची अवस्था ऐकून आपले देहाचें काय करून घेईल तें कांहीं कळत नाहीं ! इचे आईबाप इला स्वेच्छाचारी म्हणतील आणि मग याचा परिणाम काय होईल ? घडलेला घाट तर बिघडलाच, विधात्याची कृति मोठी विचित्र आहे ! पहा ! एकच दिवसाचें अन्तर पडलें. तो राजपुत्र बिचारा आपले मनांत मांडे खात असेल. पण हें पहा त्याला पुढें दुःखास्पद ताट वाढून ठेवलें आहे. शिव ! शिव ! याजगांत सर्वसुखी कोणीही नाहीं. त्यांनीं तिला सावध करण्यास बराच प्र-

यत्न केला तरी ती शुद्धीवर येईना. मग तशीच मेण्यांत घालून दोघी चौघी मैत्रिणी व सर्व सख्या व नोकर बरोबर घेऊन आस्ते आस्ते मेणा चालवीत शहरांत तिचे पित्याजवळ नेलें आणि तिच्या जाग्यांत नेऊन पलंगावर तिला निजविली. ती अशा स्थितींत आली हें आईबापांस कळतांच ते तिकडे धांवत आले. आणि कन्येस पाहतांच दैवावर हात ठेवून ह्मणूं लागले हा नष्टा प्रारब्धा ! काय हा घात केलास. लग्नसमारंभाचे दिवस आले ह्मणून ही सुंदरी जवळ असावी; कारण, देशोदेशींचे राजे प्रधान वगैरे मुलगी पहाण्यास येतात व ती जवळ नसली ह्मणजे परत जातात, तर असें न व्हावें ह्मणून हिला बागेंतून जवळ बोलाविलें तों हें असें झालें ! आतां काय करावें ? ही तर डोळे उघडून पहात देखील नाहीं ! एकाएकीं असें होण्यास काय झालें असावें ? असें ह्मणून तिच्या तोंडावरून हात कुरवाळून नेत्रांवाटें अश्रुपात ढाळीत तिच्या पिता ह्मणाला, माझे लाडके; तुला असें कशानें झालें, तिच्या सख्या जवळच होत्या, त्या ह्मणाऱ्या, येथून गेल्यावर प्रकृति बरी होती पण आपलें पत्र पाहून अशी अवस्था झाली. मग यांतलें कारण आह्मांस काय माहीत ? आपलें पत्राप्रमाणें इकडे तूर्त येण्याचा मानस नव्हता, पण आपले पत्रांत याच असें सक्तीनें लिहिलें असल्यामुळें अशी अवस्था झाली असावी. नंतर त्यांतच तिच्या सख्यांपैकीं एक लहान मुलगी होती, ती ह्मणाली काकी साहेब ! यांनीं आपल्याला एक नवरा पाहिला होता व तो उद्यां येऊन लग्नाचें ठरलें होतें. आतां आपल्यांस व काकासाहेबांस पत्र पाठवून कळवून लवकरच आमचे लग्नापूर्वी हा घाट उडवावयाचा होता. इतक्यांत मधेंच तुमच्या पत्रानें येऊन घात केला ! यांतील कारण काय तें तुह्मीच शोधून काढा. नंतर पुष्कळ वैद्य, पंचाक्षरी व ज्योतिषी वगैरे बोलावून आणले. परंतु पुष्कळ पैसा खर्च होऊन कांहींएक गुण आला नाहीं. मग तिचे आईबापांनीं ईश्वरावरच हवाला ठेवून ते स्वस्थ राहिलें. गांवांत राजकन्येची प्रकृति बिघडल्याचा पुकारा चोंहींकडे झाला. देशोदेशांहून धूर्त व चतुर असें पुष्कळ लोक आले आणि राजास हात जोडून आम्ही आपले कन्येस बरी करूं असे म्हणूं लागले व बरें केल्यावर मग बक्षीस मागूं, मात्र तिनें डोळे उघडून आमचेकडे पाहिलें पाहिजे. नाहींपेक्षां आम्ही या कामांत हात घालणार नाहीं. पुढें राजानें बरोबर विश्वासूक माणूस देऊन तिचे महालांत एका चतुर मनुष्यास पाठ-

विलें. त्यानें जाऊन प्रकृति पाहिली तों त्यास असें दिसलें कीं, ती शुद्धीवर तर आहे खरी, परंतु तिचें एकाग्र चित्त झालें असल्यामुळें तिला खाणें, पिणें कांहींएक नकोसें झाल्यानें अशी स्थिति झाली असावी. तर ही असाध्य मुळींच नाहीं. उगीच थोराचें मूल म्हणून इतके उपाय चालले आहेत. आमचेसारखे गरीबाचें असतें, तर दमडीचे औषधानेंच गुण आला असता. गरीबास हे चोचले कोठले ! हे सर्व पैशाचे खेळ आहे. असो. तो म्हणाला आम्ही तर हिला लवकर बरी करूं, पण आमचे बरोबर एक दोन मनुष्यें येण्याची परवानगी पाहिजे. याविषयीं राजेसाहेबांचा जसा हुकूम होईल तसें करूं. असें म्हणतांच राजेसाहेबांस विचारून हाताखालचे माणसांनीं परवानगी आणली. नंतर उद्यां शुद्धीवर येईल असें सांगून त्या धूर्त मनुष्यानें दररोज उपायांस सुरवात केली.

---

# भाग ८ वा.

ती आठ दिवसांनीं थोडी थोडी शुद्धीवर आल्याचें दिसूं लागली. तेणेंकरून त्यास उत्तेजन येऊन तो तिची बाधा समजून तेथील माणसांजवळ नाना तऱ्हेच्या युक्तीच्या गोष्टी बोलत बसूं लागला. व जवळील तिच्या प्रिय सख्यांस तिची हकीकत सर्व विचारून घेतली. व त्याला ती सर्व हकीकत समजतांच त्यानें विचारलें कीं, त्या राजपुत्राचें व प्रधानपुत्राचें नांव गांव कांहीं तुम्हांस माहीत आहे काय ? तेव्हां सख्यांनीं सांगितलें, आमचे लक्षांत नाहीं, पण या आमच्या आजारी पडलेल्या बहिणीच्या ध्यानांत असेल. हें ऐकून तो फारच विचारांत पडला. इतक्यांत एका दासीनें स्मरण करून त्याचें नांव सांगितलें.मनमोहन चक्रवरती तें नांव ऐकून त्यानें श्वासोच्छ्वास टाकिला व म्हणाला, हें रत्न आतां वाया जाणार ना ! शिव ! शिव ! आम्हालाही त्याच राजपुत्राचे बापानें इकडे पाठविलें आहे. त्या राजपुत्रास याच सुंदरीचें वेड लागून तो कोठें निघून गेला आहे त्याचा अद्याप पत्ता लागत नाहीं. राजानें अतिप्रयत्नानें त्यास शोधून काढण्याकरितां प्रधानपुत्रास पाठविलें आहे व चहूंकडे त्याचे शो-

धास पुष्कळ लोक सर्व देशोदेशीं व रानोरानीं पाठविले आहेत. पण दैवयोगानें पत्ता लागेल तेव्हां खरें. हें वर्तमान ऐकून तिच्या सख्या व दासी फारच घाबरल्यात आतां कसें होईल हें कळत नाहीं म्हणून दुःख करूं लागल्या. जर त्या राजपुत्राची कमजास्त हकीकत झाली असली, तर हीही मोठीच दुःखाची गोष्ट आहे ! पुनः त्या गहिवरून म्हणाल्या दादा ! ही गोष्ट खरी आहे काय ! जर खरी असेल तर मग आतां आमचे सखीचे प्राणाची आशा आह्मास मुळींच उरली नाहीं ! तो म्हणाला मुलींनो ! मी बनाऊं खोटी गोष्ट काय म्हणून सांगेन ? तुमचें माझें कांहीं वैर का आहे ? जेणेंकरून या उभयतांचें कल्याण होईल तेंच मला करणें आहे व त्यांतच माझेंही कल्याण आहे. ईश्वर करो आणि या उभयतांची मैत्री लवकर जुळो. आतां त्याचा शोध लवकर लागला म्हणजे इची प्रकृति लवकर ताळ्यावर येईल, असें म्हणून तो निघून चालता झाला. नंतर तिच्या सख्यांनीं तिच्या जवळ बसून रात्रंदिवस राजपुत्राच्या गोष्टी सांगून कर्मणूक करावी. असें चाललें असतां, एके दिवशीं त्यांनीं थट्टा करण्यास आरंभ केला व एकमेकांस ह्मणूं लागल्या कीं, आज राजपुत्र येथें येणार आहे तर सर्व तजवीज जेथल्या तेथें नीट ठेवा. कांहीं चूक पडूं देऊं नका. नाहींतर आपली सखी रागावेल. कारण तो तिचा पंचप्राणच आहे समजलात ? असें त्यांचें बोलणें ऐकतांच राजकन्येनें आपले डोळे किंचित् किलकिले करून ह्मणाली, ज्याला मीं आपले मनानें वरलें व प्राणाहून प्रिय मानलें त्यानें माझ्याशीं असें निर्दय व्हावें काय ! कोठें आहेत ते ? खरोखर आतां लवकर न भेटतील तर माझे प्राण पहा कसे जाऊं पाहतात ? मला आतां धीर निघत नाहीं. आतांच तुम्ही म्हणालांत कीं, सर्व तयारी करून ठेवा, पण या बागेंत फारसें विलासी सामान नाहीं. जर बाबासाहेब असते तर सर्व व्यवस्था सुरेख झाली असती. किंचित् लाजल्यासारखें करून पुनः ह्मणाली, अगबाई ! स्वारी तर आली. सायंकाळपर्यंत मी दृष्टीस पडणार नाहीं ह्मणून सख्यांस सांगितलें, पण देवा, माझ्यानें कसें राहवेल ? असो. येथें माझ्या भगिनीशिवाय परके कोणी नाहीं. मी जरी अशी पडलें आहे, तरी माझ्या सख्या मोठ्या हुशार व चतुर आहेत. मीं सांगितलेल्या कामांत काहींएक व्यंग पडूं देणार नाहींत अशी माझी पक्की खात्री आहे. इतकें चाललें आहे इतक्यांत एक फटकळ दासी होती, ती मध्येंच ह्मणाली

बाई, आपण इतकी तयारी केली पण यजमानांचा पत्ता ? कोठें थकून आपलें नांव घेत रानोमाळ फिरत आहेत. त्यांचा पत्ताना ठिकाणा. उगीच मनीं मांडे नी स्वप्नीं पुऱ्या असें झालें. 'मनसा चिंतितं कार्यं दैवोमन्यत्र चिंतयेत्' आतां काय करावें ? हें राजकन्येनें ऐकतांच ती ह्मणाली, मी नांवाची खरी असेन तरच त्यांना शोधून काढीन व असें म्हणून एकदम बिछान्यावर उठून बसली, आणि आपले प्रिय सखीस म्हणाली, काय म्हणालीस ? वेड लागून कोठें पत्ता नाहीं काय ? हें जर खरें असेल तर याचा पक्का शोध करा. मी कांहीं आतां घाबरणार नाहीं. कारण एकवार हा देह ज्याचा म्हटला आहे व ज्याला मीं अन्तःकरणपूर्वक वरलें आहे, त्याचे प्रीत्यर्थ हा माझा देह नाहींसा झाला तर त्याचें सार्थक झालें असें मी समजेन. माझ्या मनानें मी त्याचे शिवाय जगांतील सर्व पुरुष पिता, भ्राता मानतें. आतां यापुढें त्या पुरुषाचा शोध, याशिवाय मला कांहींएक कर्तव्य नाहीं. हा माझा निश्चय माझे आईबापांस कळवा. मी शुद्धीवर आलें, पण हें विपरीत वर्तमान माझे कानीं पडतांच माझे मनास दुःसह दुःख होऊं लागलें. हा देह सोडून आत्मा परलोकवासी होऊं इच्छितो. चिंता नाहीं. मरतेसमयीं तरी एकवार भेट होईल तर या डोळ्याचें व आत्म्याचें पारणें फिटलें असतें. सदैव अशा दुःखद स्थितींत राहण्यापेक्षां मृत्यु येईल तर बरा. पण तें कोठून घडणार ? परमेश्वरा, या दैवीं आणखी तूं काय काय लिहिलें आहेस तें कळत नाहीं.

हें सर्व तिचें बोलणें तिच्या सख्यांनीं व दासींनीं ऐकून घेऊन त्यांपैकीं एकजण म्हणाली, हें तूं काय वेड्यासारखें मांडलें आहेस ? काय भैकत उठलीस! येथें कोणी नाहीं असें तूं समजलीस कीं काय! नाहीं नाहीं त्या कल्पना मनांत आणून पाहिजे तें बडबडावें आणि लोकांत आपली अप्रतिष्ठा करून घ्यावी, यांत काय विशेष आहे? होणार असेल तें होईल. तूं सर्वांचीं मनें बिघडून टाकावीं आाणि आपलाच हट्ट घेऊन बसावें हें कांहीं बरें नाहीं,तर याहून बेहत्तर कीं, दुसरा एखादा उत्तम पुरुष वरून त्यासह तूं सदैव सुखांत लोळावेंस. आणि तें पहावें व तुझे आईबापांस सुखी करावें. हें ऐकून ती राजकन्या अग्नीसारखी लाल झाली आणि म्हणाली, हे नीचे ! नाहीं तो बोध करून माझें मन कुमार्गाकडे वळवूं पाहतेस काय ! पण मी तुझ्या अशा बोधास भीक घालणारी नाहीं समजलीस ! एकवार ज्याला मीं मनें करून

वरलें, तीच माझी भाष्य झाली. मेलें तर काय हरकत आहे ! एकवार वचन गेलें तें खरें. व ज्यांना मी एकवार आपले तोंडानें पिता व बंधू म्हटलें, त्यांसवें अन्य तऱ्हेचे विलास योजावे, हें तुमच्या शास्त्रांत सांगितलें आहे काय ! हाच न्याय लहानपणापासून विद्यासंपादन केल्यानें मिळावा काय? काय नीतिही? केवळ आपल्या सुखाकडे लक्ष देऊन दुसऱ्याचें कांहीं का होईना, त्याची काळजी न बाळगणें हें निदान माझें कर्तव्य कर्म नव्हें ! मला त्या आत्मसुखाची मुळींच गरज नाहीं. 'अन्न आच्छादन हें तों प्रारब्ध आधीन.' मी आपले जिवाची परवा मुळींच करीत नाहीं. पण ज्यानें मजकरितां सर्व सुखोपभोग व राजविलास सोडून रानाचा रस्ता धरला, त्याकरितां मी प्राण देण्यास तयार आहें. प्रथम वाचा जाते नंतर देहांतून प्राण जातो. तर इतकी भोळी मी नाहीं. ज्यानें आपल्यावर जीव ठेवला त्याच्याशीं कृतघ्न होणें हें नीचाधमाचें काम आहे समजलीस ? कुत्रीं भोकतात त्याप्रमाणेंच तुझें हें बोलणें आहे. त्यांत अर्थ न स्वार्थ मनुष्यांनीं आपले शब्दांस फार जपून वापरावें. शब्दासारखी मातबरी पैशांस नाहीं:–

॥ श्लोक ॥

अधमा धनमिच्छंति,–मानोपि महतां धनं ॥

अधमनीच लोक केवळ धनास या जगांत मान देतात. परंतु ज्ञाते व विद्वान जे आहेत ते आपणास मान मिळावा म्हणजे मानधनानें फार संतुष्ट होतात. आपली जनांत सदैव योग्यता असावी, हेंच ज्ञात्यांचें मुख्य धन आहे. द्रव्याची मातबरी ते कधींच मनांत आणित नाहींत. तें म्हणतात मानाअंतीं धन सहज मिळेल, पण मान नसेल तर धन कोठून प्राप्त होणार? तर तुला सांगतें, तुझा बोध तुझ्या जवळच जपून ठेव. माझ्यापुढें तो काढू नको. तुझ्या शब्दांस मी थप्पड मारणारी आहें व तुला सांगतें, तूही असें गैर नीतीचें वर्तन कधीं करूं नकोस. हें माझें सांगणें पक्कें लक्षांत ठेव. रागावूं नकोस. व माझें सौख्य ज्यावर अवलंबून आहे त्याचा शोध माझे आईबापांकडून लौकर आणवा. नाहींतर त्याची जी वाट तीच माझी, हें खूप लक्षांत ठेवा. मी तुम्हांस व आईबापांस खास अंतरणार. जर त्यांची माझी गांठ पडली तर परत येईन, नाहींतर जिकडे ते तिकडे हा देह जाणार. मग पशूपक्ष्यांची आहुती होवो उगर गांठ पडल्यास सुखसमुद्रांत पडो. दोन्हींतून कोणता तरी एक शेवट ईश्वरास केलाच पाहिजे. पण नि-

ष्ठा तशीं फळें मिळोत,परमेश्वर कृपेनें मजकडून कांहीं अधर्म घडूं नये येवढी त्यापाशीं माझी प्रार्थना आहे. हे तिचे शब्द सखीनें ऐकतांच, ती मनांत म्हणाली' हें काम मोठें कठिण दिसतें. व ही गोष्ट जर हिचे आईबापांस न कळविली, तर मोठा घात होईल. तर ही गोष्ट काकासाहेबास जरूर कळविली पाहिजे, नाहींतर हें अपेश आमच्यावर येणार आहे. आजचा झोक कांहीं निराळाच दिसतो.आज बेशुद्धपणा तर बिलकूल नाहीं.असा तिनें विचार करून बाहेरचे दालनांत येऊन काकूसाहेबास बोलावणें पाठविलें, आणि पुनः राजकन्येजवळ येऊन म्हणाली,बाई! आज आपल्यास कांहीं बरें वाटतें काय!कांहीं खाण्याची इच्छा असेल तर हवा तो पदार्थ करून आणतें.यावर ती म्हणाली, सखे, हवा तो पदार्थ तुम्ही कसचा आणून देता! समोर आलेला जर मला प्राप्त झाला नाहीं तर आतां तुम्ही काय आणणार ? आतां मला कशाची इच्छा नाहीं, देहाचें सार्थक करावें येवढीच इच्छा आहे. आत्महत्या करणें हें मोठें पातक आहे म्हणून ती करवत नाहीं. आतां माझी ही गोष्ट कोणासही कळवूं नका येवढीच देणगी मला द्या म्हणजे झालें ! इतक्यांत तिची आई तेथें आली व कन्येस बोलतांना ऐकून म्हणाली, आज देवानें सुदिन दाखविला. व जवळ येऊन कन्येस प्रेमानें पोटाशीं धरून म्हणाली, बाई ! माझे तान्हे ! तुला कसें वाटतें ? शीतळ उपचारानें तूं शुद्धीवर आलीस वाटतें ! तो कोण आला होता, त्या बिच्याऱ्याचा पायगुण चांगला. म्हणून आज मीं हिला बोलतांना ऐकलें. माझा जीव हिच्यावरून ओवाळून टाकावा; पण हिचे जिवास धक्का लागूं नयेसें वाटतें. सर्व सुखाचें स्थान माझी लाडकी आहे. बाई तुझी काय इच्छा आहे ? जें तुला वाटत असेस तें बेलाशक सांग ? आईबापांची अमर्यादा होईल ही भीति मनांत बाळगूं नकोस. मी तुझें इच्छित आतां पूर्ण करतें. व तिकडे जरी सांगितलें तरी आळस होणार नाहीं. कारण तुला आजारी पाहिल्यापासून अन्न खाणें सुद्धां सुचत नाहीं. तूं कोणास वरण्याचें मनांत आणलें आहेस त्याचें नांव गांव ठिकाणा वगैरे सांग. ह्या गोष्टी सहज घडणाऱ्या आहेत. तुला घरांतील तबीयत माहीत असून इतकी विचारांत कां पडलीस ? याहून तुला जर सांगण्याची भीड वाटत असेल तर सर्व लिहून माझे जवळ दे,म्हणजे ती चिट्टी देऊन तिकडे कळवून सर्व तुझ्या मनाप्रमाणें घाट घालून थाट उडवून देतें. अशी धास्ती घेऊन झुरणीस लागण्याचें कांहीं कारण नाहीं. मला तुझ्या आवडत्या दासींनीं सर्व

मजकूर कळविला आहे. पण तो राजकुमार कोण ? कोठील ? याचा तूं शोध केला आहेस काय? इतकें बोलणें ऐकतांच तिनें लज्जेस थोडें मागें सारून ती म्हणाली, आई, त्या दासीस सर्व ठाऊक आहे. तेव्हां तिला विरलें असतां सर्व कळेल. मग तिच्या आईनें त्या दासीस सर्व विचारून घेऊन आपले पदरचे कांहीं लोक पाठवून त्या राजपुत्राचा शोध आणविला. तों असें कळलें कीं, हिच्याच नादानें तो कोठें निघून गेला आहे व त्याच्या शोधाकरितां देशोदेशीं व रानोरानीं लोक पाठविले आहेत. ही बातमी आईबापांस कळतांच तीं अति दुःखी झालीं. कारण कितिही सत्ताधीश असला तरी ईश साह्य नसेल तर काय उपयोग?त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ होऊन दीन अनाथासारखे निराश झाले व ही गोष्ट कन्येस कळवूं नये असा बेत करून घरांत फार बंदोबस्त ठेवला. तथापि ती गोष्ट तिचे कानावर गेली. व ती जातांच तिनें निश्चय केला कीं, यापुढें आतां या लोकीं राहणें बरोबर नाहीं. आईबापांस काय नवऱ्याचे घरीं नांदती अथवा मेली, या दोन्हींतून कांहींही कन्येचें वर्तमान ऐकलें असतां सारखेंच समाधान असलें पाहिजे. तर माझे जीवाचा मालक मीं केलेला शोधून काढलाच पाहिजे. नाहींपेक्षां जें दैवीं लिहिलें असेल, तें चुकणार नाहीं. त्याप्रमाणेंच परिणाम होईल. जर माझ्याकरितां सर्व राज्याचा त्याग करून शिरावर वनवास धारण केला आहे, तर मलाही त्यांचेकरितां तसेंच केलें पाहिजे. हें माझें वय सदैव सुखांत राहून पतिसह आनंदांत दिवस घालविण्याचें आहे, परंतु "कर्माचा ठेवा कोणाला द्यावा" तसें झालें. मनांत पुष्कळ होते, परंतु तोंडांत मारून पुढचा घास नेला. अशी मी अभागीण या भूमींतलाचे ठायीं जन्मलें ना! ईश्वरा, माझें वय लहान असून असें अघटित कर्म करण्यास मी प्रवृत्त होणार यांत माझा हेतु मुळींच वाईट नाहीं. तरेन किंवा मरेन, परंतु जगांत हें काळें तोंड दाखविणें नको! आतां या योगानें माझे आईबापांस फार दुःख होणार, पण माझा यास काय उपाय! याप्रमाणें सर्व विचार ठरल्यावर आपले शरीराचे माफक भगवे कपडे करून ते अंगांत घालून केंस मोकळे सोडून रात्रीची परमेश्वराचें नांव घेऊन घरांतून एकटी मध्यरात्रीच्या सुमारास बाहेर पडली. जिला सहजीं इकडून तिकडे जाणें झालें तर, शेंकडों दासी सदैव सेवेंत हजर असणार व जिचें आचरण सूर्यकान्तमण्याहून स्वच्छ, तिनें एकटीनें असें मध्यरात्रीचे सुमारास भगवे कपडे घालून बाहेर पडणें किती दुःखास्पद आहे

याचा सुगर वाचक विचार करतीलच. तिचे मनास अति दुःख कीं ज्याचा पारावार नाहीं, असें वाटल्याशिवाय ती असली गोष्ट स्वीकारील काय ? असो, ती गेल्यावर तिचे आईबापांची स्थिति काय झाली तिकडे वळूं. अशी सद्गुणी एकुलती एक कन्या येवढे नौकर, चौक्या व निकट सख्यांचा रात्रंदिवस समूह असून त्या सर्वांचे हातांवर तुरी देऊन ती गेली, हें वर्तमान सूर्योदयानंतर तिचे आईबापांस कळतांच चहूंकडे शहरांत हलकल्होळ होऊन गेला. आणि सर्व म्हणूं लागले कीं, मागें एवढ्या संकटांतून तिला वांचवून आणलें आणि पुनः एकाएकीं हा काय घात झाला ! राजास तर फारच दुःख झालें. तो म्हणाला, आतां आम्ही खचित जगणार नाहीं, तरी या राज्याची व्यवस्था लावून आपणही जंगलांत चालतें व्हावें हें बरें. कन्या होती तरी ती मुलापेक्षां मला अधिक होती. तिनें खास कोठें तरी जाऊन प्राणत्याग केला असेल. तरी मीं सर्वांस सक्त ताकीद दिली होती कीं, तिला ही गोष्ट कोणी कळवूं नका. परंतु कोणीं दुष्टानें तिला हें कळवून माझा घात केला कळत नाहीं ! असो. ईश्वरा, तूं तिचें रक्षण कर. तिला कोणीं नेली किंवा ती होऊन गेली, काय घात झाला नकळे ! आतां अशी मुलगी पुनः कशानें दृष्टि पडणार. यावर एक श्लोक आहे तो असा—

॥ एकोपि गुणवान् पुत्रो, नच मूर्खशतैरपि ॥
॥ एकश्चंद्रो जगच्चक्षुर्नक्षत्रस्यः किं प्रयोजनं ॥ १ ॥

तिच्या आईस तर फारच दुःख झालें ती म्हणाली—

## ॥ अंजनी गीत ॥

माझी तान्ही कोठें गेली, कोठेगे पाहूं नेत्रें शिणलीं ॥
जगत्राता दावा वहिली, आणुन भेटवी ॥ १ ॥
अरे अनाथाच्या नाथा, तुझे चरणीं माझा माथा ॥
नको आतां मारूं लाथा, बाळक मज दावी ॥ २ ॥
त्राहे त्राहे हे भगवंता, दावी माझें तान्हें आतां ॥
मार्गामध्यें जातां जातां, बाळक मज दावी ॥ ३ ॥
बाळेवांचुनी हा देह माझा, लावूं तरी मी कवणे काजा ॥
अगे शंकराचे भाजा, बाळक मज दावी ॥ ४ ॥
नाहीं तरी जग शून्य मजला, देण्या दुःखें कैसा सजला ॥
बाळा माझी कोमल तुजला, कशिरे आवडली ॥ ५ ॥

तिजवांचुनी क्षण नगमे मजला, मारित हांका कांरे निजला ॥
माझी करुणा कसि नये तुजला, स्वस्थचि निजलासी ॥ ६ ॥
प्रभु धावा हो दीनाकरितां, प्रेमें धावें सिंधु सरिता ॥
मज समजावी जगन्नाथा, ब्रिद आपुलें राखी ॥ ७ ॥
बाळी माझी सर्व गुणांची, रसालता तरि किति वाणीची ॥
मोहक वृत्ति सदैव तिची, वर्णू किति आतां ॥ ८ ॥
विरहें दुनया न लगे मजला, थारा मागे दे राहण्याला ॥
बाळा माझी कोठें तिजला, नेली जगदीशा ॥ ९ ॥
नवस करुनि मी थकलें देवा, कोठें गेला माझा मेवा ॥
दुर्भागिण मी कैसी सेवा, करूं आतां हरिची ॥ १० ॥
हर्षें कधीं तिज पाहिन रामा, हा देह लाविन प्रभुच्या कामा ॥
शामा माझी देइल आरामा, हरि लीला दावी ॥ ११ ॥
उदर माझें हें धन्य कराया, कैसी कुशीं तूं जन्मलीस या ॥
माझे लाडके ! मज ठेवुनिया, कोठें गेलिसगे ॥ १२ ॥
उर्वी कशी ही डळमळीत, कोठें पाहूं हे जगन्नाथ ॥
नेत्रा किति तूं आश्रु ढाळित, बैस स्वस्थ येथें ॥ १३ ॥
धांवा करितें दया नसे का, मारून टाकी घाये एका ॥
मृतवत् झालें स्मृति नये का, देवा तुज माझी ॥ १४ ॥
गजेंद्राचे अंकांताशी, धांव घेतलीसे हृषीकेशी ॥
द्रौपदि रक्षुनि मज कां ताडिसी, मज तारा या हो ॥ १५ ॥
ऐसें ऐकुनि देव धांवला, माते सन्निध येऊनि पातला ॥
घे घे कन्या हृदयीं दाटला, कृपार्णव तो कीं ॥ १६ ॥
मग मातेचे उल्हासाला, पार नसे हो त्या भाग्याला ॥
मूर्च्छित पडली जणु प्रभू आला, कन्या घेउनिया ॥ १७ ॥
मिठ्या मारिल्या परस्परांनीं, कवळुनि धरिलें कराग्रांनीं ॥
नयनीं उदक भरूनि त्यांनीं, हरि पूजा केली ॥ १८ ॥
दुःखें मूर्च्छित निद्रा आली, स्वप्नीं कन्या देवें आणिली ॥
तत्क्षणीं शांती भेटुनि केली, सत्यचि मज भासे ॥ १९ ॥
स्वप्न नव्हे ही अमृत वृष्टी, मज टेंकाया जैशी यष्टी ॥
सदां कदां मीं न व्हावें कष्टी, भाक दिली हरिनें ॥ २० ॥

हें परमेश्वरा, तिजवर काय संकट येऊन ती जिवावर उदार होऊन कोठें गेली असेल हें तुझें तूं जाणे. तिजवांचून माझें प्राण जाऊं पाहतात! काय हीं स्वप्नवत् स्थिति झाली ?! असें म्हणून दुःखानें रडूं लागली. असो,अशी तिचे आईबापांची स्थिति झाली. आतां तिजकडे लक्ष देऊं. ती घरांतून सर्वांचा त्याग करून जी निघाली, ती जवळच एक सांभाचें देवालय होतें तेथें गाभाऱ्यांत जाऊन एका कोपऱ्यांत दडून बसली. तें देवालय अति रमणिय जंरी होतें, तरी तेथें एकही मनुष्य नव्हतें. दररोज प्रातःकाळीं व सायंकाळीं मात्र गुरव येऊन पूजा व आरती करून जात असे. तें देवालय गांवापासून सुमारें एक मैलावर होतें. व तेथून पुढें सर्व पांच सहा मैल दूरपर्यंत अरण्य लागलें होतें. या अरण्यांत सर्वच फळपुष्पांनीं भरलेलीं अशीं झाडें असून एक एक वृक्ष गगनचुंबितें होऊन राहिले होते. तिनें दिवसां हिरवीगार गर्द छाया पाहून त्यांत बसावें व रात्रीं त्या देवालयांत येऊन देवाची स्तुति करून, लागली तर किंचित् निद्रा घ्यावी. याप्रमाणें, दिवसां त्या वृक्षवाटिकेंत फलांचा आहार करून व शितल गंगोदक प्राशन करावें व रात्रीं देवळाचा आश्रय करावा, असे तिनें कांहीं दिवस काढले. ती वारंवार असें मनांत आणी कीं, एक दिवस तरी माझें वांछित पूर्ण होईलच होईल. जर माझे भ्रताराची आणि माझी गांठ पडेल तर मीं आपले आईबापांस सुख देईन. माझ्यावांचून त्यांची काय स्थिति झाली असेल हें एक परमेश्वर जाणत असेल. मी त्यांचे पोटीं येऊन व्यर्थ आहे. मी त्यांना वारंवार कुठारघाय मात्र करीत आहें. माझा तरी परिणाम काय होणार समजत नाहीं! असो, या अरण्यांतील वृक्ष व पक्षींच माझी करमणूक करणारे आहेत. याप्रमाणें समजून ती प्रत्येक वृक्षाजवळ जाऊन त्यास आपलें दुःख सांगत असे व मोठमोठ्यानें त्या वृक्षास मिठी मारून रडे. आणि म्हणे कीं, माझ्याकरितां राज्याचा त्याग करून गेले व माझ्याकरितां देहाचें रान करून घेतलें. एकवार जर माझी गांठ पडेल तर दोन शब्द बोलून हा देह पायावर ठेवून याचें सार्थक करून घेईन. यापेक्षां मला इंद्रपदही अधिक नाहीं.माझ्या पतिसुखापुढें सर्व या त्रिभुवनांतील सुखें तुच्छ आहेत. आहारे परमेश्वरा! या पापिणीच्या नेत्राचें सार्थक एक वेळ पतिमुख दृष्टीस पाडून करशील काय? याप्रमाणें तिची स्थिति झाली. आतां पुनः तिचे आईबापांची काय स्थिति झाली तिकडे वळूं.

ते निराश होऊन तपश्चर्येस जाण्यास निघाले. हें प्रधानानें पाहून शरण आला व राजास सांगितलें महाराज, आपण जर प्रजेस सोडून जाल तर हा राजाचा सद्धर्म होणार नाहीं. धर्मास अनुसरून नीतीनें राज्य करणें आणि प्रजेचें पुत्नाप्रमाणें पालन करणें हाच राजाचा सद्धर्म होय. आपली कन्या नाहींशी झाल्यामुळें आपलें मन उदास झालें आहे खरें, तरी आज नाहीं उद्यां नाहीं परवां पण केव्हां तरी मी तिचा शोध केल्याशिवाय राहाणार नाहीं. आम्ही आपले पदरीं असून आपणास दुःखांत ठेवणें हें आम्हास कसें योग्य वाटेल ! या पांच चार दिवसांत कांहीं खबर कळली आहे तिचा पक्का शोध करून काय तें आपणास लवकरच कळवितों. 'चक्षुर्वैसत्य' या न्यायानें मीं डोळ्यानें पाहिल्या शिवाय त्यांतील खरें तथ्य समजून येणार नाहीं. तरी पण इतकें खात्रीनें सांगतों कीं, आपली व आपले कन्येची गांठ थोडे दिवसांतच पडेल. राज्याचा त्याग करून जाणें नीट नव्हे. इतकें सांगून राजास राहून घेऊन प्रधानानें आपली दूर गांवीं जाण्याची तयारी केली. दहा पांच कारणापुर्तीं माणसें बरोबर घेऊन निघाला तों वनें उपवनें पहात पहात ज्या रानांत राजकन्या होती त्या रानांत आला. व ज्या देवळांत ती मुलगी रहात होती त्याचे आसपास तपास करूं लागला. तों त्यास असें कळलें कीं येथें दररोज रात्रीं कोणी एक बैरागीण भजन करीत असते. असें कळतांच त्यानें तेथेंच तळ दिला. रात्रीं नित्य नियमाप्रमाणें ती मुलगी देवळांत येऊन देवाची प्रार्थना करून पतिविरहानें व्याप्त झाल्यामुळें मूर्छित होऊन तेथें पडली. इतक्यांत तेथें प्रधान गेला व तिला अस्ताव्यस्त झालेली पाहून मनांत म्हणतो, राजाची कन्या किती सुस्वरूप आणि गुणवती होती व ही येथें राक्षशिणीसारखी केंस मोकळे सोडून भगवें वस्त्र धारण केलेली पडली आहे ही कोणी तरी अन्य स्त्री असावी. पण खात्री करून घेतली पाहिजे. असें म्हणून तिचे जवळ मशाल घेऊन गेला व पाहतो तों सर्व अंग घामानें डबडबून गेलें आहे. अंगांत तिळमात्र शक्ति नसून तोंडानें मात्र बुटबुटते कीं हे परमेश्वरा, जगनियंत्या, माझी दाद तुझे दरबारीं लागत नाहींना ! असा मीं कोणता अपराध केला ? तूं दयेचा सिंधू असून या दीन अबलेची तुला कशी दया येईना ! पतिविरहामुळें ही सर्व दुनिया मला तुंच्छ वाटते ! माझे देहाची मी परवा करीत नाहीं. पण माझेकरितां ज्यानें आपले जीवाचें रान करून घेतलें,

त्याची आठवण झाली म्हणजे माझें काळीज थरथर कांपतें. एक वेळ स्वप्नांत तरी येऊन सुचीव कीं, तुझी व तुझ्या पतीची गांठ पडणार नाहीं व मग या देहाची कशी आहूति करतें ती पहा आईग आई ! म्हातारपणीं मी तुला दुःख द्यावें हें माझें कर्तव्य नाहीं ! पण मीं तुझ्या उदरीं येऊन तुला व्यर्थ श्रम दिले. व्यर्थ तुझ्या तारुण्याचा भंग केला. मी तुझें उदरीं आल्यापासून तुला मजपासून एक शब्दाचेंही सुख नसून रात्रंदिवस काळजीचें ओझें जसें कांहीं बरोबरच घेऊन आलें. आतां तर माझा अंत होणार यांत संशय नाहीं ! ज्याकरितां या कायेची बेकाया केली, राज्यलक्ष्मीस लाथ मारली, मायेच्या माणसांस तुच्छ करून असंभवनीय गोष्टीवर भरंवसा ठेवला व रात्रंदिवस तळमळतें आहे, त्याची आज भेट होईल उद्यां होई. असें करतां करतां दोन महिने झाले, कोठेंही पत्ता नाहीं पण मला वाटतें,—माझ्याकडे तरी मन कशानें लागणार ! एक तर मी लहान, अज्ञान कोणतेही गोष्टीचें ज्ञान माझे अंगीं नसून केवळ दोन वेळ जेऊन आनंदांत काढणारी. पण तूर्त तेंही सर्व जाऊन ही स्थिति प्राप्त झाली. आतां सर्व दुःखांस या देहासुद्धां रजा देतें. हें सर्व बोलणें प्रधानानें निमूटपणानें ऐकून घेतलें आणि मनांत म्हणतो राजकन्या सर्वसुखाचा त्याग करून अशा दुःखांत पडेल हें अनुमान कधींच होणार नाहीं. बरें पण ही कोणी बैरागीण म्हणावी तर राजाचा संबंध दर्शविते. त्यापेक्षां ही कोणी तरी मोठ्या कुलांतली असावी यांत शंका नाहीं. जर राजकुलांतली असती तर अशा संकटांत कां पडती ! पण हिच्या बोलण्यावरून हें स्पष्ट होत आहे कीं, ही कोणी तरी विरहिणी आहे. असो. ती काय बोलते तें आणखी कांहीं वेळ ऐकावें. असें म्हणून थोडा पुढें सरसावला व जवळ जाऊन पाहतो तों तिला बिलकूल देहभान नाहींसें दिसलें. मग मशाल घेऊन अगदीं तिच्या जवळ गेला व तिचा हात धरून तीस उठवून बसवूं लागला. तो इतक्यांत तिला कोणी पुरुषाचा स्पर्श आपले शरीरास झाला हें कळतांच ती रागावली व म्हणाली दुष्टा ! निर्दया ! अधमा ! येथें येऊन मला कां उगीच त्रास दिलास ? माझें शरीरास ज्या हातांनीं स्पर्श केलास ते तुझे हात कां झडले नाहींत ! माझे देहास माझे भ्रताराशिवाय तूं अन्य पुरुषानें स्पर्श केलास त्यापेक्षां तूं खराब नरकाचा मात्र अधिकार भोगण्यास तयार झालास. बरें पण या गरीब अबलेवर हा तुझा कां जुलूम ! असें करण्यांस तुझे मनांत

शंका कशी उद्भवली नाहीं ! हें तिचें बोलणें ऐकून प्रधान आपले मनांत आश्चर्य करूं लागला आणि म्हणाला, ही राजकन्या तर खचीत असून व दुःखानें कांतिहीन झाली असावी. असा विचार करून तीस हात जोडून म्हणाला, हे राजकन्ये, तूं राजाची इतकी लाडकी असून, सर्व वैभवास लाथ मारून आईबापांस दुःखांत पाडलेंस व स्वतःलाही सुख नाहीं हें एवढें साहास करण्यास कां तयार झालीस ? व तूं ज्याकरितां इतकें दुःख स्वीकारलेंस असा प्राणी तरी या दुनियेंत कोण आहे ? त्याचें नांव सांग. मी तुझा भाऊ आहें असें समजून एक वेळ प्रेम दृष्टीनें मजकडे पहा. तूं मला पहाशील तर तुझे मनांत माझे विषयीं कुकल्पना कधींच उपजणार नाहीं. डोळे उघड आणि कृपा करून मजकडे पहा. अशी त्याची मोठ्या नम्रतेनें केलेली विनंती ऐकून. दीर्घश्वास टाकून उठून बसली व प्रधानास निरखून पाहून म्हणाली, बाबा, माझें दुःख मी सहन करतें व या मार्गानें कोणाचा परिचय होऊ नये म्हणून येथें एकान्तीं या देवळांत येऊन राहिलें आहे. मी गरीब बैरागीण आहें. माझ्या पतीचा शोध नसल्यानें दुःखव्याकुल होऊन येथें रडत पडलें आहे. तुम्ही मला राजकन्या म्हणतां पण तें वैभव मला गरीबाला कशाला पाहिजे ! तुमची राजकन्या हरवली असल्यास तिचा शोध अन्य ठिकाणीं करा. मी आपली गरीब बैरागीण तीर्थातीर्थांचे ठायीं फिरत असतें. पति सापडल्यावांचून या देहास सौख्य कोठेंच होणार नाहीं. मला येथें विनाकारण त्रास देण्याचें तुम्हास बिलकूल युक्त नाहीं. मीं तुम्हास भलते सलते शब्दांचा उपयोग केला असतां त्याचा परिणाम वाईट होईल. या करितां तुम्ही आपला आलेला रस्ता सुधरा. माझें पूर्वार्जीत मी भोगतें आहे. हें ऐकून प्रधान म्हणाला, तूं मघाशीं आपल्याशींच बोलत होतीस तेव्हां राज्याचा त्याग करून आलें असें बोलत होतीस व आतां मी प्रत्यक्ष विचारलें तेव्हां बैरागीण आहे असें सांगतेस. खोटें बोलण्यासारखें पातक नाहीं. तरी तूं तें कां संपादन करतेस ? हें ऐकून ती म्हणाली, स्वप्नांत रंकाचा राजा व राजाचा रंक होतो. तसेंच मी झोपेत कांहीं तरी चावळलें असेल व तें तुम्हीं ऐकलें असेल. मी खरोखर राजकन्या नव्हें. एक गरीब स्त्री आहें. राजकन्या एवढें दुःख कशास सहन करील ? सर्व जगाची रहाटी अशी आहे कीं नाना तऱ्हेचे यत्न उद्योग करून सुख प्राप्त होण्यासाठीं रात्रंदिवस झटत असावे. असें असून तु-

म्हांस हा केवढा भ्रम. तुमची राजकन्या कदाचित् माझ्यासारखींच असेल पण ती मी नव्हें. हें ऐकून प्रधान म्हणाला, तू जर खरी बैरागीण असतीस तर बैरागिणीला अशा गोष्टी कधींच सुचणार नाहींत व ती इतकें बोललीही नसती. तेव्हां तू खरी कोण आहेस तें सांग, त्याशिवाय आम्ही येथून हालणार नाहीं. व तुलाही सोडणार नाहीं. आम्ही तुला आमचे राजाकडे घेऊन जाणार मग तूं कोणीही ऐस. इतकें तिच्याशीं बोलून मनांत विचार करतो कीं, ही राजकन्या तर खचीत आहे हें तिच्या स्वरावरून व आविर्भावावरून स्पष्ट कळतें. एखाद्या गरीब मनुष्याची ही भाषा नव्हे. जरी तिनें ओळख दिली नाहीं तरी चिंता नाहीं. आम्हांस समजलेंच पाहिजे. इकडे राजकन्येनें तें प्रधानाचें बोलणें ऐकून मनांत विचार करते कीं, यांना माझा शोध कसा लागला असेल तो असो. हा आमचाच प्रधान खरा. मजविषयीं त्याची पुरती खात्री होत नाहीं तरी तो मला आतां खास घेऊन जाणार, तर आतां काय करावें ! इतक्यांत प्रधान पुनः हात जोडून म्हणाला, आपण जरी ओळख दिली नाहीं व आम्हांस जरी पक्की ओळख पटत नाहीं तरी राजाकडे घेऊन जाण्याविषयीं आमचें मनच आम्हांस सांगतें; तरी तुम्ही कृपा करून चलावें. आमचा कोणत्याही प्रकारें आपल्यावर जुलूम नाहीं. पण राजानें आम्हांस असें सांगितलें आहे कीं, या देवळांतील बैरागीण घेऊन या, तरी आम्हांस राजाज्ञा शिरसा वंद्य आहे व त्याप्रमाणें आम्हांस केलें पाहिजे. याकरितां आपण सुखानें चलावें हें उत्तम. हें ऐकून ती घाबरली व मनांत म्हणते,—यांनीं तर मला नेण्याचा पणच केला आहे. मी तर आपलें तोंड आईबापांस अशा स्थितींत कधींच दाखविणार नाहीं. पण तूर्त हा सत्ताधारी आहे तेव्हां खुषीनें नाहीं तर जुलमानें हा मला खास घेऊन जाईल. असो. प्रसंग युक्ति शिकवितो म्हणतात त्याप्रमाणें मलाही एक युक्ति सुचली आहे, तिचा उपयोग करून पहावा. मग तिनें हात जोडून सांगितलें, तुमचें राज्य घेऊन काय करायचें आहे ? जिकडे माझा प्राण तिकडेच हा देह जाणार. मला राज्याची आशा नाहीं. उगीच माझे देहास कष्ट देऊं नका. मी तुम्हांस आणखी एकवार सांगतें कीं, मी तिकडे साफ येणार नाहीं. तुम्ही जर जुलमानें न्याल तर पुढें पश्चात्ताप पावाल. धर्म अधर्म राजास सर्व माहित आहे. असें असून जर मला न्याल तर मी प्राणास मात्र मुकेन. तरी या बोलण्याचा विचार करून

काय करणें असेल तें करा. व मला एवढी भिक्षा द्या कीं, या देवळांत फिरून येऊं नका. इतकें बोलून रडूं लागली. तें पाहून प्रधान म्हणाला तूं रडूं नकोस. तुझ्या कल्याणाची आम्ही इच्छा करीत असून तूं कां रडतेस ! जितकी वर सुकुमार दिसतेस तितकी अन्तःकरणाची कठिण आहेस, तरी असें करूं नकोस. माझे बरोबर चल. ही पालखी, म्याना तुजकरितां आणला आहे. यावर ती म्हणाली, बाबा, हीं वाहनें आम्हा गरिबांस कशाला? आम्ही तीर्थयात्रा करून कालक्षेप करणार. आम्हांस हीं राजवाहनें मुळींच नकोत. तुम्ही कसें तरी येथून चालते व्हां. नंतर प्रधानानें असा विचार केला कीं, ही पोर तर मुळींच ऐकत नाहीं व आपलें नांव छपविते पण ही राजकन्या खचित आहे. असो. ही सुखासुखीं येणार नाहीं. आतां हिला बंदोबस्तानें ठेवलें पाहिजे, नाहींतर ही कांहीं तरी साहस करी व राजाचा विनाकारण आपल्यावर क्षोभ होईल दुसरें कांहीं नाहीं. असा विचार करून परमेश्वर तुझें कल्याण करो, असें तीस म्हणून आपले तंबूंत गेला व विचार करूं लागला कीं, ही पोर किती तरी हट्टी आहे ! उदासीनपणा दाखविते पण एवढा उदासीनपणा हिला कोणी आणला असावा बरें ! तो तरी कोणी विशेष पुरुष असला पाहिजे. मघापासून नवरा नवरा असा उच्चार करते व आपल्या राजकन्येचें तर मुळींच लग्न झालें नाहीं, तर ही सर्व हकीकत आपल्यास कळली पाहिजे. राजकन्या अविवाहित असून कुमारी आहे हें सर्वांस माहित आहे, पण राजास नकळत तिनें विवाह तर केला नसेलना ? असो. आपल्याला या भानगडींत पडण्याची काय जरूर आहे ! कांहीं तरी युक्तीनें हिला राजाजवळ न्यावी म्हणजे झालें. असा विचार करून नंतर त्यानें उत्तम उत्तम अन्नें करवून ताट भरून तिजकडे पाठविलें. तिनें तें ताट घेऊन स्वतः त्यांतील कांहींएक न घेतां देवास नैवेद्य दाखवून तें सर्व गुरवास दिलें. ही हकीकत प्रधानानें ऐकून त्यास फार वाईट वाटलें व त्यास अशी काळजी पडली कीं, आतां हिला नेण्यास काय युक्ति योजावी? या विवंचनेंत तो गढून गेला आहे इतक्यांत इकडे काय चमत्कार झाला कीं, ती देवळांतून एकाएकीं नाहींशी झाली ! तें प्रधानास कळतांच त्यानें तेथील गुरवास बोलावून आणून विचारलें कीं, ही मुलगी येथें किती दिवस होती व काय करीत असे ? हिला खाण्यापिण्यास कोण देत असे ? तेव्हां त्यानें असें सांगितलें कीं, ही बिलकूल अन्नास स्पर्श करीत नसे व कोणाचेही

हातचें खात नसे. फक्त गंगेचें स्नान पान करी, कदाचित् फलाहार करीत असेल असा माझा अदमास आहे. हिला येथें येऊन सुमारें दीड महिना झाला असावा. ज्या पुरुषानें हिचें मन हरण केलें त्याचे विरहानें रात्रं-दिवस झुरणीस लागली होती. मला एकवेळ असें म्हणाली कीं, मी येथें देवळांत असतें हें कोणासही सांगू नको. जर कोणास समजेल तर मोठें विघ्न येईल. व आपल्यास पाहून ती दुपारीं म्हणत होती कीं, मी येथें अ-सल्याची कुजबूज कोणाला तरी कळली पाहिजे, म्हणूनच हा घाला मजवर येऊन पडला ! पुनः प्रधानानें विचारलें ईचे बरोबर कोणी होतें काय ! आम्हांस तर इची हकीकत कांहींच कळली नाहीं. ही कोठें नाहींशी झाली तिचा शोध करा म्हणजे तुम्हांस चांगलें बक्षीस देऊं, असें हिच्या बापांनीं आम्हांस सांगितल्यावरून आम्ही शोध करीत करीत येथें आलों व तिला विचारूं लागलों, तों तिनें साफ सांगितलें कीं, मला तुम्ही त्रास देऊं नका, व या तिच्या बोलण्यावरून आतां असें वाटतें कीं, तिनें आपले जिवाचा घात तर करून घेतला नसेलना ! नंतर सर्व अरण्य शोधण्यास आरंभ केला. चोहींकडे शोधून शोधून सर्व माणसें थकून गेलीं. सर्व विहीरी, त-लाव सुद्धा शोधून पाहिले, पण तिचा कोठेंच थांग लागेना. त्या रानांत व्याघ्र, सर्प वगैरे हिंसक जनावरें अतिशय असल्यामुळें पुढें होण्यास को-णीही धजावेना. परंतु प्रधानाची आज्ञा शिरसावंद्य सर्वांनीं मानून धैर्य धरून पुढें झाले. सर्व रानभर व्याघ्र, कोल्हे, लांडगे यांच्या भयंकर आरोळ्या ऐकूं आल्यानें माणसांचें काळीज थरथरून जाई. तरी जिवावर उदार हो-ऊन त्यांनीं चोहींकडे शोध केला पण कांहींएक थांग लागला नाहीं. मग सर्वांनीं निराश होऊन प्रधानास येऊन सांगितलें कीं, या अरण्यांत तर कोठें तिचा थांग नाहीं पण कोठें झाडावर अगर झाडाचे ढोलींत असेल तर मात्र सांगवत नाहीं. परंतु राजकन्येचे हातून असें कर्म घडेल हें कांहीं संभवत नाहीं. इतका प्रकार झाल्यावर प्रधान निराश होऊन परत राजाकडे निघून गेला आणि ही झालेली सर्व हकीकत राजास कळविली. हें एकतांच राजाही निराश होऊन त्यानें तपश्चर्येस जाण्याचा निश्चय केला. व कांहीं दिवसांनीं प्रधानास सर्व राज्याचा मालक करून आपला तपश्चर्येस जाण्या-चा निश्चय शेवटास नेता झाला. पुढें कांहीं दिवसांनीं त्याच अरण्यांत एक मोठा यती येऊन राहिला. व रात्रंदिवस निरामय परमेश्वराची स्तुति क-

रून कालक्रमण करूं लागला. एकें दिवशीं रात्रीं असा कांहीं चमत्कार झाला कीं, ती मुलगी देवळांत येऊन तिनें शंकराचे पिंडीवर आपलें डोंकें ठेवलें व मोठ्यानें रडूं लागली व म्हणाली हे दिनोद्धारा ! मीं या देहाचें रक्षण आजपर्यंत केलें, परंतु या भूमीतलावर माझा मोठा भार झाला ! मी मातेचे पोटीं जन्मून निष्फळ झालें व व्यर्थ तिला दुःख दिलें. ज्यास मी आपला प्रियतम म्हणते त्याच्याही सुखाची रांखरांगोळी केली. तो कोठें देशांतरास गेला किंवा प्राणास मुकला हें कांहींच कळत नाहीं. मला तर सुख नाहीं हें उघडच दिसतें आहे. काय हें माझें पातक ! कोठवर दुःख सोसावें ? या माझ्या पातकास योग्य दंड म्हटला म्हणजे, एकदम प्राणनाशच कर, दुसरें आतां तुजपाशीं कांहींएक मागणें नाहीं. अशी ती विलाप करते आहे तों एक मोठा वाघ कीं ज्यास पाहून मोठमोठाले शूर देखील पळून जातील असा तिच्या दृष्टीस पडला. मध्यरात्रीचा अंमल इतका झाला होता कीं, मनुष्याची चाहूल सुद्धां ऐकूं येत नव्हती. अशा वेळीं त्या राजकुमारीची काय स्थिति झाली असेल, याचें अनुमान सुज्ञ वाचकच करतील. पण अशा वेळीं “ यथा बीजं तथांकुरः ” या न्यायाप्रमाणें तो यती तेथें येऊन त्यानें आपले हातांतील दंड त्या व्याघ्राचे काळिजास इतक्या जोरानें दाबला कीं, तो लागलींच तेथल्या तेथें मृत झाला. हें कृत्य राजकन्येनें पाहतांच त्याचे जवळ जाऊन पाय धरलें. आणि म्हणाली, आज आपण माझे प्राण वांचविले. आपण माझे प्राणदाते आहा, तरी रात्रंदिवस आपली सेवा करून दिवस काढावे हा माझा हेतु आहे व तो पूर्ण करणें आपलेकडे आहे. हे शब्द ऐकून तो यती आपले मनांतच चकित झाला व आश्चर्यांत पडला कीं, या अशा घोर अरण्यांत मधुर वाणीनें कोण बोलत असावें ? येथें कोणी तरी भूत, पिशाच्च असावें. माझा तर्क सहसा खोटा होणार नाहीं. असो, पण याचा चांगल्या रीतीनें तपास तर केलाच पाहिजे. मग तिला त्यानें पोटाशीं धरून म्हटलें, येथें हा व्याघ्र पडला आहे तरी येथून आपण पलीकडे जाऊं. जपून ये. नंतर तिनें त्या व्याघ्राकडे पाहिलें व तें भयंकर स्वरूप पाहून एकदम मूर्च्छित पडली. त्या यतीनें त्याचे भोपळ्यामध्यें पाणी होतें तें तिचे नेत्रांस लावून तिला सावध केली. ती सावध होतांच म्हणूं लागली कीं व्याघ्रास भ्यालें नाहीं पण हा पराक्रम कोणीं केला असावा या आश्चर्यानें मला मूर्च्छा आली. तरी हें कृत्य कोणी

केलें हें आपणांस कांहीं ठाऊक असेल तर कृपा करून मला सांगा ? यावर तो म्हणाला, तुला या पंचायतींत पडण्याचें काय कारण आहे. मुकाट्यानें मजबरोबर चल म्हणजे झालें. तिनें सांगितलें कीं, त्याचा शोध लागल्यावांचून मी येथून हालणार नाहीं. एवढ्या घोर अरण्यांत हा व्याघ्र कोणीं मारला ! मला तर आजपर्यंत कोठें असा मनुष्य दिसला नाहीं. व मला मोठें नवल वाटतें, आपण यावेळीं येथें कसें आला ! व आपण जर त्या वेळीं येथें होतां तर आपणास ही हकीकत माहीत असलीच पाहिजे. जर हा व्याघ्र शाळूंके जवळ आला असता तर या देहाची त्याचे जठराग्नीस आहुतीच झाली असती. असो. गोष्ट फसली मोठें वाईट झालें ! आतां या देहाचें सार्थक कशानें होणार ! ही चांगली संधि आली होती पण ती टळली. असें म्हणून दुःखानें तिनें त्याचे घट्ट पाय धरले. त्या यतीनें तिचें नानातऱ्हेचें शांतवन केलें. परंतु ती म्हणाली, मला कांहीं खरें समजल्याशिवाय बरें वाटणार नाहीं. कारण मीं आपले मनांत एक तर्क केला आहे, त्याला सहसा व्यत्यय येणार नाहीं. नंतर त्यानें सांगितलें, लज्जेचें वस्त्र मुखावरून काढ, अशा गोष्टींस लज्जेचें काय कारण ! चल हो माझे पुढें. तिनें पुनः सांगितलें कीं, मी पुढें होईन पण मला खरें काय तें सांगा ? यती म्हणाला, तुझ्या तर्कास मी अनुमोदन देतों म्हणजे झालें कीं नाहीं ! चल आतां असें म्हणून तिचा हात धरून पुढें सरसावला. इतक्यांत गुरव पुढें येऊन हात जोडून म्हणाला, महाराज येथें नुकतेंच एक अरिष्ट आलेलें गेलें. आज हा काय चमत्कार! पूर्वीं एक होतें तें आज दोन झालें. इतक्यांत त्या कन्येनें त्या पुरुषाचा हात दाबला व तेणेंकरून असें सुचविलें कीं, माझें नांव प्रसिद्ध होऊं नये. यती तें समजला व म्हणाला, तुम्हाला मी कोणत्याच संकटांत पाडणार नाहीं. तुम्ही निःकाळजी असा. असें म्हणून ते दोघे चालते झाले आणि तेथें जवळच गंगेच्या किनाऱ्यावर एक मोठी मठी होती तेथें जाऊन राहिले.

---

## भाग ९ वा.

सारी रात्र तेथें काढून उजाडतांच ते उभयतां गंगेवर स्नानास गेले. तेथें

त्यांनीं एकमेकांस पाहतांच परस्परांची खूण पटली व उभयतांचे मनांस कांहीं समाधान वाटलें. पण लज्जा मोठी कठिण आहे. तशांत ती अल्पवयी राजकन्या लज्जेच्या पडद्यानें आच्छादित झालेली त्या यतीशीं कांहीं बोलणें तें किती जपून व बेतानें बोले. व त्या यतीचीही स्थिति तशीच होती. कोणीं जर हें बोलणें ऐकलें असतें तर पाहण्याजोगी मौज होती. परंतु अशा ऐन रानांत पशू व पक्षी यांशिवाय कोण दृष्टीस पडणार ! सर्व निष्फळ. मग त्यांनीं एकेमकांस नीट न्याहाळून पाहिलें व त्यांचे उभयतांचे मनांत इतका कांहीं आनंद उद्भवला कीं, आतां कोणीं तरी एकानें लज्जा सोडली पाहिजे. नंतर त्या यतीनेंच मनाचा निश्चय करून तीस म्हणाला कीं, तूं कोण ? व कोणाची ? व येथें कां आलीस? ही सर्व हकीकत मला सांग ? पण हें एकतांच तिनें रडण्यास आरंभ केला व हात जोडून म्हणाली, एवढी गोष्ट मात्र कृपा करून मला विचारूं नका. येणेंकरून मी तुमची फार आभारी होईन परंतु जसा आपण मला प्रश्न केला तसा माझाही आपणास प्रश्न आहे. तेव्हां त्या यतीनें सांगितलें कीं, याचा जबाब मघाच झाला आहे. कारण दुसऱ्यांनीं आपल्यांशीं कसें वागावें हें आपण वागून दाखवावें लागतें त्याप्रमाणें झालें. हें ऐकतांच ती मनांत चपापली व म्हणाली, यांनीं मला बरेंच पकडलें. असो. हा यती कायदेशीर दिसतो याच्याशीं मोठें जपून वागलें पाहिजे. नंतर त्यास उघड म्हणाली, महाराज, तुम्हीं तुमची हकीकत सांगितलीच पाहिजे. हें ऐकतांच तो म्हणाला, मी यती आहें व माझी हकीकत कांहींएक नाहीं.असो, तूं येथें दररोज काय खात पीत असतेस तें सांग ? ती म्हणाली, मला बैरागिणीला काय खाणें पिणें म्हणजे परमेश्वराचें नांव आहे. तो म्हणाला, तूं तर भुकेनें व्याकुळ झालेली दिसतेस. व तुझे गळ्यांत एक मोत्याचा दागिना दिसतो आहे यावरून तूं कोणाची तरी मोठ्याच्या कुळांतली असावीस असा माझा तर्क आहे. ती म्हणाली, त्याविषयीं आपण माझी पंचाईत करूं नये. यती म्हणाला, या शहरांतील राजकन्या बाहेर फिरावयास निघत असतात तर तूं त्यांच्याकडे जा आणि आपली कांहीं उपजीविकेची तजवीज कर. ती म्हणाली, मीं सर्वांस टाळा दिला आहे, कोणी राजकन्या असोत किंवा कोणी छत्रपती असो, मला कोणाचीच जरूर नाहीं. 'अन्नआच्छादन, हें तों प्रारब्धाधीन, हें साधुवृंदांचें वाक्य कधींही मिथ्या होणार नाहीं. महाराज,

आपण माझेविषयीं बिलकुल काळजी करूं नये. पण येथें गांव तर जवळ नाहीं तेव्हां आपली आजची पुडी येथें कोठें होणार? त्यानें सांगितलें,आमची पुडी आमचे जवळ आहे. असें म्हणून त्यानें आपले झोळींतून कांहीं कंदासारखीं फळें काढून कांहीं आपण खाल्लीं व कांहीं तिला देऊन उभयतांनीं गंगोदक प्राशन केलें. त्या दिवशींचें खाणें त्या उभयतांस इतकें गोड लागलें व मानवलें कीं, देवलोकचें अमृतही त्यापुढें तुच्छ आहे. नंतर त्यानें आपला कपडा तीस देऊन सांगितलें कीं, यावर कांहीं वेळ पडून रहा. तिनें त्याप्रमाणेंच केलें. व यतीही एके बाजूस पडून राहिला. पण अशावेळीं त्या उभतांस झोंप कोठून येणार ? ते चोरट्या चोरट्या दृष्टीनें एकमेकांकडे पाहूं लागले व कृशता व कालिमा यांशिवाय सर्व खुणा पटल्या. मग तिनें विचारलें, आपण दूरदेशीं कोणीकडे चालला आहां ! व आपले पूर्वज कोठें आहेत ? आतां तुम्ही जरी आपली हकीकत सांगत नाहीं तरी येवढें तरी सांगावें त्यांनीं सांगितलें, तें मग सांगेन. पण तूं आधीं सांग कीं, तूं सर्व राज्याची आशा कां सोडलीस ? तुझें कोणीं कांहीं वाईट केलें कीं, काय ? किंवा तूं आतां परत गेल्यापासून तुझे जिवास कांहीं धोका आहे कीं काय ? काय तुला वाटतें तें सांग ? ती म्हणाली, मी कोणाचीही अपराधी नाहीं. ईश्वराची सुद्धां नाहीं मग मनुष्याची कोठून असणार. परंतु माझ्या ऐकण्यांत एक राजकन्येची गोष्ट आली आहे ती जर तुम्ही जाणत असाल तर निष्कपटपणानें खरें मला सांगावें. व तसें जर न कराल तर महापातकास पात्र व्हाल. तेव्हां तो अन्तःकरणांत थरारून म्हणतो, छे, छे, हें काय बोलतेस ? आम्हांस अशा शपथेचें कांहींच कारण उरलें नाहीं. असें तो म्हणतो आहे, तोंच तिनें गंगेचें पाणी त्याचे डोकीवर शिंपडलें. तें पाणी डोकीवर पडतांच त्यास असें वाटलें कीं, आतां मात्र खरें झालेलें सर्व कृत्य कबूल केलें पाहिजे. असा विचार करून अन्तःकरणांत गहिवरून तो म्हणाला, हायरे परमेश्वरा, तुझी लीला मोठी अगाध आहे ! या वेळचा हा हिचा प्रश्न किती मार्मिक गोड व माधुर्ययुक्त स्वरानें तिनें केला, व तो माझे मनास किती मोहक झाला ? हिच्या सर्व अभिनयावरून माझे मनाची नव्याणव हिस्से खात्री झाली, परंतु एका हिश्शानें सांगवत नाहीं. हे दुर्दैवा, आतां तरी माझी पाठ सोड. हा अशा प्रकारें खेद करतो आहे, तों ती त्याच्या तोंडाकडे पाहूं लागली. व नीट न्याहाळून पाहून म्हणाली, आपण भिक्षाटन

करूं लागला हें यतीचें कृत्य नव्हे. तें गोसावी वगैरे लोकांचें कृत्य आहे. बरें जर गोसावी म्हणावें, तर सर्व यतीचीं आयुधें जवळ आहेत. हें म्हणतांच तो किंचित् लाजल्यासारखा होऊन म्हणाला, या वेळीं तूं मला निरुत्तर केलेंस. तुझें वय अल्प असून तूं ढोंगी लोकांस तत्काळ जाणतेस हा तुझ्यामध्यें खरोखर गुण आहे. पण तुझी व माझी स्थिति सारखीच आहे. त्यांत कांहींएक भेद नाहीं. तूंही मला ढोंगीच दिसतेस. कारण तुझ्या विस्मृतीनें तुझ्या गळ्यांत हीं मोतीं राहिलीं ही चांगली साक्ष होते. व तुझें मन फार उदास दिसतें व याचें कारण जरी तूं सांगत नाहींस तरी तुझें मन कोणी तरी पुरुषानें हरण केलें असावें असें तुझ्या कृतीवरून स्पष्ट होतें. आतां या तुझ्या पोषागावरून लोक खरोखर फसतील पण हें कृत्य जो कोणी ज्ञाता जाणील तो खरोखर तुला कधींही मोकळें सोडणार नाहीं. बरें, आतां येथून तूं कोठें जाणार ?

॥ पद ॥

( मी तप्त जरी मदनशरें विनय सोडुं कां या चालीवर. )
वेधियलें चित्त कसें सुगुण सुंदरा,
गोड गोड बोलुनि मशीं मोहिलें धिरा ॥ ध्रु० ॥
स्वभाव शांत न दे अंत धीर वीर खरा,
लोकुनि अधिर मनीं स्थिर झालें प्रियकरा ॥
असुनि नार त्यांत फार तव पदीं शिरा,
ठेऊनि आतां देई मता भाष्य ती वरा ॥ १ ॥
गौर वर्ण कांति शोभे ती बरी,
रम्य रूप सौम्य स्वरूप नसे दया उरीं ॥
समज मनीं उमज आतां दृढता धरी,
देवरहित जन्म तुझा त्यागिलें क्रूरा ॥ २ ॥ वेधियलें० ॥
काय वदूं फसली गोष्ट चतुर तूं नरा,
तुजविण अन्य मला नाहीं आसरा ॥
कवणा कथुं दुःख हें सांग सुंदरा,
लाविलीस आग कशी मम हृदयमंदिरा ॥ ३ ॥
विद्या ही भूषण सम शोभे तुज जरी,
दया तुला मजविषयीं नाहीं अंतरीं ॥

तव हृदयीं वस्तीशी कशी शुद्ध कातरी,
निष्ठुरता सोड सख्या सदय मन करा ॥ ४ ॥ वेधियलें० ॥
किती विनवूं या समयीं मन्मनोहरा,
शोभतसे चंद्र जसा अंबरीं बरा ॥
तुजाविण हा जीव माझा होत घाबरा ॥
नामा सम त्याग कृति भुवन सुंदरा ॥ ५ ॥ वेधियलें० ॥
या कवना ऐकुनिया माझे मंदिरी,
हरिहर हें एकची पण ब्रह्मरूप धरीं ॥
तव भेटी दुर्मळ परी झालें घाबरी,
जन्हू ते वच देई तीस उद्धरा ॥ ६ ॥ वेधियलें० ॥

॥ ईश-भजन ॥

अभिनंदनीय गोष्ट खरी परि निवारणीय दुःख दरी ॥
हरिनाम घ्या तुम्ही स्वतः भव दुःख हरील तत्त्वतां ॥ १ ॥
हा वेष आहे मला बरा, परि जाणतसे चतुर खरा ॥
मम भाग्योदय होय जरी, तरि मारि दुष्ट तुष्ट करी ॥ २ ॥

॥ पद ॥

पूर्ण करी मम वासना, हरि इष्ट करी मम वासना ॥ पुरवीं मनांतील कामना ॥ ध्रु० ॥ आशय माझा जाण तूं देवा, तव चरणीं निरंतर भावना ॥ १ ॥ पूर्ण० ॥ पति सुधाकर कोठें मी पाहूं, त्या विरहित आज कैशी मी राहूं ॥ त्याविण जनीं मनीं हासना ॥ २ ॥ पूर्ण० ॥ करद्वयातें जोडुनि किंकरी प्रार्थित गंगा निशिदिनीं अंतरीं, तोडी शररिपू आहिक वासना ॥ ३ ॥ पूर्ण० ॥

ती म्हणाली, जिकडे आपण जाल तिकडेच मी जाणार. आतां मी आपली पट्टशिष्यीण झालें असें समजा. तो म्हणाला, असल्या शिष्यिणीस केव्हांच पळवून नेतील. असली शिष्यीण बाळगणें म्हणजे आपलें स्वतःचे जिवास अपायच करून घेणें म्हटलें तरी चालेल. आतां ओढून ताणून चंद्रबळ आणण्यांत अर्थ नाहीं. या रानांत तुला कोणीं आणून सोडिलें किंवा तूं स्वतः आलीस हें सांग? तुला पाहून माझे मनांत नाना तऱ्हेच्या कल्पना उद्भवल्या आहेत, तर हे सुकुमारी! तूं इतकी नाजूक व सुस्वरूप असून तुला या रानांत येण्याचें काय कारण पडलें? किंवा तुजवर कांहीं मोठें संकट आलें! किंवा तुझा कोणी विश्वासघात केला हें सर्व मज-

विषयीं कोणत्याच प्रकारचा अंदेशा मनांत न आणतां काय तें सांग ? मी तुजविषयीं सदैव सप्रेमभरित आहें. तुझें कल्याण व्हावें व तुला सुख मिळावें हेंच माझें मन चिंतित आहे. आतां माझे हातून कांहींएक अनन्वित कृत्य केव्हांच घडलें असतें, पण विचारा सारखी दुसरी गोष्ट नाहीं हें मनांत आणून मी स्वस्थ बसलों आहें. पुरुषांचें मन मोठें चंचल असतें पण माझी स्त्री जिला मी आपल्या मनानें वरली तिच्याशिवाय या दुनयेंतील सर्व अन्य स्त्रिया माता, भगिनी समान आहेत असा या मनाचा निश्चय असल्यामुळें तुझ्याशीं भाषण करतों तें सुद्धां फारच बेतानें करतों. तूं चतुरच आहेस, तेव्हां यांत सर्व समजलीच असशील. इतक्या भाषणांनीं एकमेकांच्या खुणा पटल्या व तें एकमेकांचे अंगास स्पर्श करण्याचे बेतांत आहेत इतक्यांत तेथें राजाचे दोन हुजरे आले आणि म्हणाले, तुम्ही दोघे कोण आहांत व येथें काय म्हणून बसलांत तें सांगा ? हें त्यांचे काळासारखे शब्द ऐकतांच ते म्हणाले, आम्ही वाटसरू आहोंत. वाट चालतां चालतां येथें मध्यें गंगेवर फराळ वगैरे करून पाणी प्यालों व स्वस्थ विश्रांति घेत बसलों आहोंत. तुम्हीं आम्हांस उपद्रव द्यावा असें आमचे जवळ कांहीं एक नाहीं. हें ऐकून ते म्हणाले,कांहींही असो तुम्ही आमचेराजाकडे चला.त्यांनींसांगितलें, आम्हांस राजाकडे येऊन काय मागावयाचें व काय करायचें आहे ! आम्ही स्वेच्छाचारी बैरागी लोक, आमच्या वाटेस तुम्हीं जाण्याचें कारण नाहीं. प्रथम परोपरीनें विनवण्या करून व शेवटीं रागानें निक्षून सांगितलें कीं, आम्हाला राजाकडे येण्याचें कारण नाहीं व आम्ही येणारही नाहीं. आम्ही काय आज येथें तर उद्यां दुसरे गांवीं. यावर ते हुजरे त्या यतीस म्हणाले, तुम्ही जर इतके साधू आहांत तर मग ही सुंदर पोर तुमचे जवळ कोण आहे ? ती म्हणाली, मी ही वाटसरूच आहें. हुजरे म्हणाले, असलेच वाटसरू लोक मोठमोठीं ढोंगें माजवतात आणि सुंदर स्त्रिया पळवून नेतात. या ढोंगांत काय अर्थ आहे ! जे खरें महात्मे साधुवृंद आहेत ते दरी खोऱ्यांतूनच रहातात. पण तूं अशा ठिकाणीं येऊन ढोंग्याशीं विषयोपभोगेच्छा पुरी करण्याचें मनांत आणलें आहेस काय ! चल आमच्या राजाकडे ! तुम्ही जर न याल तर आम्ही बलात्कारानें नेऊं. येता कीं नाहीं ! कां तुम्हांस सवाई सोटाच पाहिजे. त्या शिवाय वठणीस येणार नाहीं ! ठीक आहे, तर. चल उठ असें म्हणून ते दोघे त्या यतीचे अंगावर चा-

लून गेले. हें पाहून ती मुलगी लटलटा कांपूं लागली आणि म्हणाली, हे परमेश्वरा, मी आजचा दिवस कांहीं आनंदाचा समजत होतें, पण तो तुला सहन झाला नाहींना ? भगवदिच्छा मोठी बलवत्तर आहे. आतां यांच्या मनांत आम्हाला राजापुढें नेऊन आमचे काय हाल वनवास करावयाचे आहेत न कळे ! हे नशिबा, आतां सुख भोगण्यास तयार हो. नंतर त्यांचें आर्जव करून म्हणाली, अहो महाराज, आम्ही तुमच्या पायां पडतों आम्हांस तिकडे नेऊं नका. असें म्हणून तिनें त्या हुजऱ्यांचे पाय धरले. पण दगडासारखीं ज्यांचीं काळिजें त्यांस दया कोठून येणार ! त्यांनीं त्या दोघांस जबरदस्तीनें गचांड्या मारून राजापुढें आणून उभें केलें. व राजाचे कानीं लागून त्यास कांहीं गुप्त मजकूर सुचविला. तेणेंकरून त्या राजाचे मनांत कामवासना उत्पन्न झाली व त्यानें त्या मुलीस एकांतीं नेऊन विचारलें. तूं कोण ! कोणाची ! व येथें कशी आलीस ! व यांत तुझा हेतु काय ? हें मला सर्व स्पष्ट सांगितलें पाहिजे. तिनें हात जोडून खरी हकीकत काय होती ती सर्व सांगितली. ती हकीकत ऐकून तो ढोंगी यती मोठा चकित झाला आणि मनांत म्हणाला मी जिचें रात्रंदिवस चिंतन करतों तीच ही खास यांत संशय नाहीं. पण मीं हिला विचारलें तेव्हां हिनें निक्षून सांगितलें कीं तुम्ही मला कांहीं विचारूं नका व मीही सांगणार नाहीं आणि आज सहजीं थोड्या आयासानें हा मजकूर सांगून मला ऐकविला. याचें नांव माझेंच दुर्भाग्य दुसरें काय ! मी असा कर्म करतां मुळींच जगांत आलों नसतों तर बरें झालें असते किंवा झालों तेव्हांच मेलों असतों तरीही बरें होतें व जगांत अशी अपकीर्तिही झाली नसती, असो परमेश्वरी इच्छा जशी असेल तसें होणार ! द्यावें तैसें घ्यावें,—असें म्हणून डोळ्यांतून टपटपा आश्रुपात ढाळीत राजास म्हणतो, हे सत्ताधीश भूपति महराज या कन्येविषयीं आपण जी कांहीं इच्छा धारण केली आहे ती सोडून द्यावी. कारण चार लोकांदेखत जरी नाहीं तरी परस्परांचे मनानें आमचा विवाहसंबंध झाला आहे. परस्त्रीचा अभिलाष करणें म्हणजे विस्तवाचे घरांत जाऊन पडणें, किंवा आपले घरांत सर्प बाळगणें अथवा बलाढ्याशीं स्पर्धा करणें या सारखें अनर्थकारक आहे. राजा, तुझे पायांवर सर्व न्याय लोळतात. त्याप्रमाणें प्रजेचें पुत्राप्रमाणें पालन करणें हा तुझा धर्म, साधुवृंदास सौख्य देणें हा तुझा राज्याचा ध्वज.तर तो

ध्वज तूंच पाडण्यास कां तयार झालास ! निंद्य गोष्ट सर्वथैव सोडून दे व शुद्धीवर ये. अशी वाईट गोष्ट मनांत बाळगणें हें अनर्थाचें मूळ आहे. डोळे उघड. मजकडे पहा व मी कोण आहें ओळख. तुला पाहून मला तूं साहाय्य करशील असें वाटलें होतें, पण तें तर एकीकडेच राहून उलट तूं माझा शत्रू होण्यास पाहतोस काय ! जर तुझी इच्छा असेल तर माझ्या सत्यनिष्ठपणाचा अनुभव तुला एक रात्रींत दाखवितों. तुझ्या मुखचर्येवरून तुझा हेतु स्पष्ट कळून येतो. हें सर्व त्याचें बोलणें ऐकून राजा म्हणाला, तूं गोसावी असून गरीब भिकारी मनुष्य नसावास असें वाटतें. हे तुझे शब्द मोठे ऐश्वर्याचे व गंभीरपणाचे ऐकून माझे मनास धक्काच बसल्यासारखा झाला. तर तुझी खरी हकीकत काय असेल ती सांग. नाहींतर या तलवारीनें तुझे राई राई एवढे तुकडे करून टाकीन. बोल. तूं कोण आहेस ! असें म्हणून राजानें म्यानांतून तलवार उपसून एकदम त्याचे अंगावर तो धांवला. हें त्या यतीनें पाहून त्या राजास दोन्ही हातांनीं दाबून युक्तीनें ती तलवार त्याचे हातांतून काढून घेतली, पण हें पाहून सर्व लोकांत गलबला होऊन दहावीस लोक एकदम येऊन त्यांनीं त्या गोसाव्यास धरिलें आणि म्हणाले, अरे दुष्टा अधमा; आज तूं राजास थोडकें चुकलें नाहींतर ठार मारलें असतेंस. आम्ही आलों नसतों तर तूं या खड्गदेवतेस राजाची आहुती खरोखर दिली असतीस. अरे मूर्खा, थोडा विचार करायचा होतास कीं, ज्यावर मी चालून जातों त्याची योग्यता काय ! मी यःकश्चित् मनुष्य हें काय कृत्य करतों, याचें तुला धोरण कसें नाहीं ? गव्हारा ! नीचा, तुझे अंगांत सामर्थ्य असेल तर असा पुढें ये. प्रथम आम्हांशीं चार हात कर, मग राज्याकडे वळ. तुझें डोकें इतकें कां खवळलें हें आम्ही जाणतों ! सुंदर पोर पाहून तिला आपली बायको म्हणतोस व राजा तिचा अपहार करील म्हणून हें कृत्य आरंभिलेंस काय ! विचार कर विचार कर. अविचारानें वागशील तर फसशील हें तुला पुनः सांगतों. स्त्रीपुरुषांचे संबंधानें आजपर्यंत या जगांत किती घात व मोठे मोठे अनर्थ झाले आहेत ! नंतर त्यांत एक वृद्ध होता तो म्हणाला, तूं गोरागोमटा यती असून मोठा शूर दिसतोस, पण राजाचे बरोबरीनें भाषण करतोस हें तुला योग्य नाहीं. कारण तुझ्या स्थितीकडे पहा. व माझ्या दाढीकडे पाहून माझे सांगण्याप्रमाणें तूं ऐकावेंस हें उत्तम आहे. हें ऐकून राजा

म्हणाला, तूं कोण आहेस ! व येथें उपदेशाचें काय काम आहे ! अंगांत धमक असेल तर पुढें युद्धांस कोणाला पाहिजे त्याला येऊंदे. हें राजाचें भाषण ऐकून गोसावी म्हणाला, माझे जवळ जरी युद्धसामुग्री तयार नाहीं तरी मी युद्ध करण्यास तयार झालों असतों. मग त्यांत काय होईल तें होवो. पण तूर्त मी मरण्यास तयार नाहीं. कारण या सुंदरीसाठीं मीं सर्व दुनिया तुच्छ मानिली, सर्व राज्याचा त्याग करून वनवासाचा बोजा शिरावर घेतला. तिच्याशीं मला एकवार थोडें एकांत भाषण करावयाचें आहे व तेवढें झालें म्हणजे मग मला तुम्ही येथेंच पाहिजे तर खुशाल यमसदनास पाठवा. जरी आपण मला इतका त्रास देतां तरी या सुंदरीकडे पाहिलें म्हणजे माझे सर्व दुःखाचें विसर्जन होतें. इतकेंच नाहीं, तर इजकडे पाहतांच सुखसमुद्रांतील लाटेंत मी निमग्न होऊन जातों. आतां या सुंदरीचे तोंडांतून कांहीं शब्द ऐकण्याची जी माझी इच्छा आहे, ती तुमच्या कृपेनें परिपूर्ण होवो म्हणजे या देहाचें साफल्य झालें व मग या देहांतून माझा प्राण गेला तरी चिंता नाहीं. आई, बाप, मित्र, धन व दौलत सर्व या सुंदरीसाठीं सोडून रानोरान गांवोगांव उदासीन मनानें एकनिष्ठ होऊन फिरत होतों तों दैवयोगानें या सुंदरीची व माझी गांठ पडली, इतक्यांत यमदूतासारख्या या तुमच्या हुजऱ्यांनीं मला येथें आणलें. " दैवो विचित्रा गतिः " आपण एक चिंतावें व होतें भलतेंच. हा दैवाचा योग व जगाची राहटी पाहून मोठ्या अचंब्यांत पडलों. पण इतकेंही असून आजपर्यंत माझे हातून कधींही कांहीं पातक घडलें नाहीं ह्याचें मला भूषण वाटतें व माझी स्थिति सदैव अशीच राहो इतकीच ईश्वराजवळ माझी प्रार्थना आहे. हें सर्व भाषण ऐकून राजाचें मन जें त्या स्त्रीविषयीं इतकें चंचल झालें होतें, तें नाहींसें होऊन त्यास वाटूं लागलें कीं, ही परस्त्री आहे इजवर इच्छा ठेवल्यानें मला देहांत प्रायश्चित्तच घेतलें पाहिजे. शिव ! शिव ! आज केवढें पातक जोडण्यास मी तयार झालों होतों ! आपले देहास आपलेच हातानीं अग्नि लावून जाळून घेत होतों ! पण हा कोणी तरी मोठा राजा अथवा बलाढ्य योद्धा असावा खचित. कारण जीं जीं मीं त्याचे तोंडांतून भाषणें ऐकलीं तीं साधारण गरीब मनुष्याचे तोंडांतून कधींच निघावयाचीं नाहींत. कदाचित् हा सार्वभौम राजाही असेल. याच्यासारखी चेहऱ्याची ठेवण, बोलण्याचें गांभीर्य व सौंदर्य माझ्या आजपर्यंत पाहण्यांत आलें नाहीं.

ही याची सौम्य मुद्रा पाहून याचे गुणही अलौकिक दिसतात.व याचें वृत्त मोठें एकनिष्ठपणाचें खरें दिसतें त्यापेक्षां हा कोणी तरी मोठ्या कुळांतील उत्पन्न झालेला असावा यांत संशय नाहीं.अशी मात्रा त्याचे अन्तःकरणांत पोंहचतांच मोठ्या नम्रतेनें तो म्हणाला, गोसावीबोवा, आपण थोडे खालीं बसा, शांत व्हा आणि या कन्येशीं तुम्हास काय बोलावयाचें असेल तें बोलून घ्या, आजची रात्र तुम्हास बक्षीस दिली आहे. उद्यां सूर्योदयानंतर तुमची चौकशी करून मग काय करणें तें करूं. पण जें बोलाल तें विचारानेंच बोला व त्याचा प्रत्यय आणून द्या. असें जर न कराल तर तुम्हाला जन्मभर तुरुंगांत बसावें लागेल. हें ऐकून गोसावी म्हणाला, आपले माझ्यावर फार उपकार आहेत. आपली एवढी परवानगी जन्मसुखाची मिळाली असें मी समजतों. जरी आपलें मन-इतकें भैकून गेलें होतें, तरी ज्याचे गुण उत्तम तो आपले पूर्वस्थितीवर आल्याशिवाय कधींच राहणार नाहीं. थोरांचीं सर्व कृत्यें थोरच असतात. आतां या माझ्या बोलण्यानें आपणास मी आपली स्तुति करतों असें वाटेल, पण मी स्तुतिपाठक मुळींच नव्हें. एकनिष्ठ परमेश्वराचा भक्त आहे. व असेही दुनयेंत शेंकडों असतील. यःकश्चित् पामर मी.मीं आपली थोरवी काय म्हणून वर्णन करावी.ती आपली आपणासच योग्य आहे. असें बोलून राजास जाण्याची आज्ञा मागितली. त्यानें सांगितलें, आमच्या पलीकडच्या तंबूंत आपण रहा. तेथें आपल्यास कोणीही त्रास देणार नाहीं. आपली सर्व व्यवस्था राहील, असें म्हणून त्यास स्वतः मार्ग दाखविला व ते दोघे तिकडे गेले. राजानें आपले स्वतःसारखी सर्व त्यांची व्यवस्था ठेवली व साऱ्या रात्रभर तेथें नागव्या तलवारीचा जय्यत पाहरा ठेवला. आणि पाहरेकऱ्यांस सक्त ताकीद दिली कीं, या दोघांस बाहेर कोठें जाऊं देऊं नका. आज्ञेशिवाय जातील तर बेलाशक पकडून मजकडे घेऊन या. पहारेकऱ्यांनीं राजाज्ञेप्रमाणें सर्व व्यवस्था ठेवली. ते दोघे तंबूत गेल्यावर परस्परांकडे प्रेमदृष्टीनें पाहूं लागले. मग गोसावी म्हणाला, हें असें साहस करणें बायकांस अगदीं अयोग्य आहे. तारुण्य आणि सौंदर्य हीं जवळ असल्यावर साधारण मनुष्यही मोहित होतो, मग राजे वगैरे होतील यांत नवल तें काय ? आज मी कृतकृत्य झालों. हे चारुगात्री, आतां मात्र तुजविषयीं शंका उरली नाहीं, आतां उशीर कां करतेस ? असें म्हणून तिचा हात धरावयास पुढें झाला. इततक्यांत तिनेंही आपले मनांत

विचार केला कीं, सर्व गोष्टी मनाप्रमाणें जुळून आल्या व हा वेळ आतां युगासारखा वाटतो, तर आतां आनंदांत निमग्न व्हावें हेंच बरें. व्याघ्रांबर पांघरून खरें स्परूप लपलें जात नसतें. तथापि याला बायकोपणा थोडा दाखवावाच, असें म्हणून किंचित् वरचें स्वरूप प्रगट केलें व म्हणाली, आपण माझा हात धरण्यास कां इच्छिता ? आपण कोण व मी कोण ? एखादी स्त्री पाहिली, कीं तीच आपली बायको, हें म्हणणें रास्त होणार नाहीं. आपला हेतु कदाचित् तसा असेल पण माझा उद्देश समजल्या-शिवाय माझा हात धरण्यास कसें धजावतात ? विचार करा; माझे भ्रतारा-शिवाय मला या दुनेयतील सर्व पुरुष पिता, बंधूसम आहेत. तरी आपण मला माझे संबंधाची कांहीं खूण सांगा, नाहींतर असले ढोंगी धत्तुर बाय-कांस भुलविणारे आणि फसवून घेऊन जाणारे पुष्कळ असतात. तो म्ह-णाला, हे सुंदरी, आतां अन्त पाहूं नको ! तुजवांचून मी जो तृषित, त्याला अन्तःकरणापासून गाढ आलिंगन दे, विलंब करूं नको. हें ऐकून ती म्ह-णाली, काय हें वेड्यासारखें भाषण ? हें आपल्यासारख्यांच्या मुखांतून निघणें म्हणजे केवढें लांछन आहे ! आपण आपला हेतु सफल करण्या-साठीं किती तरी अन्तःकरणपूर्वक झटता. पण आपण जी समजता, ती मी नव्हें. मला कांहीं त्रास झाला म्हणूनच मीं आपल्यास सानुकूलसें त्या राजापुढें भाषण केलें. पण तें खरें नव्हे. गोसावी म्हणाला, कधीं कधीं थट्टेमध्येंही खरें निघतें. असो. तुझें सर्व मघाचें बोलणें खोटें कीं काय ! तर मग माझ्या या वाणीला व मनाला धिःकार असो. हे सुंदरी माझे म-नावर आज पडदा पडला काय ? किंवा माझे डोळे अंध झाले ! छे, छे, तसें होणार नाहीं. व्यर्थ नाहीं म्हणून माझे देहास विनाकारण कष्ट कां देतेस ! जर मी म्हणतों तसें खरें नसेल तर, हे माझे नेत्र व हा माझा उजवा हात यांचीं शतशः खंडें होऊन तुजपुढें पडोत ! आणि या देहांत आत्मा आहे तोही लयास जावो. केवढा मीं तुझा अपराध केला ! खरोखर याला देहांताशिवाय दुसरें प्रायश्चित्तच नाहीं. तूं परस्त्री आहेस, हें माझ्या म-नानें हा कालपर्यंत कधींच घेतलें नाहीं. असो ! आतां सांगणें इतकेंच कीं, तूं आणि मी अगदीं निरिच्छ या नात्यानें आजची सारी रात्र या तं-बूंत काढूं व उदईक राजाज्ञेप्रमाणें करणें जरूरच आहे. पुनः ती म्हणाली, ही गोष्ट मी तुम्हास राजाचेसमोरच सांगणार होतें. पण असें सांगितल्यानें

कदाचित् तुम्हावर कांहीं अनर्थ गुजरेल सबब सांगितलें नाहीं. कारण आपण हें मोहक स्वरूप धारण केलें आहे. अथवा ही ईश्वरी देणगी त्याला तुमचा तरी काय उपाय आहे. खरोखर कामी स्त्रियांस मदनासारखे भासाल यांत संशय नाहीं. खरोखर ईश्वरानें एकांत पाहून मनोत्साहानेंच ही मूर्ति घडली असेल. माझें मन इतकें एकाग्र झालेलें पण तेंही डळमळूं लागतें. राजास आपण राजपुत्र आहा, अशी कांहीं बातमी समजलीसें वाटतें. आपण जर राजपुत्र असाल, तर आपणास वरणारी ही कोणी तरी राजकन्याच असली पाहिजे. दुबळी, अनाथ व मूढ अशी स्त्री असून काय उपयोग ! जशास तसेंच असलें पाहिजे म्हणजे त्या सौख्यांस अन्तपार नसतो. शालेस पटकुराचें ठिगळ याप्रमाणें मी आपणास शोभत असेन. आपण जें मनांत आणलें, तें निरर्थक आहे. तरी मजविषयींचे सर्व विचार निर्मळ धुवून टाका. हें शब्द ऐकतांच त्या गोसाव्यास मोठा पश्चात्ताप झाला व वाटलें कीं, स्त्री जातीनें मला अशा गोष्टी शिकवाव्या इतका मी विचारशून्य आज झालों काय ! मग त्यानें तीस उघड सांगितलें कीं, तुझ्या सर्व गोष्टी निरर्थक आहेत. माझ्या गोष्टीस आधार आहेत ते सांगतों, ऐकून घे. शिवरात्रीचे दिवशीं एका तलावावर दुसरे पाळीस आम्रवृक्षाखालीं सख्यासह बोलत असतां ज्याचें मन पाशबद्ध केलेंस तोच मी. ही खुणेची गोष्ट पटतांच परस्परांनीं एकमेकांस मिठ्या मारल्या व ती सारी रात्र मोठ्या सुखांत आनंदानें घालविली. आतां तिकडे राजाचा प्रकार काय झाला तो पाहूं.

राजास सारी रात्र झोंप म्हणून बिलकूल आली नाहीं. त्यास वाटलें अशी सुंदर स्त्री आपण कधींच पाहिली नाहीं. तशांत इच्या बापाचें नांव ऐकून व इचें रूप व गुण पाहून इजवर माझें अमोल्य प्रेम जडलें. मीं इच्या विवाहाची गोष्ट मुळींच ऐकली नाहीं. परंतु तो सर्व आपली हकीकत सांगतो आणि ती पोर निमुटपणें ऐकून घेते हें काय नवल आहे ?! जर ही स्त्री त्याची आहे, तर हा एवढा नामांकित असून ही गोष्ट कोणासच कां माहित नसावी ? काय असेल तें असो; पण यांत कांहीं तरी कपट आहे. सुंदर स्त्री पाहून तिजवर मोहित होणें, हा पुरुषांचा साहजिक मनोधर्म आहे. बरें पण त्या राजकन्येची हकीकत आलीकडे मुळींच कळली नाहीं. परंतु अजारी असून घरांतून निघून गेली व तिचा शोध नाहीं

एवढी बातमी मात्र प्रधानाकडून समजली होती. असो. ही कुमारी तर अविवाहित खास आहे, मग बलात्कारानें ईस आपण हरण करणें हें आपलें कर्तव्यकर्मच आहे. अशा सुलक्षणी स्त्रीकरितां राज्य गेलें तरी हरकत नाहीं. राज्याला घेऊन काय करावयाचें आहे. जन्माचें सार्थक हेंच कीं मनोवांच्छा सफल करणें. सुंदर स्त्रीचे सहवासानें स्वर्गही नजीक होतो व मनाप्रमाणें स्त्री नसेल तर तें मन कुत्र्यासारखें जिकडे तिकडे भेकून जातें. वस्तुतः जो सुगर, समंजस व आपले सुखास नेहमी अनुसरून असणार त्याचा पायाच बळकट असतो. त्याच्या अकलेपुढें कोणाचाही घोडा घातला तरी जाणार नाहीं. अचल वारूवर बसून सुखाचा लगाम ज्याचे हातांत आला, तो वाऱ्यासारखा शत्रूस हटवून प्रसंग पडेल तसा वागून आपल्यास या जगांत कांहींच अलभ्य नाहीं, सर्व लभ्य आहे, असेंच करील. कारण तो विचार केल्याशिवाय मुळींच एक पाऊलही टाकणार नाहीं. असो, अशा प्रकारें राजाचे मनाची स्थिति अगदीं पालटून गेली. तो विचार करूं लागला कीं, माझें मन या स्त्रीवर एवढें जडलें, ह्यांत काय नवल? कारण, ती जशी रूपगुणसंपन्न आहे, तसा मीही आहें. आतां यांत वैगुण्य इतकेंच कीं, मी तिचें खरें मन काय आहे, तें जाणत नाहीं. मागें मी इलाच एकवार वरण्यास गेलों होतों पण हिनें मला नाकारलें होतें. पण आजचा हा सुदिन ईश्वरानें दाखविला. आतां ही अबला कोणीकडे जाते व तिला कोण आधार देतो? तें पाहून घेईन. असो, आतां असें केलें पाहिजे कीं, त्या यतीस परस्परेंच कैद करावा, किंवा नजरकैदेंत ठेवावा व त्या योगें या मुलीची काय अवस्था होते ती पहावी. कदाचित् दुःखानें कां होईना, पण ती मला खचित वरील असें वाटतें. ठरलें. आज उजेडतांच त्या दोघांस येथें आणलेंच पाहिजे. इतक्यांत पांचाचा अम्मल झाला. अरुणानें आपली प्रभा पसरली. पक्षी किलकिल शब्द करूं लागले. सारस उडूं लागले. चंडोल व रावे सुस्वर स्वरानें गाऊं लागले, चोहींकडे थंडगार वारा सुटला. सर्व साधुवृंद व मोठमोठे एकनिष्ठ ब्राह्मण भजन करीत, गात व भूपाळ्या म्हणत ईश्वराचें मधुरवाणीनें नामस्मरण करीत रस्तोरस्तीं चालूं लागले. कोणी सुंदर स्त्रिया शिरावर सुंदर उदकानें भरलेले कलश घेऊन आपले घराकडे जाताहेत. कोणी पाणी आणण्याकरितां रिक्त कलश घेऊन जाताहेत व त्यांचीं मुलें आईबरोबर जाण्याविषयीं हट्ट घेऊन

रडताहेत, याप्रमाणें जगराहटी सुरू झाली. कोणी गायन करूं लागले अशा वेळीं सूर्य आपला सुवर्णशेला पांघरून कांहीं उघड, कांहीं आच्छादित, असे आपले कोंवळे किरण पृथ्वीवर पसरीत आहे. व तेणें करून सर्व मनुष्यांचे चेहऱ्यांवर टवटवी दिसून ते आपले कामावर जाण्याकरितां चलाखीनें तत्पर होताहेत. इतक्यांत राजसेवक येऊन त्या दोघांस घेऊन पाहऱ्यावर आणून ठेवलें. नंतर राजानें आपलें प्रातःकालचें नित्यकर्म आटोपून सिंहासनावर आला व त्या दोघांस कचेरींत आणण्याविषयीं हुकूम केला. हुकूम होतांच दूतांनीं त्या दोघांस राजापुढें आणून उभें केलें. राजानें त्यांस पाहतांच प्रथम त्या यतीस कैद करा असा हुकूम केला. व त्याप्रमाणें तो गेल्यावर त्या मुलीस जवळ बोलावून विचारलें कीं तुझा व या मनुष्याचा विवाह झाला आहे काय ? असल्यास कोठें व कोणी केला हें सत्य स्मरून सांग. व हें जर तूं न सिद्ध करून देशील, तर या जगांतील सर्व सुखांस मुकलीस असें समज. विचार कर; तुजमध्यें सर्व गुण असतां, हें साहस करण्यास कशी प्रवृत्त झालीस ? यःकश्चित् मनुष्याकरितां, तूं आपले जीवावर इतकें उदार व्हावेंस हें अनुचित कर्म होय ! मला तर या गोष्टीचा विचार करितां मोठें आश्चर्य वाटतें ! आमच्या सारखे राजे लोक तुला अनुकूल असून तूं अज्ञान सागरांत गटंगळ्या खात कां पडलीस ! तिनें हें सर्व बोलणें ऐकून घेऊन ती म्हणाली, महाराज, आपली बुद्धि माझेविषयीं अशी होईल असें मला काल अगदीं वाटलें नव्हतें ! पण रात्रींतून आपले मनास एवढा फेर पडला हें मला मोठें नवल वाटतें ! राजेसाहेब, मी आपली धर्माची कन्या असून, काय ही आपली दृष्टि ! माझें लग्नाविषयीं जर विचाराल तर, इतकेंच सांगतें कीं, या मनुष्याची व माझी दृष्टादृष्ट होतांच माझे मनानें मीं यास माळ घातली आहे व हें मीं आपल्यास यापूर्वीं कळविलें आहे. आपल्यास तें स्मरत असेलच. आतां मजविषयींचा आपला उद्देश काय आहे, हें मी जाणतें. तथापि ती गोष्ट मी जीवंत आहे तोंपर्यंत कधींही होणार नाहीं. आपण थोर आहा विचार करा. मीं स्त्रीजातीनें आपणास ज्ञान शिकवावें असा प्रकार मुळींच नाहीं. पण राजा थोडा विचार कर तुझे पूर्वज आजपर्यंत कसें चालत आले त्यांचा कित्ता घेऊन त्याप्रमाणें वागणें हेंच तुला योग्य. आडमार्गांत कांट्याकुट्यांत कां शिरतोस ? ! जो सरळ रस्ता सोडून आड

मार्गानें जाण्याची इच्छा करतो, त्याचा परिणामही वाईट होतो. आजपर्यंत जे या पृथ्वीतलावर मोठमोठे बलाढ्य राजे होऊन गेले, त्यांची स्थिति पहा. रावणराजा, इंद्र, चंद्र, बृहस्पति यांची काय स्थिति झाली त्याचा विचार कर. तू यःकश्चित् प्राणी तुझी दशा काय होईल हें कांहीं तूं जाणलेंस काय ! परस्त्रीच्या नादानें मोठमोठे धुळीस मिळाले हें तूं पुष्कळ ऐकलें असशील. तरी डोळे उघड सावध हो. ज्यास एकवार वचन दिलें, त्याकडे लक्ष देणें हेंच तुझें काम आहे व तें जर न करशील तर पश्चात्ताप पावल्यावांचून रहाणार नाहींस ! हें कृत्य तुला प्रथम सुखावह वाटतें, पण याचा परिणाम तूं जाणत नाहींस. राजवंशांत उत्पन्न होऊन सर्व राजरीतीस विसरलास हें बरें नव्हे. या तुझ्या आचरणावरून तूं खरा राजपुत्र आहेस किंवा नाहींस याचा सुद्धां आंदेशा वाटतो ! राजपुत्राचें एकही लक्षण तुजमध्यें नाहीं ! आतां तुला वाटेल कीं, मी अधिक प्रसंग करून बोलतें, तर मी आतां या जिवावर उदार झालें आहे ! तूं सत्ताधीश आहेस, तार किंवा मार. आतां माझी कांहीं इच्छा उरली नाहीं. रात्रीं पतीची गांठ पडल्यामुळें, माझ्या सर्व दुःखाचें विसर्जन झालें. त्यांचे समक्ष तूं माझा जीव घेतलास, तरी त्यापासून मला बिलकूल दुःख वाटणार नाहीं ! पण, हात जोडून एवढेंच सांगतें कीं, ज्यानें माझेकरितां सर्व सौख्याचा त्याग केला व या अभागिणीकरितां आपले देहाची देखील परवा न करितां सर्व दुःखें स्वीकारिलीं त्यास मात्र दुःख देऊं नको. एवढें माझें पदर पसरून मागणें आहे. आतां मी गेल्यानें माझे आईबापांस दुःख होईल, पण माझे पातिव्रत्यास धक्का न लागतां तें झालें तरी चालेल. हे तिचे शब्द ऐकून राजाचे मनास बिलकूल द्रव न येतां, तो तीस म्हणाला; तूं जर माझें न ऐकशील तर तुझें पातिव्रत्य तर हरण करीनच, पण इतकेंच करून राहणार नाहीं, शेवटीं तुला हाल हाल करून त्या गृहस्थादेखत ठार मारीन. तूं काय समजतेस ? तुझा कैवारी माझेपुढें येणारा असा कोण आहे ? ज्याला तूं आपला भ्रतार मानतेस, त्याची तर छाती माझे पुढें येण्यास कधींही होणार नाहीं. तरी मीही तरुण, शूर, रंजक, सत्ताधीश राजा आहें. मला आज कांहीं कमी नसतां मी तुजवर आज एवढा झटून पडलों, यांतील तूं कांहीं तरी मर्म जाणशील असें मला वाटलें होतें. पण तूं भलताच हट्ट धरून बसली आहेस, याला काय म्हणावें !

ती ह्मणाली, राजा, मला सर्व जगामध्यें फक्त एका प्राण्याची परवा आहे व तोही हल्लीं मजसन्निधच आहे. आतां मरण हें केव्हां तरी आहेच. शंभर वर्षांनीं काय नी आज काय ! तर तूं आतां त्वरा कर आणि पुढें ज्या मला यातना होणार त्यांपासून लवकर मुक्त कर. या जीवाची मला बिलकूल परवा नाहीं. सुखोपभोग घेणें हें दैवाधीन आहे. तूं आपले हात आवरलेस कीं, मीं आपले पाय पसरलेच असें समज. तुजपाशीं कांहीं मागावें तर तें तूं देणार नाहींस अशी माझी पक्की खात्री आहे. तुझी तलवार पहा मजवांचून कशी भुकेलेली दिसते. तर मग आतां विलंब कां करतोस ? तूं राजा असून तुझें मन असें असेल हें मला वाटलें नव्हतें. दुष्टा, चाडांळा ! आपल्या असंख्य पातकांचा घडा निरपराधी स्त्री हत्येवांचून कसा रिता ठेवलास ! नीचा विचार कर ! पण विचार हा पदार्थ तुला मुळींच माहीत नाहीं ! तूं कोणाचा कोण आहेस याची भी जीवंत रहातें तर चौकशी केल्याशिवाय कधीं राहिलें नसतें. पण असो. तूं जर मला कालच्च मारली असतीस, तर तुला अधिक पातक लागतें. परंतु रात्रीं माझी व पतीची गांठ पडल्यानें कांहीं पुण्याईचा भाग तुझे वांट्यास आला. आतां उठ आणि माझा शिरच्छेद कर. हालहाल करून मारण्यापेक्षां एकदम मरण उत्तम. माझे भ्रतारास मात्र जीवदान दे. आतां हें तरी तूं ऐकशील किंवा नाहीं याची शंका वाटते, तरी मी एकवार विनंति करतें. हें तिचें सर्व भाषण राजानें ऐकून तिला कैदेंत टाकण्याचा हुकूम केला आणि सांगितलें कीं, एक महिन्यांत जर मला वश झालीस तर बरें, नाहींतर एक महिन्याचे पुढें तुझा खास शिरच्छेद करीन. तिनें सांगितलें आतां मी तयार असतां महिन्याची मुदत कशाला ? मजविषयीं आपण आशा बाळगूं नये. आज तेंच महिन्यानें, माझे भाषणांत कधींही फरक पडणार नाहीं. ज्याच्या शब्दाचा फरक, त्याच्या पित्याचा फरकच समजला पाहिजे. ज्यांच्या कुळांत या देहाची उत्पत्ति, त्यांचे देहास आतां एक व मग एक असा संपर्क मुळींच नाहीं. व त्यांचीच मी कन्या, तेव्हां माझेकडून तरी विपरीत कसें घडेल ! माझें वाक्य केवळ ध्रुवासारखें समज. अचल आहे तें कधींही चल होणार नाहीं. तर आतां मुदत करूं नको. असो, इतकें जरी तिनें सांगितलें तरी त्यानें आपलें ह्मणणें शेवटास नेलें. तिची खाण्यापिण्याची व्यवस्था ठेवली. आणि त्यानें दररोज सकाळीं संध्याकाळीं

मला वश होतेस कीं नाहीं, असें तिला विचारावें. तिनें जें एकदां मी बोललें तेंच सत्य आहे, असें सांगावें. माझे पाहिजे ते हाल करा, पण मी कांहीं तुम्हाला वश होणार नाहीं. आपण कदाचित् मजवर बलात्कार कराल, तर मी माझे हे लांब केंस गळ्यास आवळून तत्काळ प्राणत्याग करीन, परंतु माझे अंगास तुमचा स्पर्श सुद्धां होऊं देणार नाहीं. मग तर आपले मनाची शांति होईलना ! निर्दया; तुझ्या दुर्गुणाचीं कितीही उदाहरणें दिलीं तरी तीं पुरे होणार नाहींत. आतां इतकेंच सांगतें कीं त्या प्राण्याला व्यर्थ छळूं नको व माझा अंत झाल्याबरोबर त्याला सोडून दे. त्याचे जिवास जर कांहीं ईजा झाली, तर तुझे कपाळीं मोठा वनवास येईल. तूं तर त्याला जाणत नाहींस तरी मी तुला सदय अन्तःकरणानें इतकेंच सांगतें कीं तो तुझी धुंदी एका क्षणांत उतरील. तुझें व त्याचें पिता पुत्राचें नातें आहे. हे शब्द ऐकल्यावर त्याचे मनांत कांहीं चमत्कारीकसें वाटलें व नंतर त्यानें त्याचेकडे एकांतीं जाऊन त्याचे पायावर डोकी ठेविली आणि ह्मणाला, आपलें खरें वृत्त काय असेल तें मला सांगा. त्यानें सांगितलें कीं, जें कांहीं माझें तथ्य होतें तें मीं तुला एकवार सांगितलें. आतां वारंवार मला विचारून त्रास देऊं नकोस. “ सांपळ्यामध्यें व्याघ्र सांपडे, बायका मुलें मारिती खडे ” याचप्रमाणें माझी तूर्तची स्थिति आहे. यांत तूं नवल तें काय केलेंस ! जिच्याकरितां मीं येवढा वनवास शिरावर घेतला तिची व माझी भेट झाली व माझे सर्व कृत्यांचें साफल्य झालें. आतां मला काय करायचें उरलें आहे ? या मृत्युलोकीं आलेला प्राणी केव्हां तरी जाणारच. आतां मीं आपले मातापितरांस वृद्धापकाळीं दुःख दिलें, ही गोष्ट मात्र सामान्य वाईटांतली नाहीं. असो, तूं कोणीही ऐस. मला या वेळीं राजा आणि रंक सारखेच आहेत. परंतु जीवर माझें प्रेम ती तर माझे सन्निध आहे. तुला माझें काय करणें असेल तें कर. तुजविषयीं माझे मनांत नानातऱ्हेचे तरंग येतात, तथापि मी ते सर्व विचारानें मागें सारतों. यांतील हेतु इतकाच कीं, मीं आपले मनाचा असा निश्चयच केला आहे कीं, माझ्यावर कसलेंही संकट आलें तरी मी दुसऱ्यास त्रास देणार नाहीं. ज्ञानांनीं ज्यांची अंतःकरणें प्रकाशित असतात, त्यांचे पुढें धर्म व नीति कशी चाकराप्रमाणें नांदते. विचारशून्य राजा, दुसऱ्याच्या स्त्रीवर बलात्कार करून सुखोपभोग घेण्याची

इच्छा करतोस, हें शेवटास कसें जाणार ? राजा म्हणाला, तुम्ही जसें निस्पृह साधू दिसतां, तसा मी नाहीं. माझे मनांत तर ती प्रिया हरण करून तिच्याशीं यथेच्छ सुखोपभोग घ्यावा असें आहे, पण तिचें मन राजी नाहीं. तरी नळराजानें दमयंतीविषयीं जशी सर्व देवास मदत केली, तशी तूं मला कर म्हणजे हिची गंमत तुला दाखवितों. तूं जवळ असल्यानें हा सर्व घोटाळा होतो. यती म्हणाला, राजा, व्यर्थ भ्रमांत पडूं नको. ती साध्वी फार थोर पतिव्रता आहे. जिनें आपले सर्व सुखास लाथ मारली व मजकरितां रान सेविलें ती तुझे असे अपमानाचे शब्द ऐकून घेईल काय ?! पण करते काय हें सर्व प्रसंगच सहन करवितो! तिच्या शरीराचे अवयव कृश होऊन तिची कांति भ्रष्ट झाली, तरी तिचें मन किती बळकट आहे. जो दृढनिश्चय तिनें स्वीकारला तो ती कधींही सोडणार नाहीं. या जगांत जीवापेक्षां अधिक कशाचीही कोणास परवा नाहीं. पण तिनें मजकरितां आपलें शिर कसें तळहातावर घेतलें आहे ! तरी आतां आपण जें कांहीं कर्तव्य असेल तें खुशाल करा. मी आपणास मदत करतों. पण आपली व माझी या बाबतींत प्रतिज्ञा व्हावी. मग कोणत्या कार्यास आरंभ करणें तो करावा. नंतर त्या राजानें सर्व लोक जमवून अशी प्रतिज्ञा केली कीं, मी सहा महिनेपर्यंत त्या सुंदरीस छेडून पाहीन व तिचे जिवास धक्का न लावतां ती मला वश झाली तर बरें, न वश झाली तर या दोघांस सोडून देईन. ही प्रतिज्ञा सर्व लोकांस मान्य झाली. नंतर राजानें प्रथमतः तिला अंधारकोठडींत कोंडून ठेवली व खाण्या पिण्याशिवाय तीन दिवस उपाशी मारलें. उलटी टांगून तोंड बंद केलें. फिरून सोडली. नंतर हात पाय बांधून खांबास आवळली, तुझा नवरा मेला व आतां तूं काय करणार? असें सांगितलें ! कधीं खाण्यास दिलें, कधीं न दिलें, नाना शब्दांनीं तिचा आपमान केला, व आंथरण्यास अगर पांघरण्यास नाहीं असें कैक दिवस केलें, कित्येक दिवस स्नान नाहीं. एक तांब्याभर पाण्यांत तिनें सर्व कृत्यें करावीं. याप्रमाणें तिनें कारागृहांत दिवस काढावे व रात्रंदिवस हीच काळजी करावी कीं, हे दुष्ट मला इतकी छळतात व त्रास देतात, त्यापेक्षां एखादे हिंसक पशू पुढें कां नेऊन टाकीत नाहींत ! पुढें तिनें एक दिवस राजास तसें कळविलें. नंतर राजानेंही तें ऐकून दुसरे दिवशीं एक मोठा पठाणी वाघ आणवून तिचे खोलींत सोडला. सर्व लोकांस वाटलें कीं तो

तिजवर झाप घालून तिला खास फाडून खाईल. पण त्यांचें सर्व वाटणें निष्फळ झालें. कारण तो वाघ त्या खोलींत जातांच त्यानें तिला पाहून मोठ्या ममतेनें हुंगलें आणि आपली मान खालीं घालून डोळ्यांतून पाणी ढाळलें आणि परत निघून गेला! राजानें हें पाहून त्यास फार वाईट वाटलें.व तेथील सर्व जमल्या लोकांनीं हा चमत्कार पाहून ते मोठ्या आश्चर्यसमुद्रांत पडले व ह्मणूं लागले कीं यांचें नांव पातिव्रत्य वाघाचें शौर्य ! खरा शूर असतो तो स्त्री जातीचे अंगावर कधींही जात नसतो. यावरून हा वाघ खरा शूर आहे यांत संशय नाहीं. हें सर्व बोलणें राजानें ऐकून त्यास मोठा पश्चात्ताप झाला आणि ह्मणूं लागला कीं, अज्ञान पशु असून या स्त्रियेस त्रास न देतां निघून गेला, यांचेंच नांव खरें शूरत्व. असो, नंतर राजानें दुसरे दिवशीं तिला हत्तीचे पायाशीं बांधून सर्व रस्त्यानें तीस फिरवावें या हेतूनें हत्ती सोडला. परंतु त्या हत्तीनें तिला पाहतांच आपले शिरावर उचलून घेतलें. हा दुसरा चमत्कार पाहून सर्वांचीं अन्तःकरणें दुभंग होऊन गेलीं. राजानें तर आपले मनांत पक्की गांठ दिली कीं येथें कांहीं तरी सत्त्व आहे यांत बिलकुल शंका नाहीं. ही साध्वी जोंपर्यंत खवळली नाहीं, तोंपर्यंत ठीक आहे, पण जर खवळेल तर खरोखर माझें भस्म करून टाकील. असो, काय होईल तें होवो ! नंतर दुसरे दिवशीं मोठमोठाले नाग तिच्या अंगावर सोडले. हें पाहून तिचें मन तर कांहीं चळलें नाहीं. पण ते नाग सर्प तिजपुढें जातांच इकडे तिकडे तिच्या आसपास फिरूं लागले. तिच्या शरिरास नुस्ता स्पर्श सुद्धां कोणीं केला नाहीं ! सर्व नाग तिच्याकडे पाहून आपल्या फणा काढून आनंदानें डुलूं लागले. हा चमत्कार मात्र पाहून राजाची खात्री झाली कीं, आतां छळण्याची सीमा झाली. माझ्यासारखा दुष्ट दुसरा कोणीही नसेल. मीं जो या साध्वीस त्रास दिला, त्याचा मोबदला मला केव्हां नाहीं केव्हां तरी मिळून भोगलाच पाहिजे. असें ह्मणून पुन्हां मनांत विचार करतो कीं, आतां ही फार जेर झाली असेल, तर तिला एकवार विचारावें, असा विचार करून तीस विचारलें, कायग पोरी; तूं माझें ऐकतेस कीं नाहीं ? कबूल हो ह्मणजे झालें. ती हसत हास उत्तर देती झाली कीं, राजा, तुला वाटेल तें कर. माझी आशा धहें मूर्खपणाचें लक्षण आहे..मीं तर जो तुला एकवार बाप ह्मटला तेव्हां जिव्हा तुटून पडली तरी खोटें होणार नाहीं. माझे मुखावाटें अन्य श-

ब्द कधींच निघणार नाहीं. हें जो त्यांचें बोलणें चाललें आहे, तों इतक्यांत बोलण्याचे गडबडींत एक मोठा नाग हळूच जाऊन त्यानें राजाचे गळ्यास वेढा घातला व तेणेंकरून राजा फार व्याकुळ होऊन जमिनीवर पडला. सर्व लोक जमले व जो कलकलाट झाला तो लिहितां पुरवत नाहीं. सर्व लोक दुरून दुरूनच आतां काय उपाय करावा, याचा विचार करूं लागले. पण जवळ जाण्यास कोणाचीही छाती होईना. कोणी ढाल तलवार, कोणी बरची, कोणी भाला घेऊन राजाजवळ जाऊं लागले, पण ते थोडे पुढें सरतात न सरतात तों त्या नागानें एकदम फूत्कार करून त्यांचें अंगांवर आला. नंतर सर्व लोक जेथल्या तेथें तटस्थ उभे राहिले. करतात काय ! ज्याची त्याला आपले जीवाची आशा आहेच. त्याप्रमाणें ते आपले मनांत ह्मणूं लागले कीं, साध्वीचा छल केल्याबद्दल हें राजास प्रायश्चित्त मिळालें ! नंतर प्रधानानें तिचे नवऱ्यास बोलावून आणलें. आणि ह्मणाला, राजास ईश्वरानें कशी शिक्षा केली ती पहा. तो यती येतांच त्यानें ती आपली स्त्री अशा संकटांत उभी पाहून ह्मणाला, हर ! हर ! या वेळेस राजास कोण क्षमा करील ! असें ह्मणून तो एकदम त्या सर्प नागांमधून कांहींएक विचार न करितां तिचे जवळ जाऊन तिचे गळ्यास मिठी मारून मोठ्यानें रडूं लागला. तेव्हां दुसरे राजाचे सेवकही त्याचे जवळ जाऊं लागले, तों ते नाग त्यांचे अंगांवर फुसकारूं लागले व कोणासही वाट देईनात. नंतर सर्व लोक ईश्वराची स्तुति करूं लागले. कोणी आमचे राजास या दुष्ट नागापासून सोडिव अशाबद्दल देवास नवस करूं लागले. कोणी रडतात, कोणी ओरडतात, कित्येक आपलीं नाकें देवापुढें घासतात व कोणी कपाळ आपटतात. असा सर्व एकच गोंधळ होऊन गेला. पण तो नाग राजास सोडून गेला नाहीं. नंतर त्यांत कांहीं विचारी लोक होते, ते ह्मणूं लागले कीं, या राजास ही शिक्षा योग्यच आहे. राजा; अद्याप तरी सावध हो. आणि त्या साध्वीला सोडून दे. मग राजानें मोठ्या जुलमानें प्राणावर गुदरली हें जाणून दोन्ही हात जोडून ह्मटलें,—देवा, मला माझे दुष्ट कृत्याचा पश्चात्ताप झाला. आतां या साध्वीस मी न छळतां सोडून देतों. हे नागराजा, मी तुह्मांस अनन्य भावें शरण आहें, मला प्राणदान द्या. असें पुष्कळ देवास व नागास विनविलें तरी तो नाग त्यास सोडीना. मग त्यांतील एक गृहस्थ ह्मणाला, महाराज, तिचेमुळें तुह्मास हा अपाय